







# वार्षिक अहवाल
# २०२४–२५

**महानिर्मिती**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

CIN NO. U40100MH2005SGC153648

**वीजनिर्मिती - पिढ्यानुपिढ्यांसाठी**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल
## २०२४-२०२५

# वार्षिक अहवाल २०२४-२०२५

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ०१ |
| संचालक मंडळाचा अहवाल | ०३ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ३० |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (स्वायत्त) | ४१ |
| ताळेबंद (स्वायत्त) | ६६ |
| नफा-तोटा विवरण (स्वायत्त) | ६८ |
| समभाग भांडवलाचे विवरणपत्र (स्वायत्त) | ६९ |
| रोकड प्रवाह विवरण (स्वायत्त) | ७० |
| वित्तीय विवरण पत्रात येणाऱ्या अनुसूची (स्वायत्त) | ७२ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (एकत्रित) | १३७ |
| ताळेबंद (एकत्रित) | १४९ |
| नफा-तोटा विवरण (एकत्रित) | १५१ |
| समभाग भांडवलाचे विवरणपत्र (एकत्रित) | १५३ |
| रोकड प्रवाह विवरण (एकत्रित) | १५४ |
| वित्तीय विवरण पत्रात येणाऱ्या अनुसूची (एकत्रित) | १५६ |
| दिर्घ मुदतीची कर्जे | २२२ |
| अल्प मुदतीची कर्जे | २४१ |
| महानिर्मिती प्रकल्प | २४२ |

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**संचालक मंडळ**

**(१-०४-२०२४ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिनांक ०८-०१-२०२६ पर्यंत)**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | : | श्री. राधाकृष्णन बी. (२६.१२.२०२४ पासून)<br>डॉ. श्री. पी. अन्बलगन (अतिरिक्त भार ०६.०१.२०२५ पासून ३१.०१.२०२५ पर्यंत)<br>डॉ. श्री. पी. अन्बलगन (३०.०९.२०२२ पासून २६.१२.२०२४ पर्यंत) |
| संचालक (वित्त) | : | श्री. मनेष वाघीरकर (०९.०७.२०२५)<br>श्री. बाळासाहेब थिटे (१५.०९.२०२० पासून ०९.०७.२०२५ पर्यंत) |
| संचालक (संचलन) | : | श्री. संजय मारूडकर (०७.०२.२०२३ पासून) |
| संचालक (प्रकल्प) | : | श्री. अभय हरणे (२०.०६.२०२३ पासून) |
| संचालक (इंधन) | : | श्री. अभय हरणे (अतिरिक्त भार २६.०९.२०२४ पासून)<br>श्री. धनंजय सावळकर (अतिरिक्त भार १७.०७.२०२३ पासून २६.०९.२०२४ पर्यंत) |
| संचालक | : | श्रीमती आभा शुक्ला (२१.११.२०२२ पासून) |
| संचालक | : | श्री. विश्वास पाठक (२३.०८.२०२२ पासून) |

# संचालकांचा अहवाल

प्रिय सदस्य,

आपल्या कंपनीचा २० वा वार्षिक अहवाल आणि त्यासोबत दि.३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरिक्षित वार्षिक लेखे सादर करण्यास, आपल्या संचालक मंडळाला आनंद होत आहे.

**वित्तीय निष्कर्ष (स्वायत्त)**

(₹ कोटीत)

| तपशील | २०२४-२५ | २०२३-२४ पुनर्लिखित |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| वीज विक्रीपासून महसूल (निव्वळ) | ३४३५५.७८ | २९६७४.८६ |
| इतर प्रवर्तन महसूल | २७१.७३ | ४०३.२७ |
| इतर उत्पन्न | ३७०६.०७ | ३०११.१६ |
| **एकत्रित उत्पन्न** | **३८३३३.५८** | **३३०८९.३०** |
| **खर्च** | | |
| वापरलेल्या मालाचा खर्च | २३३३१.७१ | २२१२४.४२ |
| खरेदी केलेली वीज | ५३१.३६ | ५५५.७२ |
| कर्मचारी खर्च | २१५६.१७ | २२९१.४६ |
| वित्त खर्च | ३६२६.०३ | ३६१२.४० |
| घसारा/मूल्यह्रास खर्च | २९७९.२६ | २६९४.२४ |
| इतर खर्च | ५६४७.५० | २३०१.९२ |
| अपवादात्मक बाबी व करपूर्व नफा/(तोटा ) | ६१.५५ | (४९०.८६) |
| अपवादात्मक बाबी (आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अधिभाराच्या वाजवी मूल्यमापनासाठी केलेल्या तरतुदीचे पुनर्लेखन) | (५३४.३९) | (७९६.३४) |
| **अपवादात्मक बाबी नंतर नफा /(तोटा)** | **५९५.९५** | **३०५.४८** |
| वजा: कर निव्वळ (स्थगित कर खर्चासहीत चालू कर) | २३५.९७ | १६९.७९ |
| **निव्वळ करोप्रर नफा /(तोटा)** | **३५९.९७** | **१३५.६९** |
| अधिक: इतर सर्वंकष उत्पन्न/(खर्च) (नफा आणि तोटा यामध्ये पुनवर्गीकरण न होणाऱ्या बाबी) | (५५.९२) | (१२८.४३) |
| **करानंतरच्या कालावधीतील एकूण सर्वंकष उत्पन्न / (तोटा)** | **३०४.०६** | **७.२७** |

**(अ) वित्तीय कामगिरी**

**वीज विक्रीपासून महसूल** - आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये वीज विक्रीतून मिळणारे उत्पन्न लक्षणीयरीत्या १५.७६% ने वाढले. म्हणजेच आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ₹ २९,६७४ कोटींवरून ते आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ₹ ३४,३५६ कोटींवर पोहोचले. ही वाढ प्रामुख्याने उत्पादन कार्यक्षमतेतील सुधारणा आणि उच्च प्रेषण प्रमाणामुळे झाली आहे. या वाढीतील प्रमुख कारणांमध्ये ₹ २,८१४ कोटींच्या एमईआरसीने जारी केलेल्या विद्युत दरातील वाढ करण्याच्या आदेशाच्या बिलांची नोंद, ₹ ८३० कोटींचे इंधन समायोजन शुल्क (एफएसी), ₹ २०० कोटींचे नुकसानभरपाई, तसेच ३.३०% दरवाढ यांचा समावेश झालेला आहे. या सर्व घटकांनी मिळून कंपनीच्या मुख्य वीज व्यवसायाच्या शीर्षरेषीय कामगिरीत वाढ केली.

**इतर प्रवर्तन महसूल**–इतर प्रवर्तन महसूल मागील वर्षातील ₹ ४०३ कोटींवरून घटून ₹ २७२ कोटीवर आले. ही घट प्रामुख्याने आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये वॉशरी रिजेक्ट विक्रीची नोंद असामान्यरीत्या जास्त प्रमाणात झाली त्यामुळे आहे. यामध्ये बिलांच्या उशिरा प्राप्तीमुळे आर्थिक वर्ष २०२२- २३ आणि २०२३-२४ या दोन्ही वर्षांचे बिजके आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये समाविष्ट झाले होते. एकाच वर्षी दोन्ही वर्षाच्या बिजकांची नोंद झाल्यामुळे, २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे आकडे फुगलेले दिसले, ज्यामुळे चालू वर्षाचे उत्पन्न तुलनेने कमी दिसत आहे.

**इतर उत्पन्न**–इतर उत्पन्न ₹ ३,०११ कोटींवरून वाढून ₹ ३,७०६ कोटींवर पोहोचले, ज्यामुळे ₹ ६९५ कोटींची वाढ दिसून येत आहे. ही वाढ प्रामुख्याने ₹ ४७५ कोटींच्या अधिभार बिजकामध्ये वाढ झाल्यामुळे आहे, ज्यामध्ये चालू वर्षातील अधिभार बिले ₹ ३,१४९ कोटी इतकी होती, तर मागील वर्षात ती ₹ २,६७४ कोटी होती. याशिवाय, विलंब भरणा अधिभार (एलपीएस) आणि परिसमापनातील

नुकसानभरपाई (एलडी) यांमधून झालेली अधिक वसुलीही इतर उत्पन्नातील एकूण वाढीस कारणीभूत ठरलेली आहे.

**एकत्रित उत्पन्न** - वरील घटकांच्या परिणामस्वरूप, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये एकत्रित उत्पन्न वाढून ₹ ३८,३३४ कोटींवर पोहोचले, जे आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये नोंदवलेल्या ₹ ३३,०८९ कोटींच्या तुलनेत १५.८३% वाढ दर्शवते.

**वापरलेल्या मालाचा खर्च** - वापरलेल्या मालाचा खर्च ₹ २२,६८० कोटींवरून वाढून ₹ २३,८६३ कोटींवर पोहोचला. ही वाढ प्रामुख्याने प्रति मेट्रिक टन ₹ १५० (सुमारे ३%) इतक्या कोळशाच्या दरवाढीमुळे, उरण येथील जीटी ५ युनिट (जे मागील वर्षी बंद होते) सुरू झाल्यामुळे येथे ₹ ३८८ कोटींच्या गॅस वापरामुळे, तसेच एसटिपी प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र येथे पाणी खर्चासाठी झालेल्या अतिरिक्त ₹ ४७ कोटींच्या खर्चामुळे झाली आहे.

**कर्मचारी खर्च**–कर्मचारी खर्च ₹ २,२९१ कोटींवरून ₹ २,१५६ कोटींवर आला. हा खर्च कमी झाला असून त्याच्या कारणांमध्ये प्रामुख्याने ₹ ७५ कोटींच्या उपादान व रजा तरतुदीतील कपात तसेच ₹ १४५ कोटींच्या थकबाकी तरतुदीतील घट यांचा समावेश आहे. मागील वर्षी अंमलात आणलेल्या वेतनश्रेणी पुनरावलोकनानंतर झालेल्या स्थिरीकरणाचे हे प्रतिबिंब आहे.

**वित्त खर्च**–वित्त खर्च आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ₹ ३,६१२ कोटींच्या तुलनेत यावर्षी ₹ ३,६२६ कोटी इतके स्थिर राहिले. या किरकोळ वाढीचे कारण मध्यमकालीन व कार्यकारी भांडवल कर्जावरील व्याजात ₹ १८५ कोटीची वाढ आहे जी दीर्घकालीन कर्जावरील व्याजात ₹ १६७ कोटींची घट झाल्यामुळे संतुलित झाली आहे. परिणामी, वित्त खर्चाचे स्वरूप संतुलित राहिले.

**घसारा व मूल्यह्रास खर्च**–घसारा व मूल्यह्रास खर्च ₹ २,६९४ कोटींवरून वाढून ₹ २,९७९ कोटींवर पोहोचला असून, हे भुसावळ ६६० मेगावॅट युनिट, कोराडी औष्णिक वीज केंद्र येथील पाइप कन्व्हेयर तसेच साक्री सोलार (२५×२ मेगावॅट) यांसारख्या नव्या मालमत्तांच्या भांडवलीकरणाचे प्रतिबिंब आहे. याशिवाय, जुन्या चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र येथील मालमत्तांची उपयुक्त आयुष्यकालावधी पूर्ण झाल्यामुळे घसारा खर्चात वाढ झाली आहे.

**इतर खर्च** - इतर खर्चांमध्ये तीव्र वाढ होऊन ते ₹ २,३०२ कोटींवरून ₹ ५,६४८ कोटींवर पोहोचले. यामध्ये मुख्यत्वे नियामक शुल्कासाठी केलेली तरतूद तसेच जास्तीचे कार्यकारी खर्च यांचा समावेश आहे. प्रमुख घटकांमध्ये संशयास्पद थकबाकींसाठी केलेली ₹ ३,००४ कोटींची तरतूद, दुरूस्ती व देखभालीसाठी ₹ १७६२ कोटींचा खर्च तसेच डीएसएम शुल्कासाठी ₹ २१७ कोटींचा खर्च इत्यादींचा समावेश आहे.

परिणामी, आयकरासाठी तरतूद करून व इतर सर्वसमावेशक उत्पन्नाचे समायोजन केल्यानंतर, निव्वळ नफा ₹ ३०४ कोटी इतका झाला असून, मागील वर्षातील (पुनर्लिखित) ₹ ७ कोटींच्या तुलनेत तो लक्षणीयरीत्या वाढलेला आहे.

**ब. प्रवर्तनातील कामगिरी**

**१) महानिर्मिती कंपनीची स्थापित क्षमता दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी:**

- एकूण स्थापित क्षमता: १३८८० मेगावॅट
- कोळसा आधारित औष्णिक वीज निर्मिती क्षमता: १०२०० मेगावॅट
- वायु आधारित स्थापित क्षमता: ६७२ मेगावॅट
- जल विद्युत निर्मिती क्षमता: २५८० मेगावॅट
- सौर वीज प्रकल्पांची क्षमता: ४२८ मेगावॅट इतकी होती.



**२) उत्पादन कामगिरी–**

आढाव्याच्या वर्षात महानिर्मिती ने ऐतिहासिकदृष्ट्या सर्वाधिक वीज निर्मिती साध्य केली असून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ६१,४५३ दशलक्ष युनिट्स इतकी निर्मिती झाली, जी मागील आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ६१,४३९ दशलक्ष युनिट्स आहे. वार्षिक औष्णिक वीज निर्मिती आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५४,५४२ दशलक्ष युनिट्स इतकी झाली असून, ती आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ५५,६७० दशलक्ष युनिट्स आहे. औष्णिक ऑन बार उपलब्धता घटक आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ८७.२१% पर्यंत सुधारला असून, तो आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ८६.१९% होता. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी संयंत्र भार अंक (पीलएफ ) ७२.८९% इतका होता, जो मागील वर्षातील ७१.१५% होता. वायु आधारित वीज निर्मिती आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये २,४७३ दशलक्ष युनिट्स इतकी झाली असून, ती मागील वर्षातील १,७६९ दशलक्ष युनिट्सच्या तुलनेत अधिक आहे. जलविद्युत निर्मिती वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये ४,०५३ दशलक्ष युनिट्स इतकी झाली असून, ती मागील वर्षी ३,६६८ दशलक्ष युनिट्स होती. सौर वीज निर्मिती आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३८५ दशलक्ष युनिट्स इतकी झाली असून, ती मागील वर्षी ३२९ दशल दशलक्ष युनिट्स होती . विशिष्ट तेलाचा वापर आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १.३० मि.ली./किलोवॅट-तास इतका होता, जो मागील वर्षातील १.२६ मि.ली./किलोवॅट-होता. सहयोगी वीज वापर आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ९.०३% इतक इतका आहे, जो मागील वर्षात ८.८४% इतका होता. स्टेशन हीट रेट (एचआर) आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कमी होऊन २५४९ किलोकॅलरी/किलोवॅट-तास इतका झाला असून, तो मागील वर्षातील २६८९ किलोकॅलरी/किलोवॅट-तास होता. कोळशाचा वाहतूक नुकसानदर आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कमी होऊन ०.७३% इतका झाला असून, तो आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ०.९४% इतका होता.

**३) एकूण वीज निर्मिती–दशलक्ष यूनिटमध्ये**




| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| महानिर्मिती वीजनिर्मिती • | ५०१८९ | ५४४७६ | ५७७३४ | ६१४३९ | ६१४५३ |
| औष्णिक वीजनिर्मिती • | ४३८८० | ४७६३६ | ५१६१८ | ५५६७० | ५४५४२ |

**लाभांश**

कंपनीच्या प्रचंड भांडवली खर्च योजनांचा विचार करता व त्यासाठी आवश्यक असलेल्या समभाग निधीच्या गरजेमुळे, संचालक मंडळाने निर्माण झालेला रोख अधिशेष असल्यास, चालू विस्तार प्रकल्प व भावी भांडवली खर्च योजनांमध्ये पुनर्निवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आढाव्याच्या वर्षासाठी लाभांश जाहीर करण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली नाही.

**नवीन क्षमता वाढ:**

**१. क्षमता वाढीचे कार्यक्रम:**

**औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प–**

महानिर्मिती कंपनीने ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात विविधता आणण्याचे ध्येय यापूर्वीच ठरविलेले असून महाराष्ट्र राज्याची भविष्यातील ऊर्जेच्या गरजा पूर्ण करणारी जबाबदार वीज निर्मिती संस्था होण्याचे ध्येय अंगिकारले आहे . त्याला अनुसरून महानिर्मितीने कोळश्यावर आधारित वीज निर्मिती करणारे नवे प्रकल्प हाती घेतले आहेत- तसेच प्रस्थापित केले आहेत. या प्रकल्पासाठी अत्यंत कार्यक्षम व अद्ययावत तंत्रज्ञानाचे अधिष्ठान असेल जे महानिर्मितीच्या जुन्या स्थापित क्षमतेची जागा घेतील .

**अ. विद्यमान औष्णिक वीज निर्मिती केंद्रे**

**१. भुसावळ औष्णिक वीज केंद्रातील युनिट ६(१×६६० मेगावॅट):**

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये व प्रगती पुढीलप्रमाणे आहे**

आढावा वर्षात कंपनीने हा ६६० मेगावॅटचा प्रकल्प, एकूण ३ (प्रत्येकी २१० मे.वॅट क्षमता असलेले) बंद यूनिटस् च्या बदली वीज निर्मिती करणारा प्रकल्प म्हणून चालू केला आहे. सदर प्रकल्पाचे व्यावसायिक संचालन दिनांक २१.०२.२०२५ रोजी घोषित करण्यात आले आहे.

**२. कोराडी औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प (२×६६० मेगावॅट):**

महाराष्ट्र शासनाने जुन्या युनिट्सच्या जागी कोराडी औष्णिक वीज केंद्रे येथे २×६६० मेगावॅट सुपरक्रिटिकल कोळसा प्रकल्पास २०१९ मध्ये मंजुरी दिली होती. महाराष्ट्र वीज नियामक आयोग व महावितरण यांनी तत्वत: मंजुरी प्रदान केली आहे. कोळसा लिंकेजेस हे २०२३ मध्ये आलेल्या 'शक्ती' धोरणांतर्गत मंजूर करण्यात आले. ग्रीड कनेक्टिव्हिटी, पर्यावरणीय मंजुरी तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापनेसाठी संमती २०२४-२५ मध्ये प्राप्त झाली. बीटीजी करार बीएचईएलला प्रदान करण्यात आले असून, बीओपी ऑक्टोबर २०२५ मध्ये अंतिम करण्यात आले. प्रकल्प पूर्णत्वाचे लक्ष्य वित्तीय वर्ष २०२९-३० साठी निश्चित करण्यात आले आहे.

**ब. औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाच्या योजना नियोजनाखाली**

**१. उरण वायु आधारित वीज केंद्रातील यंत्रणा बदलणे प्रकल्प (८५० मेगावॅट):**

महानिर्मितीने मुंबई ग्रिड मजबूत करण्यासाठी वायु आधारित वीज केंद्र उरण येथे ८५० मेगावॅट क्षमतेचा संयुक्त साखळी पुनर्स्थापन प्रकल्प प्रस्तावित केला आहे. या प्रकल्पाच्या डीपीआरला मार्च २०२२ मध्ये संचालक मंडळाची मंजुरी मिळाली असून, अंदाजे खर्च ₹ ३५६७.६१ कोटी (व्याजाचे भांडवलीकरण व जीएसटी वगळून) आहे.महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीने या प्रकल्पाला जून २०२२ मध्ये तत्त्वत: मंजुरी दिली असून, २०% समभाग गुंतवणुकीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे. या संदर्भात सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, डीपीआरला महानिर्मिती व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी या दोन्ही संचालक मंडळांची मंजुरी मिळाली आहे. महावितरण सोबत वीज खरेदी करारावर स्वाक्षरी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. एव्हिएशन क्लिअरन्स फेब्रुवारी २०२३ मध्ये प्राप्त झाले असून, पर्यावरणीय व इतर कायदेशीर मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी नियुक्त एपीएम गॅसच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे, ज्याबाबत पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाशी चर्चा सुरू आहे.

**२. चंद्रपूर औष्णिक विद्युत प्रकल्प (१×८०० मेगावॅट):**

महानिर्मिती चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र येथे १×८०० मेगावॅट क्षमतेचा नवीन युनिट उभारण्याचा विचार करीत आहे. या प्रकल्पासाठी तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अहवाल सल्लागारामार्फत पूर्ण करण्यात आला असून डीपीआर तयार करण्यात आला आहे. संचालक मंडळाने या प्रस्तावास तत्त्वत: मंजुरी दिली असून सविस्तर प्रकल्प अहवालास मंजुरी मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**३. पारस औष्णिक विद्युत प्रकल्प (१×८०० मेगावॅट):**

महानिर्मिती पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे १×८०० मेगावॅट क्षमतेचा नवीन युनिट उभारण्याचा विचार करीत आहे. नियुक्त सल्लागारामार्फत तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्याची कामे सुरू आहेत. या प्रकल्पासाठी नवीन जमीन संपादन करण्याच्या शक्यतेचा अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

**४. भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्प (१×८०० मेगावॅट):**

महानिर्मिती भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे १×८०० मेगावॅट क्षमतेचा नवीन युनिट उभारण्याचा विचार करीत आहे. या प्रकल्पासाठी तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता याचा अभ्यास सध्या सुरू आहे.

**२. प्रदूषण नियंत्रण उपकरण स्थापना प्रकल्प:**

पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांच्या दिनांक ०७.१२.२०१५ च्या अधिसूचनेनुसार, औष्णिक विद्युत केंद्रांसाठी सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड व सूक्ष्म घन पदार्थ यांसाठी नवीन उत्सर्जन मानके अनिवार्य करण्यात आलेली आहेत. या निर्देशांचे पालन करण्यासाठी महानिर्मिती आपल्या कोळसा-आधारित केंद्रांमध्ये प्रदूषण नियंत्रण उपकरणांची स्थापना व पुनर्स्थापना करण्याचे काम हाती घेत असून, अंमलबजावणीची स्थिती प्रगतीपथावर आहे.

### २.१ वायूचे निर्गधकीकरण (एफजीडी) उपकरण स्थापना:

भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांच्या अधिसूचनेनुसार, सुधारित सल्फर डायऑक्साइड उत्सर्जन मानकांचे पालन करण्यासाठी महानिर्मिती आपल्या कोळसा-आधारित औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये वायूचे निर्गधकीकरण (एफजीडी) प्रणालीची अंमलबजावणी करीत आहे.

पारस युनिट क्र. ३ व ४ येथे काम ६९% पूर्ण झाले असून एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. परळी युनिट क्र. ६, ७ व ८ येथे ४५% प्रगती साध्य झाली असून जानेवारी २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. चंद्रपूर युनिट क्र. ५ ते ९ हे पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांच्या जुलै २०२५ च्या अधिसूचनेनुसार पुनरावलोकनाधीन असून, मानकांची लागू शक्यता प्रकरणनिहाय ठरविण्यात येणार आहे. भुसावळ युनिट क्र. ४ व ५ यांना त्याच अधिसूचनेनुसार सल्फर डायऑक्साइड मानकांपासून सूट देण्यात आलेली आहे.

कोराडी युनिट क्र. ८ ते १० साठीचा पूर्वीचा करार जून २०२५ मध्ये समाप्त करण्यात आला असून, डब्ल्यूएफजीडी स्थापनेसाठी नवीन निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. चंद्रपूर युनिट क्र. ३ व ४ हे देखील पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांच्या जुलै २०२५ च्या अधिसूचनेनुसार पुनरावलोकनाधीन आहेत. खापरखेडा युनिट क्र. १ व २ येथे ८०% काम पूर्ण झाले असून एप्रिल २०२६ पर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

हे महानिर्मिती च्या सातत्यपूर्ण अनुपालन प्रयत्नांचे प्रतीक असून, अंमलबजावणीतील प्रगती व बदलत्या नियामक निर्देशांमध्ये संतुलन राखले जात आहे.

### २.२ इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर (इएसपी) अद्ययावतकरण:

महानिर्मिती उत्सर्जन मानकांचे पालन करण्यासाठी इएसपी पुनर्स्थापना करीत आहे. खापरखेडा युनिट क्र. १ व २ (२×२१० मेगावॅट) येथे डिझाईन अभियांत्रिकी व स्थळावरील कामे सुरू असून, हे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होण्याचे लक्ष्य आहे. चंद्रपूर युनिट क्र. ५ व ६ (२×५०० मेगावॅट) येथे डिझाईन अभियांत्रिकी जवळपास पूर्ण झाले असून, पुरवठा मोठ्या प्रमाणात पूर्ण झाला आहे. युनिट क्र. ६ चे स्थापत्यकाम ५०% पूर्ण झाले असून, डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

## ३. पर्यावरण संरक्षणाच्या आणि नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब प्रकल्प:

प्रदूषण कमी करण्यासाठी आणि कोळसा वाहतूक कार्यक्षमता सुधारण्यासाठी महानिर्मितीने पाईप कन्व्हेयर प्रकल्पाची अमंलबाजवणी सुरू केली आहे. भाताडी येथील कोळसा खाणीपासून चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रापर्यंत कोळसा पोहोचवण्यासाठी चंद्रपूर पाईप कन्व्हेअर योजना कार्यरत आहे आणि कोराडी–खापरखेडा पाईप कन्व्हेयर योजनेची स्थिती पुढीलप्रमाणे आहे–

**पाईप कन्व्हेयर योजना–कोराडी व खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र**

भानेगाव व सिंगोरी खाणींमधून खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रापर्यंत कोळसा पाइप कन्व्हेयर प्रणाली पूर्ण करण्यात आली असून कोळसा वाहतूक कार्यरत आहे. कोराडी औष्णिक विद्युत केंद्रापर्यंतची कन्व्हेयर प्रणाली नोव्हेंबर २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. गोंडेगाव खाणीपासून भानेगाव आय.पी. बंकरपर्यंतच्या कन्व्हेयरचे उभारणीचे काम सध्या सुरू असून ते सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

## ४. महानिर्मितीद्वारे राबविण्यात येणारी पंप स्टोरेज प्रकल्पे-

महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) द्वारे पंप स्टोरेज प्रकल्प (पीसपी) विकसित करण्यासाठी २० डिसेंबर २०२३ रोजी एक शासकीय ठराव जारी केला. महानिर्मिती, जलसंपदा विभाग (एमकेव्हीडीसीमार्फत) व एसजेव्हीएन लिमिटेड यांच्या संयुक्त उपक्रमातून एकूण ३२२५ मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचा उद्देश ऊर्जा साठवण क्षमता वाढविणे, जल-सोलार संमिश्र प्रकल्पांचा समावेश करणे तसेच शाश्वत जल व्यवस्थापनास पाठबळ देणे हा आहे.

| अनु क्र. | प्रकल्पाचे नाव | क्षमता मे वॅट | अमलबजावणीची पद्धत |
|---|---|---|---|
| १ | कोयना डाव्या तटबंदीचा पायथा प्रकल्प | (२×४० मे वॅ ) | जलसंपदा विभाग, महाराष्ट्र सरकार सोबत संयुक्त उपक्रम |
| २ | घाटघर पंप स्टोरेज स्टेज २ | (१×१२५ मे वॅ) | मेसर्स एसजेव्हीएन सोबत संयुक्त उपक्रम |
| ३ | कोडाळी पंप स्टोरेज योजना | (२×११० मे वॅ) | मेसर्स एसजेव्हीएन सोबत संयुक्त उपक्रम |
| ४ | वरसगाव पंप स्टोरेज योजना | (४×३०० मे वॅ) | मेसर्स एसजेव्हीएन सोबत संयुक्त उपक्रम |
| ५ | पानशेत पंप स्टोरेज योजना | (४×४०० मे वॅ) | मेसर्स एसजेव्हीएन सोबत संयुक्त उपक्रम |
| | **एकूण** | **३२२५ मे वॅट** | |

मेसर्स एसजेव्हीएन सोबत संयुक्त उपक्रम स्थापनेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. शासनाने दिनांक ०७.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे एसजेव्हीएन मर्यादितसोबत संयुक्त उपक्रम कंपनीस मंजुरी दिली आहे. मेसर्स वॅप्कॉस मर्यादित यांनी घाटघर स्टेज-२ (१२५ मेगावॅट) प्रकल्पाचा व्यवहार्यता अहवाल सादर केला असून, कोडाळी, वरसगाव व पानशेत पंप स्टोरेज प्रकल्पांसाठी सल्लागारांची नेमणूक प्रक्रिया सुरू असून ती परीक्षणाधीन आहे.

**५. सिन्नर प्रकल्पाच्या संपादनासंदर्भात शासनाकडून मंजुरीची स्थिती**

ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१.११.२०२३ रोजीच्या भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाकडून प्राप्त सल्ला पत्र पुढे पाठविले असून, तणावग्रस्त वीज मालमत्तेबाबत महानिर्मितीला आवश्यक ती कार्यवाही करण्यास सांगितले आहे. ऊर्जा मंत्रालयाने राज्यातील कंपन्यांना अशा मालमत्ता संपादनासाठी एनसीएलटीच्या सीआयआरपी प्रक्रियेत सहभागी होण्याचा सल्ला दिला आहे. दिनांक २९.११.२०२३ रोजी महानिर्मितीने महाराष्ट्र शासनास नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे रतन इंडिया कंपनीचा ५×२७० मेगावॅट क्षमतेचा वीज प्रकल्प एनसीएलटी मार्गे संपादन करण्याचा आपला मानस कळविला आहे. मा. एनसीएलटी यांनी दिनांक २८.११.२०२५ रोजी मेसर्स एनटिपीसी लिमिटेडसोबतच्या संयुक्त उपक्रमातून कंपनीने सादर केलेल्या अंतिम ठराव योजनेस मंजुरी दिली आहे.

**६. प्रस्तावित नूतनीकरण व आधुनिकीकरण प्रकल्प:**

केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, महानिर्मितीने तीच्या १७ जुन्या युनिट्स (४६०० मे वॅट) च्या नूतनीकरण आणि आधुनिकीकरण /एलई च्या टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी, सध्या, महानिर्मितीने खालील प्रमाणे फेज I आणि II मध्ये नमूद केलेल्या जुन्या सहा औष्णिक विद्युत केंद्राचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण / एलई कामाची अंमलबजावणी हाती घेण्याचे प्रस्तावित केले आहे.:

| अनु. क्र. | फेज आणि कालमर्यादा | औ. वी. केंद्राचे नाव | यूनिट | क्षमता (मे.वॅट) | एकूण (मे.वॅट) |
|---|---|---|---|---|---|
| १. | फेज–१ (०१.१२.२०२४ ते ३०.०६.२०२६) | चंद्रपूर | ३ | २१० | १०५० |
| | | नाशिक | ३ व ४ | २×२१० | |
| | | नाशिक | ५ | २१० | |
| | | भुसावळ | ३ | २१० | |
| २. | फेज–२ (०१.०६.२०२६ ते ३०.१२.२०२८) | चंद्रपूर | ४ | २१० | २१० |
| | **एकूण** | | **६ यूनिटस** | | **१२६०** |

६×२१० मेगावॅट युनिट्सचे स्थिती मूल्यांकन पूर्ण झाले आहे. नाशिक (युनिट-३,४,५) व भुसावळ (युनिट-३) यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) अंतिम करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर करण्यात आले आहेत तर चंद्रपूर (युनिट-३,४) यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिमीकरणाच्या प्रक्रियेत आहेत.

**सौर ऊर्जा निर्मिती**

महानिर्मितीने ''राष्ट्रीय सौर ऊर्जा सोबत ऊर्जा विषयक विविधता'' कार्यक्रमाची अमंलबजावणी सुरू केली आहे. 'हरित महाराष्ट्र' यासाठी महानिर्मिती योगदान देत आहे. आज्ञापर्यंत ५४४.५२ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून ते समाधानकारक रीतीने कार्यरत आहेत. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार आणखी ८०३९ मेगावॅट क्षमतेची वाढ विविध योजना, ईपीसी प्रकल्प व संयुक्त उपक्रमांतर्गत अंमलबजावणीच्या प्रक्रियेत आहे.

**अ. सध्या कार्यरत प्रकल्प:**

**१. ई. पी.सी प्रकल्प**

महानिर्मितीचे अनेक अक्षय ऊर्जा प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. लातूर येथील ६० मेगावॅट सौर प्रकल्प, परळी येथील जमिनीवर हलविण्यात आला असून तो समायोजन प्रक्रियेत आहे. औष्णिक वीज केंद्राच्या जमिनीवर उभारण्यात येणारा ५२ मेगावॅट सौर प्रकल्प ४०% काम पूर्ण करून डिसेंबर २०२५ पर्यंत अंशत: कार्यान्वित करण्याचे लक्ष्य आहे. पारस, अकोला येथे ६२ मेगावॅट सौर प्रकल्पाचा करार रद्द करण्यात आला असून नवीन ईपीसी निवडीची प्रक्रिया सुरू आहे. याव्यतिरिक्त, भुसावळ औ. वी. केंद्र येथे २०एनएम३/तास ग्रीन हायड्रोजन प्रकल्प व ०.५ मेगावॅट सौर घटकाचा सौर प्रकल्प सप्टेंबर २०२५ मध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे. दोंडाईचा सौर उद्यानात २५० मेगावॅट सौर प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू असून मार्च २०२६ पर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा

आहे. केएफडब्ल्यू नवीन कर्जांतर्गत ३९० मेगावॅट ईपीसी प्रकल्प प्रगतीपथावर असून डिसेंबर २०२५ मध्ये एससीओडी नियोजित आहे. तसेच, लखमापूर येथे ६५ मेगावॅट ईपीसी प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू असून मार्च २०२६ पर्यंत कार्यान्वय अपेक्षित आहे.

**२. मुख्यमंत्री सौर कृषी वीज (एमएमएसकेवीवाय–२.०) योजनेंतर्गत प्रकल्प:**

महानिर्मितीने एमएमएसकेवीवाय २.० योजनेअंतर्गत एकूण १०७१ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या विकासासाठी निविदा प्रसिद्ध केल्या आहेत. ५६९ मेगावॅट क्षमतेच्या निविदेसाठी, महानिर्मिती यशस्वी बोलीदारास प्रकल्प स्थळी जमीन उपलब्ध करून देईल तसेच महानिर्मितीकडून पुरविण्यात येणाऱ्या पीव्ही मॉड्यूल्सचे उतराईकरण सुलभ करेल. ५०२ मेगावॅट क्षमतेच्या निविदेसाठी, महानिर्मिती यशस्वी बोलीदारास प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जमीन उपलब्ध करून देईल. आजपर्यंत ८६९ मेगावॅट क्षमतेसाठी ६९ उपकेंद्रांवर जमीन विकासकांना हस्तांतरित करण्यात आली आहे. ७७२ मेगावॅट क्षमतेसाठी ६० उपकेंद्रांवर बांधकाम कार्य प्रगतीपथावर आहे, तर १९३ मेगावॅट क्षमतेसाठी १६ ठिकाणी जमीन संपादन व हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू आहे. १००९ मेगावॅट क्षमतेचे ७९ ठिकाणी प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत कार्यान्वित करण्याचे लक्ष्य असून, एमएमएसकेवीवाय २.० योजनेच्या अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण प्रगती साधली जात आहे.

**एमएमएसकेवीवाय १.०–१७९ मेगावॅट प्रकल्प**–या प्रकल्पासाठी सप्टेंबर २०२० मध्ये मेसर्स ईईएसएल यांना सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) पद्धतीने, मंजूर ट्रेडिंग मार्जिन व वीजदर करारासह, कार्यादेश (लेटर ऑफ अवॉर्ड) जारी करण्यात आला होता. एकूण १७९ मेगावॅट क्षमतेपैकी २१.०२ मेगावॅट कार्यान्वित झाले असून १४१.८२ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प महावितरणने रद्द केले आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये शॉर्ट क्लोजरला संमती देण्यात आली असून, मार्च २०२५ मध्ये महानिर्मितीने अपूर्ण कार्यान्वित क्षमतेसाठी अंतिम समाप्ती आदेश जारी केला आहे.

**ब: बोली अंतर्गत प्रकल्प**

**१. ई. पी.सी प्रकल्प**

**३०० मेगावॅट ईपीसी + ६०० मेगावॅट टप्पा-I व ६०० मेगावॅट टप्पा-II मधिल जमीन (टप्पा-I मधून २०० मेगावॅट व टप्पा-II मधून १०० मेगावॅट)**–या प्रकल्पासाठी निविदा सूचना दिनांक ११/१०/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मा. संचालक मंडळाने दिनांक ३०.१०.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत कार्यादेश (लेटर ऑफ रिवॉर्ड) मंजूर केला असून, ३०० मेगावॅट एकत्रित क्षमतेसाठी यशस्वी बोलीदारांना कार्यादेश जारी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

महानिर्मितीचे ३९० मेगावॅट ईपीसी सौर प्रकल्प महाराष्ट्र शासनाने मंजूर केले असून, हे प्रकल्प केएफडब्लु कर्जातून वित्तपुरवठा करून दोन टप्प्यांत विकसित करण्यात येणार आहेत (टप्पा-I:२४५ मेगावॅट, टप्पा-II:१४५ मेगावॅट). टप्पा-I अंतर्गत वाशीम व यवतमाळ प्रकल्पासाठी ९० मेगावॅट क्षमतेचे कार्यादेश जारी करण्यात आले आहेत. उर्वरित १५५ मेगावॅट क्षमतेसाठी विविध ठिकाणी प्रक्रिया सुरू आहे. टप्पा-II अंतर्गत कचराळा येथे १४५ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे.

**२. तरंगता सौर प्रकल्प:**

**इराई धरणावर १०५ मेगावॅटचा तरंगता सौर प्रकल्प:** संचालक मंडळाने १०५ मेगावॅट ईपीसी प्रकल्पास अक्षय ऊर्जा बंडलिंग अंतर्गत मंजुरी दिली आहे. निविदा प्रक्रिया व्यवस्थापनासाठी सल्लागार नेमणुकीची प्रक्रिया सुरू आहे.

**लोअर वर्धा येथे ५०५ मेगावॅटचा तरंगता सौर प्रकल्प:** संचालक मंडळाने ईपीसी पद्धतीने १०० मेगावॅट (टप्पा - I) व ४०५ मेगावॅट (टप्पा - II) क्षमतेचे प्रकल्प विकसित करण्यास मंजुरी दिली आहे. टप्पा - I साठी निविदा प्रक्रिया व्यवस्थापनासाठी सल्लागार नेमणूक पूर्ण झाली आहे. आरएफपी व डीपीआर यासाठी प्रक्रिया सुरू आहे.

**३. सामंजस्य करारा अंतर्गत प्रकल्प:**

महानिर्मिती व एमपीकेव्ही राहुरी यांच्यात मुंबई येथे सौर प्रकल्पासाठी सामंजस्य करार करण्यात आला असून, एमपीकेव्ही राहुरी यांनी १०० मेगावॅट सौर पीव्ही प्रकल्पासाठी ४०० एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. याशिवाय, एमईडीएने भाडेतत्त्वावर उपलब्ध केलेल्या जमिनीवर महानिर्मितीसोबत अक्षय ऊर्जा संकरित प्रकल्प विकसित करण्याचा प्रस्ताव दिला आहे. पहिल्या टप्प्यात चाळकेवाडी, पाटण, सातारा येथे २५.६० मेगावॅट क्षमतेचा वायु - सौर संकरित प्रकल्प (१६ मेगावॅट सौर + ९.६ मेगावॅट वायु) कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**क: नियोजन अवस्थेतील प्रकल्प:**

**१. एनटिपीसी (यूएमआरईपीपी) सह संयुक्त उपक्रमांतर्गत:** महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीनुसार महानिर्मितीने मेसर्स एनटिपीसी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एनजीइएल) सोबत संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन केली असून, ५०:५० समभाग सहभागासह महाराष्ट्रात २५०० मेगावॅट क्षमतेचा यूएमआरईपीपी प्रकल्प विकसित करण्यात येणार आहे.

२. **मेसर्स एसजीव्हीएन सह संयुक्त उपक्रमांतर्गत ५००० मे.वॅट प्रकल्प:** महानिर्मितीने मेसर्स एसजीव्हीएन सोबत ५००० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प, ज्यामध्ये पीएससी प्रकल्पांचा समावेश आहे, विकसित करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. महाराष्ट्र. शासन व भारत सरकार यांनी संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. संयुक्त उद्यम करारावर स्वाक्षरी करणे व कंपनी स्थापन करण्याची पुढील प्रक्रिया सुरू आहे.

**इंधन सुरक्षा**

१. **कोळसा कंपनी आणि त्याच्या सहाय्यक कंपन्यांकडून इंधन पुरवठा**

**इंधन पुरवठा करार:** महानिर्मितीकडे डब्ल्यूसीएल, एमसीएल व एसईसीएल यांच्यासोबत दीर्घकालीन इंधन पुरवठा करार (एफएसए) आहेत. तसेच कोराडी (३×६६० मेगावॅट), चंद्रपूर (२×५०० मेगावॅट) व परळी युनिट-८ साठी डब्ल्यूसीएल व एससीसीएल यांच्याकडून गारे-पालमा कोळसा खाणीसाठी ब्रिज लिंकेज उपलब्ध आहे. याव्यतिरिक्त, चालू वर्षासाठी महानिर्मितीने एससीसीएल व डब्ल्यूसीएल यांच्यासोबत अल्पकालीन सामंजस्य करार केले आहेत.

वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी विद्यमान एफएसए, ब्रिज लिंकेज व सामंजस्य करार नुसार औष्णिक विद्युत केंद्रनिहाय व कोळसा कंपनीनिहाय लिंकेज खालीलप्रमाणे आहे–

| (एफएसए + बीएल + एमओयू) २०२४-२५ साठी संख्या एमएमटी मध्ये | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **औष्णिक विद्युत केंद्र** | **डब्लुसीएल** | **एमसीएल** | **एसईसीएल** | **एससीसीएल** | **एफएसए+एमओयू** |
| चंद्रपूर (यूनिट ३ ते ७) (यूनिट - ८,९) (बीएल) | १४.४७९ | ०.९०९ | ०.८१७ | ० | १६.२०५ |
| कोराडी (यूनिट-६) (यूनिट-८,९,१०) (बीएल) | ३.३९७ | १.७३६५ | १.८५३ | १.३ | ८.२८६५ |
| खापरखेडा (यूनिट-१ ते ५) | १.४३२ | ३.८७९ | २.००१ | ० | ७.३१२ |
| नाशिक (यूनिट-३ ते ५) | २.३५४ | ० | ०.७२४ | ० | ३.०७८ |
| भुसावळ (यूनिट-३ ते ६ डब्लुसीएल कडून) आणि (४-५ एसईसीएल कडून) | ५.८३६ | ० | २.३१२ | ० | ८.१४८ |
| परळी (यूनिट-६ ते ७ डब्लुसीएल साठी) आणि (यूनिट-८ एससीसीएल साठी) (बीएल) | १.७०७५ | ० | ० | ०.८६५ | २.५७२५ |
| पारस (यूनिट-३ ते ४) | २.५०३ | ० | ० | ० | २.५०३ |
| अधिक एमओयू | ३.० | ० | ० | ३.८३५ | ६.८३५ |
| **एकूण** | **३४.७०८५** | **६.५२४५** | **७.७०७** | **६.०००** | **५४.९४** |

* चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रासाठी एफएसए एसीक्यू व्यतिरिक्त, एनएम यूजी ते ओसी एक्स्पान्शन कॉस्ट प्लस खाणीतून १.८७ एमएमटी क्षमतेची डब्ल्यूसीएल लिंकेज उपलब्ध आहे.

२. **वित्तीय वर्ष २०२४–२५ मध्ये महानिर्मितीला कोळसा पुरवठा::**

कोळसा कंपनीनिहाय वार्षिक कराराचे प्रमाण (एसीक्यु ), प्राप्ती आणि टक्केवारी भौतिकीकरण खालीलप्रमाणे आहे:

(संख्या एमएमटी मध्ये)

| **कोळसा कंपन्या** | **वित्तीय वर्ष २०२४–२५** | | |
|---|---|---|---|
| | **एसीक्यु (एमएमटी)** | **प्राप्ती** | **टक्केवारी (एमएटी)** |
| डब्लुसीएल | ३४.७०८ | २५.१८६ | ७३ |
| एमसीएल | ६.५२५ | ८.५२० | १३१ |
| एसईसीएल | ७.७०७ | ५.७७२ | ७५ |
| एससीसीएल | ६.००० | ४.८६९ | ८१ |
| आयात | २.१८१ | २.१५३ | ९९ |
| **एकूण महानिर्मिती** | **५७.१२** | **४६.५०** | **८१** |

**३. आयात कोळसा:**

ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या ६% आयातित कोळशाच्या मिश्रणासंबंधीच्या निर्देशांनुसार, महानिर्मितीने खापरखेडा, चंद्रपूर, भुसावळ आणि नाशिक औष्णिक विद्युत केंद्रांसाठी विदेशी मूळचा २.०८ दशलक्ष मेट्रिक टन प्रति वर्ष अशा नॉन-कोकिंग (स्टीम) कोळशाच्या खरेदीसाठी दोन वर्षांच्या कालावधीसाठी आंतरराष्ट्रीय निविदांद्वारे गंतव्य टिपीएसवर या पद्धतीने स्वीकार पत्रे जारी केली आहेत. जून-२०२३ ते जून-२०२४ या कालावधीत महानिर्मितीने पहिल्या वर्षाच्या वितरण वेळापत्रकानुसार सुमारे ३.१४ दशलक्ष मेट्रिक टन कोळशाची खरेदी केली असून त्यात ५०% विस्ताराची तरतूद आहे. तसेच, महानिर्मितीने खापरखेडा, चंद्रपूर, भुसावळ आणि नाशिक औष्णिक विद्युत केंद्रांसाठी नोव्हेंबर-२०२४ ते जून-२०२५ या कालावधीत दुसऱ्या वर्षाच्या करारातील प्रमाणानुसार १६.८९ लाख मेट्रिक टन कोळशाच्या वितरण वेळापत्रकाची घोषणा केली आहे.

**४. उरण वायु केंद्रासाठी वायु पुरवठा** - महानिर्मितीची एकूण स्थापित क्षमता ६७२ मेगावॅट असून त्यासाठी ३.५ एमएमएससीएमडी इंधनाची आवश्यकता आहे. तथापि, एपीएम वायूच्या कमी उत्पादन पातळीमुळे मेसर्स गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड (गेल) कडून मिळणारे प्रत्यक्ष वाटप आवश्यक डीसीक्यू पेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. सन २०२४-२५ मध्ये, महानिर्मितीला उरण वायु केंद्रासाठी मेसर्स गेलकडून १.६६ एमएमएससीएमडी (६६%) गॅस प्राप्त झाला.

**५. बायोमास पेलेट** - भारत सरकारने ०८/१०/२०२१ रोजी कोळसा आधारित औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये सह-ज्वलनासाठी कृषी अवशेषांवर आधारित बायोमास पेलेट्सच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी बायोमास धोरण जारी केलेले आहे. त्यास ०३/०५/२०२३ रोजी परिशिष्ट जोडण्यात आले आहे. नव्या दुरूस्तीनुसार, महानिर्मितीला वित्तीय वर्ष २०२४-२५ पासून किमान ५% बायोमास पेलेट्स (वजनानुसार) आणि वित्तीय वर्ष २०२५-२६ पासून किमान ७% बायोमास पेलेट्स (वजनानुसार) बाऊल मिल्स असलेल्या युनिट्समध्ये वापरण्याची सक्ती आहे.

त्याअनुषंगाने, महानिर्मितीने आपल्या औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये कोळशासोबत सह-ज्वलनासाठी नॉन-टॉरिफाइड बायोमास पेलेट्सच्या खरेदीसाठी निविदा प्रसिद्ध करण्यास मान्यता दिली आहे. विविध औष्णिक विद्युत केंद्रांसाठी निविदा प्रक्रियेत आहेत.

**६. धुतलेला कोळसा:**

धुतलेला कोळसा करार: डब्ल्यूसीएल, एसईसीएल आणि एमसीएल खाण क्षेत्रांमधून कच्चा कोळसा उचलून चांगल्या दर्जाचा कोळसा सुनिश्चित करण्यासाठी, प्लांटची उपलब्धता वाढवण्यासाठी आणि अनुपलब्धतेमुळे होणारी अस्वीकृती कमी करून त्यांच्या वीज केंद्रांना लाभदायक कोळसा पुरवठा करण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून मेसर्स एमएसएमसी सोबत करार केला आहे.

लाभार्थी/ धुतलेल्या कोळसा कराराचा कोळसा कंपनीनिहाय तपशील खाली सारांशित आणि सारणीबद्ध केला आहे:

| कोळसा कंपनी कच्च्या कोळश्याचे प्रमाण (एमएमटिपीए) | | | | |
|---|---|---|---|---|
| | **डब्लुसीएल** | **एसईसीएल** | **एमसीएल** | **एकूण** |
| सुरुवातीची ८०% संख्या | ८ | ५.६ | ३.९८ | १७.५८ |
| उर्वरित २०% संख्या | २ | १.२१८ | १.०० | ४.२१८ |
| एकूण संख्या | १० | ६.८१८ | ४.९८ | २१.७९८ |

**वित्तीय वर्ष २०२४-२५ दरम्यान कोळसा कंपनीनुसार व औष्णिक विद्युत केंद्रानुसार धुतलेल्या कोळशाचा प्राप्ती अहवाल:**

| धुतलेल्या कोळशाची प्राप्ती (मेट्रिक टन) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **वर्ष** | **कोल कंपनी** | **कोरडी टिपीएस** | **खापरखेडा टिपीएस** | **भुसावळ टिपीएस** | **चंद्रपूर टिपीएस** | **एकूण** |
| वित्तीय वर्ष २०२४–२५ | डब्लुसीएल | ३२३३१३३ | ९०६७ | ० | ९०८६२ | ३३३३०६२ |
| | एमसीएल (स्वत:) | ६८८७ ५४ | ६९३०१ | ० | ३६८३ | ७६१७३८ |
| | एमसीएल | ७३५६२३ | १०७२९२ | ० | ७३२८ | ८५०२४३ |
| | एसईसीएल | १८९६८१६ | १६२१६ | ० | ० | १९१३०३२ |

**पर्यावरणाचे संरक्षण**

**पर्यावरण धोरणाच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करण्यासाठी महानिर्मितीने वर्ष- २०२४ -२५ मध्ये हाती घेतलेले महत्त्वाचे उपक्रम–**

१. प्रदूषण नियंत्रण प्रणाली: पार्टिक्युलेट मॅटर कंट्रोलसाठी उच्च कार्यक्षमतेचे इलेक्ट्रोस्टॅटिक प्रीसिपिटेटर, लो एनओएक्स बर्नर्स, एनओएक्स नियंत्रणासाठी ओव्हर फायर/ अंडर फायर सिस्टीम्स औष्णिक वीज केंद्रांवर स्थापित केल्या आहेत. वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण प्रणालीचे सुधारणा आणि रेट्रोफिटिंग देखील केले जाते.

२. सभोवतालची हवा गुणवत्ता, स्टॅक उत्सर्जन, सांडपाणी उत्सर्जन यासाठी सतत ऑनलाइन देखरेख प्रणाली सर्व औष्णिक वीज केंद्रांवर कार्यरत आहे आणि ती सीपीसीबी/एमपीसीबी शी जोडलेली आहे.

३. विविध ठिकाणी सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी मोबाईल व्हॅनची सुविधा उपलब्ध आहे.

४. जल प्रदूषण नियंत्रण प्रणाली: राख पाण्याचा पुनर्वापर करणारी यंत्रणा, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, सांडपाणी पुनर्वापर संयंत्र

५. महानिर्मितीने पाण्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर करण्यासाठी सर्व वीज केंद्रांवर ‘शून्य पाणी सोडण्याचे’ धोरण स्वीकारले आहे.

६. महानिर्मितीचे सर्वऔष्णिक वीज केंद्रांवर खुल्या क्षेत्रात किमान ३३% वृक्ष लागवडीचे नियम पूर्ण करतात.

७. महानिर्मितीने सर्व वीज केंद्रांमध्ये शून्य अपघात धोरण स्वीकारले आहे.

८. औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये मूलभूत व प्रगतसुरक्षा प्रशिक्षण (कार्यादेश दिनांक ३०.०४.२०२४) देण्यात येणार असून याचा उद्देश सुरक्षा विषयक जागरूकता निर्माण करणे व सुरक्षित कार्यसंस्कृती विकसित करणे हा आहे.

९. पर्यावरण व सुरक्षा (ई अँड एस) विभागाने नूतनीकरणक्षम ऊर्जा प्रकल्पांमधून कार्बन क्रेडिट्स मिळविण्याचा उपक्रम हाती घेतला असून यामुळे महानिर्मितीला कोट्यावधी रूपयांमध्ये महसूल प्राप्त होणार आहे.

**राख वापर आणि महसूल निर्मिती**

१. राख विक्रीतून मिळणारा महसूल पूर्वीच्या वर्षी ₹ १२६.३३कोटीं होता. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये तो ₹ १३५.७२ कोटी झाला.

२. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ड्राय फ्लाय ॲश वापरराचे प्रमाण ४८.७९% होते, जे आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये वाढून ५२.४४% झाले आहे.

३. पारस,परळी व नाशिक औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये तलावातील राख उपसण्यासंबंधीचे ई-लिलाव प्रक्रिया तसेच उपासण्याचे काम यशस्वीपणे सुरू करण्यात आले असून त्यातून महसूल उत्पन्नास हातभार लागणार आहे

४. कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये १००% राखेचा उपयोग साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून त्यामुळे पर्यावरणीय शाश्वततेस हातभार लागत आहे.

५. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांच्या दिनांक ३१.१२.२०२१ रोजीच्या नवीन अधिसूचना तसेच ऊर्जा मंत्रालय यांच्या विविध मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने, राज्य राख धोरणाचा मसुदा वर्ष २०२५ मध्ये तयार करून महाराष्ट्र शासनाकडे राज्य राख धोरण तयार करण्यासाठी सादर करण्यात आला. त्यानंतर दिनांक ०३.०९.२०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य राख धोरणास मंजुरी देण्यात आली.

६. कोराडी औष्णिक विद्युत केंद्राने दिनांक ३०.०५.२०२४ रोजी मेसर्स अल्ट्राफाईन यांच्याशी कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे फ्लाय ॲश प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी करार केला आहे. संबंधित उपकरणांची उभारणी करण्याचे काम मेसर्स अल्ट्राफाईन यांच्याकडून करण्यात येत आहे.

७. संचालक मंडळाने दिनांक २३.०९.२०२४ रोजी कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथील औष्णिक विद्युत केंद्रांमधून तलावातील राख (पॉन्ड ॲश)वाहतुकीसाठी प्रति मेट्रिक टन ₹ १२५ इतकी आर्थिक मदत मंजूर केली आहे. ही मदत शासनाच्या विविध यंत्रणांकडून हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी लागू राहील. उदाहरणार्थ इमारती व नगररचना बांधकाम, पूल बांधकाम, खाणींची मागील भरणी, तसेच दगड खाणींमध्ये स्टोईंग इत्यादी.

८. चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र(सीएसटिपीएस), राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि मेसर्स गोविंदपूर राजुरा इन्फ्रा प्रोजेक्ट यांच्यामध्ये दिनांक ११.१०.२०२४ रोजी करार करण्यात आला असून, या करारानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या प्रकल्पासाठी ४२ लाख मेट्रिक टन तलावातील राख (पॉन्ड ॲश) वापरण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी प्रति मेट्रिक टन ₹ १२५ इतकी आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार फ्लाय ॲश उचलण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**महानिर्मिती - गारे पाल्मा - II (जीपी-II) कोळसा खाणीला वाटप केलेले कॅप्टिव्ह कोळसा ब्लॉक**

कोळसा मंत्रालयाने २४.०३.२०१५ रोजी ६५५.१५२ एमएमटी काढण्यायोग्य साठा आणि २३.६ एमटिपीए शिखर क्षमतेसह जीपी-II कोळसा खाण (२५८३.४८७ हेक्टर) महानिर्मितीला वाटप केली. अंतिम वापराच्या प्रकल्पांमध्ये चंद्रपूर (२×५०० मे. वॅ), कोराडी (३×६६० मे. वॅ), आणि परळी (१×२५० मे. वॅ) यांचा समावेश होतो. ३१.०३.२०२१ रोजी कोळसा खाण करारावर स्वाक्षरी करून मेसर्स अदानी एंटरप्राइझ लिमिटेडची एमडिओ म्हणून नियुक्त करण्यात आली. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून अंतिम पर्यावरणीय मंजुरी प्राप्त झाली असून, छत्तीसगड शासनासोबत खाण भाडेपट्टी करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे.

ही खाण दिनांक १८.०९.२०२५ पासून कार्यान्वित झाली असून, चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस कोळसा पुरवठा सुरू होण्याची अपेक्षा आहे.

**संचालक मंडळाच्या बैठकांची संख्या**

वर्ष २०२४-२५ मध्ये संचालक मंडळाच्या एकूण ६ बैठका संपन्न झाल्या.

**संचालक नियुक्तीचे धोरण**

कंपनीचे कार्यकारी संचालक आणि स्वतंत्र संचालक यांची नेमणूक सुत्रधारी कंपनी मर्यादित तर्फे केल्या जातात. कार्यकारी संचालक यांची पात्रात व नेमणूकीचे इतर निकष याची माहिती कंपनीच्या संघटनात्मक संस्थापक नियमावलीमध्ये दिली आहे.

**कलम १८६ अनुसार कर्जे, हमी आणि गुंतवणूकीचा तपशील**

महानिर्मिती कंपनी पायाभूत सुविधा पुरविणे या उद्योगात कार्यरत असल्याने कंपनी अधिनियम २०२३ चे कलम १८६ यातील कर्जे, हमी किंवा प्रतिभूती देणे या विषयीच्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत. कंपनीने तिच्या उपकंपन्यांना प्रवर्तनांच्या गरजांसाठी कर्जे पुरविली आहेत. या गुंतवणूकीची माहिती कंपनीच्या स्वायत वित्तीय विवरण पत्राची टिपा मध्ये दिली आहे.

**संबंधितांशी केलेल्या कंत्राटांचा/करारांचा तपशील**

महानिर्मिती कंपनी तिने निर्माण केलेली बहुतांश वीज 'मराविमं सूत्रधारी कंपनीची दूसरी उपकंपनी 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण)' या सहोदर कंपनीला विकते. या वीज विक्रीचे दर विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचेकडून निश्‍चित केले जातात. तसेच महानिर्मिती कंपनी रिॲक्टीव्ह एनर्जी चार्जेस यांचे देयक मेसर्स महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण) कंपनीला आकारते. या वीज विक्रीचे दर सुद्धा विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदीप्रमाणे विद्युत नियामक म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचेकडून निश्‍चित केले जातात.

**वित्तीय वर्ष अखेर आणि अहवालाची तारीख दरम्यान कंपनीच्या वित्तीय स्थितीवर परिणाम करणारे महत्वाचे बदल आणि बांधिलकी (असल्यास)**

वित्तीय वर्ष संपल्यानंतर अहवाल तारखेपर्यच्या कालावधीत कंपनीच्या वित्तीय स्थितीला बाधक ठरू शकतील असे कोणतेही मोठे बदल किंवां बांधिलकी झालेली नाहीत.

**औद्योगिक संबंध**

या वर्षभरात कंपनीच्या व्यवस्थापनाने आपल्या कर्मचारी वृदांशी असलेले संबंध नेहमीप्रमाणे सलोख्याचे ठेवले आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्याबाबत तसेच कल्याणाच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत केले जाते. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या सर्व थरात प्रतिनिधी सोबत कार्यशाळा घेवुन त्यांना कंपनी समोरील व्यावसायिक बदल, संधी, जोखीमा आणि आव्हाने याबाबत अवगत करण्यात आले. कंपनीत सर्व थरातील औद्योगीक संबंध हे शांततेचे आहेत त्यांच्या परस्पर विश्‍वास आणि सुसंवाद आहे.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) मधील धोरणे**

१. **सामाजिक जबाबदारी (सीएसआर)**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) कडे राज्याच्या मालकीच्या वीज निर्मिती केंद्राचे संचालन आणि देखभाल तसेच महाराष्ट्र राज्याला शाश्‍वत आधारावर वीज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य क्षेत्रांतर्गत नवीन वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

महानिर्मितीच्या सीएसआर धोरणाचा उद्देश स्थानिक समुदाय आणि समाजाच्या शाश्‍वत सामाजिक-आर्थिक विकासासाठी सक्रियपणे योगदान देणे हे आहे.

२. **व्हिसल ब्लोअर पॉलिसी आणि दक्षता यंत्रणा**

महानिर्मितीची व्हिसल ब्लोअर पॉलिसी आणि दक्षता यंत्रणा कर्मचाऱ्यांना शिक्षेच्या भीतीशिवाय सिस्टमचे उल्लंघन, गैरव्यवहार, सत्तेचा

गैरवापर, पालन न करणे आणि फसवणूक यासारख्या संशयित गैरवर्तनाची तक्रार करण्यास प्रोत्साहित करते. हे धोरण गोपनीयतेची खात्री देते आणि व्हिसल ब्लोअर्सना अपमान किंवा छळ यांसारख्या प्रतिशोधात्मक कृतींपासून संरक्षण करते. या दृषिकोनाचा उद्देश सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करणे आणि कंपनीच्या प्रतिष्ठेचे रक्षण करणे आहे.

**३. जोखीम व्यवस्थापन धोरण**

महानिर्मितीच्या जोखीम व्यवस्थापन धोरणाचे उद्दिष्ट सर्व वर्तमान आणि भविष्यातील भौतिक जोखीम एक्सपोजर ओळखणे, मूल्यांकन करणे, परिमाण निश्‍चित करणे, कमी करणे, नियंत्रण करणे आणि व्यवस्थापित करणे, हे आहे ज्यामुळे मजबूत जोखीम व्यवस्थापन प्रणाली सुनिश्‍चित होईल. हे जोखीम व्यवस्थापन प्रक्रियेसाठी एक फ्रेमवर्क स्थापित करते, अंमलबजावणी सुनिश्‍चित करते आणि सर्वोत्तम पद्धतीद्वारे संबंधित नियमांचे पालन करण्यास सक्षम करते. याव्यतिरिक्त, हे आर्थिक स्थिरतेसह व्यवसाय वाढीची खत्री देते.

**महानिर्मितीच्या उप कंपन्या व संयुक्त उपक्रम**

**१. महाजेनको रीन्यूएबल एनर्जी मर्यादित (एमआरईएल)**

नवनिर्माण ऊर्जा व्यवसाय हाती घेण्यासाठी कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी केलेली महाजेनको रीन्यूएबल एनर्जी मर्यादित (एमआरईएल) ही महानिर्मितीची पूर्ण मालकीची उपकंपनी आहे.

**२. महागुज कॉलीरीज मर्यादित**

ओरिसा राज्यातील अगुल जिल्ह्यातील मच्छकाटा येथे कोळसा खाणींच्या कॅप्टिव्ह खाणकामासाठी ही कंपनी महानिर्मिती आणि गुजरात राज्य वीज कंपनी मर्यादित यांच्यातील ६०:४० च्या प्रमाणात संयुक्त उपक्रम आहे. भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, ओरिसा राज्यात वाटप करण्यात आलेल्या कोळसा खाणीचे वाटप रद्द करण्यात आले आहे.

**३. धोपावे कोस्टल पॉवर कंपनी मर्यादित**

भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रकरण-२ अंतर्गत विविध औष्णिक ऊर्जा प्रकल्पांना हरित क्षेत्र प्रकल्प म्हणून कार्यान्वित करण्यासाठी या कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. सध्या ही कंपनी कार्यरत नसलेली कंपनी आहे. महानिर्मितीने धोपावे कोस्टल पॉवर कंपनी मर्यादित बंद करण्याच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सरकारकडे अर्ज केला आहे.

**४. महाजेनको एनटिपीसी ग्रीन एनर्जी मर्यादित**

ही कंपनी महानिर्मिती आणि एनटिपीसी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एनजीईएल) यांची संयुक्त उपक्रम कंपनी असून, दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी हिची स्थापना झाली आहे. मुंबई येथे मुख्यालय असलेल्या या कंपनीचे उद्दिष्ट महाराष्ट्रभर २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करणे असून, भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणास पाठबळ देणे हे आहे.

नवीनकरणीय ऊर्जा उद्याने, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा साठवण यांवर विशेष भर देऊन, ही कंपनी प्रदेशातील शाश्वत वीज निर्मिती पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिक बजावत आहे.

**संचालक मंडळातील बदल**

वर्षभरात श्री. राधाकृष्णन बी यांची दिनांक २६.१२.२०२४ पासून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती झाली असून, डॉ. पी. अन्बलगन यांनी दिनांक २६.१२.२०२४ पासून संचालकपदाचा राजीनामा दिला आहे. तसेच श्री. मनेष वाघिरकर यांची दिनांक ०९.०७.२०२५ पासून संचालक (वित्त) म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, श्री. बाळासाहेब थिटे यांनी ०९.०७.२०२५ पासून संचालकपद सोडले.

**लेखा परिक्षण समिती**

भारत सरकाचे कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसुचना क्रमांक जी एस आर ८८०(इ) दि. २३.०७.२०१७ नुसार लेखा परिक्षण समिती, नामनिर्देशन आणि परिश्रमिक समितीची अनिवार्य स्थापना बंधनकारक नाही. कंपनीने लेखापरिक्षण समिती स्थापन केली आहे. ज्यामध्ये स्वतंत्र संचालक, श्री. विश्वास पाठक हे अध्यक्ष आणि श्री. संजय मारूडकर समितीचे सदस्य आहेत. वर्षभरात लेखापरिक्षण समितीच्या तीन बैठका झाल्या.

**कंपनीची सामाजिक जबाबदारी - समिती**

महानिर्मिती कंपनीची सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी एक समिती गठित केली आहे. ३१.०३.२०२५ रोजी समितीचे सदस्य असे आहेत, श्री. राधाकृष्णन बी (अध्यक्ष), श्री. संजय मारूडकर (सदस्य), श्री. अभय हरणे (सदस्य), श्री. बाळासाहेब थिटे (सदस्य), महानिर्मिती कंपनीने सी.एस.आर. चे धोरण तयार केले असुन त्याला कंपनीचे संचालक मंडळ आणि या समितीने मंजूरी दिली आहे. सी. एस. आर. धोरणाचे ध्येय व उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१ प्रकल्प बाधीत व्यक्ती (पी ए पी) यांची सामाजिक आणि आर्थिक सुधारणा घडविणे.

२. कायम स्वरूपी सुधारणा साठीच्या संधी पुढील क्षेत्रात पुरविणे-उत्पन्नाची निर्मिती, आरोग्य, शिक्षण, पाणी व वीज, स्वचता, संवाद व इतर क्षेत्रे.

३. प्रकल्पग्रस्तांच्या सामुदायिक विकासासाठी व्यापक दृष्टिकोन बाळगणे आणि अशा क्षेत्रात प्रकल्पग्रस्तांना किमान त्यांची पूर्वीची जीवन शैली पुन्हा प्राप्त होईल याची हमी घेणे.

४. सामुदायिक विकासाची कामे पारदर्शक व सहभाग पद्धतीने अंमलात आणणे.

५. स्थानीक लोकप्रतीनिधींच्या सहभागाने व सल्ल्याने समितीच्या कामाचे आयोजन करण्याची हमी घेणे आणि प्रकल्पग्रस्त क्षेत्रे व वीज केंद्राचा परिसर यात कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या कार्यासाठी संस्थात्मक स्वरूपाची यंत्रणा तयार करणे.

सामाजिक जबाबदारी बाबत तपशील अहवाल 'परिशिष्ठ-१ येथे जोडण्यात आला आहे. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १९८ नुसार मागील तीन आर्थिक वर्षासाठी कंपनीचा सरासरी निव्वळ नफा ऋणात्मक (तोटा असल्याने) कायद्याच्या १३५ अंतर्गत विहीत कंपनीचे कोणतेही अनिर्वाय सामाजिक जबाबदारीचे दायित्व नव्हते.

**संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४(३)(सी) नुसार, कंपनीच्या संचालकांच्या जबाबदारीचे विवरण पत्राच्या संदर्भात खालील बाबींची हमी देण्यात येते.

१. कंपनीला लागू होणाऱ्या लेखामानकांचे अनुसरण करण्यात आले आहे. जर काही प्रत्यक्ष विचलन झाले असेल तर, त्याबाबत योग्य स्पष्टीकरणे देण्यात आली आहेत.

२. निवडलेली लेखा धोरण सातत्याने लागू केली होती आणि दि. ३१.०३.२०२५ रोजी कंपनीच्या स्थितीचे रास्त आणि योग्य दर्शन घडावे यासाठी न्यायबुद्धीने तसेच सुज्ञतेने निर्णय घेण्यात आले व अंदाज करण्यात आले.

३. कंपनीच्या मत्तांचे संरक्षण करणे तसेच लबाडी व अनियमितता रोखणे यासाठी कंपनी अधिनियम २०१३ मध्ये ज्या तरतुदी केल्या आहेत, त्यानुसार लेख्यांचे अभिलेखांचे जतन करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने योग्य प्रकारे आणि पुरेशी काळजी घेतली आहे.

४. 'सतत कार्यरत असलेली संस्था' या तत्वाच्या आधारे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले आहेत.

५. कंपनीला लागू होणारे सर्व कायद्यातील तरतूदीचे अनुपालन करण्याची हमी मिळवी या दृष्टीने योग्य कार्य पद्धतीची रचना संचालकांनी केलेली होती आणि ही कार्यपद्धती पुरेशी असुन प्रभावी कार्यरत होती.

**ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञान वापर आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च**

कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १३४(एम) ज्याचे सहवाच कंपनी (लेखे) नियमावली १९८८ यातील नियम क्र. ८(३) या सोबत होते. त्यानुसार 'ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञान स्वीकार आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च' या संबंधीची आवश्यक असलेली माहिती या अहवालाचा भाग असलेले, **'परिशिष्ट-२'** यामध्ये दिलेली आहे.

**सांविधिक लेखा परिक्षक यांची निरीक्षणे/अभिप्राय यांची उत्तरे**

सांविधिक लेखा परिक्षक यांनी त्यांच्या लेखपरिक्षण अहवालात लिहिलेली निरीक्षणे व अभिप्राय यांना कंपनीने दिलेली उत्तरे या अहवालाचे **'परिशिष्ट-३'** यामध्ये जोडली आहेत.

**मुदतींच्या ठेवी**

अहवाल वर्षात कंपनीने जनतेकडून कोणत्याही मुदतीच्या ठेवी मागविल्या नाहीत/स्वीकारल्या नाहीत.

**व्यय लेखापरिक्षक**

सांघिक प्रकरण विभाग मंत्रालय भारत सरकार यांच्या मंजुरीने महानिर्मिती कंपनीने दि. ३१.०३.२०२५ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी कंपनीचे' व्यय लेखा परिक्षक म्हणून मेसर्स रोहीत वोरा आणि कंपनी याची नेमणूक केली आहे.

**सांविधिक लेखापरिक्षक**

कंपनीच्या वैधानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती भारतीय लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक करतात. मे. जी. एम. कपाडीया आणि कंपनी, मुंबई आणि मे. कल्याणीवाला आणि मिस्त्री, एलएलपी मुंबई यांची २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी संयुक्त वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालअंतर्गत लेखापरिक्षण निरीक्षणांना व्यवस्थापनाचे उत्तरे या अहवालाच्या **'परिशिष्ट ३'** यामध्ये दिलेली आहेत.

**बाह्य कंपनी सेक्रेटरी कृत परिक्षण**

महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाने वर्ष २०२४-२५ साठी स्वतंत्र कंपनी सेक्रेटरी यांचेकडून परिक्षण करण्यासाठी मेसर्स ए.वाय. साठे आणि कंपनी या कंपनी सेक्रेटरी (सी/२०२, कोहीनूर अपार्टमेंटस, दुसरा गाळा, एन. सी. केळकर मार्ग, कबूतर खान्याजवळ, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८) यांची नियुक्ती केली आहे. त्यांचा अहवाल **परिशिष्ट-४** यामध्ये आहे.

**ऋणनिर्देश**

महानिर्मिती कंपनीला आपल्या कार्यामध्ये विविध केंद्र व राज्य सरकार विभाग/संस्था यांचे तसेच वित्तीय संस्था आणि बँका, सांविधिक लेखा परिक्षक, व्यय लेखा परिक्षक, भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक, नवी दिल्ली तसेच महालेखापाल (वाणिज्य) मुंबई, केंद्रीय/राज्य विद्युत नियामक, प्राधिकारी, सेक्रेटरीयल, ऑडीटर्स, अपीलासाठीची न्यायाधिकरणे आणि कंपनीचे भागधारक यांनी जी मदत व सहकार्य केले त्याबद्दल संचालक त्यांची कृतज्ञतापूर्वक प्रशंसा व धन्यवाद नोंदवित आहेत. तसेच कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तळमळीने व समर्पित वृत्तीने त्याचे कार्य केले त्याबद्दल मंडळ त्यांची प्रशंसा करीत असून ती येथे नोंदवित आहे.

**संचालक मंडळाच्या वतीने**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

दिनांक: ०८.०१.२०२६

स्थळ: मुंबई

## संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट- १

### कंपनीची सामाजिक जबाबदारी यांचा वार्षिक अहवाल ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी

१. कंपनीच्या सीएसआर धोरणाची संक्षिप्त रूपरेषा - स्थानिक समुदाय आणि समाजाच्या शाश्वत सामाजिक-आर्थिक विकासासाठी सक्रियपणे योगदान देण्याचे महानिर्मितीचे धोरण आहे.

२. **सीएसआर समितीची रचना:**

| अ. क्र | संचालकांची नावे | पद/संचलनाचे स्वरूप | वर्षातील सभांची संख्या* | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | श्री राधाकृष्णन बी. (२६.१२.२०२४ पासून ) | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | - | - |
| २ | डॉ. श्री. पी. अन्बलगन (२६.१२.२०२४ रोजी पर्यन्त) | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | - | - |
| ३ | श्री. बाळासाहेब थिटे | संचालक (वित्त) | - | - |
| ४ | श्री. संजय मारूडकर | संचालक (संचलन) | - | - |
| ५ | श्री. अभय हरणे | संचालक (प्रकल्प) | - | - |

* आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सीएसआर समितीची एकही बैठक झाली नाही.

३. कंपनीच्या संचालक मंडळाने मंजूर केलेली सीएसआर समितीची रचना, सीएसआर धोरण आणि सीएसआर प्रकल्प वेबसाईटवर केले आहे. तिचा - https://mahagenco.in/csr

४. कंपनी (सीएसआर धोरण) नियम, २०१४ च्या उप-नियम (३) नुसार केलेल्या सीएसआर प्रकल्पांच्या प्रभाव मूल्यांकनाचे तपशील लागू असल्यास प्रदान करा: लागू नाही

५. कंपनी (सीएसआर धोरण) नियम, २०१४ च्या ७ च्या उप-नियम (३) नुसार सेट ऑफसाठी उपलब्ध रकमेचा तपशील आणि आर्थिक वर्षासाठी सेट ऑफ करण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम, जर असेल तर

| अ. क्र | आर्थिक वर्ष | सेट-ऑफसाठी उपलब्ध रक्कम मागील आर्थिक वर्षापासून (रक्कम कोटीत) | वित्तीय वर्षापासून उपलब्ध करण्यासाठी आवश्यक रक्कम (रक्कम कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | २०२१-२२ | २.६९ | ० |
| २. | २०२२-२३ | १०.३२ | ० |
| ३. | २०२३-२४ | १०.४३ | ० |

६. कलम १३५(५) नुसार कंपनीचा सरासरी निव्वळ नफा: ₹ (३२८ )/३ = ₹ (१०९) कोटी

७. (अ) कलम १३५(५) नुसार कंपनीच्या सरासरी निव्वळ दोन टक्के - ₹ निरंक

(ब) सीएसआर प्रकल्प किंवा मागील आर्थिक वर्षातील कार्यक्रम यातील अधिक्याची रक्कम - लागू नाही

(क) वित्तीय वर्षासाठी राखून ठेवायची रक्कम - ₹ निरंक

(ड) वित्तीय वर्षासाठी एकूण सीएसआर बंधन (७ अ + ७ ब + ७ क) ₹ निरंक

८. (अ) आर्थिक वर्षासाठी सीएसआर साठी खर्च केलेली किंवा न खर्च केलेली रक्कम

| आर्थिक वर्षात खर्च केलेली एकूण रक्कम (₹ मध्ये | खर्च न केलेली रक्कम (₹ मध्ये) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कलम १३५(६) नुसार न खर्च केलेल्या सीएसआर खात्यात हस्तांतरित केलेली एकूण रक्कम | | कलम १३५(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार अनुसूची अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निधीमध्ये हस्तांतरित केलेली रक्कम | | |
| | रक्कम | हस्तांतरणाची तारीख | निधीचे नाव | रक्कम | हस्तांतरणाची तारीख |
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**ब) आर्थिक वर्षासाठी चालू असलेल्या प्रकल्पांवर खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील**

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | कार्यक्षेत्र सूची ७ च्या लाभांच्या यादी नुसार | स्थानिक क्षेत्र (होय/ नाही) | प्रकल्प जागा | | प्रकल्पची मुदत | जिल्हा प्रकल्पची दिलेली रक्कम (₹ मध्ये) | चालू वित्तीय वर्षात खर्च केलेली रक्कम (₹ मध्ये) | खर्च न केलेली सीएसआर प्रकल्पाची रक्कम कलम १३५(६) नुसार खर्च न केलेल्या सीएसआर खात्यात हस्तांतरित (₹ मध्ये) | अंमलबजावणी प्रत्यक्ष थेट होय/ नाही | अंमलबजावणी संस्थे मार्फत केली असल्यास | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | राज्य | जिल्हा | | | | | | नाव | सीएसआर नोंदणी क्रमांक |
| १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| | एकूण | | | | | | | | | | | |

**(क) आर्थिक वर्षासाठी चालू असलेल्या प्रकल्पांव्यतिरिक्त खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील:**

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | कायद्याच्या सूची ७ मधील यादीतील बाब क्रं | स्थानिक क्षेत्र (होय / नाही) | प्रकल्प जागा | | प्रकल्पची दिलेली रक्कम (₹ मध्ये) | अंमलबजावणी प्रत्यक्ष थेट होय/ नाही | अंमलबजावणी संस्थे मार्फत केली असल्यास | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | राज्य | जिल्हा | | | नाव | सीएसआर नोंदणी क्रमांक |
| १. | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

ड) प्रशासकीय कामासाठी खर्च केलेली रक्कम - लागू नाही

इ) लागू असल्यास, प्रभाव मूल्यांकनावर खर्च रक्कम - लागू नाही

फ) आर्थिक वर्षासाठी खर्च केलेली एकूण रक्कम - लागू नाही (८(ब) + ८(क)+ ८(ड) + ८(इ))

ग) सेट ऑफसाठी जास्तीची रक्कम, जर असेल तर

| अ. क्र. | तपशील | रक्कम (₹ मध्ये) |
|---|---|---|
| (१) | कलम १३५(५) नुसार कंपनीच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या दोन टक्के | निरंक |
| (२) | आर्थिक वर्षासाठी खर्च केलेली एकूण रक्कम | निरंक |
| (३) | आर्थिक वर्षासाठी खर्च केलेली जादा रक्कम (२) - (१) | निरंक |
| (४) | सीएसआर प्रकल्प किंवा मागील आर्थिक वर्षातील कार्यक्रम किंवा उपक्रम, जर काही असेल तर त्यातून उद्भवणारे अधिशेष | निरंक |
| (५) | पुढील आर्थिक वर्षामध्ये सेट ऑफसाठी उपलब्ध रक्कम (३) - (४) | निरंक |

**९. अ) मागील तीन आर्थिक वर्षासाठी न खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील**

| अ. क्र | आधीचे आर्थिक वर्ष | आर्थिक वर्ष खर्च न केलेली सीएसआर साठी हस्तांतरित केलेली रक्कम कलम १३५(६) | अहवालाच्या वित्तीय वर्षात खर्च केलेली रक्कम (₹ मध्ये) | अनुसूची ७ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निधीमध्ये हस्तांतरित केलेली रक्कम कलम १३५(६) जर असेल तर | | | पुढील वर्षात करण्यासाठी रक्कम (₹ मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निधीचे नाव | (₹ मध्ये) | हस्तांतरणाची तारीख | |
| १. | २०२२-२३ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २. | २०२१-२२ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| ३. | २०२०-२१ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| | एकूण | | | | | | |

**(ब) मागील आर्थिक वर्षातील चालू प्रकल्पांसाठी आर्थिक वर्षात केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील**

| अ. क्र. | प्रकल्प ओळखपत्र | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाला ते वित्तीय वर्ष | प्रकल्पाची मुदत | प्रकल्पाची एकूण दिलेली रक्कम | अहवालाची वित्तीय वर्षात प्रकल्पावर खर्च केलेली रक्कम (₹ मध्ये) | संचयी रक्कम खर्च केली ज्या शेवटी अहवाल देणे आर्थिक वर्ष (₹ मध्ये) | प्रकल्पाची स्थिती–पूर्ण / सुरू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २. | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| ३. | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| | एकूण | | | | | | | |

१०. जर सीएसआर रकमेतून वित्तीय वर्षात भांडवली मत्ता निर्माण किंवा संपादित केल्या असतील त्यांच्या निर्मितीच्या संपादन याचा खर्च: लागू नाही (मालमत्तेनुसार तपशील)

(अ) भांडवली मालमत्तेची किंवा संपादनाची तारीख.

(ब) भांडवली मालमत्तेच्या निर्मितीसाठी किंवा संपादनासाठी खर्च केलेल्या सीएसआर ची रक्कम

(क) संस्था किंवा सार्वजनिक प्राधिकरण किंवा लाभार्थींचा तपशील ज्यांच्या नावाखाली भांडवली मालमत्ता नोंदणीकृत आहे, त्यांचा पत्ता इत्यादी .

(ड) तयार केलेल्या किंवा अधिग्रहित केलेल्या भांडवली मालमत्तेचे तपशील प्रदान करा (संपूर्ण पत्ता आणि भांडवली मालमत्तेच्या स्थानासह)

**११.** कलम १३५(५) नुसार कंपनी सरासरी निव्वळ नफ्याच्या दोन टक्के खर्च करण्यात यशस्वी न झाल्यास कारणे निर्दिष्ट करा. **लागू नाही कारण मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये कंपनीला सरासरी नफा नाही.**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**सीएसआर समितीचे अध्यक्ष**

दिनांक: ०८.०१.२०२६

स्थळ: मुंबई

## संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र. २

(कंपनी (लेखे) नियम २०१४ अंतर्गत आवश्यक असलेले तपशील)

### ऊर्जा संवर्धन

- वर्ष २०२४-२०२५ या वर्षात ऊर्जा बचतीचे उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.
- कॉम्प्रेस्ड एअर, फीड वॉटर, कूलिंग वॉटर सिस्टीम, हीटर्स इ. सारख्या क्षेत्रांमध्ये अंतर्गत ऊर्जा अंकेक्षण करण्यात आले.
- वीज निर्मिती केंद्रात कर्मचारी जागरुकता/प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले गेले.
- ऊर्जा संवर्धनावर पोस्टर / निबंध स्पर्धेद्वारे जागरूकता निर्माण केली जाते.
- महानिर्मिती कंपनीकडे प्रशिक्षित अभियंताचा ताफा आहे. ते ऊर्जा अंकेक्षण आणि प्रमाणित ऊर्जा व्यवस्थापक आहेत. त्यांचे ज्ञान केंद्राच्या संचालन व सुव्यवस्थेच्या नित्य कामात उपयोगात आणण्यात येते.
- दरवर्षी २ वेळा कर्मचाऱ्यांना एलईडी दिव्यांचे मोफत वाटप. कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरात एलईडी बल्बचे वाटप.

### सहाय्यक वीज वापर

- ०.२ वर्ग ऊर्जा मीटर वापरून सहाय्यक वापराचे अचूक मूल्यांकन.
- दिवसाच्या प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्यात येतो.
- उपकरणे / मशीन निष्क्रियपणे चालवणे टाळणे.
- ऊर्जा कार्यक्षम दिवे वापरून प्रकाश प्रणालीमध्ये सुधारणा केल्या जातात.
- संपीडित हवा, स्टीम पाईपिंग, कूलिंग वॉटर सिस्टम आणि इलेक्ट्रिकल सिस्टममधील गळती रोखणे.
- डी. एम. वॉटर फ्लो मिटरची स्थापना केली.
- उरण येथील जी.टी. युनिटसाठी नैसर्गिक कूलिंग व्यवस्था.
- सहाय्यकांची स्थिती निरीक्षण आणि वेळेवर प्रतिबंधात्मक देखभाल वेळापत्रक.
- वीज केंद्रांच्या विविध विभागांमध्ये पंप, कॉम्प्रेसर आणि पंखे यासाठी व्हीएफडी बसवणे .
- खापरखेडा २१० मेगावॅट युनिटमध्ये सीईपी इंपेलर स्टेज मध्ये कपात.

### प्रकाश योजना

- एचपीएमव्ही दिव्यांच्या जागी एलईडी लाईटिंग लावणे.
- इलेक्ट्रॉनिक बॅलास्ट आणि सीएफएल दिवे वापरणे.
- सर्व्हिस बिल्डींग, स्टेअरकेस आणि टर्बाइन बेसमेंट भागात शक्य असेल तिथे वैयक्तिक चालू/बंद लाईटिंग स्विचेस प्रदान केले.

### उष्णता ऊर्जा

- ऑन-लाइन कंडेन्सर ट्यूब क्लिनिंग सिस्टमवर योग्य लक्ष.
- थर्मल इन्सुलेशनची त्वरित दुरुस्ती.
- जेव्हा शक्य असेल तेव्हा एअर-प्रीहीटर्स आणि भट्टी साफ करणे..
- बॉयलरच्या अतिरिक्त हवेच्या ऑप्टिमायझेशनचे निरीक्षण.

### वंगण

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना सुरू करण्यात आली आहे
- ऑइल स्किमर नाल्यांमधून इंधन तेल पुनर्प्राप्त करण्यासाठी डिझाइन केलेले आणि विकसित केले आहेत.
- भुसावळ व नाशिक औष्णिक विद्युत केंद्रांवर सेंट्रीफ्यूग करून टर्बाइन आणि बीईपी ऑइल फिल्टरेशन.

### डीएम वॉटर

- डीएम वॉटर, फीड लाइन आणि वाफेची गळती प्राधान्याने हाताळली जाते.

- खापरखेडा येथे सोनिक बॉयलर ट्यूब डिटेक्शन सिस्टीम बसवण्यात आली आहे.

**अन्य पाण्याचा वापर**

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातील राखेच्या पाण्याचा पुर्नवापर केला जातो.
- अग्निशामक पाण्याचे हेडर्स गळती होण्यासाठी भूगर्भातून जमिनीच्या पातळीवर आणले.

**ब) तंत्रज्ञान अंगिकार आणि नवीन शोध स्विकार**

अ) तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी केलेले प्रयत्न

- कोराडी ६६० मेगावॅट युनिटसाठी नागपूर शहरातून प्रक्रिया केलेल्या महानगरपालिकेच्या सांडपाण्याचा वापर .
- कोराडी युनिट-६ ऊर्जा कार्यक्षम नूतनीकरण आणि आधुनिकीकरण पार पडले.
- महानिर्मिती मुख्यालय व वीज केंद्रे येथे साहित्य प्रापणासाठी इ-निविदा संकल्पना सुरू केली.
- खापरखेडा युनिट-२ मध्ये डिव्हिआर यंत्रणा बसवली.
- कोराडी ६६० आणि खापरखेडा ५०० मेगावॅट युनिट मध्ये कमी एनओएक्स बर्नर बसवले.

ब) कंपनीने कोणतेही आयात केलेले तंत्रज्ञान वापरलेले नाही.

**परकीय चलनातील मिळकत व खर्च**

अ) निर्यातीशी संबंधित उपक्रम, निर्यात वाढवण्यासाठी घेतलेला पुढाकार, उत्पादने आणि सेवांसाठी नवीन निर्यात बाजारांचा विकास आणि निर्यात योजना: निरंक

ब) वापरलेले आणि मिळवलेले एकूण परकीय चलन

| अ. क्र. | वापरलेले / कमावलेले एकूण परकीय चलन | ₹ |
|---|---|---|
| १ | परकीय चलनातील खर्च | शून्य |
| २ | परकीय चलन कमावलेले | शून्य |

## संचालकांच्या अहवालाचे परिशिष्ट ३

## सांविधिक लेखापरीक्षकांच्या निरीक्षणांना कंपनीची उत्तरे

| अ. क्र. | मुख्य निरीक्षण | कंपनीची उत्तरे |
|---|---|---|
| १. | टिप क्रमांक ४३(अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) ला देय करावयाच्या विलंब भरणा अधिभार (एलपीएस) उत्पन्नाची गणना ₹ ३,१४९.८३ कोटी (मागील वर्षी ₹ २,६७४.१८ कोटी) थकबाकीच्या उशिरा देयकासाठी व्याज म्हणून केली आहे. अशा उत्पन्नाचा मागील वर्षांमध्ये महावितरणने अंशत: स्वीकार केलेला नाही. मागील वर्षांमध्ये महावितरणने न स्वीकारलेली विलंब भरणा अधिभाराची एकूण रक्कम ३१ मार्च २०२५ रोजी ₹ १६,९९६.१९ कोटी आहे (मागील वर्षी ₹ १५,५९३.६३ कोटी). या व्यतिरिक्त, महावितरणने वीज आणि पूरक बिले आणि मागील कालावधी समायोजनासंदर्भात इतर बिले विवादित केली आहेत, ३१ मार्च २०२५ रोजी वीज आणि पूरक बिलांच्या संदर्भात वादग्रस्त बिलांची शिल्लक आणि मागील कालावधीचे समायोजन ₹ ३३८.०८ कोटी (मागील वर्षी ₹ ४२९.२५ कोटी) आणि ₹ १३७.६१ कोटी (मागील वर्षी ₹ १३७.६१ कोटी) इतके आहे. या वादग्रस्त रकमेच्या वसुलीच्या अनिश्चिततेमुळे, कंपनीच्या नफ्यावर आणि समभागावर होणारा परिणाम आणि त्याचा व्यापार प्राप्ती आणि विना देय येणीवर (टिप ६) होणारा परिणाम यावर आम्ही भाष्य करू शकत नाही. या वर्षी कंपनीने सदर प्राप्ती योग्य रकमेविरुद्ध २,८३३.०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अशा तरतुदीचा कोणताही आधार आम्हाला उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. याव्यतिरिक्त, कंपनीने वरील बिलांना चालू नसलेल्या मत्ता अंतर्गत विवादित व्यापारी येणी असे न नोंदवता चालू मत्ता अंतर्गत व्यापारी येणी (टिप ६) अशी नोंद केली आहे. जे भारतीय लेखा मानक १ वित्तीय विवरणपत्रांचे सादरीकरण मध्ये नमूद केलेल्या प्रकटीकरण आवश्यकतांच्या विरूद्ध आहे. तसेच कंपनीने वरील प्राप्ती निर्विवाद म्हणून उघड केल्या आहेत जे कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची III नुसार नाही. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे. | कंपनीने महावितरणकडून प्राप्त झालेल्या रकमेचे विनियोग करताना प्रथम विलंब भरणा अधिभार (एलपीएस) साठी आणि उर्वरित रक्कम मूळ थकबाकीसाठी समायोजित करण्याची पद्धत अवलंबली आहे. ही पद्धत एलपीएस नियम, २०२२ द्वारे देखील मान्य करण्यात आलेली आहे.<br>एलपीएस नियमांच्या अटी व शर्ती महावितरणकडून अद्याप पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत तसेच महावितरणकडून येणे बाकी असलेल्या रकमेचे आकडे अद्याप अंतिम झालेले नाहीत, हे लक्षात घेता कंपनीने विलंब भरणा अधिभाराची गणना करण्यासाठी आपले तत्त्व व पद्धतीचा अवलंब सुरू ठेवला आहे आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी विलंब भरणा अधिभाराचे बिल जारी केले आहे. या बिलामध्ये ₹ १३,८०१ कोटी रक्कम जी यायची बाकी आहे ती वगळण्यात आली आहे.<br>दरम्यान कंपनीने या रकमेवर अंशत: तरतूद केलेली आहे. महावितरण सोबत येणे बाकी असलेल्या रकमेचे आकडे अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. |

| | | |
|---|---|---|
| २. | टिप क्रमांक ४३(ई) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्यामध्ये (टिप ५) महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ लिमिटेड (एमएसएमसी) कडून धुतलेला कोळसा (पुनर्प्राप्त) ₹ २१.३२ लाख मेट्रिक टन कच्चा कोळसा (₹ १६.८२ लाख मेट्रिक टन धुतलेल्या कोळशात रूपांतरित) (मागील वर्षी १६.६६ लाख मेट्रिक टन कच्चा कोळसा ₹ १३.५४ लाख मेट्रिक टन धुतलेल्या कोळशात रूपांतरित) ₹ ५७१.०० कोटी (मागील वर्षी ₹ ४५०.१५ कोटी) यांचा समावेश आहे. तथापि, एमएसएमसीने अशा दाव्याच्या स्वीकृतीबाबत पुरेसा आणि योग्य लेखापरीक्षण पुरावा नसल्यामुळे, अशा पुनर्प्राप्त कोळशाच्या प्रमाणाची पुनर्प्राप्ती आणि त्याचा कंपनीचा नफा आणि तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्यावर परिणाम यावर आम्ही भाष्य करण्यास असमर्थ आहोत. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षामध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे. | महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ मर्यादित (एमएसएमसी) सोबत धुतलेल्या कोळशाच्या पुरवठ्याच्या करारातील अटींनुसार आणि भारताच्या लेखा नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या लेखापरीक्षण अहवालात केलेल्या निरीक्षणांचे पालन करून, कंपनीने एमएसएमसी कडून वर्षअखेरपर्यंत न पुरवठा केलेल्या पुनर्प्राप्त कोळशाच्या प्रमाणाची नोंद लेखावहीत केली आहे. पुनर्प्राप्त कोळशाचे प्रमाण टप्प्याटप्प्याने प्राप्त होत असून, करारातील अटींनुसार करार कालावधी पूर्ण होईपर्यंत संबंधित पुनर्प्राप्त कोळसा पुरवठादाराकडून मिळेल अशी अपेक्षा आहे.<br>करार कालावधी पूर्ण झाल्यानंतर, कंपनी शिल्लक पुनर्प्राप्त न झालेल्या कोळशाच्या प्रमाणाचे पुनरावलोकन करेल आणि असल्यास ती रक्कम संबंधित पुरवठादाराकडून करारातील अटींनुसार वसूल केली जाईल. |
| ३. | कंपनीने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा, २००६ (एमएसएमई कायदा) अंतर्गत आवश्यक कालावधीपेक्षा बिलंबीत भरण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) देय व्याज म्हणून ₹ २.१८ कोटी (मागील वर्षी ₹ १.६८ कोटी) नोंदविले आहेत. एमएसएमई कायद्याच्या कलम १६ नुसार आवश्यक असलेले व्याज कंपनीने संबंधित विक्रेत्यांना दिलेले नाही (टिपा क्र. ३५ पहा). शिवाय, एमएसएमई कायद्यांतर्गत येणाऱ्या उद्योगांची ओळख पटविण्यासाठी कंपनीकडे योग्य व्यवस्था नाही. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची ओळख पटविण्यासाठी योग्य प्रणाली आणि लेखा संगणक प्रणालीमध्ये एमएसएमई कायद्यांतर्गत ओळखल्या जाणाऱ्या उद्योगांची स्थिती जाणण्यासाठी आवश्यक प्रणाली नसल्यामुळे, अशा उद्योगांसाठी असलेल्या व्याजाच्या तरतुदी, कंपनीच्या नफ्यावर होणारा परिणाम आणि स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांच्या टिप क्रमांक ३५ मध्ये केलेल्या खुलाशावर आम्ही भाष्य करू शकत नाही. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षामध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे. | लेखापरीक्षणामध्ये विक्रेत्याच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग स्थितीची पडताळणी लेखा सॉफ्टवेअरद्वारे करण्याची सूचना करण्यात आली आहे. यासंबंधी, कंपनीने प्रत्येक निविदा कराराच्या प्रारंभी संबंधित विक्रेता सूक्ष्म, लघु किवां मध्यम श्रेणीत मोडतो व सूक्ष्म, लघु किवां मध्यम उद्योग अधिनियमांतर्गत लाभ घेण्यास पात्र आहे, याचा पुरावा म्हणून आवश्यक नोंदणी कागदपत्रे मागविली आहेत. त्यामुळे विक्रेत्याच्या दर्जामध्ये झालेल्या बदलांकडे दुर्लक्ष होण्याचा धोका कमी होतो.<br>कंपनीने सूक्ष्म, लघु किवां मध्यम उद्योग अधिनियमाच्या तरतुदीनुसार सूक्ष्म, लघु किवां मध्यम श्रेणीत येणाऱ्या विक्रेत्यांना देय असलेले व्याज लेखावहीत नोंदविले आहे आणि यासंबंधी आवश्यक प्रकटीकरण केले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४. | भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने (एमओइएफ) जारी केलेल्या ०३ नोव्हेंबर २००९ च्या राजपत्र अधिसूचनेनुसार (सूचना) फ्लाय ॲशच्या विक्रीतून जमा होणारी रक्कम १००% फ्लाय ॲश वापर पातळी गाठेपर्यंत पायाभूत सुविधा किंवा सुविधांच्या विकासासाठी, फ्लाय ॲशच्या वापरासाठी प्रोत्साहन आणि सुविधा उपक्रमांसाठी वापरली जाणे आवश्यक आहे. सदर अधिसूचनेनुसार कंपनीने अशी माहिती वेगळ्या शीर्षकात ठेवणे देखील आवश्यक आहे. वर्षअखेर कंपनीने इतर चालू आर्थिक देणी (टिपा क्र. १९) या शीर्षकाखाली ₹ ४०१.७५ कोटी (मागील वर्षी ₹ ३१९.३६ कोटी) फ्लाय ॲश वापर निधी जमा केला आहे. कंपनीने निर्माण केलेल्या फ्लाय ॲश निधीचा वापर कंपनीच्या कामकाजासाठी केला आहे जो सदर अधिसूचनेचे उल्लंघन आहे. शिवाय कंपनीने वेगळ्या बँक खात्यात निधी जमा केलेला नाही. कंपनीच्या मते, निधी वेगळ्या बँक खात्यात ठेवण्याची कोणतीही अट नाही. (टिपा क्र. ३१ पहा). कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे. | पर्यावरण व वन मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, कंपनीने फ्लाय ॲश विक्रीतून प्राप्त होणाऱ्या महसुलाची नोंद करण्यासाठी स्वतंत्र खाते शीर्षक तयार केले आहे तसेच एक लेजर खाते देखील ठेवले आहे, ज्यामध्ये फ्लाय ॲश विक्रीतून मिळणारा महसूल हस्तांतरित केला जातो. या खात्याला ठफ्लाय ॲश उपयोजन निधी असे नाव देण्यात आले आहे. फ्लाय ॲश उपयोजन निधीतून पायाभूत सुविधा विकासाशी संबंधित सर्व उपक्रम तसेच फ्लाय ॲशच्या उपयोजनाशी संबंधित खर्च अधिसूचनेच्या पालनार्थ करण्यात येतात.<br>सदर अधिसूचना निधी स्वतंत्र बँक खात्यात ठेवण्याची सक्ती करत नाही. |
| ५. | व्यापार देय, व्यापार प्राप्ती, पुरवठादारांना आगाऊ रक्कम, सुरक्षा ठेव, राखीव ठेवी, महाराष्ट्र सरकारची खाती आणि कर्जे ही सामंजस्य आणि परिणामी समायोजनाच्या अधीन आहेत. अशा सामंजस्य आणि समायोजनाच्या अनुपस्थितीत, या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रावर उद्भवू शकणाऱ्या समायोजनांचा किंवा प्रकटीकरणाचा, जर काही असेल, तर त्याचा काय परिणाम होईल हे आम्ही निश्चित करू शकत नाही. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे. | कंपनी वर्षअखेर पुरवठादारांशी ताळमेळ / शिल्लक पुष्टीकरणाची प्रक्रिया राबवते. मात्र जी केवळ कंपनीशी संबंधित नाहीत जसे की पुरवठादारांकडून बिजके सादर करण्यात झालेला विलंब, शिल्लक पुष्टीकरण विनंत्यांना प्रतिसाद न मिळणे, पुरवठादारांकडून चुकीची माहिती येणे, दावे / प्रतिदावे इत्यादी, इत्यादि कारणामुळे काही पुरवठादारांच्या बाबतीत ताळमेळ किंवा समायोजनास अधिक वेळ लागतो. आवश्यकतेनुसार, कंपनी अशा पुरवठादार खात्यांच्या शिल्लक रकमेवर लागू होणारी तरतूद करते.<br>ही सतत चालणारी प्रक्रिया असल्याने, कंपनी शिल्लक पुष्टीकरण व ताळमेळाच्या उपक्रमांना आणखी बळकट करेल. |
| ६. | कंपनीला वित्तीय साधनांवर भारतीय लेखा मानक १०९ नुसार आवश्यक असलेल्या वित्तीय मत्तेवर ''अपेक्षित तोट्याची तरतूद'' करणे आवश्यक आहे. कंपनी व्यापारी येणी यावर अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची गणना करण्यासाठी प्रोव्हिजन मॅट्रिक्स वापरत नाही, तसेच अशा येण्यावरील क्रेडिट जोखीम मूल्यांकन करताना कोणत्याही क्रेडिट मूल्यांकन आणि आजीवन क्रेडिट मूल्यांकनाचा विचार करत नाही आणि 'इतर वित्तीय मत्तेच्या' बाबतीत, त्यांनी भारतीय लेखा मानक १०९ च्या तरतुदींमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांनुसार, अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची गणना करण्यासाठी सामान्य दृष्टिकोन अवलंबलेला नाही. | कंपनी जुन्या शिल्लक रकमेवर किंवा अनिश्चिततेची शक्यता असलेल्या खात्यांवर तरतूद करते. या तरतुदी ताळेबंदातील टिपा मध्ये संबंधित शिल्लक रकमेच्या सोबत सादर केल्या जातात. आगामी वर्षात कंपनी ही प्रक्रिया अपेक्षित पतहानीच्या तरतुदीच्या दृष्टीकोनातून आणखी बळकट करेल. |

| | | |
|---|---|---|
| ७. | कंपनीच्या लेखा धोरणानुसार, भांडारातील सामान सुटे भाग या सह माल साठयाचे मूल्यांकन त्यांचा खर्च आणि त्यांचे वसूली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते. आणि खर्च हा वेटेड अव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो.भांडारातील सेवेस निरूपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्या बाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते. या हेतुसाठी कंपनी मंद हलणाऱ्या वस्तु मालासाठी ३०% २ वर्षा पर्यन्त अचल वस्तु मालासाठी ६०% आणि २ वर्षापेक्षा जास्त अचल वस्तु मालासाठी ८०% या दराने तरतूद केली जाते. निकामी वस्तु मालासाठी पूर्णपणे तरतूद केली जाते. ३१ मार्च २०२५ रोजी अशा साठ्यासाठी एकूण तरतूद ₹ ३९९.८२ कोटी आहे (मागील वर्षी ₹ ४१०.५९ कोटी). अशा तरतुदीची गणना लेखा संगणक प्रणालीमध्ये केली गेली आहे. आमच्याकडून केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आम्हाला अशा निकामी वस्तु मालाची ओळख पटवण्यात आणि अशा तरतुदीची गणना करण्यात त्रुटी आढळून आल्या आहेत. गणनेतील अशा चुकांचा तरतुदीवर होणारा परिणाम कंपनीने निश्चित केलेला नाही. त्यामुळे, कंपनीच्या नफ्यावर आणि समभागावर होणारा परिणाम आणि परिणामी भांडारातील सामानाच्या मूल्यावर (टिप क्रमांक ५) होणारा परिणाम यावर आम्ही भाष्य करू शकत नाही. | कंपनी मंद गतीने हलणाऱ्या / न हलणाऱ्या तसेच कालबाह्य साठ्यासाठी तरतूद करते. अशा तरतुदी प्रणालीद्वारे तयार केलेल्या अहवालांमधून ओळखल्या जातात. कंपनी अशा अहवालांच्या निर्मितीतील त्रुटी ओळखून त्यांचे निराकरण करण्याच्या प्रक्रियेत आहे. आगामी वर्षात कंपनी अहवाल सुधारण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. |
| ८. | ३१ मार्च २०२५ रोजी प्रगतीपथावर असलेल्या भांडवली कामाच्या बाबतीत,कंपनीला प्रकल्प पूर्ण होण्याची अपेक्षित तारीख आणि मालमत्ता/प्रकल्पाची प्रत्यक्ष किंमत मूळ योजनेनुसार अंदाजे खर्चापेक्षा जास्त असल्याचे किंवा मालमत्ता/प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष वेळेची मर्यादा मूळ योजनेनुसार अंदाजे वेळेपेक्षा जास्त असल्याचे, जर असेल तर, उघड करणे आवश्यक आहे. कंपनीने स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांमध्ये असे कोणतेही खुलासे केलेले नाहीत, जे कायद्याच्या अनुसूची II च्या विभाग III च्या आवश्यकतांचे काटेकोरपणे पालन करत नाही. | सध्या कंपनी विविध मालमत्ता वर्गांखाली प्रगतीपथावरील भांडवली कामकाजाच्या शिल्लक रकमेची माहिती तसेच ताळेबंदाच्या टिपामध्ये अशा भांडवली कामाच्या कालावधीसंबंधीची माहिती सादर करत आहे.<br><br>कंपनी या संदर्भात प्रकल्प खर्च आणि वेळेच्या तपशीलांबद्दल अधिक माहिती देण्याचा प्रयत्न करेल. |

**अंतर्गत आर्थिक नियंत्रणासंबंधित**

| अ. क्र. | मुख्य निरीक्षणे | कंपनी उत्तरे |
|---|---|---|
| १ | पुरवठादारांना दिलेल्या आगाऊ रकमा व त्यासाठी करण्यात आलेल्या दायित्वांच्या तरतुदी यांचे वेळेवर समायोजन; ओळखलेले पुरवठादार, न ओळखलेले पुरवठादार, अयशस्वी बँक व्यवहारांशी संबंधित दायित्वे अशा विविध खात्यांमध्ये नोंदविलेल्या नोंदींचे समायोजन/ताळमेळ/निर्मूलन; तसेच जुन्या प्रलंबित शिल्लक रकमेचे समायोजन/ताळमेळ/निर्मूलन. | मुख्यत:, कंपनी तिच्या प्रघाता नुसार प्रकल्प विक्रेते आणि रेल्वेला आगाऊ रक्कम देते. या विक्रेत्यांकडून चक्रीय पद्धतीने बिले घेतली जातात.त्यामुळे आगाऊ रक्कम समायोजित होण्यास वेळ लागतो.तथापि, काळाच्या ओघात, अशा आगाऊ देयतेसह समायोजित केले जातात. कंपनी अशा शिल्लक वेळेवर समायोजित करण्यात सुधारणा करेल. |
| २ | औष्णिक विद्युत केंद्रांसाठी ऊर्जा खरेदी करारानुसार विलंब भरणा अधिभार (एलपीएस) संबंधी मासिक बिले वेळेवर न काढल्याबाबत. | कंपनी पुढील वर्षात अशाप्रकारे बिले जारी करण्याचा विचार करत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | परिसमापनातील नुकसानभरपाईची वेळेवर अंतिमीकरण व आकारणी करण्याबाबत. | मोठ्या प्रकल्पांचे विलंब विश्लेषण हे वेळ लागणारे काम आहे कारण त्यासाठी कंत्राटदार किंवा मालकास कारणीभूत असलेल्या विलंबाच्या कारणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.<br>विलंब स्थापित करण्यासाठी कंपनीच्या निर्णयाबाबत कंत्राटदाराशी सहमत नसलेल्या बाबींसाठी, बऱ्याच वेळा प्रकरण तृतीय पक्ष विश्लेषणाकडे पाठवले जाते जे स्वतंत्र एजन्सी आहेत.<br>पुढे, कंत्राटदाराकडे कंपनीच्या उच्च व्यवस्थापनाकडे अपील किंवा लवाद इत्यादीसारखे इतर पर्याय आहेत ज्यात वेळ लागतो. अशी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, भरपाईच्या रकमेबद्दल निर्णय घेतला जातो. |
| ४ | कर्जे व आगाऊ रक्कम, रोखून ठेवलेली रक्कम आणि धनको यांच्याशी संबंधित प्रणाली-आधारित वयोमान अहवालाबाबत. | एसएपी सिस्टीममधून वयानुसार काही अहवाल प्राप्त होतात. कंपनी सिस्टममधून असे सर्व अहवाल तयार करण्यासाठी प्रयत्न करेल. |
| ५ | स्वायत्त वित्तीय विवरणांमध्ये दायित्वांच्या बाजूस डेबिट शिल्लक खात्यांचे आणि मालमत्तांच्या बाजूस क्रेडिट शिल्लक खात्यांचे मॅपिंग असण्याबाबत. | या प्रणालीमध्ये विशेष जनरल लेजर निर्देशक विकसित केले आहेत, आणि लागू असल्यास, दुरुस्तीचे काम सुरू आहे. हे पुढील वर्षाच्या आर्थिक विवरणांमध्ये प्रतिबिंबित होईल. |
| ६ | व्यवस्थापनाच्या प्रक्रियेच्या आधारे, अंतर्गत लेखापरीक्षकांनी जोखीम मूल्यांकन प्रक्रिया व अंतर्गत आर्थिक नियंत्रण यांची पडताळणी केली आहे. तथापि, काही ठिकाणी जोखीम नियंत्रण मॅट्रिक्स किंवा मानक कार्यपद्धती अद्ययावत करणे आवश्यक आहे किंवा उपलब्ध नाहीत, असे आम्ही निरीक्षण केले आहे. त्यामुळे अशा नियंत्रणांच्या कार्यक्षमतेबाबत आम्ही मत व्यक्त करू शकत नाही. | कंपनीकडे आधीच जोखीम नियंत्रण मॅट्रिक्स आहे. त्याचा आढावा घेऊन आगामी वर्षात त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. |
| ७ | अंतर्गत लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात झालेला विलंब आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल प्राप्त होण्यात झालेला विलंब. | अंतर्गत लेखापरीक्षकाची नियुक्तीसाठी कार्यवाही आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल वेळेवर प्राप्त करण्यासाठी आगामी वर्षात कार्यवाही केली जाईल. |
| ८ | वॉशरी/तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाची कोणताही प्रत्यक्ष पडताळणी अहवाल/पुष्टीकरण उपलब्ध नाही. | कंपनी पुढील वर्षात अशा प्रत्यक्ष पडताळणीच्या शक्यतेबद्दल शोध घेईल. |
| ९ | कर्ज विभाग, प्रकल्प कार्यालये, बांधकाम विभाग आणि विद्युत केंद्रे यासारख्या विविध विभागांमधील कर्ज खर्चाच्या भांडवलीकरणावरील समन्वयावर अंतर्गत नियंत्रण सक्षम करणे आवश्यक आहे. | आगामी वर्षात कर्ज खर्चाचे भांडवलीकरण आणि समन्वय यावर अंतर्गत नियंत्रण मजबूत केले जाईल |
| १० | बँक खाते उघडणे आणि ती खाती कंपनीच्या लेख्यांमध्ये नोंदविण्याबाबतचे नियंत्रण अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. तसेच, कंपनीने केलेल्या व्यवहारांची नोंदणी करण्याची धोरणे आणि त्या व्यवहारांसाठी 'मेकर-चेकर' यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. | कंपनी डेटा बेस स्तरावर थेट बदलांसाठी रेकॉर्डिंग ऑडिट ट्रायलची वैशिष्ट्ये सेट करण्याबद्दलची शक्यता पडताळून पाहिल. |

## फॉर्म क्र. एम आर ३
## सेक्रेटरीयल लेखापरिक्षण अहवाल
### आर्थिक वर्षः ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम २०४(१) आणि कंपनी (व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि मोबदला) नियम २०१४ च्या नियम क्र. ९ नुसार**

**प्रति,**
**मा. सदस्य,**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
प्रकाशगड, भूखंड जी-९,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे(पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

मी अजित साठे, ए.वाय.साठे अँड कंपनीचे मालक, व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी, मुंबई, आपणांस नमूद करतो की, मी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (सीआयएन यू४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८) (यापुढील मजकुरात हिचा उल्लेख कंपनी असा केला आहे) या कंपनीकडून तिला लागू होणाऱ्या सांविधिक तरतुदींचे पालन आणि कंपनी व्यवसायाला धरून राहण्याची निष्ठा यासाठी सेक्रेटरीयल ऑडिट केले आहे. या कंपनीच्या व्यावसायिक वर्तनाचे/ अनुपालनाचे मूल्यांकन करण्यासाठी मला योग्य आधारतत्व मिळावे आणि त्यावर अभिप्राय द्यावा याप्रकारे मी हे परीक्षण केले.

कंपनीची पुस्तके, कागदपत्रे, मिनिट बुक्स, फॉर्म आणि रिटर्न भरलेले आणि कंपनीने ठेवलेल्या इतर नोंदी आणि सेक्रेटरीयल ऑडिट करताना कंपनी, तिचे अधिकारी, एजंट आणि अधिकृत प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीच्या आधारे स्पष्टीकरण आणि आम्हाला दिलेले स्पष्टीकरण, व्यवस्थापनाने केलेले निवेदन, मी याद्वारे अहवाल देतो की, माझ्या मते, कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण कालावधीत ('ऑडिट कालावधी') सांविधिक तरतुदींचे पालन केले आहे. तसेच या कंपनीकडे योग्य बोर्ड-प्रक्रिया आहे आणि त्या मर्यादेत आणि कार्यपद्धतीत अनुपालन करण्याची यंत्रणा अस्तित्वात आहे आणि ती खालील अहवालाच्या अधीन आहे.

कंपनीची पुस्तके, कागदपत्रे, मिनिट बुक्स, फॉर्म आणि रिटर्न आणि कंपनीने ठेवलेल्या इतर नोंदी यांची इ-मेल आणि प्रत्यक्ष पडताळणी केली.

मी ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीने भरलेली पुस्तके, कागदपत्रे, मिनिट बुक्स, फॉर्म आणि रिटर्न आणि इतर नोंदी तपासल्या आहेत. त्यांचे पुढील कायदा व नियमे आदींच्या तरतुदीनुसार परीक्षण केले.

१) कंपनी कायदा, २०१३ (अधिनियम) आणि कंपनी कायदा, १९५६ (लागू मर्यादेपर्यंत) आणि त्याखाली बनवलेले नियम

२) दि सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) कायदा, १९५६ (एससीआरए) आणि त्याखाली बनवलेले नियम; (कंपनी सार्वजनिक असूचीबद्ध कंपनी असल्याने लागू नाही)

३) दि डिपॉझिटरीज कायदा, १९९६ आणि विनियम आणि त्यांअतर्गत तयार केलेले उप-कायदे; (कंपनीचे शेअर्स प्रत्यक्ष स्वरूपात असल्याने लागू नाही)

४) परकीय चलन व्यवस्थापन कायदा, १९९९ आणि त्यांअतर्गत थेट परकीय गुंतवणूक, परदेशी थेट गुंतवणूक आणि बाह्य व्यावसायिक कर्जाच्या मर्यादेपर्यंत केलेले नियम आणि नियम; (ऑडिट कालावधी दरम्यान कंपनीला लागू नाही)

५) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया कायदा, १९९२ ('सेबी कायदा') अंतर्गत विहित केलेले खालील नियम आणि मार्गदर्शक तत्वे लेखापरीक्षण कालावधीत लागू होत नाहीत कारण कंपनी सूचीबद्ध नसलेली सार्वजनिक कंपनी आहे.:

   (अ) भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (शेअर्स संपादन आणि अधिग्रहण) नियम, २०११

   (ब) भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (इनसाइडर ट्रेडिंग प्रतिबंध) विनियम, २०१५

   (क) भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (भांडवल आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २००९

   (ड) भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५

   (इ) भारतीय सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड (कर्मचारी स्टॉक पर्याय योजना आणि कर्मचारी स्टॉक खरेदी योजना) मार्गदर्शक तत्वे, १९९९. जी आता भारतीय सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड (शेअर आधारित कर्मचारी लाभ) नियमावली, २०१४ आणि सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर आधारित कर्मचारी लाभ) (सुधारणा) विनियम, २०१५ द्वारे बदलण्यात आली आहे.

   (ई) भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (डेट सिक्युरिटीजचे इश्यू आणि लिस्टिंग) नियम, २००८

(उ) भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (इश्यू आणि शेअर ट्रान्सफर एजंटचे रजिस्ट्रार) कंपनी व क्लायंटशी व्यवहार करण्याबाबत नियम, १९९३

(ऊ) भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (इक्विटी शेअर्सचे डिलिस्टिंग) नियम, २००९

(ए) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (बायबॅक ऑफ सिक्युरिटीज) विनियम, १९९८

६) विशेषत: कंपनीला लागू होणाऱ्या इतर कायद्यांच्या संदर्भात, खाली नमूद केलेला इतर कायदा विशेषत: कंपनीला लागू आहे

**विद्युत अधिनियम २००३**

मी खालील लागू असलेल्या कलमांचे पूर्ततेचेही परीक्षण केले.

१) दि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सेक्रेटरीयल स्टँडर्ड्स (१ जुलै २०१५ आणि १ ऑक्टोबर २०१७ पासून लागू)

२) कंपनीने बी एस ई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांचे सोबत लिस्टिंग करार (सार्वजनिक असूचीबद्ध कंपनी असल्याने ऑडिट कालावधी दरम्यान कंपनीला लागू होणार नाही)

आढावा वर्षात कंपनीने वर नमूद केलेल्या कायद्यातील तरतुदी, नियम, विनियम, मार्गदर्शक तत्वे, मानके इत्यादींचे पालन केले आहे. यापुढे मी खालीलप्रमाणे अहवाल देतो की,

कार्यकारी संचालक, अकार्यकारी संचालक यांच्या योग्य संतुलनासह कंपनीच्या संचालक मंडळाची स्थापना केली जाते. पुनरावलोकनाधीन कालावधीत संचालक मंडळाच्या रचनेत झालेले बदल अधिनियमातील तरतुदींचे पालन करून करण्यात आले.

सर्व संचालकांना मंडळाच्या बैठकांचे वेळापत्रक तयार करण्यासाठी पुरेशी सूचना देण्यात आली आहे, कार्यक्रम पत्रिका आणि त्यावरील तपशीलवार टिपा किमान सात दिवस अगोदर पाठवण्यात आल्या आहेत आणि बैठकीपूर्वी आणि बैठक अर्थपूर्ण करण्यासाठी, कार्यक्रम पत्रिके वर अधिक माहिती आणि स्पष्टीकरण मिळविण्यासाठी आणि प्राप्त करण्यासाठी एक प्रणाली अस्तित्वात आहे.

निर्णय बहुमताने घेतले जातात आणि जर काही सदस्यांची असहमती दर्शक मते असली तर ती विचारात घेतली जातात. त्यांची नोंद इतिवृत्तात करण्यात येते.

**मी पुढे अहवाल देतो की,** कंपनीच्या आकारमानानुसार आणि कार्यपद्धतीनुसार लागू कायदे, नियम, आणि मार्गदर्शक तत्वे यांचे निरीक्षण आणि अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी कंपनीमध्ये पुरेशा प्रणाली आणि प्रक्रिया आहेत

**मी पुढे अहवाल देतो की,** महानिर्मिती कंपनी म. रा. वि. मं. सूत्रधारी कंपनी लिमिटेड संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे, सूत्रधारी कंपनी ही पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या मालकीची कंपनी आहे आणि तिथे हक्काच्या तत्वाच्या आधारे प्रत्येकी **₹** १०/- दर्शनी किमतीचे समभाग महाराष्ट्र सरकारच्या शासन निर्णयानुसार (जी आर) वाटप केले होते. त्यांच्या तपशील खालील प्रमाणे आहे.

| वाटपाची तारीख | ₹ १० दर्शनी मूल्याच्या समभागाची संख्या | मोबदला | शासन निर्णय क्रमांक |
|---|---|---|---|
| १९/०८/२०२४ | १८,८७,८९,१०० | १८८,७८,९१,००० | शासन निर्णय, क्र. समायो-२०२४/प्र.क.३३/ऊर्जा-३ |

**मी पुढे अहवाल देतो की,** लेखापरीक्षण कालावधीत असे खालील घटना/प्रसंग घडलेले नाहीत:

१) सार्वजनिक / प्राधान्य शेअर्स / ऋणपत्रे / स्वेट इक्विटी इत्यादीचे वितरण करणे

२) प्रतिभूतींचे विमोचन/ पुर्नखरेदी करणे

३) विलिनीकरण/एकत्रीकरण/पुनर्रचना इत्यादी करणे

४) परदेशी तांत्रिक सहयोग करणे

**ए.वाय.साठे अँड कंपनीकरिता**
**कंपनी सेक्रेटरीज**

**सी.एस.अजित साठे**
मालक: एफसीएस नं. २८९९ सी ओ पी नं. ७३८
पीअर रिव्ह्यू प्रमाणपत्र क्र.१५८५/२०२१ यूडीआयएन: एफ००२८९९जी००२०५४५३१

स्थळ: ठाणे
दिनांक२६.११.२०२५
हा अहवाल आमचे समान तारखेचे पत्रासोबत वाचावा. हे पत्र, फॉर्म जोडपत्र-१ या अहवालाचा अविभाज्य भाग आहे.

## सेक्रेटरीयल लेखापरिक्षण अहवालाचे जोडपत्र क्र. १

**प्रति,**
**मा. सदस्य,**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
**प्रकाशगड, भूखंड जी-९,**
**अनंत काणेकर मार्ग, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

आमचा समान तारखेचा अहवाल या पत्रासोबत वाचण्यात यावा.

१) सचिवीय संबंधित कामाचे अभिलेख जतन करणे ही कंपनीची व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे या सचिवीय नोंदीवर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

२) सेक्रेटरिअल रेकॉर्डमधील मजकुराच्या शुद्धतेबद्दल वाजवी हमी मिळविण्यासाठी आम्ही लेखापरीक्षण पद्धती आणि प्रक्रियांचे पालन केले आहे. सचिवीय नोंदीमध्ये योग्य तथ्ये दिसून येतात याची खात्री करण्यासाठी चाचणीच्या आधारावर सत्यापन केले गेले. आमचा विश्वास आहे की आम्ही अनुसरलेल्या प्रक्रिया आणि पद्धती आमच्या मताला वाजवी आधार देतात.

३) आम्ही कंपनीच्या आर्थिक नोंदी आणि लेखाच्या पुस्तकांची शुद्धता आणि योग्यता तपासली नाही.

४) जेथे आवश्यकता आहे तेथे आम्ही कागदे, नियमावली, नियामक आणि घडलेल्या घटना इत्यादी यांच्या पूर्ततेबद्दल आम्ही निवेदने मिळवली आहेत.

५) कंपनी कायदा आणि इतर लागू कायदे, नियम, मानके यांच्या तरतुदीचे पालन करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आमची परीक्षा चाचणीच्या आधारावर प्रक्रियांच्या पडताळणीपुरती मर्यादित होती.

६) सचिवालय लेखापरिक्षण अहवाल कंपनीच्या भविष्यातील व्यवहार्यतेबद्दल किंवा व्यवस्थापनाने कंपनीच्या कारभाराचे संचालन केलेल्या कार्यक्षमतेची किंवा परिणामकारकतेची खात्री नाही.

**ए.वाय.साठे अँड कंपनीकरिता**
**कंपनी सेक्रेटरीज**

**सी.एस.अजित साठे**
**मालकः** एफसीएस नं. २८९९ सी ओ पी नं. ७३८
पीअर रिव्ह्यू प्रमाणपत्र क्र.१५८५/२०२१
यूडीआयएन: एफ००२८९९जी००२०५४५३१

दिनांक: २६.११.२०२५
स्थळ: ठाणे

**भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(६)(ब) यानुसार 'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित' या कंपनीच्या दि.३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांवर व्यक्त केलेले प्रस्तावित अभिप्राय:**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनाी मर्यादित,** या कंपनीच्या दि.३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके कंपनी अधिनियम २०१३ यातील वित्तीय अहवाल देण्याचा आकृतीबंधानुसार सादर करणे ही या कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. भारताचे लेखानियंत्रक आाणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियमाचे कलम १३९(५) यानुसार नियुक्त केलेल्या सांविधिक लेखापरिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३(१०) यात विहित केलेल्या मानकानुसार केलेल्या स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे या वित्तीय विवरण पत्रकावर अभिप्राय देण्याची जबाबदारी असते. त्यांनी तसे केलेले आहे हे त्यांच्या लेखापरिक्षणाच्या दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्या वतीने, **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई या कंपनीच्या दि.३१ मार्च २०२५** रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय पत्रकांचे पूरक लेखापरिक्षण, अधिनियमाचे कलम १४३(६)(अ) नुसार केले. हे लेखापरिक्षण स्वतंत्रपणे केले आहे. त्यासाठी सांविाधिक लेखापरिक्षकांकडून कागदपत्र मिळाविली नाहीत. हे लेखापरिक्षण सांविधिक लेखा परिक्षक आणि कंपनीचे कर्मचारी यांचेकडे विचारणा करणे, लेखा दस्ताऐवजची निवडक परिक्षण यांच्या मर्यादीत करण्यात आले आहे.

माझ्या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारे, मी अधिनियमाचे कलम १४३(६)(ब) नुसार माझ्या लक्षात आलेल्या खालील महत्वाच्या बाबींवर लक्ष वेधू इच्छितो. माझ्या मते वित्तीय विवरणपत्रके आणि संबंधित लेखा परिक्षण अधिक चांगले समजावून घेण्यासाठी ते आवश्यक आहे.

**अ. नफ्या संबंधी टिपण्या:**

**नफा व तोटा पत्रक**
**इतर खर्च (टिपा क्र. २८): ₹ ५६४७.५० कोटी**
**कंपनी सामाजिक जबाबदारी खर्च ₹ ९.०५ कोटी**

१(i) १×६६० मेगावॅट सुपर-क्रिटिकल तंत्रज्ञानाधारित भुसावळ येथील औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट क्र. ६ दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आले असून, सदर युनिटचे हस्तांतरण भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडे करण्यात आले आहे. पर्यावरण वन मंत्रालय (एमओइएफ) यांनी दिनांक २७.११.२०१२ रोजी दिलेल्या पर्यावरणीय मंजुरी (इसी) अंतर्गत अट क्र. XXXI नुसार, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना प्रकल्प कार्यरत असताना दरवर्षी ₹३.६४ कोटी इतका पुनरावर्ती खर्च कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) उपक्रमांसाठी राखून ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.[१]

परंतू, दिनांक २२.०२.२०२५ ते ३१.०३.२०२५ या कालावधीसाठी प्रमाणानुसार कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) खर्चाची तरतूद भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राच्या लेखावहीमध्ये करण्यात आलेली नाही.

वरील कालावधीसाठी प्रमाणानुसार कंपनी सामाजिक जबाबदारी खर्चाची तरतूद न केल्यामुळे चालू दायित्वे व कंपनी सामाजिक जबाबदारी खर्च अनुक्रमे ₹ ०.३९ कोटीने कमी दाखविण्यात आले असून, परिणामी नफा ₹ ०.३९ कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे.

**सुरक्षा खर्च - ₹ १७३.४५ कोटी**

१(ii) **सुरक्षा उपाययोजना व सुरक्षितता (जी एल-७६१७०) - ₹ १६.४६ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने पोलीस विभागाची (एक हवालदार व तीन पोलीस शिपाई) सेवा घेतली असून, त्यांचे वेतनखर्च तसेच लागू असलेला सेवा कर महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांच्याकडून वहन करण्यात यावा अशी तरतूद आहे. परंतू, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने दिनांक ०१.०७.२०२४ ते ३१.०३.२०२५ या कालावधीसाठी सुरक्षा खर्चाकरिता ₹ ०.६१ कोटीची तरतूद केलेली नाही.

यामुळे इतर खर्च (टिपा क्र. २८) अंतर्गत सुरक्षा खर्च कमी दाखविण्यात आला असून, चालू व्यापारी देणी (टिप क्र. १८) देखील कमी दाखविण्यात आली आहेत. परिणामी नफा ₹ ०.६१ कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे.

**ब. आर्थिक स्थितीवर टिप्पणी**

**दायित्वे**
**चालू दायित्वे - ₹ ३२४२२.३१ कोटी**

१. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्रमाणानुसार सीएसआर दायित्व ₹ ३.६४ कोटी × ३९ दिवस/३६५ दिवस = ₹ ०.३९ कोटी

**व्यापारी देणी–सूक्ष्म , लघु व मध्यम व्यतिरिक्त (टिप क्र. १८) - ₹ १०६०५.६७ कोटी**

२. ग्रामपंचायत–पिंप्रीसेकम निम्भोरे यांनी दिनांक २२.०५.२०२४ रोजी सन २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीसाठी मालमत्ता कराचे ₹ ८.०२ कोटी इतके बिल जारी केले. भुसावळ कार्यालयाने ऑक्टोबर २०२४ मध्ये ग्रामपंचायतीस ₹ १.४० कोटी इतका भरणा केला. तसेच, ग्रामपंचायतीने आकारलेल्या जास्त दराविरुद्ध पंचायत समितीच्या अपील कार्यालयात अपील दाखल केले होते. पंचायत समितीने दिनांक २४.०३.२०२५ रोजी अपील संदर्भात आदेश पारित केला असून, त्यानुसार ग्रामपंचायतीने सन २०१९-२० ते २०२५-२६ या सात वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक ₹ ७९,६७,६७६ दराने एकूण ₹ ५.५७ कोटी इतके बिल जारी केले आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत ₹ ६.६१ कोटी इतकी तरतूद केली आहे, जे आवश्यक तरतुदीच्या ₹ ३.३८ कोटी (सन २०१९-२० ते २०२४-२५ या सहा वर्षांसाठी वार्षिक ₹ ७९,६७,६७६ प्रमाणे, त्यातून आधीच भरलेले ₹ १.४० कोटी वजा करून) पेक्षा जास्त आहे.

त्यामुळे मार्च २०२५ अखेर ₹ ३.२३ कोटी इतकी जादा तरतूद झाल्याने चालू दायित्वे व इतर खर्च (दर व कर) अनुक्रमे ₹ ३.२३ कोटीने जास्त दाखविण्यात आले असून, परिणामी नफा ₹ ३.२३ कोटीने कमी दाखविण्यात आला आहे.

**चालू दायित्वे - ₹ ३२४२२.३१ कोटी**
**इतर चालू वित्तीय दायित्वे (टिपा क्र. १९) - ₹ ४२६६.३० कोटी**
**भांडवली मालाची देणी - ₹ १३४.०९ कोटी**

३. छत्तीसगड पूर्व रेल्वे मर्यादित (सीइआरएल) ही कंपनी छत्तीसगड पूर्व रेल्वे कॉरिडॉरचा विकास करीत असून, त्यास जोडणारी शाखा रेल्वे मार्गिका महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना वाटप करण्यात आलेल्या कोळसा खाणींमधून जात आहे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित कडून कोळसा खाणीच्या सीमारेषेवर शाखा रेल्वे मार्गिकेचे संरेखन बदलण्याची विनंती करण्यात आल्यावर, छत्तीसगड ईस्ट रेल्वे मर्यादित (सीइआरएल) यांनी खाजगी जमिनीच्या अतिरिक्त खर्चाकरिता ₹ ५३.४६ कोटीची मागणी केली असून, यापूर्वी नोव्हेंबर २०२१ मध्ये ₹ १११.७२ कोटीचा भरणा करण्यात आलेला होता. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांनी ₹ १६.७८ कोटी व्याजाच्या रकमेचा समान प्रमाणात वाटून घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार सीइआरएल यांनी तात्पुरते ₹ १६.७८ कोटीच्या ५० टक्के वजावट करून ₹ ४५.०७ कोटी (₹ ५३.४६ कोटी वजा ५० टक्के ₹ १६.७८ कोटी) इतकी रक्कम भरण्याची मागणी केली. महानिर्मिती व सीइआरएल यांच्यात दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असून, दिनांक २५.०२.२०२५ रोजी ₹ ४५.०७ कोटी इतका भरणा करण्यात आला आहे. दरम्यान, सीइआरएल यांनी आपल्या पत्र दिनांक १७.०१.२०२५ मध्ये व्याज खर्चाचे वाटप अंतिम किंवा कायमस्वरूपी नसल्याचे नमूद करून भविष्यात महानिर्मिती कडून ₹ ८.३९ कोटीच्या भरण्याची हमी देण्याची विनंती केली आहे.
परंतू, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांनी व्याज दायित्वाकरिता ₹ ८.३९ कोटी (₹ १६.७८ कोटीच्या ५० टक्के) इतकी तरतूद केली नाही तसेच ती आकस्मित दायित्वाखाली देखील उघड केलेली नाही. यामुळे चालू दायित्वे व प्रगतीपथावरील भांडवली कामे अनुक्रमे ₹ ८.३९ कोटीने कमी दाखविण्यात आली आहेत.

**मत्ता:**
**चालू नसलेल्या मत्ता: ₹ ४३०८७.१९ कोटी,**
**चालू नसलेल्या - व्यापारी येणी (टिपा क्र.–३ ब): ₹ ११३६.६७ कोटी.**
**पुरवठादाराला आगाऊ रक्कम - ₹ ४४१.१८ कोटी,**
**पुरवठादाराला आगाऊ रक्कम–(जी एल ९९१०१) - ₹ ११.३९ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**

४. यामध्ये खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र यांनी एमटिपीके आणि केआरडीएस रेल्वे सायडिंग्सकरिता रॅक बुकिंगसाठी अनुक्रमे ₹ १.३५ कोटी व ₹ २.४६ कोटी इतका भरणा केलेला आहे. दक्षिण पूर्व रेल्वेने दिनांक ०३.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे ₹ १.६० कोटी इतक्या समयोजनाची माहिती दिली असून, ती सन २०२४-२५ मध्ये लेखाबद्ध करण्यात आलेली नाही.
यामुळे चालू नसलेल्या व्यापारी देण्या अंतर्गत (टिपा क्र–३ब ) पुरवठादारांकडे आगाऊ रकमेचे जास्त दाखविण्यात आले, वापरलेल्या साहित्याचा खर्च (टिपा क्र–२५) कमी दाखविण्यात आला आहे. परिणामी नफा ₹ १.६० कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे.

**चालू मत्ता**
**इतर मत्ता (टिपा क्र १०): ₹ १०८८.९२ कोटी**
**संचालन व सुव्यवस्था पुरवठा/कामे यांची अग्रिमे ₹ ५९.७५ कोटी**

५. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ( महानिर्मिती) यांनी दिनांक ०३ जुलै २०२३ रोजी ₹ २४७.०५ कोटी (जीएसटीसह)

कंत्राट मूल्याचे पुरस्काराचे पत्र जारी केले आहे. या कामासाठी नियोजित पूर्णता कालावधी १८ महिने असून, शून्य दिनांक (०३ जुलै २०२३) पासून ते ०२ जानेवारी २०२५ पर्यंत हा कालावधी आहे. हे कंत्राट मेसर्स मेलको इंडिया प्रा. लि., फरीदाबाद यांना देण्यात आले असून, कामामध्ये डिझाईन, अभियांत्रिकी, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन यांचा समावेश आहे. सदर काम ड्राय सॉर्बेंट इंजेक्शन (डीएसआय) व फ्ल्यू गॅस डीसल्फरायझेशन (एफजीडी) प्रणाली स्थापनेसाठी असून, हे परळी औष्णिक विद्युत केंद्र येथील युनिट क्रमांक ६, ७ व ८ (३ × २५० मेगावॅट) साठी आहे.

पुरस्काराचे पत्रामधील कलम ९.२.१ व ९.२.२ नुसार, आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर एक्स-वर्क्स किंमतीच्या १५ टक्के रक्कम व्याजमुक्त आगाऊ रक्कम म्हणून दिली जाणार होती. ही आगाऊ रक्कम पुरवठा केलेल्या वस्तूंच्या बिजकांद्वारे प्रो-राटा पद्धतीने वसूल करण्यात येणार असून, नियोजित पूर्णता दिनांकाच्या अगोदरच्या बिजकामध्ये कोणतीही असंयोजित शिल्लक रक्कम वसूल करण्यात येईल. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती ) यांनी मेसर्स मेलको इंडिया प्रा. लि. यांना ₹ ३६.८१ कोटी इतकी व्याजमुक्त मोबिलायझेशन आगाऊ रक्कम जारी केली आहे.

मात्र, दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी कंत्राटदाराकडून असंयोजित मोबिलायझेशन आगाऊ रक्कम म्हणून ₹ १८.८३ कोटी वसूल केलेले नव्हते. यामुळे चालू मत्तेतील संचालन व सुव्यवस्था पुरवठा/ कामे यांच्या आगाऊ रकमेचे अधिक लेखांकन झाले असून, प्रगतीपथावरील भांडवली कामे या रकमेचे ₹ १८.८३ कोटी इतके कमी लेखांकन झाले आहे.

**इतर मत्ता (टिपा क्र. १०): ₹ १०८९.०९ कोटी**

**शासन प्राधिकरणांना अग्रिमे - ₹ ८७.२८ कोटी**

**शासन प्राधिकरणांना अग्रिमे (जी एल–९९१०९) - ₹ १२.३८ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**

६. वरील रकमेतील ₹ १.९६ कोटी इतकी रक्कम रेल्वे वाहतूक खर्चासाठी असून ती ई-पी एम टी द्वारे दिनांक २४ जानेवारी २०२४ ते ०१ एप्रिल २०२४ दरम्यान अदा करण्यात आली आहे.कोळसा व वाहतूक खर्च या दोन्हींचा उपभोग त्याच कालावधीत घेण्यात आला असून ते योग्य प्रकारे खर्च खात्यात नोंदविण्यात आले आहेत. मात्र, आगाऊ खाते संबंधित देय खात्याविरुद्ध समायोजित करण्यात आलेले नाही.

यामुळे चालू इतर मत्ता (टिपा क्र. १०) अंतर्गत शासन प्राधिकरणांकडे आगाऊ रकमेचे अधिक लेखांकन तसेच चालू व्यापारी देणी (टिपा क्र. १८) अंतर्गत अधिक लेखांकन प्रत्येकी ₹ १.९६ कोटी इतके झाले आहे.

**क. प्रकटीकरणावर टिप्पण्या**

**आकस्मिक दायित्वे आणि बांधिलकी (टिपा क्र. ४०)**

**३. महत्वाच्या इतर बांधिलकी**

७. पर्यावरण व वन मंत्रालय (एमओइएफ ) यांनी दिनांक २७.११.२०१२ रोजी भुसावळ १×६६० मेगावॅट सुपर-क्रिटिकल तंत्रज्ञानाधारित औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पासाठी दिलेल्या पर्यावरणीय मंजुरी मधील अट क्रमांक XXXI नुसार,महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना प्रकल्प प्रवर्तकाने केलेल्या बांधिलकीप्रमाणे कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) कार्यक्रमासाठी ₹ १८.२० कोटी इतका एकदाच होणारा भांडवली खर्च करणे आवश्यक होते. १×६६० मेगावॅट भुसावळ प्रकल्प फेब्रुवारी २०२५ मध्ये पूर्ण होऊन कार्यान्वित करण्यात आला. महानिर्मिती ने सीएसआर खर्चाखाली झालेल्या ₹ ५.२८ कोटी इतक्या रकमेचे मार्च २०२५ पर्यंत भांडवलीकरण केले आहे.

मात्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी भुसावळ १×६६० मेगावॅट प्रकल्पासाठी प्रकल्प प्रवर्तकाने केलेल्या बांधिलकीप्रमाणे एकदाच होणाऱ्या सीएसआर भांडवली खर्चाकरिता ₹ १२.९२ कोटी खर्च करणे आवश्यक आहे ही बाब टिपा क्र. ४१ मधील आकस्मिक दायित्वे व बांधिलकी अंतर्गत उघड केलेली नाही. त्यामुळे टिपा क्र. ४१ मधील आकस्मिक दायित्वे व बांधिलकी संदर्भातील प्रकटीकरण वरील प्रमाणात अपूर्ण आहे.

**भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरीक्षक**
**यांचे साठी आणि त्यांच्यावतीने**
**सही/ -**
**(दत्तप्रसाद एस शिरसाठ)**
**महालेखापाल (लेखापरीक्षण)–दोन, महाराष्ट्र**

दिनांक: २६/१२/२०२५
ठिकाण: नागपूर

## भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(६)(ब) यानुसार 'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित' या कंपनीच्या दि.३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवर व्यक्त केलेले प्रस्तावित अभिप्राय:

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,** या कंपनीच्या **दि. ३१ मार्च २०२५** रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रके कंपनी अधिनियम २०१३ यातील वित्तीय अहवाल देण्याचा आकृतीबंधानुसार सादर करणे ही या कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. भारताचे लेखानियंत्रक आाणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियमाचे कलम १३९(५) ज्याचे वाचन अधिनियमाचे कलम २९१४ सोबत होते यानुसार नियुक्त केलेल्या सांविधिक लेखापरिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३(१०) यात विहित केलेल्या मानकानुसार केलेल्या स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे या वित्तीय विवरण पत्रकावर अभिप्राय देण्याची जबाबदारी असते. त्यांनी तसे केलेले आहे हे त्यांच्या लेखापरिक्षणाच्या दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्या वतीने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय पत्रकांचे पूरक लेखापरिक्षण, अधिनियमाचे कलम १४३(६)(अ), ज्याचे वाचन पत्र अधिनियमाचे कलम १२९(४) सोबत केले जाते, त्यानुसार आयोजित केले होते. आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित **धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड, महागूज कोलायरीज लिमिटेड, महाजेनको रिनीवेबल एनर्जी लिमिटेड आणि (कंपनीच्या उपकंपन्या), महाजेनको एनटिपीसी ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड (संयुक्त साहस उपक्रम) यांच्या वित्तीय विवरण पत्रकाचे पुरक लेखापरीक्षण केले, परंतु मेसर्स युसीएल कोल कंपनी लिमिटेड आणि छत्तीसगढ कटघोरा डोंगरगढ रेल्वे लिमिटेड (कंपनीच्या सहयोगी कंपन्या)** यांच्या त्याच तारखेला संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रकांचे पूरक लेखा परिक्षण केलेले नाही. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले. त्यासाठी सांविधिक लेखा परिक्षकांची कामकाज कागदपत्र मिळविण्यात आलेले नाहीत आाणि हे पूरक लेखापरिक्षण प्रामुख्याने सांविाधिक लेखा परिक्षक यांच्याकडे चौकशी करणे, कंपनी कर्मचारी यांचेकडे विचारणा करणे आणि लेख्यांच्या काही दस्ताऐवजांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादित केले आहे.

माझ्या पूरक लेखापरिक्षणात, ज्यावर अधिनियमांचे कलम १४३(६)(ब) यांचे सहवाचन अधिनियमाचे कलम १२९(४) सोबत होते. यानुसार माझ्या लक्षात आलेल्या खालील महत्वाच्या बाबींवर लक्ष वेधू इच्छितो, माझ्या मते वित्तीय विवरणपत्रके आणि संबंधित लेखा परिक्षण अधिक समजावून घेण्यासाठी ते आवश्यक आहे.

**१. नफ्या संबंधी टिपण्या:**

**नफा व तोटा पत्रक**

**इतर खर्च (टिपा क्र. २८): ₹ ५६४८.१३ कोटी**

**कंपनी सामाजिक जबाबदारी खर्च ₹ ९.०५ कोटी**

१(i) १×६६० मेगावॅट सुपर-क्रिटिकल तंत्रज्ञानाधारित भुसावळ येथील औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट क्र. ६ दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आला असून, सदर युनिटचे हस्तांतरण भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडे करण्यात आले आहे. पर्यावरण वन मंत्रालय (एमओइएफ ) यांनी दिनांक २७.११.२०१२ रोजी दिलेल्या पर्यावरणीय मंजुरी (इसी ) अंतर्गत अट क्र. XXXI नुसार, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना प्रकल्प कार्यरत असताना दरवर्षी ₹ ३.६४ कोटी इतका पुनरावर्ती खर्च कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) उपक्रमांसाठी राखून ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

परंतू, दिनांक २२.०२.२०२५ ते ३१.०३.२०२५ या कालावधीसाठी प्रमाणानुसार कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) खर्चाची तरतूद भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राच्या लेखावहीमध्ये करण्यात आलेली नाही.

वरील कालावधीसाठी प्रमाणानुसार कंपनी सामाजिक जबाबदारी खर्चाची तरतूद न केल्यामुळे चालू दायित्वे व कंपनी सामाजिक जबाबदारी खर्च अनुक्रमे ₹ ०.३९ कोटीने कमी दाखविण्यात आले असून, परिणामी नफा ₹ ०.३९ कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे.[१]

**सुरक्षा खर्च - ₹ १७३.४५ कोटी**

**सुरक्षा उपाययोजना व सुरक्षितता (जी एल–७६१७०) - ₹ १६.४६ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**

१(ii) खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने पोलीस विभागाची (एक हवालदार व तीन पोलीस शिपाई) सेवा घेतली असून, त्यांचे वेतनखर्च तसेच लागू असलेला सेवा कर महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांच्याकडून वहन करण्यात यावा अशी तरतूद आहे. परंतू, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने दिनांक ०१.०७.२०२४ ते ३१.०३.२०२५ या कालावधीसाठी सुरक्षा खर्चाकरिता ₹ ०.६१ कोटीची तरतूद केलेली नाही.

यामुळे इतर खर्च (टिपा क्र. २८) अंतर्गत सुरक्षा खर्च कमी दाखविण्यात आला असून, चालू व्यापारी देणी (टिप क्र. १८) देखील कमी दाखविण्यात आली आहेत. परिणामी नफा ₹ ०.६१ कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे.

१. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्रमाणानुसार सीएसआर दायित्व ₹ ३.६४ कोटी × ३९ दिवस/३६५ दिवस = ₹ ०.३९ कोटी

**ब. आर्थिक स्थितीवर टिप्पणी**

**दायित्वे**

**चालू दायित्वे - ₹ ३२४२२.३१ कोटी**

**व्यापारी देणी–सूक्ष्म, लघु व मध्यम व्यतिरिक्त (टिप क्र. १८) - ₹ १०६०५.६७ कोटी**

२. ग्रामपंचायत–पिंप्रीसेकम निम्भोरे यांनी दिनांक २२.०५.२०२४ रोजी सन २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीसाठी मालमत्ता कराचे ₹ ८.०२ कोटी इतके बिल जारी केले. भुसावळ कार्यालयाने ऑक्टोबर २०२४ मध्ये ग्रामपंचायतीस ₹ १.४० कोटी इतका भरणा केला. तसेच, ग्रामपंचायतीने आकारलेल्या जास्त दराविरुद्ध पंचायत समितीच्या अपील कार्यालयात अपील दाखल केले होते. पंचायत समितीने दिनांक २४.०३.२०२५ रोजी अपील संदर्भात आदेश पारित केला असून, त्यानुसार ग्रामपंचायतीने सन २०१९-२० ते २०२५-२६ या सात वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक ₹ ७९,६७,६७६ दराने एकूण ₹ ५.५७ कोटी इतके बिल जारी केले आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत ₹ ६.६१ कोटी इतकी तरतूद केली आहे, जे आवश्यक तरतुदीच्या ₹ ३.३८ कोटी (सन २०१९-२० ते २०२४-२५ या सहा वर्षांसाठी वार्षिक ₹ ७९,६७,६७६ प्रमाणे, त्यातून आधीच भरलेले ₹ १.४० कोटी वजा करून) पेक्षा जास्त आहे.

त्यामुळे मार्च २०२५ अखेर ₹ ३.२३ कोटी इतकी जादा तरतूद झाल्याने चालू दायित्वे व इतर खर्च (दर व कर) अनुक्रमे ₹ ३.२३ कोटीने जास्त दाखविण्यात आले असून, परिणामी नफा ₹ ३.२३ कोटीने कमी दाखविण्यात आला आहे.

**चालू दायित्वे - ₹ ३२४२२.३१ कोटी**

**इतर चालू वित्तीय दायित्वे (टिपा क्र. १९) - ₹ ४२६६.३० कोटी**

**भांडवली मालाची देणी - ₹ १३४.०९ कोटी**

३. छत्तीसगड पूर्व रेल्वे मर्यादित (सीइआरएल) ही कंपनी छत्तीसगड पूर्व रेल्वे कॉरिडॉरचा विकास करीत असून, त्यास जोडणारी शाखा रेल्वे मार्गिका महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना वाटप करण्यात आलेल्या कोळसा खाणींमधून जात आहे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित कडून कोळसा खाणीच्या सीमारेषेवर शाखा रेल्वे मार्गिकेचे संरेखन बदलण्याची विनंती करण्यात आल्यावर, छत्तीसगड ईस्ट रेल्वे मर्यादित (सीइआरएल) यांनी खाजगी जमिनीच्या अतिरिक्त खर्चाकरिता ₹ ५३.४६ कोटीची मागणी केली असून, यापूर्वी नोव्हेंबर २०२१ मध्ये ₹ १११.७२ कोटीचा भरणा करण्यात आलेला होता. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांनी ₹ १६.७८ कोटी व्याजाच्या रकमेचा समान प्रमाणात वाटून घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार सीइआरएल यांनी तात्पुरते ₹ १६.७८ कोटीच्या ५० टक्के वजावट करून ₹ ४५.०७ कोटी (₹ ५३.४६ कोटी वजा ५० टक्के ₹ १६.७८ कोटी) इतकी रक्कम भरण्याची मागणी केली. महानिर्मिती व सीइआरएल यांच्यात दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असून, दिनांक २५.०२.२०२५ रोजी ₹ ४५.०७ कोटी इतका भरणा करण्यात आला आहे. दरम्यान, सीइआरएल यांनी आपल्या पत्र दिनांक १७.०१.२०२५ मध्ये व्याज खर्चाचे वाटप अंतिम किंवा कायमस्वरूपी नसल्याचे नमूद करून भविष्यात महानिर्मिती कडून ₹ ८.३९ कोटीच्या भरण्याची हमी देण्याची विनंती केली आहे.

परंतू, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांनी व्याज दायित्वाकरिता ₹ ८.३९ कोटी (₹ १६.७८ कोटीच्या ५० टक्के) इतकी तरतूद केली नाही तसेच ती आकस्मित दायित्वाखाली देखील उघड केलेली नाही. यामुळे चालू दायित्वे व प्रगतीपथावरील भांडवली कामे अनुक्रमे ₹ ८.३९ कोटीने कमी दाखविण्यात आली आहेत.

**मत्ता:**

**चालू नसलेल्या मत्ता: ₹ ४३०८७.१९ कोटी**

**चालू नसलेल्या - व्यापारी येणी (टिपा क्र. ३ ब): ₹ ११३६.६७ कोटी**

**पुरवठादाराला आगाऊ रक्कम - ₹ ४४१.१८ कोटी**

**पुरवठादाराला आगाऊ रक्कम - (जी एल ९९१०१) - ₹ ११.३९ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**

४. यामध्ये खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र यांनी एमटिपीके आणि केआरडीएस रेल्वे सायडिंग्सकरिता रॅक बुकिंगसाठी अनुक्रमे ₹ १.३५ कोटी व ₹ २.४६ कोटी इतका भरणा केलेला आहे. दक्षिण पूर्व रेल्वेने दिनांक ०३.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे ₹ १.६० कोटी इतक्या समयोजनाची माहिती दिली असून, ती सन २०२४-२५ मध्ये लेखाबद्ध करण्यात आलेली नाही.

यामुळे चालू नसलेल्या व्यापारी देण्या अंतर्गत (टिपा क्र–३ब) पुरवठादारांकडे आगाऊ रकमेचे जास्त दाखविण्यात आले, वापरलेल्या साहित्याचा खर्च (टिपा क्र–२५) कमी दाखविण्यात आला आहे. परिणामी नफा ₹ १.६० कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे.

**चालू मत्ता**

**इतर मत्ता (टिपा क्र १०): ₹ १०८८.९२ कोटी**

**संचालन व सुव्यवस्था पुरवठा/ कामे यांची अग्रिमे ₹ ५९.९१ कोटी**

५. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी दिनांक ०३ जुलै २०२३ रोजी ₹ २४७.०५ कोटी (जीएसटीसह) कंत्राट मूल्याचे पुरस्काराचे पत्र जारी केले आहे. या कामासाठी नियोजित पूर्णता कालावधी १८ महिने असून शून्य दिनांक (०३ जुलै २०२३) पासून ते ०२ जानेवारी २०२५ पर्यंत हा कालावधी आहे. हे कंत्राट मेसर्स मेलको इंडिया प्रा. लि., फरीदाबाद यांना देण्यात आले असून, कामामध्ये डिझाईन, अभियांत्रिकी, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन यांचा समावेश आहे. सदर काम ड्राय सॉर्बेंट इंजेक्शन (डीएसआय) व फ्ल्यू गॅस डीसल्फरायझेशन (एफजीडी) प्रणाली स्थापनेसाठी असून, हे परळी औष्णिक विद्युत केंद्र येथील युनिट क्रमांक ६, ७ व ८ (३×२५० मेगावॅट) साठी आहे.

पुरस्काराचे पत्रामधील कलम ९.२.१ व ९.२.२ नुसार, आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर एक्स-वर्क्स किंमतीच्या १५ टक्के रक्कम व्याजमुक्त आगाऊ रक्कम म्हणून दिली जाणार होती. ही आगाऊ रक्कम पुरवठा केलेल्या वस्तूंच्या बिजकांद्वारे प्रो-राटा पद्धतीने वसूल करण्यात येणार असून, नियोजित पूर्णता दिनांकाच्या अगोदरच्या बिजकामध्ये कोणतीही असंयोजित शिल्लक रक्कम वसूल करण्यात येईल. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती ) यांनी मेसर्स मेलको इंडिया प्रा. लि. यांना ३६.८१ कोटी इतकी व्याजमुक्त मोबिलायझेशन आगाऊ रक्कम जारी केली आहे.

मात्र, दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी कंत्राटदाराकडून असंयोजित मोबिलायझेशन आगाऊ रक्कम म्हणून ₹ १८.८३ कोटी वसूल केलेले नव्हते. यामुळे चालू मत्तेतील संचालन व सुव्यवस्था पुरवठा/कामे यांच्या आगाऊ रकमेचे अधिक लेखांकन झाले असून, प्रगतीपथावरील भांडवली कामे या रकमेचे ₹ १८.८३ कोटी इतके कमी लेखांकन झाले आहे.

**इतर मत्ता (टिपा क्र. १०): ₹ १०८९.०९ कोटी**

**शासन प्राधिकरणांना अग्रिमे - ₹ ८७.२८ कोटी**

**शासन प्राधिकरणांना अग्रिमे (जी एल - ९९१०९) - ₹ १२.३८ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**

६. वरील रकमेतील ₹ १.९६ कोटी इतकी रक्कम रेल्वे वाहतूक खर्चासाठी असून ती ई-पी एम टी द्वारे दिनांक २४ जानेवारी २०२४ ते ०१ एप्रिल २०२४ दरम्यान अदा करण्यात आली आहे.कोळसा व वाहतूक खर्च या दोन्हींचा उपभोग त्याच कालावधीत घेण्यात आला असून ते योग्य प्रकारे खर्च खात्यात नोंदविण्यात आले आहेत. मात्र, आगाऊ खाते संबंधित देय खात्याविरुद्ध समायोजित करण्यात आलेले नाही.

यामुळे चालू इतर मत्ता (टिपा क्र. १०) अंतर्गत शासन प्राधिकरणांकडे आगाऊ रकमेचे अधिक लेखांकन तसेच चालू व्यापारी देणी (टिपा क्र. १८) अंतर्गत अधिक लेखांकन प्रत्येकी ₹ १.९६ कोटी इतके झाले आहे.

**क. प्रकटीकरणावर टिप्पण्या**

**आकस्मिक दायित्वे आणि बांधिलकी (टिपा क्र. ४०)**

**३. महत्वाच्या इतर बांधिलकी**

७. पर्यावरण व वन मंत्रालय (एमओइएफ ) यांनी दिनांक २७.११.२०१२ रोजी भुसावळ १×६६० मेगावॅट सुपर-क्रिटिकल तंत्रज्ञानाधारित औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पासाठी दिलेल्या पर्यावरणीय मंजुरी मधील अट क्रमांक XXXI नुसार,महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना प्रकल्प प्रवर्तकाने केलेल्या बांधिलकीप्रमाणे कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) कार्यक्रमासाठी ₹ १८.२० कोटी इतका एकदाच होणारा भांडवली खर्च करणे आवश्यक होते. १×६६० मेगावॅट भुसावळ प्रकल्प फेब्रुवारी २०२५ मध्ये पूर्ण होऊन कार्यान्वित करण्यात आला. महानिर्मिती ने सीएसआर खर्चाखाली झालेल्या ₹ ५.२८ कोटी इतक्या रकमेचे मार्च २०२५ पर्यंत भांडवलीकरण केले आहे.

मात्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी भुसावळ १×६६० मेगावॅट प्रकल्पासाठी प्रकल्प प्रवर्तकाने केलेल्या बांधिलकीप्रमाणे एकदाच होणाऱ्या सीएसआर भांडवली खर्चाकरिता ₹ १२.९२ कोटी खर्च करणे आवश्यक आहे ही बाब टिपा क्र. ४१ मधील आकस्मिक दायित्वे व बांधिलकी अंतर्गत उघड केलेली नाही. त्यामुळे टिपा क्र. ४१ मधील आकस्मिक दायित्वे व बांधिलकी संदर्भातील प्रकटीकरण वरील प्रमाणात अपूर्ण आहे.

**भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरीक्षक**
**यांचे साठी आणि त्यांच्यावतीने**
**सही/-**
**(दत्तप्रसाद एस शिरसाठ)**
**महालेखापाल (लेखापरीक्षण)—दोन, महाराष्ट्र**

दिनांक: २६/१२/२०२५
ठिकाण: नागपूर

## वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी लेखा नियंत्रक व महालेखापाल यांच्या स्वायत्त आणि एकत्रित अंतिम अभिप्रायावर महानिर्मिती कंपनीच्या व्यवस्थापनाची उत्तरे

| अ. क्र | लेखा परीक्षण अभिप्राय | व्यवस्थापनाची उत्तरे | सांविधिक लेखा परीक्षकांचे मत |
|---|---|---|---|
| १. | **नफ्या संबंधी टिपण्या:**<br>**नफा व तोटा पत्रक**<br>**इतर खर्च (टिपा क्र. २८): ₹ ५६४७.५० कोटी कंपनी सामाजिक जबाबदारी खर्च ₹ ९.०५ कोटी** | | |
| i) | १×६६० मेगावॅट सुपर-क्रिटिकल तंत्रज्ञानाधारित भुसावळ येथील औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट क्र. ६ दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आला असून, सदर युनिटचे हस्तांतरण भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडे करण्यात आले आहे. पर्यावरण वन मंत्रालय (एमओइएफ ) यांनी दिनांक २७.११.२०१२ रोजी दिलेल्या पर्यावरणीय मंजुरी (इसी ) अंतर्गत अट क्र. XXXI नुसार, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना प्रकल्प कार्यरत असताना दरवर्षी ₹ ३.६४ कोटी इतका पुनरावर्ती खर्च कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) उपक्रमांसाठी राखून ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.<br>परंतू, दिनांक २२.०२.२०२५ ते ३१.०३.२०२५ या कालावधीसाठी प्रमाणानुसार कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) खर्चाची तरतूद भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राच्या लेखावहीमध्ये करण्यात आलेली नाही. वरील कालावधीसाठी प्रमाणानुसार कंपनी सामाजिक जबाबदारी खर्चाची तरतूद न केल्यामुळे चालू दायित्वे व कंपनी सामाजिक जबाबदारी खर्च अनुक्रमे ₹ ०.३९ कोटीने कमी दाखविण्यात आले असून, परिणामी नफा ₹ ०.३९ कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे.[१] | भुसावळ प्रकल्प दिनांक २२-०२-२०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आला आहे. परंतू, भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रासाठी कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) आराखडा अद्याप मंजूर झालेला नाही. म्हणूनच, दिनांक ३१-०३-२०२५ रोजी तत्काळ खर्चाच्या तरतुदीची नोंद भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राच्या लेखावहीमध्ये करण्यात आलेली नाही. कंपनी वरील तरतुदीचे पालन वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये सुनिश्चित करील. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| ii) | **सुरक्षा खर्च - ₹ १७३.४५ कोटी**<br>**सुरक्षा उपाययोजना व सुरक्षितता (जी एल–७६१७०) - ₹ १६.४६ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**<br>खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने पोलीस विभागाची (एक हवालदार व तीन पोलीस शिपाई) सेवा घेतली असून, त्यांचे वेतनखर्च तसेच लागू असलेला सेवा कर महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांच्याकडून वहन करण्यात यावा अशी तरतूद आहे. परंतू खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने दिनांक ०१.०७.२०२४ ते ३१.०३.२०२५ या कालावधीसाठी सुरक्षा खर्चाकरिता ₹ ०.६१ कोटीची तरतूद केलेली नाही.<br>यामुळे इतर खर्च (टिपा क्र. २८) अंतर्गत सुरक्षा खर्च कमी दाखविण्यात आला असून, चालू व्यापारी देणी (टिप क्र. १८) देखील कमी दाखविण्यात आली आहेत. परिणामी नफा ₹ ०.६१ कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे. | पोलीस संरक्षण सेवांसाठी सुरक्षा खर्चाचे बीजक पोलीस विभागाकडून सादर करण्यात आलेले नाही. परिणामी, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात बीजक चलन प्रक्रिया होऊ शकली नाही.<br>आवश्यक लेखा कारवाई पुढील वित्तीय वर्षात करण्यात येईल. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

१. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्रमाणानुसार सीएसआर दायित्व ₹ ३.६४ कोटी × ३९ दिवस/३६५ दिवस = ₹ ०.३९ कोटी

| | | | |
|---|---|---|---|
| २. | **आर्थिक स्थितीवर टिप्पणी**<br>**चालू दायित्वे - ₹ ३२४२२.३१ कोटी**<br>**व्यापारी देणी–सूक्ष्म, लघु व मध्यम व्यतिरिक्त (टिप क्र. १८) - ₹ १०६०५.६७ कोटी**<br>ग्रामपंचायत–पिंप्रीसेकम निम्भोरे यांनी दिनांक २२.०५.२०२४ रोजी सन २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीसाठी मालमत्ता कराचे ₹ ८.०२ कोटी इतके बिल जारी केले. भुसावळ कार्यालयाने ऑक्टोबर २०२४ मध्ये ग्रामपंचायतीस ₹ १.४० कोटी इतका भरणा केला. तसेच, ग्रामपंचायतीने आकारलेल्या जास्त दराविरुद्ध पंचायत समितीच्या अपील कार्यालयात अपील दाखल केले होते. पंचायत समितीने दिनांक २४.०३.२०२५ रोजी अपील संदर्भात आदेश पारित केला असून, त्यानुसार ग्रामपंचायतीने सन २०१९-२० ते २०२५-२६ या सात वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक ₹ ७९,६७,६७६ दराने एकूण ₹ ५.५७ कोटी इतके बिल जारी केले आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत ₹ ६.६१ कोटी इतकी तरतूद केली आहे, जे आवश्यक तरतुदीच्या ₹ ३.३८ कोटी (सन २०१९-२० ते २०२४-२५ या सहा वर्षांसाठी वार्षिक ₹ ७९,६७,६७६ प्रमाणे, त्यातून आधीच भरलेले ₹ १.४० कोटी वजा करून) पेक्षा जास्त आहे.<br>त्यामुळे मार्च २०२५ अखेर ₹ ३.२३ कोटी इतकी जादा तरतूद झाल्याने चालू दायित्वे व इतर खर्च (दर व कर) अनुक्रमे ₹ ३.२३ कोटीने जास्त दाखविण्यात आले असून, परिणामी नफा ₹ ३.२३ कोटीने कमी दाखविण्यात आला आहे. | सामान्यत: तरतूदीची रक्कम ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेल्या बिलांच्या आधारे पुनरावलोकन केली जाते. सदर प्रकरणात ऑगस्ट २०२५ पर्यंत बिल प्राप्त झालेले नसल्यामुळे आवश्यकसुधारात्मक कार्यवाही पुढील वित्तीय वर्षात करण्यात येईल. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | **चालू दायित्वे - ₹ ३२४२२.३१ कोटी**<br>**इतर चालू वित्तीय दायित्वे (टिपा क्र. १९) - ₹ ४२६६.३० कोटी**<br>**भांडवली मालाची देणी - ₹ १३४.०९ कोटी**<br>छत्तीसगड पूर्व रेल्वे मर्यादित (सीइआरएल) ही कंपनी छत्तीसगड पूर्व रेल्वे कॉरिडॉरचा विकास करीत असून, त्यास जोडणारी शाखा रेल्वे मार्गिका महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना वाटप करण्यात आलेल्या कोळसा खाणींमधून जात आहे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित कडून कोळसा खाणीच्या सीमारेषेवर शाखा रेल्वे मार्गिकेचे संरेखन बदलण्याची विनंती करण्यात आल्यावर, छत्तीसगड ईस्ट रेल्वे मर्यादित (सीइआरएल) यांनी खाजगी जमिनीच्या अतिरिक्त खर्चाकरिता ₹ ५३.४६ कोटीची मागणी केली असून, यापूर्वी नोव्हेंबर २०२१ मध्ये ₹ १११.७२ कोटीचा भरणा करण्यात आलेला होता. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांनी ₹ १६.७८ कोटी व्याजाच्या रकमेचा समान प्रमाणात वाटून घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार सीइआरएल यांनी तात्पुरते ₹ १६.७८ कोटीच्या ५० टक्के वजावट करून ₹ ४५.०७ कोटी (₹ ५३.४६ कोटी वजा ५० टक्के ₹ १६.७८ कोटी) इतकी रक्कम भरण्याची मागणी केली. महानिर्मिती व सीइआरएल यांच्यात दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असून, दिनांक २५.०२.२०२५ रोजी ₹ ४५.०७ कोटी इतका भरणा करण्यात आला आहे. दरम्यान, सीइआरएल यांनी आपल्या पत्र दिनांक १७.०१.२०२५ मध्ये व्याज खर्चाचे वाटप अंतिम किंवा कायमस्वरूपी नसल्याचे नमूद करून भविष्यात महानिर्मिती कडून ₹ ८.३९ कोटीच्या भरण्याची हमी देण्याची विनंती केली आहे.<br>परंतू, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांनी व्याज दायित्वाकरिता ₹ ८.३९ कोटी (₹ १६.७८ कोटीच्या ५० टक्के) इतकी तरतूद केली नाही तसेच ती आकस्मित दायित्वाखाली देखील उघड केलेली नाही. यामुळे चालू दायित्वे व प्रगतीपथावरील भांडवली कामे अनुक्रमे ₹ ८.३९ कोटीने कमी दाखविण्यात आली आहेत. | कंपनीच्या आकलनानुसार दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजीचे पत्र व त्यानंतरचा सामंजस्य करार यावरून, छत्तीसगड ईस्ट रेल्वे मर्यादित (सीइआरएल) कडून मागणी झाल्यास कंपनीला अतिरिक्त भरणा करावा लागेल असे सूचित होते. तथापि, सद्यस्थितीत सीइआरएल यांनी कंपनीकडे कोणतीही मागणी केलेली नाही. परिणामी, कंपनी ही दायित्वाची नोंद पुढील वित्तीय वर्षात करील. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| ४. | **चालू नसलेल्या मत्ता: ₹ ४३०८७.१९ कोटी**<br>**चालू नसलेल्या - व्यापारी येणी (टिपा क्र.–३ ब): ₹ ११३६.६७ कोटी**<br>**पुरवठादाराला आगाऊ रक्कम - ₹ ४४१.१८ कोटी**<br>**पुरवठादाराला आगाऊ रक्कम - (जी एल ९९१०१) - ₹ ११.३९ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**<br>यामध्ये खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र यांनी एमटिपीके आणि केआरडीएस रेल्वे सायडिंग्सकरिता रॅक बुकिंगसाठी अनुक्रमे ₹ १.३५ कोटी व ₹ २.४६ कोटी इतका भरणा केलेला आहे. दक्षिण पूर्व रेल्वेने दिनांक ०३.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे ₹ १.६० कोटी इतक्या समयोजनाची माहिती दिली असून, ती सन २०२४-२५ मध्ये लेखाबद्ध करण्यात आलेली नाही.<br>यामुळे चालू नसलेल्या व्यापारी देण्या अंतर्गत (टिपा क्र–३ब) पुरवठादारांकडे आगाऊ रकमेचे जास्त दाखविण्यात आले, वापरलेल्या साहित्याचा खर्च (टिपा क्र–२५) कमी दाखविण्यात आला आहे. परिणामी नफा ₹ १.६० कोटीने जास्त दाखविण्यात आला आहे | कंपनीकडून अनुसरल्या जाणाऱ्या सावधगिरीच्या पद्धतीनुसार, रेल्वे पावत्यांचे योग्य ताळमेळ केल्यानंतरच उत्पन्नाची नोंद केली जाते. रेल्वे पावत्यांची निकासी प्रक्रिया पुढील वित्तीय वर्षात करण्यात येईल. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | **चालू मत्ता**<br>**इतर मत्ता (टिपा क्र १०): ₹ १०८८.९२ कोटी**<br>**संचालन व सुव्यवस्था पुरवठा/ कामे यांची अग्रिमे ₹ ५९.७५ कोटी**<br>महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ( महानिर्मिती) यांनी दिनांक ०३ जुलै २०२३ रोजी ₹ २४७.०५ कोटी (जीएसटीसह) कंत्राट मूल्याचे पुरस्काराचे पत्र जारी केले आहे. या कामासाठी नियोजित पूर्णता कालावधी १८ महिने असून, शून्य दिनांक (०३ जुलै २०२३) पासून ते ०२ जानेवारी २०२५ पर्यंत हा कालावधी आहे. हे कंत्राट मेसर्स मेलको इंडिया प्रा. लि., फरीदाबाद यांना देण्यात आले असून, कामामध्ये डिझाईन, अभियांत्रिकी, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वियन यांचा समावेश आहे. सदर काम ड्राय सॉर्बेंट इंजेक्शन (डीएसआय) व फ्ल्यू गॅस डीसल्फरायझेशन (एफजीडी) प्रणाली स्थापनेसाठी असून, हे परळी औष्णिक विद्युत केंद्र येथील युनिट क्रमांक ६, ७ व ८ (३×२५० मेगावॅट) साठी आहे.<br>पुरस्काराचे पत्रामधील कलम ९.२.१ व ९.२.२ नुसार, आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर एक्स-वर्क्स किंमतीच्या १५ टक्के रक्कम व्याजमुक्त आगाऊ रक्कम म्हणून दिली जाणार होती. ही आगाऊ रक्कम पुरवठा केलेल्या वस्तूंच्या बिजकांद्वारे प्रो-राटा पद्धतीने वसूल करण्यात येणार असून, नियोजित पूर्णता दिनांकाच्या अगोदरच्या बिजकामध्ये कोणतीही असंयोजित शिल्लक रक्कम वसूल करण्यात येईल.<br>त्याअनुषंगाने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती ) यांनी मेसर्स मेलको इंडिया प्रा. लि. यांना ₹ ३६.८१ कोटी इतकी व्याजमुक्त मोबिलायझेशन आगाऊ रक्कम जारी केली आहे.<br>मात्र, दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी कंत्राटदाराकडून असंयोजित मोबिलायझेशन आगाऊ रक्कम म्हणून ₹ १८.८३ कोटी वसूल केलेले नव्हते. यामुळे चालू मत्तेतील संचालन व सुव्यवस्था पुरवठा/ कामे यांच्या आगाऊ रकमेचे अधिक लेखांकन झाले असून, प्रगतीपथावरील भांडवली कामे या रकमेचे ₹ १८.८३ कोटी इतके कमी लेखांकन झाले आहे. | पुरस्काराचे पत्र दिनांक ०३ जुलै २०२३ नुसार, प्रकल्पाची पूर्णता कालावधी शून्य दिनांक (०३ जुलै २०२३) पासून १८ महिने असा अंदाजित करण्यात आला होता, म्हणजेच ०२ जानेवारी २०२५ पर्यंत पूर्णता कालावधी असेल असा अंदाज होता. कंत्राटाच्या अटींनुसार मोबिलायझेशन आगाऊ रक्कम ही प्रकल्पाच्या एकूण खर्चावर समायोजित करण्यात येणे अपेक्षित होते. मात्र, प्रकल्पास विलंब झाला असून तो ३१ मार्च २०२५ पर्यंत प्रगतीपथावर होता. पुरस्काराचे पत्रामधील मधील कलम ९.२.१ व ९.२.२ नुसार, व्याजमुक्त मोबिलायझेशन आगाऊ रक्कम ही दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत करण्यात आलेल्या पुरवठ्याच्या द्वारे प्रो-राटा पद्धतीने समायोजित करण्यात आली असून, ती रक्कम एकूण ₹ २२.४८ कोटी इतकी आहे. चालू आर्थिक वर्षात शिल्लक आगाऊ रक्कम बिजकांमधून वसूल करण्यात आली आहे. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | **इतर मत्ता (टिपा क्र. १०): ₹ १०८९.०९ कोटी**<br>**शासन प्राधिकरणांना अग्रिमे - ₹ ८७.२८ कोटी शासन प्राधिकरणांना अग्रिमे (जी एल - ९९१०९) - ₹ १२.३८ कोटी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र)**<br>वरील रकमेतील ₹ १.९६ कोटी इतकी रक्कम रेल्वे वाहतूक खर्चासाठी असून ती ई-पी एम टी द्वारे दिनांक २४ जानेवारी २०२४ ते ०१ एप्रिल २०२४ दरम्यान अदा करण्यात आली आहे.कोळसा व वाहतूक खर्च या दोन्हींचा उपभोग त्याच कालावधीत घेण्यात आला असून ते योग्य प्रकारे खर्च खात्यात नोंदविण्यात आले आहेत. मात्र, आगाऊ खाते संबंधित देय खात्याविरुद्ध समायोजित करण्यात आलेले नाही.<br>यामुळे चालू इतर मत्ता ( टिपा क्र. १०) अंतर्गत शासन प्राधिकरणांकडे आगाऊ रकमेचे अधिक लेखांकन तसेच चालू व्यापारी देणी (टिपा क्र. १८) अंतर्गत अधिक लेखांकन प्रत्येकी ₹ १.९६ कोटी इतके झाले आहे. | ₹ १.९६ कोटी आगाऊ रकमेच्या समायोजनाची लेखा नोंद पुढील आर्थिक वर्षात करण्यात आली आहे. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. आम्ही वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील आमच्या अहवालातील परिच्छेद क्र. (६)(i) मध्ये नोंदविलेल्या निरीक्षणाचा देखील संदर्भ घ्यावा असे सुचवतो . |
| **क. ३.**<br>७. | **प्रकटीकरणावर टिप्पण्या**<br>**आकस्मिक दायित्वे आणि बांधिलकी (टिपा क्र. ४०)**<br>**महत्वाच्या इतर बांधिलकी**<br>पर्यावरण व वन मंत्रालय (एमओइएफ ) यांनी दिनांक २७.११.२०१२ रोजी भुसावळ १×६६० मेगावॅट सुपर-क्रिटिकल तंत्रज्ञानाधारित औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पासाठी दिलेल्या पर्यावरणीय मंजुरी मधील अट क्रमांक XXXI नुसार,महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांना प्रकल्प प्रवर्तकाने केलेल्या बांधिलकीप्रमाणे कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर) कार्यक्रमासाठी ₹ १८.२० कोटी इतका एकदाच होणारा भांडवली खर्च करणे आवश्यक होते. १×६६० मेगावॅट भुसावळ प्रकल्प फेब्रुवारी २०२५ मध्ये पूर्ण होऊन कार्यान्वित करण्यात आला. महानिर्मिती ने सीएसआर खर्चाखाली झालेल्या ₹ ५.२८ कोटी इतक्या रकमेचे मार्च २०२५ पर्यंत भांडवलीकरण केले आहे.<br>मात्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांनी भुसावळ १×६६० मेगावॅट प्रकल्पासाठी प्रकल्प प्रवर्तकाने केलेल्या बांधिलकीप्रमाणे एकदाच होणाऱ्या सीएसआर भांडवली खर्चाकरिता ₹ १२.९२ कोटी खर्च करणे आवश्यक आहे ही बाब टिपा क्र. ४१ मधील आकस्मिक दायित्वे व बांधिलकी अंतर्गत उघड केलेली नाही. त्यामुळे टिपा क्र. ४१ मधील आकस्मिक दायित्वे व बांधिलकी संदर्भातील प्रकटीकरण वरील प्रमाणात अपूर्ण आहे. | पर्यावरणीय मंजुरीच्या अटींनुसार कंपनीला कंपनी सामाजिक जबाबदारी (सीएसआर ) अंतर्गत ₹ १८.२० कोटी इतका एकदाच होणारा खर्च करणे आवश्यक आहे.<br>दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत कंपनीने प्रत्यक्षात ₹ ५.२८ कोटी इतका खर्च केला असून, तो लेखापुस्तकांमध्ये भांडवलीकरण करण्यात आला आहे. उर्वरित रकमेबाबत, शिल्लक कामांच्या आदेशांची अंमलबजावणी प्रलंबित आहे. या शिल्लक कामांसाठी आदेश जारी होऊन त्याची अंमलबजावणी झाल्यानंतर, आवश्यक खर्च कंपनीकडून ज्या प्रमाणात होईल त्याप्रमाणे लेखाबद्ध करण्यात येईल. कोणतीही न वापरलेली रक्कम पुढील आर्थिक वर्षात योग्य प्रकारे प्रकटीकरण करण्यात येईल. | आम्ही कंपनी व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

## स्वतंत्र लेखापरिक्षक यांचा अहवाल

प्रति, मा. सदस्य, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी स्वायत्त वित्तीय वितरण पत्रकांच्या लेखापरिक्षणाचा अहवाल.**

**पात्र मत**

१. आम्ही **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित** (यापुढे महानिर्मिती / सदर कंपनी') यांचा येथे जोडलेल्या स्वायत्त वित्तीय वितरण पत्रकांचे लेखापरिक्षण केले आहे, ज्यामध्ये दिनांक ३१ मार्च २०२५ रोजीचा ताळेबंद याच तारखेला संपलेल्या वर्षासाठी कंपनीचे नफा आणि तोटा पत्रक (इतर सर्वकष उत्पन्नासह), समभागात झालेले बदल आणि रोकडता प्रवाहाची विवरण पत्रके आणि स्वायत्त विवरण पत्रकावरील टिपा, महत्वपूर्ण लेखा धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे. (येथुन पुढे या सर्वांचा 'स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके' असा उल्लेख केला आहे.)

२. आमच्या मते आणि आमच्या सर्वोतोपरी माहिती तसेच आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, आमच्या अहवालाच्या 'पात्र मताचा आधार' विभागात वर्णन केलेल्या बाबींचे परिणाम /संभाव्य परिणाम वगळता, 'भर देण्याची प्रकरण' परिच्छेद, उपरोक्त स्वायत्त वित्तीय वितरण पत्रके, ही कंपनी 'अधिनियम' २०१३ (कायदा) यात विहीत केलेल्या कार्य पद्धतीनुसार कायद्याच्या १३३ अंतर्गत विहीत केलेल्या भारतीय लेखा मानकांसह, कंपनीचे (भारतीय लेखा मानक नियम २०१५ सह वाचलेल्या कायद्यातील १३३ सुधारित ('भारतीय लेखा मानक') आणि इतर लेखा तत्वे भारतात सामान्यत: स्वीकारली जातात, ३१ मार्च २०२४ पर्यंत कंपनीची स्थिती, आणि तिचा नफा एकूण सर्व समावेश उत्पन्न (आर्थिक कामगिरी) त्या तारखेला संपलेल्या वर्षासाठी समभागाचे बदलांचे आणि तिच्या रोकडता प्रवाहाचे यथार्थ आणि रास्त दर्शन घडवतात.

**पात्र मताचा आधार:**

३. आम्ही लक्ष वेधतो:

अ) टिप क्रमांक ४३(अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) ला देय करावयाच्या विलंब भरणा अधिभार (एलपीएस) उत्पन्नाची गणना ₹ ३,१४९.८३ कोटी (मागील वर्षी ₹ २,६७४.१८ कोटी) थकबाकीच्या उशिरा देयकासाठी व्याज म्हणून केली आहे. अशा उत्पन्नाचा मागील वर्षांमध्ये महावितरणने अंशत: स्वीकार केलेला नाही. मागील वर्षांमध्ये महावितरणने न स्वीकारलेली विलंब भरणा अधिभाराची एकूण रक्कम ३१ मार्च २०२५ रोजी ₹ १६,९९६.१९ कोटी आहे (मागील वर्षी ₹ १५,५९३.६३ कोटी). या व्यतिरिक्त, महावितरणने वीज आणि पूरक बिले आणि मागील कालावधी समायोजनासंदर्भात इतर बिले विवादित केली आहेत, ३१ मार्च २०२५ रोजी वीज आणि पूरक बिलांच्या संदर्भात वादग्रस्त बिलांची शिल्लक आणि मागील कालावधीचे समायोजन ₹ ३३८.०८ कोटी (मागील वर्षी ₹ ४२९.२५ कोटी) आणि ₹ १३७.६१ कोटी (मागील वर्षी ₹ १३७.६१ कोटी) इतके आहे. या वादग्रस्त रकमेच्या वसुलीच्या अनिश्चिततेमुळे, कंपनीच्या नफ्यावर आणि समभागावर होणारा परिणाम आणि त्याचा व्यापार प्राप्ती आणि विना देय येणीवर (टिप ६) होणारा परिणाम यावर आम्ही भाष्य करू शकत नाही. या वर्षी कंपनीने सदर प्राप्ती योग्य रकमेविरुद्ध २,८३३.०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अशा तरतुदीचा कोणताही आधार आम्हाला उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. याव्यतिरिक्त, कंपनीने वरील बिलांना चालू नसलेल्या मत्ता अंतर्गत विवादित व्यापारी येणी असे न नोंदवता चालू मत्ता अंतर्गत व्यापारी येणी (टिप ६) अशी नोंद केली आहे. जे भारतीय लेखा मानक १ वित्तीय विवरणपत्रांचे सादरीकरण मध्ये नमूद केलेल्या प्रकटीकरण आवश्यकतांच्या विरूद्ध आहे. तसेच कंपनीने वरील प्राप्ती निर्विवाद म्हणून उघड केल्या आहेत जे कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची III नुसार नाही. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

ब) टिप क्रमांक ४३(ई) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्यामध्ये (टिप ५) महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ लिमिटेड (एमएसएमसी) कडून धुतलेला कोळसा (पुनर्प्राप्त) ₹ २१.३२ लाख मेट्रिक टन कच्चा कोळसा (₹ १६.८२ लाख मेट्रिक टन धुतलेल्या कोळशात रूपांतरित) (मागील वर्षी १६.६६ लाख मेट्रिक टन कच्चा कोळसा ₹ १३.५४ लाख मेट्रिक टन धुतलेल्या कोळशात रूपांतरित) ₹ ५७१.०० कोटी (मागील वर्षी ₹ ४५०.१५ कोटी) यांचा समावेश आहे. तथापि, एमएसएमसीने अशा दाव्याच्या स्वीकृतीबाबत पुरेसा आणि योग्य लेखापरीक्षण पुरावा नसल्यामुळे, अशा पुनर्प्राप्त कोळशाच्या प्रमाणाची पुनर्प्राप्ती आणि त्याचा कंपनीचा नफा आणि तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्यावर परिणाम यावर आम्ही भाष्य करण्यास असमर्थ आहोत. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

क) कंपनीने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा, २००६ (एमएसएमई कायदा) अंतर्गत आवश्यक कालावधीपेक्षा

बिलंबीत भरण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) देय व्याज म्हणून ₹ २.१८ कोटी (मागील वर्षी ₹ १.६८ कोटी) नोंदविले आहेत. एमएसएमई कायद्याच्या कलम १६ नुसार आवश्यक असलेले व्याज कंपनीने संबंधित विक्रेत्यांना दिलेले नाही (टिपा क्र. ३५ पहा). शिवाय, एमएसएमई कायद्यांतर्गत येणाऱ्या उद्योगांची ओळख पटविण्यासाठी कंपनीकडे योग्य व्यवस्था नाही. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची ओळख पटविण्यासाठी योग्य प्रणाली आणि लेखा संगणक प्रणालीमध्ये एमएसएमई कायद्यांतर्गत ओळखल्या जाणाऱ्या उद्योगांची स्थिती जाणण्यासाठी आवश्यक प्रणाली नसल्यामुळे, अशा उद्योगांसाठी असलेल्या व्याजाच्या तरतुदी, कंपनीच्या नफ्यावर होणारा परिणाम आणि स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांच्या टिप क्रमांक ३५ मध्ये केलेल्या खुलाशावर आम्ही भाष्य करू शकत नाही. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

ड) भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने (एमओइएफ) जारी केलेल्या ०३ नोव्हेंबर २००९ च्या राजपत्र अधिसूचनेनुसार (सूचना) फ्लाय ॲशच्या विक्रीतून जमा होणारी रक्कम १००% फ्लाय ॲश वापर पातळी गाठेपर्यंत पायाभूत सुविधा किंवा सुविधांच्या विकासासाठी, फ्लाय ॲशच्या वापरासाठी प्रोत्साहन आणि सुविधा उपक्रमांसाठी वापरली जाणे आवश्यक आहे. सदर अधिसूचनेनुसार कंपनीने अशी माहिती वेगळ्या शीर्षकात ठेवणे देखील आवश्यक आहे. वर्षअखेर कंपनीने इतर चालू आर्थिक देणी (टिपा क्र. १९) या शीर्षकाखाली ₹ ४०१.७५ कोटी (मागील वर्षी ₹ ३१९.३६ कोटी) फ्लाय ॲश वापर निधी जमा केला आहे. कंपनीने निर्माण केलेल्या फ्लाय ॲश निधीचा वापर कंपनीच्या कामकाजासाठी केला आहे जो सदर अधिसूचनेचे उल्लंघन आहे. शिवाय कंपनीने वेगळ्या बँक खात्यात निधी जमा केलेला नाही. कंपनीच्या मते, निधी वेगळ्या बँक खात्यात ठेवण्याची कोणतीही अट नाही. (टिपा क्र. ३१ पहा). कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

इ) व्यापार देय, व्यापार प्राप्ती, पुरवठादारांना आगाऊ रक्कम, सुरक्षा ठेव, राखीव ठेवी, महाराष्ट्र सरकारची खाती आणि कर्जे ही सामंजस्य आणि परिणामी समायोजनाच्या अधीन आहेत. अशा सामंजस्य आणि समायोजनाच्या अनुपस्थितीत, या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रावर उद्भवू शकणाऱ्या समायोजनांचा किंवा प्रकटीकरणाचा, जर काही असेल, तर त्याचा काय परिणाम होईल हे आम्ही निश्चित करू शकत नाही. कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

फ) कंपनीला वित्तीय साधनांवर भारतीय लेखा मानक १०९ नुसार आवश्यक असलेल्या वित्तीय मत्तेवर ''अपेक्षित तोट्याची तरतूद'' करणे आवश्यक आहे. कंपनी व्यापारी येणी यावर अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची गणना करण्यासाठी प्रोव्हिजन मॅट्रिक्स वापरत नाही, तसेच अशा येण्यावरील क्रेडिट जोखीम मूल्यांकन करताना कोणत्याही क्रेडिट मूल्यांकन आणि आजीवन क्रेडिट मूल्यांकनाचा विचार करत नाही आणि 'इतर वित्तीय मत्तेच्या' बाबतीत, त्यांनी भारतीय लेखा मानक १०९ च्या तरतुदींमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांनुसार, अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची गणना करण्यासाठी सामान्य दृष्टिकोन अवलंबलेला नाही.

तथापि, कंपनी विशिष्ट तरतुद आणि कंपनीच्या सर्वोत्तम अंदाजांवर आधारित अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची नोंद करते. वरील बाबी लक्षात घेता, कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रावर त्याचा परिणाम काय होईल यावर आम्ही भाष्य करू शकत नाही.

ग) कंपनीच्या लेखा धोरणानुसार, भांडारातील सामान सुटे भाग या सह माल साठयाचे मूल्यांकन त्यांचा खर्च आणि त्यांचे वसूली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते. आणि खर्च हा वेटेड अव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो. भांडारातील सेवेस निरूपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्या बाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते. या हेतुसाठी कंपनी मंद हलणाऱ्या वस्तु मालासाठी ३०%, २ वर्षा पर्यन्त अचल वस्तु मालासाठी ६०% आणि २ वर्षापेक्षा जास्त अचल वस्तु मालासाठी ८०% या दराने तरतूद केली जाते. निकामी वस्तु मालासाठी पूर्णपणे तरतूद केली जाते. ३१ मार्च २०२५ रोजी अशा साठ्यासाठी एकूण तरतूद ₹ ३९९.८२ कोटी आहे (मागील वर्षी ₹ ४१०.५९ कोटी). अशा तरतुदीची गणना लेखा संगणक प्रणालीमध्ये केली गेली आहे. आमच्याकडून केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आम्हाला अशा निकामी वस्तु मालाची ओळख पटवण्यात आणि अशा तरतुदीची गणना करण्यात त्रुटी आढळून आल्या आहेत. गणनेतील अशा चुकांचा तरतुदीवर होणारा परिणाम कंपनीने निश्चित केलेला नाही. त्यामुळे, कंपनीच्या नफ्यावर आणि समभागावर होणारा परिणाम आणि परिणामी भांडारातील सामानाच्या मूल्यावर (टिप क्रमांक ५) होणारा परिणाम यावर आम्ही भाष्य करू शकत नाही.

ह) ३१ मार्च २०२५ रोजी प्रगतीपथावर असलेल्या भांडवली कामाच्या बाबतीत,कंपनीला प्रकल्प पूर्ण होण्याची अपेक्षित तारीख आणि मालमत्ता/प्रकल्पाची प्रत्यक्ष किंमत मूळ योजनेनुसार अंदाजे खर्चापेक्षा जास्त असल्याचे किंवा मालमत्ता/प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष वेळेची मर्यादा मूळ योजनेनुसार अंदाजे वेळेपेक्षा जास्त असल्याचे, जर असेल तर, उघड करणे आवश्यक आहे. कंपनीने

स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांमध्ये असे कोणतेही खुलासे केलेले नाहीत, जे कायद्याच्या अनुसूची II च्या विभाग III च्या आवश्यकतांचे काटेकोरपणे पालन करत नाही.

४. या बाबींचा पुरेसे आणि योग्य ऑडिट पुरावे मिळविण्यात अक्षमतेमुळे काही प्रकरणांमध्ये अज्ञात असलेल्या वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे, स्वायत्त वित्तीय विवरणपत्रावर होणारा परिणाम महत्त्वाचा आहे. काही समायोजन आवश्यक आहे की नाही यावर आम्ही भाष्य करू शकत नाही.

५. आम्ही आमचे लेखापरीक्षण कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) अंतर्गत केलेल्या लेखापरीक्षणाची मानके यानुसार केले आहे. त्या मानकांखालील आमच्या जबाबदाऱ्यांचे अधिक तपशीलवार वर्णन आमच्या अहवालातील स्वायत्त वित्तीय वितरण पत्रकाचे लेखापरीक्षण संबंधी लेखा परीक्षकाच्या जबाबाऱ्या या विभागात दिल्या आहेत. आम्ही कंपनी कायदा २०१३ आणि नियमाच्या तरतुदींच्या अंतर्गत स्वतंत्र वित्तीय वितरण पत्रकांच्या आमच्या लेखापरिक्षणाशी संबंधित असलेल्या नैतिक आवश्यकतांसह भारताच्या सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या आचारसंहितेनुसार कंपनीपासून स्वतंत्र आहोत. आणि या आवश्यकता आणि आचारसंहितेनुसार आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. आम्हाला विश्वास आहे की आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे आमच्या मताला आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत

**भर देण्याची प्रकरणे**

६. खालील बाबीवर लक्ष वेधतो.

अ) टिप क्रमांक ४१ कोळसा कंपन्यांनी दावा केल्यानुसार कामगिरी प्रोत्साहन देयके/कोळशाच्या कमी उचलण्याबद्दल, आणि विलंबित देयकावरील व्याज इ. आकस्मिक दायित्वे म्हणून दर्शविले आहेत आणि महानिर्मितीने कोळसा कंपन्यांवर काही प्रतिदावे देखील दाखल केले आहेत जसे की कमी पुरवठा, दर्जाची घसरण, व्याज इ. ते आकस्मिक मत्ता म्हणून दर्शविले आहेत आणि संबंधित कोळसा कंपन्यांनी केलेले सामंजस्य मेळ याचा सारांश:

| पुरवठादारांची नावे | कोळसा कंपन्यांचे दावे आकस्मिक दायित्व म्हणून दाखवले आहेत *(₹ कोटी मध्ये) | कंपनीकडून प्रतिदावे * (₹ कोटी मध्ये) |
|---|---|---|
| वेर्स्टन कोलफिल्डस लिमिटेड | ३,३०५.११<br>(३,२३५.९४) | ४,६६३.९४<br>(४,३६६.५९) |
| साउथ ईस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड | ९४५.९९<br>(९४५.९९) | ४,०१२.६७<br>(३,६८१.०७) |
| महानदी कोलफिल्ड लिमिटेड | २१२.३६<br>(२१२.३६) | ८९८.५४<br>(८२०.२०) |
| सिंगरेनी कोलायरीज कंपनी लिमिटेड | १४९.१९<br>(११३.७२) | ३१२.१४<br>(७२.१६) |

* मागील वर्षाचे आकडे कंसात दर्शविलेले आहेत.

ब) केंद्रीय विद्युत प्राधिकरण, ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारच्या सल्लागाराबाबत टिप क्रमांक ४३(एफ), आयात केलेल्या कोळशाचे मिश्रण ज्यामध्ये कंपनीने प्लांट पातळीऐवजी कंपनी पातळीवर परिपत्रकाचे पालन केले आहे.

क) टिप क्रमांक ४३(जी) ज्यामध्ये असे म्हटले आहे की कंपनीच्या संचालक मंडळाकडे वर्षभरात फक्त एक स्वतंत्र संचालक होता. त्यानुसार, त्यांच्या उपसमित्यांची रचना, ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच लेखापरीक्षण समितीचा समावेश आहे, ती कंपनी कायदा २०१३ च्या कलम १७७ नुसार नाही. सदर नोंदीवरून सूचित केल्याप्रमाणे, वार्षिक आर्थिक विवरणपत्रांचा आढावा, संबंधित पक्ष व्यवहारांना मान्यता देणे इत्यादी लेखापरीक्षण समितीची अनिवार्य कामे कंपनीच्या संचालक मंडळाने थेट पार पाडली आहेत. त्यानुसार, संलग्न स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे संचालक मंडळाने थेट मंजूर केली आहेत.

ड) टिप क्रमांक ४३(एच), मागील वर्षामध्ये उघडलेल्या काही बँक खात्यांच्या संदर्भात, ही खाती प्रतिबिंबित करत नाहीत किंवा या बँक खात्यांद्वारे होणारे व्यवहार कंपनीच्या खात्यांच्या पुस्तकात नोंदवलेले नाहीत. कंपनीच्या दृष्टीने, कंपनीच्या लेखा पुस्तकांवर कोणताही महत्त्वपूर्ण परिणाम झालेला नाही.

इ) टिप क्रमांक १ड ,महाराष्ट्र सरकारकडून विविध जलविद्युत निर्मिती सुविधांच्या भाडेपट्ट्यासंदर्भात, जिथे भाडेपट्टी कराराचे नूतनीकरण अद्याप झालेले नाही.

वरील बाबींबाबत आमचे मत पात्र नाही.

**स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके आणि त्यावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाव्यतिरिक्त इतर माहिती**

७. इतर माहिती तयार करण्यासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे.कंपनीच्या इतर माहितीमध्ये वार्षिक अहवाल समाविष्ट आहे परंतु स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके आणि त्यावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाचा समावेश नाही. लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या तारखेनंतर वार्षिक अहवाल आंम्हाला उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

८. स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकावरील आमच्या मतात इतर माहितीचा अंतर्भाव करत नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही प्रकारचे आश्वासन निष्कर्ष व्यक्त करत नाही.

९. स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाच्या आमच्या परिक्षणा संदर्भात, आमची जबाबदारी ही आहे की इतर माहिती वाचणे आणि असे करताना, इतर माहिती स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांशी भौतिकदृष्ट्या विसंगत आहे किंवा कसे किंवा लेखापरीक्षणात आम्ही मिळालेले ज्ञान यात काही मोठ्या प्रमाणात गैरविवरण झाले किंवा नाही याचा विचार करणे.

१०. जर, आम्ही केलेल्या कामावर आधारित, आम्ही असा निष्कर्ष काढतो की या इतर माहितीचे एक महत्वपूर्ण चुकीचे विधान आहे, आम्हाला हे प्रकरण ज्यांच्यावर शासनाचा आरोप आहे त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे.

**स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकासाठी व्यवस्थापन आणि प्रशासनाच्या जबाबदाऱ्या**

११. कंपनी कायदा २०१३ (“अधिनियम”) चे कलम १३४ (५) या मधील दिलेल्या विषयासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. त्यामध्ये भारतातील सर्वसाधरण पणे स्वीकृत केलेली लेखा विषयी तत्वे आणि कलम १३३ यात विहित केलेली लेखा मानके यांच्याशी सुसंगत असे कंपनीची वित्तीय स्थिती, वित्तीय कामगिरी, समभागातील बदल, रोकडता प्रवाह यांचे यथार्थ आणि रास्त दर्शन घडविणारी स्वायत वित्तीय विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी समाविष्ट आहे.

१२. यामध्ये कंपनीच्या मत्ताचे संरक्षण करणे, फसवणूक आणि इतर अनियमितता यांना शोधणे किंवा आळा घालणे. योग्य लेखा धोरणे निवडून ती लागू करणे, प्रमाणाबद्ध व सुज्ञ असे निर्णय व अंदाज करणे, अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची रचनेची अंमलबजावणी करून ती कार्यरत ठेवणे आणि कंपनीचे सत्य व योग्य दर्शन घडवणारी आणि अन्य कोणतीही मोठी लबाडी किंवा चूकभूल यापासून मुक्त असलेली स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे तयार करणे या कामाचा समावेश असतो.

१३. स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे तयार करताना, जर कंपनीचे परिसमापन करावे किंवा काम थांबवावे किंवा तसे करण्यापासून अन्य पर्याय नाही असे जर संचालक मंडळाचे मत नसेल तर, संचालक मंडळाला सतत कार्यरत असलेली संस्था असे काम करण्यासाठी कंपनी समर्थ असल्याबद्दल निर्धारित करावे लागते. सतत कार्यरत संस्था संबंधी प्रकटन करणे व त्या आधारे लेखे करणे ही संचालक मंडळाची जबाबदारी असते.

१४. कंपनीच्या आर्थिक अहवाल प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी देखील संचालक मंडळ जबाबदार आहे.

**स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाच्या परीक्षणासाठी लेखापरीक्षकांच्या जबाबदाऱ्या**

१५. आमचे लेखापरीक्षणाचे उद्दिष्ट असे आहे की, स्वायत्त वित्तीय विवरण पत्रे फसवणूक किंवा त्रुटीमुळे होऊ शकणाऱ्या महत्वाच्या चूकीच्या विधानापासून संपूर्णत: मुक्त आहेत की नाही याबद्दल वाजवी आश्वासन मिळवणे आणि आमचे मत समाविष्ट करणारा लेखापरीक्षकांचा अहवाल जारी करणे हे आहेत. वाजवी हमी ही उच्च पातळीची हमी आहे. परंतु लेखामानका नुसार केलेले लेखापरीक्षण नेहमीच चुकीचे विधान शोधून काढेल याची हमी देता येत नाही. फसवणूक किंवा त्रुटीमुळे गैर विवरण उद्भवू शकतात आणि जेव्हा वापर कर्त्याच्या आर्थिक निर्णयावर त्यांचा एकत्रितपणे मोठा प्रभाव पडत असेल तर ते मोठ्या प्रमाणातील गैर विवरण आहे असे समजण्यात येते.

१६. लेखामानका नुसार परीक्षणाचा एक भाग म्हणून, आम्ही व्यावसायिक निर्णय घेतो आणि संपूर्ण परीक्षणामध्ये व्यावसायिक साशंकता राखतो आम्ही खालील बाबी अनुसरल्या आहेत:

- स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकातील महत्वाची गैरविवरणाचे धोके शोधणे आणि त्यांचे मुल्यमापन करणे, ही गैरविववरणे लबाडी मुळे किंवा चुकीमुळे झालेली आहेत किंवा कसे ते शोधणे, या जोखिमांना प्रतिबंधात्मक लेखा परीक्षण पध्दतीची संरचना करणे व त्यादृष्टीने काम करणे आणि आमच्या मतांना आधार देणारे पुरेसे व योग्य पुरावे लेखापरीक्षणातून मिळवणे. लबाडी मधून

होणाऱ्या गैरविवरणांचे धोके शोधणे हे चुकीने निर्माण झालेल्या गैर विवरणपेक्षा मोठे असतात. कारण लबाडीमध्ये संगनमत, बनावट दस्त ऐवज हेतुपूरस्पर माहिती वगळणे, चुकीचा अर्थ लावणे, विपर्यास करणे किंवा अंतर्गत नियंत्रणांचे उल्लंघन करणे आदि कृतीचा समावेश असतो.

- आम्ही लेखा परीक्षणासंबंधीची अंतर्गत नियंत्रणे समजावून घेतली आहेत त्यामुधून परिस्थितिनुरूप योग्य लेखा परीक्षण कार्यपद्धतीची रचना केली आहे. कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३ (३) (आय) नुसार आम्ही कंपनीमध्ये अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आहे किंवा कसे आणि वित्तीय विवरण पत्रके नियंत्रणे योग्य व प्रभाविरीत्या कार्यरत आहेत किंवा कसे यावर आमची मते देण्याची आमच्यावर जबाबदारी आहे.

- कंपनीने वापरलेल्या लेखा धोरणाच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, तसेच व्यवस्थापनाने केलेल्या अंदाज आणि प्रकटणे समर्थनीय असल्याने निश्चित करणे.

- कंपनी ही सतत चालू राहणारी संस्था आहे असे गृहीत धरून व्यवस्थापनाने त्याच्या आधारे मांडलेल्या लेख्यांच्या योग्यते विषयी निष्कर्ष काढणे, त्यासाठी लेखा परीक्षणात्मक पुरावे मिळविणे, कंपनीमध्ये घडलेल्या संबंधित घटना आणि स्थिती यांच्यावरून मोठी अनिश्चितता अस्तित्वात आहे किंवा कसे या आधारे कंपनीकडे कार्यरत संस्था यासाठी सामर्थ्य आहे किंवा कसे या बाबतचे निष्कर्ष नोंदवणे.

  जर कंपनी विषयी अशी अनिश्चितता मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे असा आमचा निष्कर्ष असेल तर आम्ही त्याकडे आमच्या लेखापरीक्षण अहवालात लक्ष्य वेधणे आवश्यक असते आणि स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाच्या संबंधित प्रकटनात तसे उल्लेख असले पाहिजे. आमचे मतात रूपभेद करण्यासाठी ही प्रकटने अपूर्ण असतील तर त्याकडे लक्ष वेधणे ही आमची जबाबदारी आहे. आमच्या लेखा परीक्षणाच्या अहवालाच्या तारखेपर्यंत जे लेखापरीक्षणाचे पुरावे आम्ही मिळविले, त्यावर आमचे निष्कर्ष आधारलेले आहे. मात्र भविष्यात अन्य काही घटना किंवा स्थिति यांचा सुद्धा परिणाम होवून कंपनी 'सतत चालू राहणारी संस्था' या प्रमाणे काम करणे थांबू शकते.

- स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांचे सर्वागीण सादरीकरण, रचना आणि त्यातील समाविष्ट विषय यांचे मूल्यांकन करणे, यात प्रकटणे ही येतात आणि या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकातून कंपनीचे व्यवहार आणि प्रसंग यांचे योग्यरित्या दर्शन होते आहे, त्याबद्दल मत देणे.

१७. आम्ही ज्यांच्याकडे कंपनीचा प्रशासनाचा कारभार आहे, अशा सर्वासोबत संपर्क केला त्यामध्ये इतर विषयांसोबत लेखा परीक्षणाची व्याप्ती, वेळ आणि आढळलेली महत्वाची माहीती यावर चर्चा केली. यात आमच्या लेखा परीक्षणात आम्हाला आढळलेल्या अंतर्गत नियंत्रणातील महत्वाच्या उणिवांचीही समावेश होता.

१८. तसेच आम्हाला आवश्यक असलेल्या आमच्या स्वातंत्र्यसंबंधीच्या नैतिक आवश्यकतेची पूर्तता करण्यासाठी आम्ही संबंधित कार्यभार सांभाळणाऱ्यांना एक निवेदनपत्र दिले. आमच्या स्वतंत्र कामाच्या जबाबदारीसाठी आम्हाला सर्व नाते हितसंबंध आणि इतर विषयी माहिती दिली तसेच जेथे लागू असेल तेथे सुरक्षेसंबंधीची माहिती दिली.

**इतर बाबी**

१९. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांचे लेखापरीक्षण शाह आणि टपारिया आणि उम्मेद जैन अँड कंपनी यांनी केले. २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या त्यांच्या अहवालात कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांवर योग्य मत व्यक्त केले, त्यानुसार जी. एम. कपाडिया अँड कंपनी आणि कल्याणीवाला अँड मिस्त्री एलएलपी ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांवर कोणतेही मत व्यक्त करत नाहीत.

वरील बाबींबाबत आमचे मत पात्र नाही.

**इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांबद्दल अहवाल**

२०. कंपनी कायदा, २०१३ चे कलम १४३ (५) अन्वये आवश्यकतेनुसार, भारताचे लेखानियत्रंक आणि महालेखा परीक्षक यांनी दिलेल्या निर्देशानुसार जोडपत्र (१) देत आहोत. लेखापरीक्षणासाठी सुचविलेल्या कार्यपद्धतीचे पालन केल्यानंतर, केलेल्या कारवाईच्या आणि तिचा कंपनीच्या लेख्यावर आणि स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकावर होणारा परिणाम या जोडपत्रात दिले आहेत.

२१. कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३ मधील उप-कलम (११) या मधील अटीनुसार, भारताच्या केंद्र शासनाने जारी केलेल्या कंपन्यांचे (लेखा परीक्षितांचे अहवाल) आदेश २०२० (''आदेश'') च्या आवश्यकतेनुसार आम्ही परिचेद ३ आणि ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणा संबंधी जोडपत्र (२) मध्ये अहवाल देतो.

२२. अधिनियम कलम १४३ (३) नुसार आम्ही अहवाल देत आहेत.

ए) आमचे सर्वोतोपरी ज्ञान आणि विकास यानुसार आमचे लेखा परीक्षणाच्या हेतुसाठी आवश्यक ती सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे मिळविले आहेत. फक्त वरील 'पात्र मत्तांचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेली तिसऱ्या पक्षांकडील शिलकीची निश्चिती, मेळ आणि समायोजन करणे यांचा अपवाद आहे. त्याचा जर काही परिणाम या वित्तीय विवरण पत्रांवर होणार असेल तर त्याचे अंदाज करता येत नाहीत.

बी) आमच्या मते, खालील वगळता

१. वरील 'पात्र मताचा आधार' परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे आणि स्वायत्त वित्तीय विवरण पत्राच्या टिप ४३(एच) मध्ये नमूद केल्याप्रमाणे बाबींचे परिणाम/संभाव्य परिणाम,

२. नियम ११(ग) अंतर्गत अहवाल देण्याबाबत खालील परिच्छेद जे(६) मध्ये नमूद केलेल्या बाबी

आमच्या तपासणीतून असे दिसून येते की, कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असलेल्या योग्य हिशेबपुस्तके ठेवली आहेत.

सी) या अहवालाशी संबंधित वित्तीय विवरण पत्रके म्हणजेच ताळेबंद, नफा-तोटा पत्रक (इतर सर्वकष उत्पन्न यासह) समभागातील बदल आणि रोकडता पत्रक ही कागदपत्रे लेखा वह्यांशी सुसंगत आहे.

डी) वरील आमच्या पात्र मतांचा आधार या परिच्छेदात वर्णन केलेल्या या विषयाचे संभाव्य परिणाम याला अधीन राहून आमचे असे मत आहे की, उपरोक्त स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके ही अनुषंगिक नियमावली सह वाचल्या जाणाऱ्या कायदयाचे कलम क्र. १३३ अंतर्गत विनिर्देशित लेखा मानकांचे अनुपालन करतात.

ई) आम्ही वरील पात्र मतांचा आधार या परिच्छेदात देलेली परीक्षणे यांचे कंपनीच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही.

एफ) महानिर्मिती शासकीय कंपनी असल्याने, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्र. जी. एस.आर, ४६४ (इ) दिनांक ०५ जून २०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १६४ (२) यामधील संचालकाची अपात्रता याविषयीच्या तरतुदी महानिर्मिती कंपनीला लागू होत नाही.

जी) हिशेबपुस्तके ठेवण्या संबंधित पात्रता आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबी 'पात्र मताचा आधार' विभागात नमूद केल्याप्रमाणे आहेत.

एच) कंपनीचे वित्तीय अहवाल संबंधीत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा पर्याप्तता आणि या नियंत्रणाचा प्रभाव या विषयी आमचा स्वतंत्र अहवाल 'जोडपत्र तीन' मध्ये दिला आहे.

आय) ही कंपनी शासकीय असल्याने, भारत सरकारची अधिसूचना क्र. ४६३ (इ) दिनांक ०५ जून २०१५ याप्रमाणे कायद्यातील कलम १९७ च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

जे) कंपनी (लेखा परीक्षण व लेखा परीक्षक) नियमावली २०१४ यातील नियम क्र.११ नुसार जे अन्य विषय या अहवालात समाविष्ट करावयाचे असतात त्याबाबत आम्ही आमचे सर्वोत्तपरी ज्ञान आणि आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही खालील मते नोंदवितो.

१) महानिर्मिती कंपनीने तिच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रामध्ये प्रलंबित कायदेशीर बाबीचे परिणाम प्रकट केले आहेत. त्यासाठी स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाची टिप क्र. ४१ पहावी.

२) ज्यात भविष्यात तोटे येऊ शकतील असे कोणतेही दीर्घ मुदतीचे करार कंपनीने केलेले नाहीत (यात डेरिव्हेटीव कंत्राटे पण समाविष्ट आहेत.)

३) कंपनीद्वारे या वर्षी गुंतवणूकदार शिक्षण आणि रक्षण निधीत स्थानांतरीत करण्यास आवश्यकता नाही.

४) अ) व्यवस्थापनाने असे प्रतिनिधित्व केले आहे की, त्याच्या उत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे, कंपनीने परदेशी संस्थांसह (मध्यस्थ) कोणत्याही व्यक्ती (व्यक्ती) किंवा संस्थांमध्ये (मध्यस्थ) कोणताही निधी किंवा कर्ज (उधार घेतलेल्या निधीतून किंवा सिक्युरिटीज प्रीमियममधून किंवा इतर कोणत्याही स्त्रोतातुन किंवा अन्य प्रकारच्या निधीतून) दिलेल्या नाही किंवा गुंतवलेला नाही किंवा या समजुतीने, लेखी किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी, मध्यस्थ इतर व्यक्तींना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कर्ज देईल किंवा गुंतवणूक करेल किंवा कंपनी ('अंतिम लाभार्थी') द्वारे किंवा त्याच्या वतीने कोणत्याही प्रकारे ओळखल्या जाणाऱ्या संस्था किंवा अंतिम लाभार्थ्याच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा तत्सम प्रदान करतात.

ब) व्यवस्थापनाने असे प्रतिनिधित्व केले आहे की, त्याच्या उत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे परदेशी संस्थांसह (फंडिग पार्टीज) कोणत्याही व्यक्ती (व्यक्ती) किंवा संस्थांकडून कंपनीला कोणताही निधी प्राप्त झालेला नाही. हे समज, लेखी किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी, कंपनी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फंडिग पार्टी (अंतीम लाभार्थी) द्वारे किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांना कर्ज देईल किंवा गुंतवणूक करेल किंवा कोणतीही तरतूद करेल किंवा अंतिम लाभार्थ्याच्या वतीने हमी, सुरक्षा किंवा यासारखे आणि

क) परिस्थितीमध्ये वाजवी आणि योग्य मानल्या गेलेल्या अशा लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे वरील उप-खंड (अ) आणि (ब) अंतर्गत व्यवस्थापन प्रस्तुतीमध्ये कोणतेही महत्वपूर्ण चुकीचे विधान असलेबाबबत आम्हांला आढळले नाही.

५) कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षात कोणताही लाभांश घोषित किंवा वितरित केलेल्या नाही म्हणून कायदा १२३ अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

६) आमच्या परीक्षणाच्या आधारावर, ज्यामध्ये चाचणी तपासण्यांचा समावेश होतो, कंपनीने लेखांकन सॉफ्टवेअरचा वापर केला आहे, ज्यामध्ये जतन केलेले पुरावे (एडिट लॉग) सुविधेचे वैशिष्ट आहे. वर्षभरातील सर्व संबंधित व्यवहाराचे जतन त्या सॉफ्टवेअरमध्ये केले जाते. तथापि डेटा बेस स्तरावर थेट बदलांसाठी ऑडिट ट्रेल्स नोंद करण्याची सुविधा सॉफ्टवेअरमध्ये नाही.

पुढे आमच्या परिक्षणा दरम्यान आम्हाला जतन केलेले पुरावे वैशिष्टयामध्ये छेडछाड केल्याचे कोणतेही उदाहरण आढळेली नाही. मागील आर्थिक वर्षातील कालावधी वगळता, जिथे डेटासाठी ऑडिट ट्रेल वैशिष्ट्य सक्षम केले नव्हते, त्या कालावधीसाठी कंपनीने वैधानिक रेकॉर्ड धारणा आवश्यकतानुसार ऑडिट ट्रेल जतन केले आहे.

**जी एम कपाडिया अँड कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४७६७डब्लू**

**हितेन विरा**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १४२६९१**
यूडीआयएन: २५१४२६९१बीएमओएयूजे७००२

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४६०७ डब्लू/डब्लू १००१६६**

**साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १०७०१७**
यूडीआयएन: २५१०७०१७बीएमएलएफआरएस २०८४

दिनांक: २५ सप्टेंबर २०२५
स्थळ: मुंबई

**जोडपत्र क्र. १: महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्या सदस्यांना ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या सम तारखेच्या अहवालाच्या परिच्छेद २१ मध्ये मी ''इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल'' या शीर्षकाखाली संदर्भित केलेला परिशिष्ट.**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३ च्या उप-कलम (५) अंतर्गत निर्देश

१) **आयटी प्रणालीद्वारे सर्व लेखा व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठी कंपनीकडे यंत्रणा आहे का? होय असल्यास, खात्यांच्या अखंडतेवर आयटी प्रणालीबाहेरील लेखा व्यवहारांच्या प्रक्रियेचे परिणाम आणि आर्थिक परिणाम, जर काही असतील तर, नमूद करा.**

कंपनीने एकात्मिक इआरपी उपाय म्हणून सॅप इआरपी प्रणाली वर हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत, जी अधिकृत कर्मचाऱ्यांना (त्यांना दिलेल्या अधिकाऱ्याच्या मर्यादेपर्यंत) कंपनी कार्यरत असलेल्या सर्व ठिकाणांहून उपलब्ध आहेत. कंपनीच्या धोरणानुसार, टिप क्रमांक ४३(एच) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वगळता सर्व अकाउंटिंग व्यवहार ईआरपी प्रणालीद्वारे प्रक्रिया केले जातात.

२) **कंपनीच्या कर्जाची परतफेड करण्यास असमर्थतेमुळे विद्यमान कर्जाची पूनर्रचना केली आहे किंवा कंपनीच्या कर्जदाराने केलेली कर्जे/व्याज माफी/निर्लेखन इत्यादी प्रकरणे आहेत का? होय असल्यास, आर्थिक परिणाम नमूद करा. अशा प्रकरणांचा योग्य हिशोब नोंदवला आहे का? (जर कर्ज देणारी सरकारी कंपनी असेल, तर हा निर्देश कर्ज देणाऱ्या कंपनीच्या सांविधिक लेखापरिक्षकांनासुद्धा लागु आहे)**

आमच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार, आम्हांला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण आणि लेखापुस्तकांद्वारे दर्शविल्याप्रमाणे कर्जाची पुर्नरचना करणे किंवा कर्ज / ऋण / व्याज यांना सोडून देणे किंवा त्यांचे निर्लेखन करणे असे एकही प्रकरण नाही परंतु, कंपनीने छत्तीसगड कटघोरा डोंगरगड रेल्वे मर्यादितला देय असलेले ₹ ४.३४ कोटी खर्चाचा हिस्सा असल्याचे सांगितले आहे जे वसूल करण्यायोग्य नाही.

वषअखेरीस तरतूद करण्यात आलेल्या कर्जाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| उपकंपनी / सहयोगी कंपनीचे नाव | वर्षभरात दिलेली कर्जाची रक्कम (₹ कोटी) | ३१-०३-२०२५ रोजी थकित कर्जाची रक्कम (₹ कोटी) | तरतूद (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड | ०.००* | ६.२० | ६.२० |
| महागुज कोलियारीज लिमिटेड | ०.१८ | ४१.४३ | ४१.४३ |
| यूसीएम कोळसा कंपनी लिमिटेड | - | ०.५६ | ०.५६ |

*** १ लाख रुपयांपेक्षा कमी**

३) **केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या एजन्सीकडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला/प्राप्य असलेला निधी (अनुदान इ.) त्याच्या अटी व शर्तीनुसार योग्य रीतीने जमा/वापरण्यात आला होता का ? विचलन प्रकरणांची यादी करा.**

आमच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार, आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण आणि लेखा पुस्तकांद्वारे दर्शविल्यानुसार केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या एजन्सीकडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेल्या/ प्राप्त असलेल्या खाते निधी (अनुदान/सबसिडी इ.) यांचे, त्याच्या अटी आणि नियमांनुसार योग्य रीतीने लेखाजोखा आणि उपयोग केला गेला.

**क्षेत्र विशिष्ट उप-आदेशांवरील टिप्पण्या**

१) **कंपनीकडे, मागणी केलेल्या आणि प्राप्त झालेल्या कोळशाचे प्रमाण/गुणवत्ता यांची नोंद करायची यंत्रणा आहे का आणि कोळशाची श्रेणी/ओलावा इ. पुस्तकांमध्ये योग्यरीत्या नोंदवलेले आहे का?**

आमच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार, आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीकडे कोळसा कंपन्यांनी दिलेली बिले कंपनीला प्राप्त झालेल्या बिलांमध्ये सामंजस्य करण्याची एक प्रणाली आहे. तथापी, मागणी केलेल्या आणि प्राप्त झालेल्या कोळशाच्या प्रमाण/ गुणवत्तेच्या संदर्भात, सामंजस्याची सध्याची प्रक्रिया मजबूत करणे आवश्यक आहे. कंपनीने मान्यताप्राप्त कोळसा विश्लेषक कंपन्यांची नियुक्ती केली आहे. त्या कोळसा कंपनीच्या माल भरण्याच्या जागेवरून कोळसा श्रेणीचे तांत्रिक विश्लेषण करतात. या कंपन्या द्वारे सादर केलेल्या विश्लेषण अहवालाच्या आधारे, कंपनीचे कोळसा कार्यालय, नागपूर हे बिलात नमूद केलेल्या दर्जा यांची अहवालात

नमूद केलेल्या दर्जाशी मेळ करते आणि दर्जा घसरला असेल तर कोळसा कंपन्याकडे त्याचे दावे केले जातात.

कोळसा पुरवठादारांनी महानिर्मिती द्वारे विवादित कमी माल उचलणे, कार्यप्रदर्शन प्रोत्साहन आणि व्याज यास्तव कंपनीकडून ₹ ४,६१२.६५ कोटी (मागील वर्षी ₹ ४,५०८.०१ कोटी) चा दावा केला आहे. जे कंपनीने विवादित केले. पुरेसे आणि योग्य परीक्षण पुरावे उपलब्ध नसल्यामुळे, कोणत्याही पक्षाकडून दाव्यांच्या अचूकतेबद्दल निष्कर्षापर्यंत पोहोचणे कठीण आहे. कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी कोळसा पुरवठदांराचे हे दावे आकस्मिक दायित्व म्हणून घोषित केले आहेत.

कोळसा पुरवठादांविरूद्ध कंपनीचे दर्जा घसरण, अपुरा पुरवठा दावे, आर्द्रता दावे, कमी माल भरणे दावे आणि कराराच्या अटीनुसार व्याजाचे दावे ३१ मार्च २०२५ रोजी ₹ ९,८८७.२९ कोटी (मागील वर्षी ₹ ८,९४०.०२ कोटी) आहेत. पुरेसे आणि योग्य परीक्षण पुरावे उपलब्ध नसल्यामुळे, कोणत्याही पक्षाकडून दाव्यांच्या अचूकतेबद्दल निष्कर्षापर्यंत पोहोचणे कठीण आहे. कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी कोळसा पुरवठदांराचे हे दावे आकस्मिक दायित्व म्हणून घोषित केले आहेत.

कंपनीने मे. महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ मर्यादित सोबत कोळसा लाभ आणि वितरण करार केला आहे. मे. एमएसएमसी सोबत लाभदायक कार्याची व्याप्तीमध्ये महानिर्मितीच्या वतीने कोळसा कंपन्यांनी जारी केलेल्या आदेशानुसार खाण प्राधिकरणाकडून कच्च्या कोळशाचे वितरण प्राप्त करून घेणे, कच्च्या कोळशांची वॉशरीपर्यंत वाहतूक करणे, विशिष्ट मापदंड मिळविण्यासाठी कच्च्या कोळशावर प्रक्रिया करणे, लाभदायक कोळशाची रेल्वे साईडिंगपर्यंत वाहतूक, लाभदायक कोळसा रेल्वे वॅगन्समध्ये भरणे आणि असा लाभदायक कोळसा नियुक्त केलेल्या औष्णिक विद्युतकेंद्राना वितरित करणे यांचा समावेश होतो. कच्च्या कोळशाच्या गुणवत्तेतील कमतरता कमी करण्यासाठी आणि एमओडी (मेरिट ऑर्डर डिस्पॅच) संकल्पनेत राज्याच्या वीजनिर्मितीची मागणी पूर्ण करण्यासाठी सुधारित गुणवत्तेसह (जिसिव्ही आणि राख सामग्री) लाभदायक कोळशाचा वापर केला जातो. गुणवत्ता आणि प्रमाण यामध्ये बिघाड झाल्यामुळे वीज निर्मितीवर विपरीत परिणाम होतो. म्हणून, एमएसएमसी मध्ये तांत्रिक तपशीलानुसार (राख सामग्री, ओलावा इ.) नुसार योग्य कोळसा वितरीत करेल, असे न केल्यास करारामध्ये निर्दिष्ट केलेला दंड एमएसएमसी कडून वसूल केला जाईल. जास्त राख सामग्रीमध्ये दंडाच्या कलमानुसार, राखेचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा जास्त वाढल्यास, एमएसएमसीला कच्च्या कोळशाचे प्रमाण उत्पन्नातील फरकाच्या बरोबरीचे म्हणजे राख सामग्रीमध्ये वाढ झाल्यामुळे सुधारित तत्सम उत्पन्न आणि सुधारित मानक उत्पन्न यांच्यातील फरक परतफेड करणे आवश्यक आहे. कंपनीने ३१.०३.२०२५ पर्यंत प्रलंबित कोळसा वसूल कारण्यायोग्य ₹ ५७१.०० कोटी रकमेची नोंद केली आहे. आमच्या पडताळणीसाठी एमएसएमसीकडून मिळलेले आवश्यक पुष्टीकरण आमच्यासमोर न केल्यामुळे आम्ही हा मुद्दा आमच्या मुख्य अहवालात पात्र ठरविला आहे.

**२) राज्य सरकारला मोफत विजेचा किती वाटा होता? आणि ते मान्य केलेल्या अटींनुसार मोजले गेले आणि स्वीकारलेल्या लेखा नियमांनुसार खात्यांमध्ये चित्रण केले गेले का?**

आमच्या सर्वोतोपरी उत्कृष्ट ज्ञान, आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, कोणत्याही करारअंतर्गत, राज्य सरकारचा मोफत विजेचा कोणताही वाटा नाही.

**३) वस्तुमाल सुचीमध्ये भंगार, निकामी साहित्य इत्यादीचे मूल्यासंह योग्य वर्गीकरण केले आहे का?**

आमच्या सर्वोतोपरी उत्कृष्ट ज्ञान, आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण नुसार भंगार आणि निकामी साहित्य कंपनीने निश्चित केले आहे. तथापि अशी निश्चित ओळख करण्याच्या वेळी त्यांचे लेखे केले जात नाही. हिशेबाच्या पुस्तकात धातू भंगाराचे मूल्यांकन व नोंद केली जात नाही आणि लिलाव जेव्हा होईल तेव्हा त्याची वसुलीची लेखा पुस्तकात नोंद केली जाते. निकामी साहित्याची ऐतिहासिक किंमत मोजली जाते आणि त्याच बरोबर कालबाह्यतेसाठी १००% तरतूद लेखा पुस्तकात केली जाते. निकामी वस्तूच्या लिलावावर अशा प्रकारे तयार केलेली तरतूद समायोजित केली जाते. कंपनी वस्तूमालाच्या वयानुसार वस्तूमाल निकामी म्हणून ओळखते. आमच्या स्वतंत्र लेखापरीक्षण अहवालाच्या परिच्छेद ३(छ) मध्ये सांगतल्यामाणे अशा निकामी वस्तूमालाची ओळख पटवण्यात आणि अशा तरतुदीची गणना करण्यात आम्हाला त्रुटी आढळल्या आहेत. गणनेतील अशा चुकांचा तरतुदीवर होणारा पीरणाम कंपनीने निश्चित केलेला नाही.

**४) लेखापरीक्षण अहवाल नमूद केलेला नफा/तोटा कंपनीच्या नफा आणि तोटा विवरणानुसार आहे का ?**

आम्ही लेखापरीक्षण मानक (एसए) ७०० (सुधारित) वित्तीय विवरणपत्रांवर मत तयार करणे आणि अहवाल देणे; या संदर्भात आमचा लेखापरीक्षण अहवाल जारी केला आहे. ज्याचे वाचन कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत विहित केलेल्या स्वतंत्र लेखापरीक्षकाच्या अहवालातील मतातील बदल लेखापरीक्षण मानक (एसए) ७०५ (सुधारित) सह केले जाते. या मानकांनुसार लेखापरीक्षकांना लेखापरीक्षण अहवालात कंपनीच्या वर्षातील नफा/तोट्याचा आकडा नमूद करण्याची आवश्यकता नाही. अहवालाच्या परिच्छेद २ मध्ये

उल्लेख केलेला इतर सर्वकष उत्पन्न (ओसीआय) मध्ये नोंदवलेल्या बाबींचा विचार न करता कर पश्चात वर्षाचा नफा ₹ ३५९.९७ कोटी रुपये आहे.

**५) जलविद्युत प्रकल्पांच्या बाबतीत जैवविविधता राखण्यासाठी, पाण्याचा विसर्ग राज्य सरकारने जारी केलेल्या धोरण/मार्गदर्शनुसार आहे की नाही. तो न राखल्यास दंड देयक/ भरले असल्यास त्याची माहिती द्यावी.**

आमच्या सर्वोतोपरी उत्कृष्ट ज्ञान आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणा नुसार राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाद्वारे (डब्लूआरडी) पाण्याचा विसर्ग नियंत्रित केला जातो आणि आम्हाला कळवल्याप्रमाणे, कंपनीची यात कोणतीही भुमिका नाही. जैवविविधता राखण्यासाठी पाण्याच्या विसर्जनासाठी कोणताही दंड देय/भरलेला नाही.

**६) सीएसआर उपक्रमांचे अहवाल देणे आणि प्रकटीकरण करणे, कॉर्पोरेट प्रशासन आणि लेखापरीक्षण समितीची स्थापना करणे आणि त्यावरील बैठका आयोजित करणे यासह कंपनी कायद्यातील तरतुदींचे पालन केले गेले आहे का ते तपासा.**

**अ) सीएसआर उपक्रम**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५ मधील कंपनीची सामाजिक जबाबदारी (सीएसआर) उपक्रमांचा अहवाल देणे आणि प्रकटीकरण करण्याच्या तरतुदी कंपनीला लागू आहेत. तथापि, मागील वर्षातील तोटा लक्षात घेता, कंपनीला या वर्षासाठी सीएसआरसाठी कोणतीही रक्कम खर्च करण्याची आवश्यकता नाही (मागील वर्ष शून्य). तथापि, अंतर्गत धोरणानुसार, कंपनीने सीएसआर उपक्रमांतर्गत खर्चासाठी ₹ ९.०५ कोटी (मागील वर्षी ₹ १०.०६ कोटी) खर्च केले आहेत.

कंपनीच्या धोरणानुसार, सीएसआर अंतर्गत करावयाच्या खर्चांना संचालक मंडळाने पूर्वमंजूर करणे आवश्यक आहे. कंपनीने अशा खर्चासाठी पोस्ट-फॅक्टर मान्यता मिळवली आहे.

कंपनीच्या धोरणाच्या संदर्भात सीएसआरवर झालेल्या खर्चाच्या संदर्भात खुलासा स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांच्या टिप क्रमांक ४० मध्ये नमूद केला आहे.

कंपनीला मंडळाने मंजूर केलेल्या सीएसआर धोरणाचे पालन करणे आणि सीएसआरवरील खर्चाचे विविध श्रेणींमध्ये वर्गीकरण करणे आवश्यक आहे. कंपनीने अशा खर्चाचे वर्गीकरण केलेले नाही. त्यामुळे, आम्ही कंपनीच्या सीएसआर धोरणाचे पालन आणि स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांच्या टिप क्रमांक ४० मध्ये केलेल्या खुलाशावर भाष्य करण्यास असमर्थ आहोत.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५ नुसार, कंपनीने एक सीएसआर समिती स्थापन केली आहे. तथापि, वर्षभरात आणि मागील वर्षात समितीच्या कोणत्याही बैठका झालेल्या नाहीत. समितीने अशा खर्चाचा आढावा घेतलेला नाही.

**ब) कॉर्पोरेट गव्हर्नन्स**

आम्हाला कळवल्याप्रमाणे, कंपनी ही नियम १७ ते २७ च्या तरतुदींनुसार सूचीबद्ध कंपनी नसल्यामुळे, नियम ४६ च्या उप-नियम (२) च्या कलम (बी ) ते (आय) आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (''लिस्टिंग रेग्युलेशन्स'') च्या अनुसूची पाचमधील परिच्छेद सी, डी आणि ई कंपनीला लागू नाहीत. याव्यतिरिक्त, कंपनीने आम्हाला कळवले आहे की कंपनी कायदा, २०१३ किंवा कोणत्याही लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रामध्ये असे कोणतेही प्रकटीकरण आवश्यक नाही. संचालक मंडळाच्या अहवालात काही खुलासे अनिवार्य आहेत. आमच्या स्वतंत्र लेखापरीक्षण अहवालाच्या परिच्छेद १० मध्ये म्हटल्याप्रमाणे, संचालक मंडळाच्या अहवालासह वार्षिक अहवाल या लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या तारखेनंतर आम्हाला उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

कंपनीने स्थापन केलेल्या समित्यांची माहिती आणि आयोजित केलेल्या बैठकांची संख्या खालीलप्रमाणे आहे:

| समिती | वर्षभरात झालेल्या बैठकांची संख्या |
|---|---|
| लेखापरिक्षण समिती | ३ |
| कंपनीची सामाजिक जबाबदारी (सीएसआर) समिती | ० |

**क) लेखापरिक्षण समिती**

भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने १३.०७.२०१७ रोजी जारी केलेल्या अधिसूचना जिएसआर ८८०(इ) अंतर्गत

दिलेल्या सूटमुळे लेखापरीक्षण समिती आणि नामांकन आणि मोबदला समितीची अनिवार्य स्थापना आवश्यक नाही. कंपनीने फक्त एका स्वतंत्र संचालकाचा समावेश असलेली लेखापरीक्षण समिती स्थापन केली आहे. तथापि, आमच्या स्वतंत्र लेखापरीक्षण अहवालाच्या परिच्छेद ६(ड) मध्ये म्हटल्याप्रमाणे, समितीची स्थापना कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १७७ नुसार नाही. त्यानुसार, वार्षिक वित्तीय विवरणपत्रांचा आढावा, संबंधित पक्ष व्यवहारांना मान्यता देणे इत्यादी लेखापरीक्षण समितीची काही अनिवार्य कामे कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे थेट पार पाडली जातात. त्यानुसार, संलग्न स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे संचालक मंडळाने थेट मंजूर केली आहेत.

वर्षभरात, लेखापरीक्षण समितीच्या ३ बैठका झाल्या.

**जी एम कपाडिया अँड कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४७६७डब्लू**

**हितेन विरा**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १४२६९१**
यूडीआयएन: २५१४२६९१बीएमओएयूजे७००२

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४६०७ डब्लू/डब्लू १००१६६**

**साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १०७०१७**
यूडीआयएन: २५१०७०१७बीएमएलएफआरएस २०८४

दिनांक: २५ सप्टेंबर २०२५
स्थळ: मुंबई

## जोडपत्र क्र.२: महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्या सदस्यांना ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या सम तारखेच्या अहवालाच्या परिच्छेद २२ मध्ये मी "इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल" या शीर्षकाखाली संदर्भित केलेला परिशिष्ट.

**१. मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या संदर्भात:**

आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार, आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरण आणि आमच्या नोंदीच्या तपासणीच्या आधारावर:

अ) १) कंपनीने मालमत्ता, कारखाने व साधने याचा परिमाणवाचक तपशील आणि परिस्थितीसह संपूर्ण तपशील दर्शविणाऱ्या योग्य नोंदी ठेवल्या आहेत.

२) कंपनीने अमूर्त मालमत्तेचे संपूर्ण तपशील दर्शविणारे योग्य लेखे ठेवले आहेत

ब) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार आणि आमच्या नोंदींच्या तपासणीच्या आधारे, कंपनीकडे मालमत्ता, कारखाने व साधने प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी कोणतेही दस्तऐवजीकरण धोरण नाही. कंपनीच्या सातत्यपूर्ण पद्धतीनुसार मालमत्ता, कारखाने व साधने यांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षांनी एकदा केली जाते. कंपनीने २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात मालमत्ता, कारखाने व साधने यांची प्रत्यक्ष पडताळणी केली आहे. मागील वर्ष आणि चालू आर्थिक वर्षात मालमत्ता, कारखाने व साधने यांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. त्यानुसार, जर काही लेखापुस्तकांमध्ये महत्त्वाचे विसंगती असतील तर, त्याबाबत आम्ही भाष्य करू शकत नाही.

क) आम्हास दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार आणि आमच्या नोंदीच्या तपासणीच्या आधारावर, कंपनी काही स्थावर मालमत्ता कंपनीच्या नावावर आहेत की कसे हे निर्धारीत करण्यासाठीस, विलेख (टायटल डिड्स) मिळविण्यासाठी प्रक्रियेत आहे. उपलब्ध माहितीनुसार खालील प्रकरणी विलेख (टायटल डिड्स) कंपनीच्या नावे (म्हणजेच महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित) धारण केलेली नाहीत.

कंपनीच्या नावावर नसलेल्या स्थावर मालमत्ता आणि मालमत्तेचा वापर करण्याचा अधिकार जिथे कंपनी भाडेपट्टेदार आहे यांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

| अनु. क्र. | मालमत्तेचे वर्णन | एकूण वहन मूल्य (कोटी) | च्या नावावर | प्रवर्तक संचालक किंवा त्याचे नातेवाईक किंवा कर्मचारी यांच्या नाववार आहे का? | केव्हापासून | कंपनीच्या नावावर न ठेवण्याचे कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भुसावळ येथील जमीन | ०.२४ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| २. | चंद्रपूर येथील जमीन | १.२४ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| ३. | नाशिक येथील जमीन | ३.७५ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| ४. | पारस येथील जमीन | १६.६८ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| ५. | परळी येथील जमीन | २५.६८ | जमीन मालकाच्या | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| ६. | खापरखेडा येथील जमीन | २३.७१ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७. | एस इ (जनरेशन) कोल नागपूर | ०.०१ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| ८. | भाटघर येथील जमीन | ०.०३ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| ९. | मुख्य कार्यालय सौर प्रकल्प आणि स्थापत्य | १२.९५ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १०. | साक्री सोलार येथील जमीन | ४२.०३ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| ११. | शिरसुफळ | ११.३१ | महानिर्मिती कार्यालय | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १२. | उरण | ६९.७६ | एमएसइबी | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १३. | उरण | ६१.२६ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १४. | कोयना स्टेज १ | ७३.४९ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १५. | कोयना स्टेज ४ | १,३१४.५१ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १६. | तेरवंमेढे | २.६१ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १७. | दूधगंगा | ६७.१५ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १८. | माणिकओढ | २१.४३ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| १९. | ढीम्बे | १६.८५ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| २०. | उज्जनी | २४.६७ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| २१. | वारणा | ३९.२७ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| २२. | सूर्या | ३१.३५ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| २३. | सूर्या आरबी | ९.२६ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |
| २४. | घाटघर | १,३७९.८९ | भाडेपट्टी करार अंमलात आला नाही | नाही | कंपनी स्थापन झाल्यापासून | कंपनीच्या नोंदणीकृत शीर्षक हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे |

ड) कंपनीने चालू आर्थिक वर्षात तिच्या मालमत्तेचे, साधने आणि कारखाने मालमत्तेचा वापर करण्याच्या अधिकारासह किंवा अमूर्तमत्ता किंवा दोन्ही यांचे पुर्नमुल्यांकन केलेले नाही. यानुसार आदेशातील परिच्छेद ३(१)(ड) लागू होत नाही.

इ) व्यवस्थापनाने आम्हांला कळवल्याप्रमाणे, बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा १९८८(१९८८ चा (४५) आणि त्या अंतर्गत बनविलेल्या नियमानुसार कोणतीही बेनामी मालमत्ता ठेवल्याबद्दल कंपनीविरूद्ध कोणतीही कार्यवाही सुरू केलेली नाही किंवा प्रलंबित नाही.

**२. वस्तूमालाच्या संदर्भात**

अ) आम्हाला समजावून सांगितल्याप्रमाणे, वर्षभरात वाजवी अंतराने, व्यवस्थापनाद्वारे वस्तुमालाची प्रत्यक्ष पडताळणी केली आहे. व्यवस्थापनाद्वारे नियुक्त केलेल्या सनदी लेखापालांच्या बाह्य संस्थांद्वारे वर्षभरात वास्तुमाल साठयाची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. ज्यांचे अहवाल आम्हांला देण्यात आले आहेत. तथापि, कोल वॉशरीज वाहतुकदार आणि महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ (एमएसएमसी) कडे पडून असलेल्या कोळशाच्या संदर्भात कोणताही महत्वपूर्ण पडताळणी अहवाल किंवा शिल्लक पुष्टीकरण प्राप्त झालेला नाही. आमच्या मते कोल वॉशरीज वाहतुकदार आणि महाराष्ट्र स्टेट मायनिंग कंपनी लिमिटेड (एमएसएमसी) कडे पडलेल्या कोळशाच्या पडताळणीशिवाय व्यवस्थापनादवारे अशा सत्यापनाची व्याप्ती आणि प्रक्रिया योग्य आहे. लक्षात आलेल्या विसंगती हिशोबाच्या पुस्तकामध्ये योग्य रित्या हाताळल्या गेल्या आहेत.

ब) आम्हाला कळवल्याप्रमाणे, कंपनीला चालू मालमत्तेच्या सुरक्षेच्या आधारावर बँकांकडून एकत्रितपणे ₹ १०,५०० कोटीची खेळते भांडवली कर्ज मर्यादा मंजूर करण्यात आली आहे आणि कंपनीने अशा बँकांकडे आवश्यक त्रैमासिक रिर्टन भरले आहेत, त्याचे तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| बँकेचे नाव एकूण | कार्यरत भांडवल मर्यादा मंजूर (₹ कोटीत) | सिक्युरीटी म्हणून देऊ (ऑफर) केलेल्या चालू मालमत्तेचे स्वरूप | त्रैमासिक शेवट | स्वरूप तिमाही रिटर्न/ स्टेटमेंटनुसार उगड केलेली रक्कम (₹ कोटीत) | हिशोबाच्या वहयांनुसार रक्कम (₹ कोटीत) | फरक (₹ कोटीत) | फरकाची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कन्सोर्टियम बँक | १०,५००/- | संदर्भ नोंद | जून ३०, २०२४, | ३२,७७८.६७ | ३२,५०१.४७ | २७७.२० | नंतरच्या काळात पूरक / निभेदक ऊर्जा बिल जारी केले. व लेखावहीत नोंद केली आहे. वस्तूमाल साठात मूल्य समायोजित केले आहे. |
| कन्सोर्टियम बँक | १०,५००/- | संदर्भ नोंद | सप्टेंबर ३०, २०२४, | ३१,८४०.३६ | ३१,५५२.०२ | २८८.३४ | नंतरच्या काळात पूरक / निभेदक ऊर्जा बिल जारी केले. व लेखावहीत नोंद केली आहे. वस्तूमाल साठात मूल्य समायोजित केले आहे. |
| कन्सोर्टियम बँक | १०,५००/- | संदर्भ नोंद | डिसेंबर ३१, २०२४ | ३१,६०८.५९ | ३१,४४९.४३ | १५९.१६ | नंतरच्या काळात पूरक / निभेदक ऊर्जा बिल जारी केले. व लेखावहीत नोंद केली आहे. वस्तूमाल साठात मूल्य समायोजित केले आहे. |
| कन्सोर्टियम बँक | १०,५००/- | संदर्भ नोंद | मार्च ३१, २०२५ | ३३,८८६.७७ | ३२,११७.४८ | १,७६९.३० | आर्थिक वर्ष संपल्यावर अधिभार बिल जारी केले. विनादेयक महसुलाची तरतूद लेखावहीत केले आहे. वस्तूमाल साठात मूल्य समायोजित केले आहे. |

कंपनीची संपूर्ण चालू मालमत्ता म्हणजे कच्च्या मालाचा साठा, उपभोग्य वस्तूमाल साठा आणि येणी इत्यादी, समानतेने बँकांच्या नावे तारण दिले आहे.

3. कंपनीने वर्षभरात कंपन्यांमध्ये कर्जे दिली आहेत आणि गुंतवणूक केली आहे आणि इतर पक्षांना असुरक्षित कर्जे दिली आहेत. कंपनीने फर्म्स आणि मर्यादित दायित्व भागीदारींना कोणतेही कर्ज दिले आहे,

अ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, कंपनीने त्याच्या उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्याना खालील तपशील अनुसार कर्ज दिले आहे.

| | **हमी** | **सुरक्षा** | **कर्ज** | **कर्जाच्या स्वरूपातील आगाऊ रक्कम** |
|---|---|---|---|---|
| वर्षभरात दिलेली/प्रदान केलेली एकूण रक्कम | निरंक | निरंक | ₹ १६.३७ कोटी | निरंक |
| - उपकंपनी<br>- संयुक्त उपक्रम<br>- सहकारी कंपनी<br>- कर्मचारी कर्ज | निरंक | निरंक | ₹ २.१४ कोटी<br>-<br>-<br>₹ १४.२३ कोटी | निरंक |
| वरील प्रकरणांच्या बाबतीत ताळेबंदाच्या तारखेनुसार थकबाकी<br>- उपकंपनी<br>- संयुक्त उपक्रम<br>- सहकारी कंपनी<br>- कर्मचारी कर्ज | निरंक | निरंक | <br><br><br>₹ ५१.६९ कोटी<br>-<br>₹ ०.५६ कोटी<br>₹ १.३५ कोटी | निरंक |

ब) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, प्रदान केलेल्या कर्जे आणि हमी, हे प्रथमदर्शी कंपनीच्या हितासाठी प्रतिकूल नाहीत. उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्यांना दिलेल्या कर्जाच्या संदर्भात कोणत्याही अटी निर्दिष्ट केलेल्या नाहीत. तसेच ही कर्ज व्याजमुक्त देण्यात आली आहेत जी कंपनीच्या निधीच्या खर्चपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहेत.

क) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, सदरील कर्जाच्या मुद्दलाची परतफेड करण्याचे वेळापत्रक आणि उपरोक्त कर्जाच्या संदर्भात व्याज भरण्याचे वेळापत्रक, नमूद केलेले नाही. त्यामुळे परतफेड किंवा वसुली नियमित आहे कि नाही यावर भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

ड) मुद्दलाची परतफेड आणि व्याज भरण्याचे वेळापत्रक नसल्याने, अशा कर्जाच्या बाबतीत थकित रक्कम किती आहे याबद्दल आम्ही भाष्य करू शकत नाही अशा कर्जाच्या वसुलीसाठी व्यवस्थापनाने कोणतेही पाऊल उचलले नाही.

इ) कर्जाची परतफेड किंवा व्याज भरण्याचे वेळापत्रक नसल्याने आम्हाला कळविल्याप्रमाणे, वर्षभरात कोणतीही रक्कम देय/नूतनीकरण झालेली नाही.

फ) कोणत्याही निर्दिष्ट अटी किंवा परतफेडीचा कालावधी न देता दिलेल्या कर्जांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

| | **सर्व पक्ष** | **प्रवर्तक** | **संबंधित** |
|---|---|---|---|
| कर्जाच्या स्वरूपातील कर्जे/अग्रिमांची एकूण रक्कम | - | - | - |
| - मागणीनुसार परतफेड करण्यायोग्य (अ) | - | - | - |
| - करारामध्ये परतफेडीच्या कोणत्याही अटी किंवा कालावधी निर्दिष्ट केलेला नाही (ब) | - | - | ₹ ५२.२५ कोटी |
| एकूण (अब) | - | - | ₹ ५२.२५ कोटी |
| एकूण कर्जाच्या तुलनेत कर्जाच्या स्वरूपातील कर्जे/अग्रिमांची टक्केवारी | - | - | ९७% |

४. आम्हाला कळवल्याप्रमाणे, कंपनीने कायद्याच्या कलम १८५ मध्ये नमूद केल्याल्या पक्षांना थेट किंवा अप्रत्यक्षपणे कर्जे दिली नाहीत, हमी दिलेली नाहीत किंवा कर्जासाठी सुरक्षा प्रदान केलेली नाही. त्यानुसार, कलम १८५ लागू नाही. कंपनी कायद्याच्या अनुसूची IV मध्ये नमूद केल्याप्रमाणे पायाभूत सुविधा पुरवण्यात गुंतलेली असल्याने, कायद्याच्या उप-कलम (१) वगळता कलम १८६ च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, कायद्याच्या कलम १८६(१) च्या तरतुदींचे पालन करण्यात आले आहे.

५. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, कंपनीने भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या निर्देशांचे आणि कलम ७३ ते ७६ च्या तरतुदींचे किंवा कायद्याच्या इतर कोणत्याही संबंधित तरतुदींचे आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांचे, लागू असलेल्या मर्यादेपर्यंत पालन केले आहे. व्यवस्थापनाकडून आम्हाला कळविण्यात आले आहे की कंपनी कायदा मंडळ किंवा राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण किंवा भारतीय रिझर्व्ह बँक किंवा कोणत्याही न्यायालय किंवा इतर कोणत्याही न्यायाधिकरणाने या संदर्भात कोणताही आदेश दिलेला नाही.

६. केंद्र सरकारने कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४८(१) नुसार खर्चाच्या नोंदीची देखभाल करण्याचे विहित केले आहे. आम्ही कंपनीच्या अशा संबंधित लेखे यांचे व्यापकपणे पुनरावलोकन केले आहे आणि आमच्या मते आणि आम्हाला प्रथमदर्शनी दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने विहित नोंदी बनवून ठेवल्या आहेत. तथापी आम्ही कंपनी (कॉस्ट अकाउंटिग रेकॉर्ड) नियम २०१४ अंतर्गत देखरेखीसाठी आवश्यक असलेल्या खर्चाच्या नोंदी अचूक आणि पूर्ण आहेत किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी तपासले नाही.

७. **वैधानिक देय रकमेच्या संदर्भात:**

अ) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार आणि पुस्तके आणि नोंदीनुसार, कंपनीने सामान्यत: निर्विवाद स्वरूपाच्या सांविधिक देणे नियमितपणे योग्य प्राधिकाऱ्यांकडे जमा केले. यामध्ये भविष्यनिर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर विक्रिकर, सेवा कर, सीमाशुल्क. उत्पादन शुल्क, मुल्यवर्धित कर, वस्तु व सेवा कर (जीएसटी) व उपकर यांशिवाय इतर सांविधिक देणी यांचा सामवेश होतो. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, भविष्य निर्वाह निधी कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मुल्यवर्धित कर, जीएसटी आणि उपकर यांच्या संदर्भात, देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी कोणतीही निर्विवाद रक्कम ३१ मार्च २०२५ रोजी थकीत नव्हती.

ब) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार आयकर, संपत्ती-कर विक्रीकर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मुल्यवर्धित कर, जीएसटी आणि उपकर असे कोणतेही देणी, खालील विवादच्या कारणास्तव गोष्टी वगळता, शिल्लक राहिली नव्हती.

| अनु. क्र. | देय संविधांचे नाव | देयकाचे प्रकार | एकूण रक्कम (₹ कोटीमध्ये) | जमा केलेली रक्कम (₹ कोटीमध्ये) | देय रक्कम (₹ कोटीमध्ये) | रक्कम कोणत्या कालावधीशी संबंधित आहे | ज्या मंचावर वाद प्रलंबित आहे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आयकर कायदा | सेवा करावरील स्त्रोतापासून कपात (₹ ८९५०००/-) | ०.०९ | | ०.०९ | मूल्यांकन वर्ष २००६-०७ आणि २००७-०८ | आयटीएटी पुणे खंडपीठ |
| २ | आयकर कायदा | दंड कलम १४३(३) अंतर्गत | ५.१६ | - | ५.१६ | मूल्यांकन वर्ष २०१४-१५ | सी आय टी (ए), मुंबई |
| ३ | आयकर कायदा | ट्रेस नुसार दिसणारी मागणी (संपूर्ण महानिर्मिती करिता ) | ०.४३ | | ०.४३ | मूल्यांकन वर्ष २००८-०९ आणि २०२५-२६ | एओ मुंबई |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | आयकर कायदा | कलम १४३(३) दिनांक ०८.०४.२०२१ अंतर्गत एओ चुकीने एकूण तोटा कमी मानून ₹ २०८२३२१८२/- उत्पन्न ठिकाणी वजा केलेल्या करासाठी क्रेडिट कमी दिले ₹ ३९७६७०/-, २३४अ ६०८७०३४/- अंतर्गत व्याजाची चुकीची आकारणी, २३४ब ₹ १६८५८३७/- अंतर्गत व्याजाची चुकीची जास्त आकारणी आणि २३४क ₹ २००८५/- अंतर्गत व्याजाची चुकीची जास्त आकारणी. | २१.६४ | - | २१.६४ | मूल्यांकन वर्ष २०१८-१९ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| ५ | आयकर कायदा | आयकर कायदा, १९६१ च्या कलम ३२एसी अंतर्गत दावा केलेल्या वजावटीची परवानगी रद्द करण्याचा आदेश ३० डिसेंबर २०१९ रोजी कलम १४३(३) अंतर्गत पारित करण्यात आला. या संदर्भात ऑनलाइन अर्ज दाखल करण्यात आला आहे. सीआयटी(ए) चा आदेश अद्याप प्रलंबित आहे. | २,५५८.४९ | | २,५५८.४९ | मूल्यांकन वर्ष २०१७-१८ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| ६ | केंद्रीय सेवा कर | पोफळी एचपीएस (कोयना स्टेज I आणि II, III, IV, आणि केडीपीएच), येथे सीजीएसटी विभाग V, कोल्हापूर आयुक्तालय, कोल्हापूर कडून महाराष्ट्र सरकार, जलसंपदा विभागाला देय असलेल्या पाणी रॉयल्टी शुल्क आणि स्थापत्य देखभाल शुल्कावरील सेवा कर मागणी. | ५.६० | ०.४२ | ५.१८ | एप्रिल २०१६ ते जून २०१७ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| ७ | केंद्रीय सेवा कर | आयुक्त सीजीएसटी, सीएक्स नागपूर. ई/८६०३४/२१९ एसएम (₹ २२१८२०/-) | ०.०२ | | ०.२० | २०१९ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| ८ | केंद्रीय सेवा कर | मेसर्स बीएसएन जोशी यांनी सेवा करावरील व्याज ₹ ५,८३,२३५/- भरण्यासाठी अर्ज दाखल केला. महानिर्मितीने नागपूर येथील जिल्हा न्यायालयात ₹ ४,२८,०७६/- रक्कम जमा केली. | ०.०२ | | ०.०२ | | सेवा कर आयुक्त (अपील) मुंबई |
| ९ | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) | जी एस टी आर -३बी रिटर्न भरण्यास विलंब व्याज | ०.०१ | - | ०.०१ | ऑगस्ट-१७ | संयुक्त राज्य कर आयुक्त (अपील) |
| १० | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) | जी एस टी आर -३बी रिटर्न भरण्यास विलंब व्याज | ०.०२ | | ०.०२ | डिसेंबर-१९ | संयुक्त राज्य कर आयुक्त (अपील) |
| ११ | (सीइएस टीएटी) मुंबई | केंद्रीय उत्पादन शुल्क कार्यालयाने क्र. ३२/२००९/१ दिनांक २७.११.२००९ आणि २८-३०/२००९/क दिनांक २४.११.२००९ द्वारे काढलेल्या आदेशाविरुद्ध उत्पादन शुल्क भरले आहे. या प्रकरणाचा निषेध आहे. | ०.२७ | - | ०.०२ | २०२३ | (सीइएसटीएटी) मुंबई |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | आयकर कायदा | वित्तीय वर्ष २१-२२ च्या चौथ्या तिमाहीत बीओबी बँकेने पेमेंट करण्यास विलंब केल्यामुळे ट्रेस ने टीडीएसची मागणी केली. बँकेने सीआयटी (आयकर आयुक्त) कडे अपील दाखल केले आहे परंतु सीआयटीची सुनावणी अद्याप सुरू झालेली नाही. | ०.०४ | | ०.०४ | मूल्यांकन वर्ष २०२३-२४ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| १३ | आयकर कायदा | मागील कालावधीच्या खर्चाची परवानगी रद्द करणे ₹ १,७९,४२,२६५/-, कर्मचारी निवासस्थान म्हणून वापरल्या जाणाऱ्या इमारतींवर १०% दराने घसारा मंजूर न करणे ₹ ६,६३,८४,०९४/- आणि परकीय चलनातील फरकावरील नफा म्हणून ₹ ४२,६३,९४,७५१/- ची परवानगी रद्द करणे. सीआयटी (ए) कडून सुनावणी अद्याप निश्चित झालेली नाही. | ५१.०७ | - | ५१.०७ | आर्थिक वर्ष २०१२-१३ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| १४ | आयकर कायदा | कंपनीने दाखल केलेल्या सुधारित उत्पन्न परतावा विचारात न घेता - तोटा कमी मानला जात आहे (₹ ९१४६०६४०१), आयकर कायदा, १९६१ च्या कलम १४अ अंतर्गत भत्ता रद्द (₹ १३३०००) आणि मागील कालावधीच्या खर्चाची परवानगी रद्द करणे (₹ १५२४०२०८५७). सीआयटी(ए) ने सुनावणीची तारीख १५.०५.२०२५ निश्चित केली आहे. | २४३.८८ | - | २४३.८८ | आर्थिक वर्ष २०१३-१४ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| १५ | केंद्रीय सेवा कर | २७ जलविद्युत केंद्रांसाठी पाणी रॉयल्टी आणि स्थापत्य देखभाल शुल्कावर सेवा कराची मागणी | १९.२७ | १.४४ | १७.८३ | ऑक्टोबर २०१२ ते मार्च २०१६ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| १६ | केंद्रीय सेवा कर | २७ जलविद्युत केंद्रांसाठी पाणी रॉयल्टी आणि स्थापत्य देखभाल शुल्कावर सेवा कराची मागणी | ७.५० | ०.५६ | ६.९४ | एप्रिल २०१६ ते जून २०१७ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| १७ | केंद्रीय सेवा कर | पाटबंधारे विभाग आणि नागपूर महानगरपालिका - कोराडी टिपीएस आणि खापरखेडा टिपीएस यांना भरलेल्या पाणी शुल्कावरील सेवा कर मागणी. | ३.१३ | ०.२५ | २.८८ | एप्रिल २०१६ ते जून २०१७ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| १८ | केंद्रीय सेवा कर | वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जासाठी महाराष्ट्र सरकारला भरलेल्या हमी शुल्कावरील सेवा कर मागणी. (मुख्य कार्यालय) | ३.१९ | ०.२४ | २.९५ | जुलै २०१२ ते मार्च २०१७ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| १९ | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) | नुकसान भरपाईसाठी जीएसटीची मागणी. (मुख्य कार्यालय ) | ५८.३० | ३.३० | ५५.०० | जुलै २०१७ ते मार्च २०२२ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| २० | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) | जीएसटी ऑडिट २०१८-१९. नाशिक टिपीएसमधील एकलहरे, बॅरेज आणि जमिनीच्या वापरासाठी मिळालेल्या वार्षिक शुल्कावर आणि विक्रेत्यांना लवकर पैसे दिल्यावर मिळालेल्या व्याजावर जीएसटी देय. जीएसटीवरील व्याज आणि दंडाची मागणी. (मुख्य कार्यालय) | १.०५ | ०.०५ | १.०० | एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ | संयुक्त राज्य कर आयुक्त (अपील) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | एम-व्हॅट | मूल्यवर्धित कर नियमांमध्ये पूर्वलक्षी सुधारणा आणि त्यावरील व्याजामुळे मूल्यवर्धित कराच्या अतिरिक्त परताव्याची मागणी. | १३.६३ | १.५४ | १२.०९ | एप्रिल २००६ ते मार्च २००७ | महाराष्ट्र विक्री कर |
| २२ | आयकर कायदा | मागील कालावधीच्या खर्चाची परवानगी रद्द करणे आणि मागील वर्षात आधीच कर आकारलेल्या जादा बिलिंगच्या उलटीकरणामुळे कपात करण्याबाबत कलम १४८ अंतर्गत पुनर्मूल्यांकन कार्यवाही. आयकर कायद्याच्या कलम १४८ अंतर्गत पुनर्मूल्यांकन कार्यवाहीची वैधता प्रलंबित आहे. | ३९९.९२ | - | ३९९.९२ | मूल्यांकन वर्ष २००७-०८ | उच्च न्यायालय, मुंबई |
| २३ | आयकर कायदा | कर्मचारी निवासस्थान म्हणून वापरल्या जाणाऱ्या इमारतींवर १०% दराने घसारा मंजूर न करणे ₹ ३,१९,३०,३४९/- आणि आयकर आयुक्त (अपील) यांनी दिलेल्या ०६ जून २०११ च्या आदेशाला लागू होणाऱ्या २० सप्टेंबर २०११ च्या आदेशानुसार मूल्यांकन केलेले एकूण उत्पन्न विचारात न घेता. २३ ऑगस्ट २०२२ च्या आदेशानुसार कर न्यायाधिकरणाने हे प्रकरण गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यासाठी सीआयटी(ए) च्या फाईलमध्ये परत पाठवले आहे. संबंधित लेखी सबमिशन सीआयटी(ए) कडे दाखल करण्यात आले आहेत आणि अपील निर्णयासाठी प्रलंबित आहे. | १५८.२५ | - | १५८.२५ | मूल्यांकन वर्ष २००८-०९ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| २४ | आयकर कायदा | कलम ४०(अ)(आयए) अंतर्गत परवानगी रद्द करणे ₹ ८२,६५,५७,७०४/-, मागील कालावधीच्या खर्चाची परवानगी रद्द करणे ₹ १९,१५,८७,८०३/-, आयकर कायदा, १९६१ च्या कलम १४अ अंतर्गत परवानगी रद्द १११९६ आणि हवाला ऑपरेटरकडून खरेदी करण्याबाबत परवानगी नाकारणे ₹ ४,९७,४३२/-. आयटीएटीने २० सप्टेंबर २०२१ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कंपनीच्या बाजूने पूर्वीच्या इश्यूजचा निर्णय घेण्यात आला आहे. आता कर विभागाने आयटीएटीच्या आदेशाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. | १०१.८७ | - | १०१.८७ | मूल्यांकन वर्ष २०१०-१ | उच्च न्यायालय, मुंबई |
| २५ | आयकर कायदा | ₹ १४,७८,४७,३३२/- च्या मागील कालावधीच्या खर्चाची परवानगी रद्द करणे. आयटीएटीने २२ एप्रिल २०२१ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कंपनीच्या बाजूने याआधीच्या समस्याचा निर्णय घेण्यात आला होता. आता कर विभागाने आयटीएटीच्या आदेशाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. | १४.७८ | - | १४.७८ | मूल्यांकन वर्ष २०११-२ | उच्च न्यायालय, मुंबई |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | आयकर कायदा | १९६१ च्या आयकर कायदा कलम २७२अ(१)(ड) अंतर्गत १०,०००/- रुपयांचा दंड आकारला जाईल. अपील सीआयटी(ए) कडे प्रलंबित आहे. ऑनलाइन अर्ज दाखल केला आहे आणि सीआयटी(ए) चा आदेश अद्याप प्रलंबित आहे. | ०.०० | | ०.०० | मूल्यांकन वर्ष २०१७-१८ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| २७ | केंद्रीय सेवा कर | आरसीएम अंतर्गत सेवा कर न भरल्याबद्दल व्याज आणि दंडासह ₹ ५९,१२,७६८/- चा सेवा कर भरण्यासाठी केंद्रीय वस्तू आणि सेवा कर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क (नागपूर) च्या अतिरिक्त आयुक्तांच्या मुंबई न्यायालयात आदेशाविरुद्ध अपील. | ०.५९ | ०.०६ | ०.५३ | एप्रिल २०१६ ते जून २०१७ | (सीइएसटीएटी) मुंबई |
| २८ | आयकर कायदा | सीआयटी(ए) ने कलम २५० अंतर्गत आदेश क्रमांक आयटीबीए आयटीबीए / एपील / एस / २५० / २०२४-२५ / १०६९३७०९१८(१) दिनांक ०४.१०.२०२४ द्वारे आदेश पारित केला आहे. | २६.६३ | - | २६.६३ | मूल्यांकन वर्ष २०२३-२४ | सीआयटी(ए) - एनएफएसी |
| २९ | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) | नाकारलेल्या धुतलेल्या कोळशाच्या विक्रीवर भरपाई उपकर. उपकर आयटीसी द्वारे भरण्यात आला आहे. व्याज आणि दंड भरण्यासाठी कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली (मुख्यकार्यालय). न्यायाधिकरणाच्या कामकाजाच्या सुरुवातीबद्दल अपील अद्याप दाखल झालेले नाही. | १२.१० | - | १२.१० | ऑक्टोबर २०२१ ते सप्टेंबर २०२४ | जीएसटी अपीलीय न्यायधिकरण |
| ३० | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) | जीएसटी ऑडिट २०२०-२१. कायदेशीर शुल्कावर आरसीएम अंतर्गत कमी कर भरण्याबाबत जीएसटीची मागणी. | ०.६७ | ०.०३ | ०.६४ | एप्रिल २०२० ते मार्च २०२१ | संयुक्त राज्य कर आयुक्त (अपील) |
| ३१ | आयकर कायदा | २०१(१)/२०१(१अ)/ टीडीएस भांडवली खर्च आणि कर्मचाऱ्यांच्या खर्चाबाबत कर कापला नाही. | १३.११ | ५.८१ | ७.३० | मूल्यांकन वर्ष २००९-१० | उच्च न्यायालय |
| | | | **३,७२०.७३** | **१३.७०** | **३,७०७.०३** | | |

८. आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, आयकर कायदा, १९६१ (१९६१ चा ४३) अंतर्गत कर मूल्यांकनात वर्षभरात उत्पन्न म्हणून सोडून दिलेले किंवा उघड केलेले, असे कोणतेही व्यवहार नाहीत जे लेखा पुस्तकात नोंदवले गेले नाहीत.

९) अ) कंपनीने वर्षभरात कोणत्याही कर्जदाराला कर्ज किंवा इतर कर्ज परतफेड करण्यात किंवा त्यावरील व्याज देण्यात कसूर केलेली नाही.

ब) कंपनीला कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्थेने किंवा सरकारने किंवा कोणत्याही सरकारी प्राधिकरणाने जाणूनबुजून कसुरवार (विलफुल डीफॉल्टर) म्हणून घोषित केलेले नाही.

क) आमच्या मते, कंपनीने वर्षभरात घेतलेली मुदत कर्जे, ज्या उद्देशांसाठी कर्जे घेतली होती त्याच उद्देशांसाठी कंपनीने वापरली होती.

ड) कंपनीच्या आर्थिक विवरणपत्रांच्या एकूण तपासणीवर, प्रथमदर्शनी, अल्पकालीन आधारावर उभारलेला निधी कंपनीने वर्षभरात दीर्घकालीन उद्देशांसाठी वापरला नाही.

ई) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, कंपनीने तिच्या उपकंपन्या, सहयोगी किंवा संयुक्त उपक्रमांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी किंवा त्यांच्यासाठी कोणत्याही संस्थेकडून किंवा व्यक्तीकडून कोणताही निधी घेतलेला नाही.

एफ) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, कंपनीने तिच्या उपकंपन्या, संयुक्त उपक्रम किंवा सहयोगी कंपन्यांमध्ये ठेवलेल्या सिक्युरिटीजच्या तारणावर वर्षभरात कर्जे उभारली नाहीत.

१०) अ) आम्हाला कळवल्याप्रमाणे, वर्षभरात कंपनीने प्रारंभिक सार्वजनिक ऑफर किंवा पुढील सार्वजनिक ऑफर (कर्ज साधनांसह) द्वारे कोणतेही पैसे उभारले नाहीत.

ब) कंपनीने लेखापरीक्षणाधीन वर्षात समभाग /पूर्ण किंवा अंशत: किंवा पर्यायी परिवर्तनीय डिबेंचर्सचे कोणतेही प्राधान्य वाटप किंवा खाजगी वाटप केलेले नाही. तथापि, वर्षभरात, महाराष्ट्र सरकारच्या ३० मार्च २०२४ च्या शासकीय ठराव २०२४/अनु.क्र.३३/ ऊर्जा-३ निर्देशानुसार, कायद्याच्या कलम ६२ अंतर्गत मराविम सूत्रधारी कंपनी मर्यादितला (कंपनीचे एकमेव भागधारक) अतिरिक्त समभाग जारी करण्यात आले. ज्या उद्देशासाठी निधी उभारण्यात आला होता त्यासाठीच मिळालेले भागभांडवल वापरले गेले आहे.

११) अ) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, आमच्या लेखापरीक्षणादरम्यान कंपनीने किंवा तिच्या अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी कंपनीवर केलेली कोणतीही महत्त्वाची फसवणूक लक्षात आलेली नाही किंवा नोंदवलेली नाही.

ब) कंपनी कायद्याच्या कलम १४३ च्या उपकलम (१२) अंतर्गत लेखापरीक्षकांनी कंपनी (ऑडिट आणि ऑडिटर्स) नियम, २०१४ च्या नियम १३ अंतर्गत विहित केलेल्या फॉर्म एडीटी-४ मध्ये केंद्र सरकारकडे कोणताही अहवाल दाखल केलेला नाही;

क) आम्हाला कळवल्याप्रमाणे, कंपनीला वर्षभरात कोणत्याही व्हिसल-ब्लोअर तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत;

१२) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, कंपनी निधी कंपनी नाही. त्यानुसार, आदेशाच्या कलम ३(xii) अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

१३) व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार आणि आमच्या तपासणीवर आधारित, संबंधित पक्षांसोबतचे व्यवहार जेथे लागू असेल तेथे कायद्याच्या कलम १८८ चे पालन करतात. आमच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या परिच्छेद ६(डी) सह एकत्रितपणे वाचलेल्या स्वायत वित्तीय विवरणांच्या टिप क्रमांक ४३(जी) मध्ये म्हटल्याप्रमाणे, वर्षभरात लेखापरीक्षण समितीची कोणतीही बैठक बोलावण्यात आली नसल्यामुळे, कायद्याच्या कलम १७७ अंतर्गत आवश्यक असलेले संबंधित पक्ष व्यवहारांचे पुनरावलोकन/मंजूरी देण्याचे अनिवार्य कार्य लेखापरीक्षण समितीने थेट संचालक मंडळाद्वारे पार पाडले आहे. कंपनीने लागू असलेल्या भारतीय लेखा मानकांनुसार आवश्यक असलेल्या प्रमाणात, स्टँडअलोन वित्तीय विवरणपत्रांच्या नोट्समध्ये संबंधित पक्ष व्यवहारांचे तपशील उघड केले आहेत.

१४) अ) आमच्या मते कंपनीकडे तिच्या व्यवसायाच्या आकार आणि स्वरूपाशी सुसंगत पुरेशी अंतर्गत लेखापरीक्षण प्रणाली आहे.

ब) आमच्या लेखापरीक्षण प्रक्रियेचे स्वरूप, वेळ आणि व्याप्ती निश्चित करताना, आम्ही वर्षभरात आणि आजपर्यंत कंपनीला जारी केलेल्या लेखापरीक्षण वर्षाच्या अंतर्गत लेखापरीक्षण अहवालांचा विचार केला आहे.

१५) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार आणि कंपनीच्या नोंदींच्या आमच्या तपासणीवर आधारित, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १९२ नुसार कंपनीने संचालकांशी किंवा त्यांच्याशी संबंधित व्यक्तींशी रोख नसलेले व्यवहार केलेले नाहीत. त्यानुसार, आदेशाच्या कलम ३(xv) अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

१६) अ) आमच्या मते, कंपनीला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४ च्या कलम ४५-आयए अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक नाही. म्हणून, आदेशाच्या कलम ३(xvi)(अ), (ब) आणि (क) अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

ड) आमच्या मते, आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, गटात (कोअर इन्व्हेस्टमेंट कंपन्या (रिझर्व्ह बँक) निर्देश, २०१६ नुसार) कंपनीच्या प्रवर्तक/प्रवर्तक गटाचा भाग असलेल्या कोणत्याही कंपन्या कोअर इन्व्हेस्टमेंट कंपन्या नाहीत.

१७) नोंदींच्या तपासणीच्या आधारे, कंपनीला आर्थिक वर्षात आणि त्याच्या लगतच्या मागील आर्थिक वर्षात रोख नुकसान झालेले नाही.

१८) वर्षभरात कोणत्याही वैधानिक लेखापरीक्षकांनी राजीनामा दिलेला नाही. म्हणून, आदेशाच्या कलम ३(xviii) अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

१९) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार आणि आर्थिक गुणोत्तरांच्या आधारावर, वित्तीय मालमत्तेच्या वसुली आणि आर्थिक दायित्वांच्या देयकाच्या अपेक्षित तारखा, वित्तीय विवरणपत्रांसह इतर माहिती, संचालक मंडळाचे आणि व्यवस्थापन योजनांचे लेखापरीक्षकाचे ज्ञान, स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांवरील लेखापरीक्षण अहवालात आमच्या पात्रतेनुसार व्यापार प्राप्तींच्या वसुलीचा अपवाद वगळता, आमचे असे मत आहे की लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत, कंपनी ताळेबंदाच्या तारखेला अस्तित्वात असलेल्या आणि ताळेबंदापासून एक वर्षाच्या कालावधीत देय असलेल्या दायीत्व पूर्ण करण्यास सक्षम आहे याबद्दल कोणतीही महत्त्वाची अनिश्चितता

अस्तित्वात नाही. तथापि, आम्ही असे म्हणतो की हे कंपनीच्या भविष्यातील व्यवहार्यतेचे आश्वासन नाही. आम्ही पुढे असे नमूद करतो की आमचा अहवाल लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंतच्या माहितीवर आधारित आहे आणि आम्ही कोणतीही हमी देत नाही किंवा कोणतेही आश्वासन देत नाही की ताळेबंधाच्या तारखेपासून १ वर्षाच्या कालावधीत देय असलेली सर्व देणी कंपनीकडून जेव्हा देय होतील तेव्हा ती फेडली जातील.

२०) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, कायद्याच्या कलम १३५ च्या तरतुदींनुसार आवश्यक असलेल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत खर्च करण्यास कंपनी जबाबदार नाही. आणि कंपनी कायद्याच्या अनुसूची VII मध्ये निर्दिष्ट केलेल्या निधीमध्ये किंवा सदर कायद्याच्या कलम १३५ च्या उप-कलम (६) च्या तरतुदीनुसार विशेष खात्यात हस्तांतरण करण्याची आवश्यकता असलेल्या वर्षासाठी कोणतीही अखर्चित सीएसआर रक्कम नाही.

२१) कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांच्या लेखापरीक्षणाच्या बाबतीत कलम (xxi) अंतर्गत अहवाल लागू होत नाही. त्यानुसार, या अहवालातील कलमाच्या संदर्भात कोणतीही टिप्पणी समाविष्ट केलेली नाही.

**जी एम कपाडिया अँड कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १०४७६७डब्लू**

**हितेन विरा**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १४२६९१**
**यूडीआयएनः २५१४२६९१बीएमओएयूजे७००२ २०८४**

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १०४६०७ डब्लू/डब्लू १००१६६**

**साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १०७०१७**
**यूडीआयएनः २५१०७०१७बीएमएलएफआरएस**

दिनांक: २५ सप्टेंबर २०२५
स्थळ: मुंबई

## जोडपत्र ३ - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्या सदस्यांना ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या सम तारखेच्या अहवालाच्या परिच्छेद २३ (एच) मध्य ''इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल'' या शीर्षकाखाली संदर्भित केलेला परिशिष्ट.

### कंपनी कायदा, २०१३ (कायदा)च्या कलम १४३ च्या उप-कलम (३) च्या कलम (i) अंतर्गत स्वायत्त वित्तीय विवरणांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणांवरील अहवाल

**पात्र मत:**

१. आम्ही महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ('कंपनी') च्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांसंदर्भात अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे लेखापरीक्षण केले आहे. हे लेखापरीक्षण आम्ही कंपनीच्या ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखापरीक्षणासोबत केले आहे.

२. आमच्या मतानुसार, खालील 'पात्र मताचे आधार' परिच्छेदात वर्णन केलेल्या गंभीर दुर्बलतेच्या संभाव्य परिणामांचा अपवाद वगळता, नियंत्रण निकषांच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसंदर्भात कंपनीने सर्व महत्त्वपूर्ण बाबींमध्ये स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांसंबंधी पुरेसे अंतर्गत आर्थिक नियंत्रण राखले आहे आणि अशा अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची कार्यक्षमता ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या स्थितीनुसार प्रभावीपणे कार्यरत होती.

३. आम्ही वरीलप्रमाणे ओळखलेल्या आणि अहवालित केलेल्या गंभीर दुर्बलतांचा विचार करून, कंपनीच्या ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखापरीक्षणामध्ये लागू केलेल्या लेखापरीक्षण चाचण्यांचे स्वरूप, वेळ आणि व्याप्ती निश्चित केली आहे.

४. आमच्या 'पात्र मताचे आधार' या विभागातील परिच्छेद ६(i), (viii) आणि (x) मध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात पुरवठादारांना दिलेल्या आगाऊ रकमांचे व त्यासाठी करण्यात आलेल्या दायित्वांच्या तरतुदी यांचे वेळेवर समायोजन तसेच वॉशरी/तृतीय पक्षांकडे ठेवलेल्या कोळशाच्या प्रत्यक्ष पडताळणी अहवाल/पुष्टीकरण यांबाबतची कमकुवतता, कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणांवरील आमच्या मतावर परिणामकारक ठरली असून, आम्ही आमच्या मुख्य लेखापरीक्षण अहवालात पात्र मत नोंदविले आहे

५. आमच्या 'पात्र मताचे आधार' या विभागातील परिच्छेद ६(i) ते (viii), आणि (x) मध्ये नमूद केलेल्या इतर कमकुवत बाबी कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणांवरील आमच्या मतावर परिणामकारक ठरत नाहीत.

**पात्र मताचा आधार**

६. आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार आणि आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे, ३१ मार्च २०२५ रोजी खालील महत्त्वाच्या कमकुवतपणा ओळखल्या गेल्या आहेत ज्यामध्ये अंतर्गत आर्थिक नियंत्रणे प्रभावीपणे कार्यरत नव्हती.

   १) पुरवठादारांना दिलेल्या आगाऊ रकमा व त्यासाठी करण्यात आलेल्या दायित्वांच्या तरतुदी यांचे वेळेवर समायोजन; ओळखलेले पुरवठादार, न ओळखलेले पुरवठादार, अयशस्वी बँक व्यवहारांशी संबंधित दायित्वे अशा विविध खात्यांमध्ये नोंदविलेल्या नोंदींचे समायोजन/ताळमेळ/निर्मूलन; तसेच जुन्या प्रलंबित शिल्लक रकमेचे समायोजन/ताळमेळ/निर्मूलन.

   २) औष्णिक विद्युत केंद्रांसाठी ऊर्जा खरेदी करारानुसार विलंब भरणा अधिभार (एलपीएस) संबंधी मासिक बिले वेळेवर न काढल्याबाबत.

   ३) परिसमापनातील नुकसानभरपाईची वेळेवर अंतिमीकरण व आकारणी करण्याबाबत.

   ४) कर्जे व आगाऊ रक्कम, रोखून ठेवलेली रक्कम आणि धनको यांच्याशी संबंधित प्रणाली-आधारित वयोमान अहवालाबाबत.

   ५) स्वायत्त वित्तीय विवरणांमध्ये दायित्वांच्या बाजूस डेबिट शिल्लक खात्यांचे आणि मालमत्तांच्या बाजूस क्रेडिट शिल्लक खात्यांचे मॅ पिंग असण्याबाबत.

   ६) व्यवस्थापनाच्या प्रक्रियेच्या आधारे, अंतर्गत लेखापरीक्षकांनी जोखीम मूल्यांकन प्रक्रिया व अंतर्गत आर्थिक नियंत्रण यांची पडताळणी केली आहे. तथापि, काही ठिकाणी जोखीम नियंत्रण मॅट्रिक्स किंवा मानक कार्यपद्धती अद्ययावत करणे आवश्यक आहे किंवा उपलब्ध नाहीत, असे आम्ही निरीक्षण केले आहे. त्यामुळे अशा नियंत्रणांच्या कार्यक्षमतेबाबत आम्ही मत व्यक्त करू शकत नाही.

   ७) अंतर्गत लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात झालेला विलंब आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल प्राप्त होण्यात झालेला विलंब.

८) वॉशरी/तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाची कोणताही प्रत्यक्ष पडताळणी अहवाल/पुष्टीकरण उपलब्ध नाही.

९) कर्ज विभाग, प्रकल्प कार्यालये, बांधकाम विभाग आणि विद्युत केंद्रे यासारख्या विविध विभागांमधील कर्ज खर्चाच्या भांडवलीकरणावरील समन्वयावर अंतर्गत नियंत्रण सक्षम करणे आवश्यक आहे.

१०) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची (एमएसएमइ) ओळख पटविण्यासाठी योग्य प्रणाली उपलब्ध नाही तसेच एमएसएमइ अधिनियमांतर्गत ओळखल्या गेलेल्या उद्योगांचा दर्जा लेखा सॉफ्टवेअरमध्ये नोंदविण्यासाठी आवश्यक प्रणाली उपलब्ध नाही.

११) बँक खाते उघडणे आणि ती खाती कंपनीच्या लेख्यांमध्ये नोंदविण्याबाबतचे नियंत्रण अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. तसेच, कंपनीने केलेल्या व्यवहारांची नोंदणी करण्याची धोरणे आणि त्या व्यवहारांसाठी 'मेकर-चेकर' यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे.

७. 'महत्त्वपूर्ण कमकुवतता' म्हणजे एक त्रुटी किंवा त्रुटींचा एकत्रित परिणाम, जो स्वायत्त वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणामध्ये आढळतो, ज्यामुळे कंपनीच्या वार्षिक आर्थिक विवरणांमध्ये महत्त्वपूर्ण चुकीची नोंद वेळेवर रोखली जाण्याची किंवा शोधली जाण्याची शक्यता कमी होते.

**अंतर्गत आर्थिक नियंत्रणांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी**

८. कंपनीच्या संचालक मंडळांची जबाबदारी आहे की त्यांनी अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची स्थापना व देखभाल करावी. हे नियंत्रण कंपनीने स्वायत्त वित्तीय विवरणांशी संबंधित निकषांच्या आधारे, तसेच इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) यांनी जारी केलेल्या आर्थिक अहवालांवरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक टिप मध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या आवश्यक घटकांचा विचार करून स्थापित केलेले आहे. या जबाबदाऱ्यांमध्ये व्यवसायाचे सुव्यवस्थित व कार्यक्षम संचालन सुनिश्चित करण्यासाठी पुरेसे अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे डिझाइन, अंमलबजावणी आणि देखभाल यांचा समावेश होतो. यात कंपनीच्या धोरणांचे पालन, मालमत्तांचे संरक्षण, फसवणूक व चुका यांची प्रतिबंध व शोध, लेखा नोंदींची अचूकता व पूर्णता, तसेच कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत आवश्यक असलेली विश्वासार्ह आर्थिक माहिती वेळेवर तयार करणे यांचा समावेश आहे.

**लेखापरीक्षकांची जबाबदारी**

९. आमची जबाबदारी म्हणजे कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांवर आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे. आम्ही आमचे लेखापरीक्षण 'आर्थिक अहवालांवरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक टिप' तसेच कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत निर्धारित लेखापरीक्षण मानकांनुसार, एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणास लागू होईल त्या मर्यादेपर्यंत केले आहे. त्या मानकांनुसार आणि मार्गदर्शक टिपेनुसार आम्हाला नैतिक आवश्यकतांचे पालन करणे तसेच लेखापरीक्षणाची योजना आखून ते पार पाडणे आवश्यक आहे, जेणेकरून एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित पुरेसे अंतर्गत आर्थिक नियंत्रण स्थापित व राखले गेले आहेत का आणि अशी नियंत्रणे सर्व महत्त्वपूर्ण बाबींमध्ये प्रभावीपणे कार्यरत आहेत का याबाबत वाजवी खात्री मिळवता येईल.

१०. आमच्या लेखापरीक्षणामध्ये स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकाशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणालीची पुरेशी क्षमता आणि तिच्या कार्यक्षमतेबाबत लेखापरीक्षण पुरावे मिळविण्यासाठी आवश्यक कार्यपद्धतींचे पालन करणे समाविष्ट आहे. आमच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकाशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणामध्ये, त्या नियंत्रणांचे आकलन करणे, महत्त्वपूर्ण कमकुवतपणा अस्तित्वात असल्याचा धोका मूल्यांकन करणे, तसेच मूल्यांकन केलेल्या धोक्याच्या आधारे अंतर्गत नियंत्रणाच्या डिझाइन व कार्यक्षमतेची चाचणी व मूल्यांकन करणे यांचा समावेश आहे. निवडलेल्या कार्यपद्धती या लेखापरीक्षकांच्या निर्णयावर अवलंबून असतात, ज्यामध्ये स्वायत्त वित्तीय विवरण पत्रका मध्ये फसवणूक किंवा चूक यांमुळे महत्त्वपूर्ण चुकीची नोंद होण्याच्या धोक्याचे मूल्यांकन समाविष्ट असते.

११. आम्हाला आम्हाला असे वाटते की आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे हे स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाच्या संदर्भात कंपनीच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणालीवरील आमच्या लेखापरीक्षण मतासाठी आधार देण्यास पुरेसे आणि योग्य आहेत.

**स्वायत्त वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचा अर्थ**

१२. कंपनीचे स्वायत्त वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रण हे एक असे प्रक्रिया तंत्र आहे, जे आर्थिक अहवालांच्या विश्वासार्हतेबाबत वाजवी खात्री प्रदान करण्यासाठी आणि सर्वसाधारणपणे स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा तत्त्वांनुसार बाह्य उद्देशांसाठी स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांची तयारी करण्यासाठी तयार केलेले आहे. कंपनीचे स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणामध्ये खालील धोरणे व कार्यपद्धतींचा समावेश होतो:

अ) लेखा नोंदींचे जतन करणे, ज्यामध्ये व्यवहार व कंपनीच्या मालमत्तेतील बदल यांचे अचूक व न्याय्य प्रतिबिंब वाजवी तपशीलात दिसून येईल.

ब) व्यवहारांची नोंद सर्वसाधारणपणे स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा तत्त्वांनुसार स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांची तयारी करण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात करण्यात आली आहे याबाबत वाजवी खात्री प्रदान करणे, तसेच कंपनीचे प्राप्ती व खर्च हे केवळ व्यवस्थापन व संचालक मंडळाच्या मंजुरीनुसारच करण्यात आले आहेत याची खात्री करणे. आणि

क) कंपनीच्या मालमत्तेचे अनधिकृत अधिग्रहण, वापर किंवा विल्हेवाट यांची प्रतिबंध किंवा वेळेवर ओळख होईल याबाबत वाजवी खात्री प्रदान करणे, ज्याचा स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाणवर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो.

**स्वायत्त वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची अंतर्निहित मर्यादा**

१३. स्वायत्त वित्तीय विवरण पात्रांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या अंतर्निहित मर्यादांमुळे, ज्यामध्ये संगनमताची शक्यता किंवा नियंत्रणांवर व्यवस्थापनाने अयोग्यरीत्या मात करणे यांचा समावेश आहे, चुका किंवा फसवणुकीमुळे महत्त्वपूर्ण चुकीच्या नोंदी होऊ शकतात आणि त्यांचा शोध लागू शकत नाही. तसेच, स्वायत्त वित्तीय विवरण पात्रांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे कोणतेही मूल्यांकन भविष्यातील कालावधीसाठी प्रक्षेपित केल्यास, परिस्थितीतील बदलांमुळे ही नियंत्रणे अपुरी ठरू शकतात किंवा धोरणे व कार्यपद्धतींचे पालन करण्याची पातळी कमी होऊ शकते, असा धोका असतो.

**जी एम कपाडिया अँड कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४७६७डब्लू**

**हितेन विरा**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १४२६९१**
**यूडीआयएन: २५१४२६९१बीएमओएयूजे७००२**

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४६०७ डब्लू/डब्लू १००१६६**

**साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १०७०१७**
**यूडीआयएन: २५१०७०१७बीएमएलएफआरएस २०८४**

दिनांक: २५ सप्टेंबर २०२५
स्थळ: मुंबई

## ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद पत्रक (स्वायत्त) सीआयएन - यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८.

(₹ कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) | ०१.०४.२०२३ (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|---|
| **मत्ता** | | | | |
| **चालू नसलेल्या मत्ता** | | | | |
| मालमत्ता कारखाने व साधन | १ | ३४,०७२.५३ | २९,२८९.०८ | ३१,१५१.२१ |
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | २ | २,२७४.२२ | ७,१९५.१० | ५,७५७.२९ |
| मत्ता वापरण्याचे हक्क | १ अ | ३,०३०.६२ | ३,२८८.१८ | ३,४१९.२४ |
| अमूर्त मत्ता | १ ब | २.३१ | २.४७ | ४.२९ |
| अमूर्त मत्ता विकसनशील | २ | ९४२.१० | ६४२.०८ | ५७४.१६ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| - चालू नसलेल्या गुंतवणूक | ३ | १४.१६ | २.६७ | २.३९ |
| - बँक ठेवी | ३ अ | १००.०० | १००.०० | ९१.२१ |
| - व्यापारी येणी | ३ ब | १,१३६.६७ | ४,३४०.३३ | ७,२५६.१९ |
| निव्वळ स्थगित कर मत्ता | १५ | - | - | ६९.६१ |
| इतर चालू नसलेल्या मत्ता | ४ | १,५१४.५९ | ८०२.५७ | ६७४.१४ |
| **एकूण चालू नसलेल्या मत्ता** | | **४३,०८७.१९** | **४५,६६२.४७** | **४८,९९९.७४** |
| **चालू मत्ता** | | | | |
| वस्तुमाल सूची | ५ | ३,६५३.६२ | २,९४३.५८ | २,११४.७८ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| - व्यापारी येणी | ६ | ३०,४१२.८६ | २६,९२४.०५ | २२,७२०.४७ |
| - रोख व रोख समतुल्य | ७ | ४.२८ | ७.५८ | २६३.६८ |
| - रोख व रोख समतुल्य व्यतिरिक्त इतर बँक शिलकी | ७ अ | ९४.५१ | ५३.९४ | - |
| - कर्जे | ८ | १.३५ | १.८९ | १.७८ |
| - इतर वित्तीय मत्ता | ९ | ४११.६९ | ५१५.१४ | २९८.८० |
| इतर चालू मत्ता | १० | १,०८८.९२ | ८३२.७९ | ९३३.१४ |
| **एकूण चालू मत्ता** | | **३५,६६७.२२** | **३१,२७८.९६** | **२६,३३२.६५** |
| **इतर मत्ता** | | | | |
| विक्री/ विल्हेवाटी साठी वर्गीकरण केलेल्या मत्ता | १ क | - | - | - |
| **एकूण इतर मत्ता** | | **-** | **-** | **-** |
| **एकूण मत्ता** | | **७८,७५४.४२** | **७६,९४१.४३** | **७५,३३२.३९** |
| **समभाग आणि दायित्वे** | | | | |
| **समभाग** | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| समभाग भांडवल | ११ | २६,३०४.१९ | २६,११५.४० | २५,९१८.५० |
| इतर समभाग | १२ | (९,९०१.६६) | (१०,०१६.९३) | (१०,१२१.८५) |
| **एकूण समभाग** | | **१६,४०२.५२** | **१६,०९८.४६** | **१५,७९६.६५** |
| **दायित्वे** | | | | |
| **चालू नसलेली दायित्वे** | | | | |
| वित्तीय दायित्वे | | | | |
| - कर्जे | १३ | २४,३८६.०३ | २८,१४४.४० | २४,६८५.९१ |
| - भाडेपट्टीचे दायित्वे | १३अ | २,६७३.८२ | २,८५८.५२ | २,९२६.५६ |
| तरतूद | १४ | १,६८६.४५ | १,५०४.१५ | १,१५३.४५ |
| निव्वळ स्थगीत कर दायित्वे | १५ | २७४.१५ | ५६.९८ | - |
| इतर चालू नसलेली दायित्वे | १६ | ९०९.१४ | ८४९.९२ | ६५४.६७ |
| **एकूण चालू नसलेली दायित्वे** | | **२९,९२९.५८** | **३३,४१३.९८** | **२९,४२०.५९** |
| **चालू दायित्वे** | | | | |
| वित्तीय दायित्वे | | | | |
| - कर्जे | १७ | १६,९५४.७९ | १२,६२४.७६ | १७,२७२.७३ |
| - भाडेपट्टीचे दायित्वे | १७अ | १८४.७१ | १७३.९१ | १४३.३४ |
| - व्यापारी देणी (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक) | १८ | १.०७ | १.८६ | १.०० |
| - व्यापारी देणी (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक व्यतिरिक्त) | १८ | १०,६०५.६७ | ९,८१३.४४ | ८,१६७.९७ |
| - इतर वित्तीय दायित्वे | १९ | ४,२६६.३० | ४,३७७.४७ | ४,१०८.६७ |
| इतर चालू दायित्वे | २० | १५२.७९ | १५४.९१ | १८२.३६ |
| तरतूद | २१ | २५७.०० | २८२.६४ | २३९.०७ |
| **एकूण चालू दायित्वे** | | **३२,४२२.३१** | **२७,४२८.९९** | **३०,११५.१५** |
| **एकूण समभाग आणि दायित्वे** | | **७८,७५४.४२** | **७६,९४१.४३** | **७५,३३२.३९** |

महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिपा १ ते ५० हे आर्थिक विवरणपत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा आणि तोटा पत्रक (स्वायत्त)सीआयएन - यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८.

(₹ कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ पुनर्लिखित |
|---|---|---|---|
| **महसूल** | | | |
| प्रवर्तनातील महसूल | | | |
| वीज विक्री | २२ | ३४,३५५.७८ | २९,६७४.८६ |
| इतर प्रवर्तन महसूल | २३ | २७१.७३ | ४०३.२७ |
| इतर उत्पन्न | २४ | ३,७०६.०७ | ३,०११.१६ |
| **एकूण उत्पन्न** | | **३८,३३३.५८** | **३३,०८९.३०** |
| **खर्च** | | | |
| वापरलेल्या साहित्याचा खर्च | २५ | २३,३३१.७१ | २२,१२४.४२ |
| वीज खरेदी | २५अ | ५३१.३६ | ५५५.७२ |
| कर्मचारी लाभ खर्च | २६ | २,१५६.१७ | २,२९१.४६ |
| वित्त खर्च | २७ | ३,६२६.०३ | ३,६१२.४० |
| घसारा आणि मूल्यऱ्हास खर्च | १,१अ व १ब | २,९७९.२६ | २,६९४.२४ |
| इतर खर्च | २८ | ५,६४७.५० | २,३०१.९२ |
| **एकूण खर्च** | | **३८,२७२.०३** | **३३,५८०.१६** |
| अपवादात्मक बाबी आणि कराच्या आधी नफा / (तोटा) | | ६१.५५ | (४९०.८६) |
| वजा: अपवादात्मक बाबी | २८ब | (५३४.३९) | (७९६.३४) |
| **करपूर्व नफा/(तोटा)** | | **५९५.९५** | **३०५.४८** |
| **कर खर्च:** | | | |
| नफा व (तोटा) बाबीवर चालू कर | | - | |
| स्थगित कर खर्च/ (प्राप्ती) | २८अ | २३५.९७ | १६९.७९ |
| एकूण कर खर्च | | २३५.९७ | १६९.७९ |
| **कालावधीतील नफा / (तोटा)** | | **३५९.९७** | **१३५.६९** |
| **इतर सर्वंकष उत्पन्न** | | | |
| नफा किंवा तोटा यात विवरण न केलेल्या बाबी: | | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांची पूर्णमोजणी | २६अ | (७४.७२) | (१७१.६२) |
| इतर सर्वंकष उत्पन्नावरील स्थगित कर खर्च लाभ / (व्यय) | २८अ | (१८.८१) | (४३.१९) |
| **कालावधीतील इतर सर्वंकष उत्पन्नांकडून (करांची मिळकत)** | | **(५५.९२)** | **(१२८.४३)** |
| **कालावधीतील एकूण सर्वंकष उत्पन्न (करांची निव्वळ)** | | **३०४.०६** | **७.२७** |
| प्रतिभाग मिळकत (मूळ) (समभाग प्रत्येकी ₹ १०) | | ०.१४ | ०.०५ |
| **प्रतिभाग मिळकत (सौम्यकत - प्रतिभाग) (समभाग प्रत्येकी ₹१०)** | | ०.१४ | ०.०५ |

महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिपा १ ते ५० हे आर्थिक विवरणपत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.
सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## समभागातील बदलांचे विवरणपत्रक (स्वायत्त)

### १.समभाग भांडवल

| तपशील | रक्कम (₹ कोटीत) |
|---|---|
| **दि. ३१.०३.२०२३ रोजी पुनर्लिखित** | **२५,९१८.५०** |
| लेखा धोरणातील बदल किंवा आधीच्या कालावधीतील त्रुटी | - |
| **पुनर्लिखित दि. ०१.०४.२०२३ रोजी** | **२५,९१८.५०** |
| समभाग भांडवलीतील बदल | १९६.९० |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **२६,११५.४०** |
| समभाग भांडवलीतील बदल | १८८.७९ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **२६,३०४.१९** |

### २. इतर समभाग

(₹ कोटीत)

| तपशील | वापरप्रलंबित असलेल्या समभागाचे अर्ज | ठेवलेली मिळकत | इतर सर्वकष उत्पन्न | एकूण इतर समभाग |
|---|---|---|---|---|
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **९१.१४** | **(८,७६०.७१)** | **(२७३.१८)** | **(८,९४२.७५)** |
| लेखा धोरणातील बदल किंवा आधीच्या कालावधीतील त्रुटी | | (१,१७९.१०) | | (१,१७९.१०) |
| **पुनर्लिखित शिल्लक दि. ०१.०४.२०२३ रोजी** | **९१.१४** | **(९,९३९.८१)** | **(२७३.१८)** | **(१०,१२१.८५)** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | १७३.४४ | | १७३.४४ |
| वर्षातील इतर सर्वकष उत्पन्न | | | (१२८.४३) | (१२८.४३) |
| वाटप प्रलंबित असलेले समभागाच्या अर्जातील भर | २९४.५५ | | | २९४.५५ |
| वर्षभरात वितरण केलेले समभाग | (१९६.९०) | | | (१९६.९०) |
| दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) | १८८.७९ | (९,७६६.३६) | (४०१.६१) | (९,९७९.१८) |
| लेखा धोरणातील बदल किंवा आधीच्या कालावधीतील त्रुटी | | (३७.७५) | | (३७.७५) |
| **पुनर्लिखित शिल्लक दि. ०१.०४.२०२४ रोजी** | **१८८.७९** | **(९,८०४.१२)** | **(४०१.६१)** | **(१०,०१६.९३)** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | ३५९.९७ | | ३५९.९७ |
| वर्षातील इतर सर्वकष उत्पन्न | | | (५५.९२) | (५५.९२) |
| वापर प्रलंबित असलेले समभागाच्या अर्जातील भर | - | | | - |
| वर्षभरात वितरण केलेले समभाग | (१८८.७९) | | | (१८८.७९) |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **-** | **(९,४४४.१४)** | **(४५७.५२)** | **(९,९०१.६६)** |

महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिपा १ ते ५० हे आर्थिक विवरणपत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचा रोकडता प्रवाह (स्वायत्त)

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी | ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| अ) प्रवर्तन कार्यापासूनचा रोकडता प्रवाह | | |
| करोत्तर नफा/तोटा | ३०४.०६ | ७.२७ |
| **कर पूर्व नफ्याचा प्रवर्तन कार्यात वापरलेल्या निव्वळ रोखींशी मेळ करण्यासाठी समायोजने** | | |
| मालमत्ता, कारखाना व उपकरणे आणि अमूर्त मत्तावरील घसारा | २,९७९.२६ | २,६९४.२४ |
| वित्त खर्च | ३,६२६.०३ | ३,६१२.४० |
| विनमय दरातील वसूल न झालेला फरक | (०.०३) | ०.०० |
| किरकोळ पत शिल्लक - पुनर्लिखित | (८१.७९) | (१८.४८) |
| संशयास्पद अग्रिमांसाठी तरतूद | १७०.७१ | ४७.३७ |
| अपेक्षित पतहाणीसाठी तरतूद | २,८३३.०० | - |
| उलट नोंदणी केलेले व्याज | (५३४.३९) | (७९६.३४) |
| व्याजाचे उत्पन्न | (३.९१) | (०.०६) |
| निकामी वस्तू मालासाठी तरदूत | १०.७८ | (२४.६४) |
| **खेळत्या भांडवलातील बदला पूर्वीचा प्रवर्तनातील नफा (उपबेरीज-) १** | **९,३०३.७१** | **५,५२१.७६** |
| खेळत्या भांडवलातील स्थलांतर | | |
| व्यापारी येण्यातील (वाढ)/ घट | (२,७५४.४६) | (५३८.७५) |
| कर्ज, अग्रिमे व इतर मत्ता यातील (वाढ)/घट | (९०४.७३) | (२३७.६४) |
| वस्तू माल सूचींतील (वाढ)/घट | (७२०.८२) | (८०४.१५) |
| दायित्वे व इतर देणी यातील वाढ / (घट) | १,३४४.४९ | २,६७०.१२ |
| **(उपबेरीज २)** | **(३,०३५.५२)** | **१,०८९.५८** |
| प्रवर्तनातून निर्माण झालेली रोकड ((१)+(२)) | | |
| वजा: थेट कर/एफ बी टी परतावा / भरलेले - निव्वळ | ६,२६८.२० | ६,६११.३४ |
| प्रवर्तनातून निर्माण झालेली निव्वळ रोकडप्रवाह (अ) | ६,२६८.२० | ६,६११.३४ |
| ब) गुंतवणूक कार्यापासूनचा रोकडप्रवाह | | |
| मालमत्ता, कारखाना व उपकरणे यांची खरेदी | (२,९९२.९३) | (३,०१५.३३) |
| मालमत्ता, कारखाना व उपकरणे यांची विक्री | १०८.७९ | ८१०.३७ |
| उपकंपन्याातील गुंतवणूक | (११.४९) | (०.२८) |
| मिळालेले व्याज | ३.९१ | ०.०६ |
| गुंतवणूक कार्यातून निर्मिलेला/(वापरलेला) निव्वळ रोकड प्रवाह (ब) | **(२,८९१.७२)** | **(२,२०५.१७)** |
| क) वित्तीय कार्यापासूनचा रोकडता प्रवाह | | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची मिळकत | ४,५२८.७२ | ८,४४८.२० |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड | (५,२०६.८४) | (५,०६९.३८) |

| | | |
|---|---|---|
| समभागाच्या वितरणातून मिळालेली मिळकत | ०.०० | २९४.५५ |
| अल्पमुदतीच्या कर्जाची मिळकत/(परतफेड) | १,२६०.८२ | (३,९९७.८३) |
| भांडवल अनुदान प्राप्ती | - | २१०.४९ |
| वित्तीय खर्च (दिलेला) | (३,५००.३९) | (३,४८६.२५) |
| भाडेपट्टी | (४५१.०४) | (४९१.५८) |
| **वित्तीय कामातून निर्माण झालेली/वापरलेली निव्वळ रोकड प्रवाह (क)** | **(३,३६८.७२)** | **(४,०९१.७९)** |
| **रोख व रोख समतूल्य यातील निव्वळ वाढ /(घट) (अ+ब+क)** | **७.७६** | **३१४.३७** |
| वर्षारंभीची रोख व रोख समतूल्य | (२९.३४) | (३४३.७१) |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतुल्य** | **(२१.५८)** | **(२९.३४)** |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतुल्य यांचा तपशील** | | |
| रोख व रोख समतुल्य रोजी | | |
| बँकतील शिलकी | | |
| - चालू/बचत खात्यांवर (टिपा क्र ७ पहा) | ४.२७ | ७.५६ |
| रोख समतुल्य | - | - |
| ओव्हरड्राफ्ट | (२५.८६) | (३६.९१) |
| हातातील रोख | ०.०१ | ०.०१ |
| **वर्षाअखेरीची रोख व रोख समतुल्य** | (२१.५८) | (२९.३४) |
| **टिपः रोकडता विवरणपत्र लेखा धोरण क्रमांक २१ नुसार तयार केले आहे.** | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांकः १४२६९१

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांकः १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर टिपा

**अ कंपनीची माहिती**

**कंपनीचे स्वरूप**

'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (सदर कंपनी) ही एक पब्लिक लिमिटेड कंपनी असून तिची संस्थापना कंपनी अधिनियम १९५६ नुसार झाली आहे आणि ती भारतातील निवासी कंपनी आहे. ही कंपनी सूचीबद्ध कंपनी नाही आणि तिचे सर्व समभाग म्हणजे १०० टक्के समभाग महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीने धारण केले आहेत.

कंपनी वीज निर्मितीच्या उद्योगात काम करते. यासाठी औष्णिक, जलविद्युत आणि वायु या स्त्रोतावर आधारीत कंपनीची वीज निर्मिती केंद्रे महाराष्ट्र राज्यभरात आहेत. महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेली वीज प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) (सहोदर कंपनी) ला पूरविते. यासाठीचे वीज दरपत्रक महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग या नियामक संस्थेतर्फे निश्चित केले जात असते. त्याचप्रमाणे कंपनी महाराष्ट्रातील सौरऊर्जा आधारीत ऊर्जा प्रकल्पांद्वारे वीज निर्मितीमध्ये गुंतलेली आहे आणि महावितरणसह इतर ग्राहकांना वीज पुरवठा करते.

**ब) वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठीची आधारभूत तत्वे:**

**१. भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन केल्याचे निवेदन**

ही स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके सर्वार्थाने भारतीय लेखा मानके (यापुढे ह्याचा उल्लेख भारतीय लेखा मानक असा केला जाईल) यांचे अनुपालन करून तयार केली आहेत. ही भारतीय लेखा मानके कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १३३ ज्याचे सहवाचन कंपन्यांसाठी (भारतीय लेखा मानके) नियमावली, २०१५ यातील नियम क्र.३ आणि कंपन्यांची (भारतीय लेखा मानके) दुरूस्त केलेली नियमावली, २०१६ यामध्ये सूचित केलेले आहेत. तसेच ही लेखा मानके कंपनी अधिधिनयम २०१३ च्या संबंधित तरतुदीचे अनुपालन करतात.

कंपनीचे सादरीकरणासाठी भारतीय रूपया हे चलन वापरले आहे. तसेच तिच्या व्यवहाराचे चलनसुद्धा भारतीय रूपया हेच आहे. वित्तीय विवरण पत्रकातील सर्व रकमांच्या आकडेवारीचे त्याजवळच्या कोटी रूपयामध्ये रूपांतरण केले आहे. (जेथे इतर काही निर्देश असेल त्याला अपवाद)

**२. चालू/चालू नसलेल्या मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण**

कंपनी अधिनियम २०१३ ची सूची क्र. ३ यात दिलेले निकष आणि कंपनीचे सामान्यत: कार्यचक्र यानुसार कंपनीच्या मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण चालू आणि चालू नसणाऱ्या या प्रकारांमध्ये केले आहे. स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांचे त्यांच्या निव्वळ तत्वावर चालू नसणाऱ्या असे वर्गीकरण केले आहे.

वरील हेतूसाठी कंपनीने तिचे कार्यचक्र बारा महिन्यासाठी निश्चित केले आहे, तसेच ते उत्पादनाचे स्वरूप आणि उत्पादनासाठी लागणारे निवेश साहित्य यांचे संपादन करून व त्यांचे रोख आणि रोख समतूल्य यात रूपांतरण करण्यासाठी लागणारा वेळ यावर आधारलेले असते.

ही कंपनी विद्युत अधिनियम २००३ द्वारे शासित आहे. विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींचे त्यातील नियमावली सोबत सहवाचन केले जाते आणि जेव्हा त्या अधिनियम २०१३ च्या तरतुदींशी होत नसतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १७४ च्या अटींनुसार विद्युत अधिनियम २००३ आणि त्याची सुसंगत नियमावली अभिभावी होतील.

**३. ऐतिहासिक खर्च संकेतावर टिपा**

ऐतिहासिक किंमत सामान्यत: वस्तू आणि सेवांच्या बदल्यात दिलेल्या मोबदलाच्या रास्त मुल्यांवर आधारित असते.

**४. सुज्ञ निर्णय आणि अंदाज याचा उपयोग करणे**

कंपनीची वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी व्यवस्थापनाला काही सुज्ञ निर्णय, अंदाज करावी लागतात तसेच गृहिते धरावी लागतात. त्याचा परिणाम अहवालात दिलेल्या महसुल, खर्च यांच्या रकमा तसेच मत्ता व दायित्वे आणि सोबतची प्रकटने व आकस्मिक दायित्वे यांच्यावर होतो. या अंदाज व गृहितकातील अनिश्चिततेचा परिणाम भविष्यकाळात मत्ता व दायित्व यांच्या लेखात नोंदविलेल्या रकमांमध्ये प्रभावी समाजोयन असा होऊ शकतो. कंपनी अंदाज व गृहितके यांच्या कंपनी सर्वोतोपरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे सतत मूल्यमापन करते.

विशेषत: लेखा धोरणे लागू करताना महत्वाच्या क्षेत्रातील अंदाज व न्याय निर्णय यांच्या माहितीचे वित्तीय विवरण पत्रातील मान्य रकमांवर होणारे परिणाम खाली देले आहेत.:

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आणि उर्वरित आयुष्य याविषयीचे अंदाज करणे.
- वित्तीय नसलेले मत्तांची मुल्यघट करणे.
- वित्तीय विलेखांच्या रास्त मुल्यांची मोजणी.
- व्याख्यांकित लाभ बंधनाचे व महत्वाच्या विमागणित गृहितांचे मापन
- तरतूदी आणि आकस्मिक परिस्थिती
- स्थगित कर मत्ता यांच्या वसुली योग्यतेचे मूल्यमापन

लेखांचे अंदाजामध्ये सुधारणा केल्यास वित्तीय विवरण कालावधीकरिता भविष्यातील परिणाम घेऊन त्यांना प्रक्षेपाने मान्यता दिली जाते, जर भविष्यातील काळात बाधा येणार असेल तर, संबंधित लेखा मानकानुसार त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने समजणे आवश्यक असेल, तशी मान्यता देण्यात येते.

**क) महत्वाची लेखा धोरणे:**

भारतीय लेखामानकानुसार स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रके (ज्याला स्वायत्त वित्तिय विवरणपत्रे ही म्हणतात) तयार करण्यासाठी आणि सादरीकरणासाठी खालील महत्वाची लेखा धोरणे अंगिकारण्यात आलेली आहेत. या लेखा धोरणाचे सातत्याने कंपनीद्वारे अनुसरण केले गेले आहे.

**१. मत्ता, कारखाने आणि साधने**

१) मालकीची जमीन खरेदी किंमती प्रमाणे नमूद केली जाते. मत्ता, कारखाने आणि साधने यांचे मूल्य संचित घसारा व मूल्य घट विचारात घेऊन नमूद केले जाते.

२) कोणत्याही मत्तांच्या प्रारंभिक खर्चात पुढील बाबी समाविष्ट असतात, खरेदीची किंमत किंवा मत्ता उभारणीचे खर्च (यांमध्ये आयात शुल्क, माल वाहतूक भाडे, परतावा न मिळणारे कर यांचा अंतर्भाव असतो) याशिवाय सदर मत्ता तिच्या जागेवर आणण्यासाठी प्रत्यक्ष केलेले खर्च, ती इच्छित कामासाठी संचलीत करण्यासाठी केलेले खर्च आणि पात्र मत्तेसाठी कर्ज खर्च (पात्र मत्ता म्हणजेच अशी मत्ता जी त्यांचा इच्छित वापरासाठी आवश्यक असणारा बराच वेळ घेते).

मत्तेचे खरेदी मूल्य म्हणजे एकत्रित दिलेली रक्कम आणि सदर मत्ता संपादनासाठी विचारात घेतलेल्या इतर बाबींचे रास्त मूल्य होय. यंत्राच्या खर्चात यंत्र प्रायोगिक तत्वावर चालविण्याचे खर्च प्रायोगिक तत्वावर चालविण्याच्या कालावधी दरम्यान उत्पादित कोणत्याही बाबींच्या विक्रीतून मिळणारी रक्कम वजा केल्यावर आणि प्रवर्तनाचे इतर खर्च, म्हणजे वाहतूक खर्च, स्थापन करण्याचे आकार, इत्यादी बांधकाम उभारणी कालावधीतील इतर उत्पन्नाची निव्वळ रक्कम इत्यादी यांचा समावेश केला जातो. ज्या प्रकल्पांचे काम चालू आहे त्याचा प्रचलित खर्च धरला जातो. त्यात थेट खर्च संबंधित प्रवर्तन पूर्व प्रासंगिक खर्च आणि देय व्याज यांचा समावेश असतो.

जर एखाद्या बाबीपासून कंपनीला भविष्यात आर्थिक लाभ मिळणे संभवनीय असेल आणि अशा मत्तांचा खर्च जर विश्वसनीयरीत्या मोजता येत असेल तरच असे नंतरचे खर्च त्या मतांच्या प्रचलीत रकमेत समाविष्ट केले जातात किंवा त्यांना स्वतंत्र मत्ता म्हणून मान्यता देण्यात येते.

३) जर कंपनीने केलेल्या भांडवली खर्चातून जिच्यावर कंपनीची मालकी किंवा नियंत्रण नाही अशी मत्ता निर्माण केली जात असेल तर असे खर्च मत्तांचे बांधकाम चालू असे पर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये दाखविले जातात आणि त्यांच्या समतूल्य रक्कम निकामी मत्तांची तरतूद खर्च म्हणून वजा केली जाते आणि ती ज्यावर्षी खर्च केली त्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकात आकारली जाते. बांधकाम पूर्ण झाल्यावर वरील भांडवली खर्चाचे भांडवलीकरण केले जाईल आणि त्याचे समायोजन कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्ता यांच्या तरतुदीत केले जाईल. कंपनीची मालकी नसलेली मत्ता आणि कंपनीच्या सामाजिक जबाबदाऱ्यांच्या कार्यासाठी दिलेले अंशदान जेव्हा खर्च होईल तेव्हा त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

४) पूरक मालमत्ता: कंपनीला तिच्या अन्य काही मत्तांद्वारे भविष्यात आर्थिक लाभ मिळविण्यासाठी मालमत्ता, कारखाने व साधने यातील काही उपयुक्त बाबी संपादन कराव्या लागतात. (या बाबी स्वत: भविष्यात आर्थिक लाभ मिळवून देतीलच असे नसते) अशा बाबींना मत्ता म्हणून, मालमत्ता, कारखाने व साधने यात मान्यता द्यावी लागते. कारण त्यामुळे कंपनीला अन्य संबंधीत मत्तांद्वारे आर्थिक लाभ मिळविता येतात. या बाबी संपादन केल्या नसल्या तर असे जादा आर्थिक लाभ मिळू शकले नसते. मात्र कंपनी या मत्तांचे त्यांच्या प्रकरण निहाय स्वरूपाची पडताळणी केल्यानंतर, त्यांचे भांडवलीकरण करते.

५) प्रगतीपथावरील भांडवली कामांमध्ये कंत्राटदाराचे देयकाचे अंतिमीकरण करणे जिथे राहिले आहे, त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर केले जाते. मात्र ते अंतिम चुकते होण्याच्या वर्षात समायोजन करण्याचे अधीन असते.

६) भांडवली कंत्राटाच्या किमतीच्या विचलनाच्या दाव्यांच्या प्रकरणी, कंपनीने दावे स्वीकरले तरच त्यांचे लेखे केले जातात.

७) जेव्हा मत्ता, कारखाने व साधने आणि एखादा महत्वाचा भाग ज्याला सुरूवातीपासून मत्ता, कारखाने व साधने म्हणुन मान्यता दिलेली आहे, याची विल्हेवाट केल्यास त्याची मान्यता काढून घेतली जाते किंवा जर अशा मत्ताच्या वापरातून भविष्यात कोणतेही आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा नसते तेव्हा त्यांची मान्यता काढून घेतली जाते. ही मान्यता काढल्यानंतर होणारी प्राप्ती किंवा हानी यांचा समावेश नफा-तोटा पत्रकात समाविष्ट केला जातो.

८) नव्याने कार्यान्वित केलेल्या प्रकल्पांच्या भांडवली खर्चाकरिता कंपनी निम्नलिखित धोरणाचे पालन करते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांची बहुवर्षीय वीज दर नियमने २०१९ यांच्याशी हे धोरण सुसंगत आहेत.

कंपनी अधिकचे अनिवार्य स्पेअर्स / महत्वाचे स्पेअर्स / सुरूवातीचे स्पेअर्स जे मूळ प्रकल्प स्थापने बरोबर घेतले जातात किंवा स्थापने नंतर ३ वर्षात घेतले जातात किंवा ज्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांची परवानगी असते याचे भांडवलीकरण प्रकल्पाच्या ४% इतकी केली जाते.

९) मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या आवश्यक सुट्ट्या भागाचे मूल्य त्यांच्या विहीत मर्यादेपेक्षा जास्त असेल तर त्यांचे भांडवलीकरण मालमत्ता, कारखाने आणि साधने यामध्ये केले जाते. अन्य प्रकरणी सुटे भाग संपादन केल्याबरोबर त्या वस्तूमाला सूचीमध्ये समाविष्ट केल्या जातात आणि त्या वापरल्यानंतर त्यांची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

१०) यंत्रांचे जे सुटे भाग ज्या वर्षी निकामी होतात, त्यावर्षी त्यांचे कमी केलेले लिखित मूल्य नफा-तोटा पत्रकात आकारले जाते. मात्र या जुन्या भागाच्या ऐवजी नवे भाग कार्यान्वित झाले पाहिजेत आणि जुने भाग निरूपयोगी झाले पाहिजेत. जर जुने भाग दुरूस्त करून पुर्नवापरासाठी योग्य झाले तर त्या दोन्ही भागांचे उर्वरित उपयुक्त आयुष्याच्या काळासाठी घसारा करण्यात येतो. जून्या संबंधित भागांच्या दुरूस्तीच्या खर्चाची आकारणी नफा-तोटा पत्रकात होते.

११) जेव्हा मत्ता किंवा भांडवली सुटे भाग बदल्यास मत्ता/भांडवली सुटे भागाच्या मुळ भागाचे कमी झालेली मूल्य माहिती नसेल तर खर्च / मत्तांच्या नव्या भागांची/भांडवली सुट्ट्या भागांची निव्वळ पुस्तकी मूल्य निर्लेखित केली जाते आणि त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात होते.

१२) मालमत्ता, कारखाने व साधने नष्ट करणे एखाद्या साईटला त्यांच्या उपयुक्त आयुष्याच्या शेवटी पूर्वीच्या स्थितीत पुर्नसंचयित करण्याचे बंधन (कायदेशीर किंवा रचनात्मक) अस्तित्वात आहे, त्याचे अंदाजे खर्चाचे वर्तमान मूल्य, (साइट काढून टाकणे किंवा पुर्नसंचयित करणे) हे संपादनाच्या खर्चासह भांडवल केले जाते किंवा बांधकाम पूर्ण झाल्यावर आणि कार्यान्वित नसलेले तरतुदीच्या रूपात संबंधित दायित्व ओळखले जाते. मालमत्ता, कारखाने व साधने या बाबींचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत नफा तोटा पत्रकातील खर्चातून ही निकामी तरतूद रद्द करण्यात येते.

१३) कंपनीने पूर्वीच्या सर्वसामान्य मान्य केलेली लेखा तत्वानुसार मालमत्ता, कारखाने यांचे चालू मुल्य हेच भारतीय लेखा मानकाच्या संक्रमण तारखेस अभिदत्त मूल्य म्हणून मानन्याचे ठरविले आहे.

१४) कंपनीच्या आकारमान व्यवसायाचे स्वरूप व भौगोलिक विस्तार विचारात घेता, कंपनीकडून मालमत्ता, यंत्रसामग्री व उपकरणे यांची प्रत्यक्ष पडताळणी दर तीन वर्षांच्या कालावधीत एकदा करण्यात येते. अशा प्रकारची मागील पडताळणी वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये करण्यात आलेली आहे. चालू वर्ष हे विश्रांती वर्ष असल्याने, मालमत्ता, यंत्रसामग्री व उपकरणे यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आलेली नाही.

**२. अमूर्त मत्ता**

अमूर्त मत्ता या संचित घसारा आणि मूल्यघट हे विचारात घेऊन नोंदल्या जातात. अमूर्त मत्ता (सॉफ्टवेअर व्यतिरिक्त) यांची त्यांचे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने घसाराची तरतूद केली जाते आणि जेव्हा अमूर्त मत्तांचे मूल्यघट झाल्याची चिन्हे असतील तेव्हा त्यांचे मूल्यघट करण्यासाठी मूल्यांकन केले जाते. सॉफ्टवेअरच्या घसाराची तरतूद ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी विहीत केलेल्या दराप्रमाणे केली जाते. अमूर्त मत्तांचे घसारा व मूल्यघट यांची नोंद नफा व तोटा पत्रकात करण्यात येते.

कंपनीने अस्तित्वातील अमूर्त मत्तांचे पूर्वीच्या सर्वसामान्य मान्य केलेल्या लेखा तत्वानूसार विद्यमान मुल्य यालाच भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेचे अभिदत्ते मूल्य मानण्याचे ठरविले आहे.

**३. प्रगतीपथावरील भांडवली कामे**

मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या बाबतीत, नवीन प्रकल्प/क्षमता विस्तार यांच्या प्रकरणी असे प्रकल्प/विस्तार कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत संबंधित खर्च आणि कर्जावरील व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते.

तसेच संबंधित प्रकल्पांची तांत्रिक आणि वाणिज्य वर्धनक्षमता या विषयीचे अभ्यास पूर्ण करून नंतर त्यांची अंमलबजावणीचा प्रारंभ करण्यासाठी करण्यात येत असलेल्या खर्चाचे कंपनीच्या संचालक मंडळाच्या मंजूरीनंतर भांडवलीकरण करणे सुरू केले जाते. अशा प्रकल्पांच्या शक्यते विषयी अभ्यास करण्याचे खर्च जेव्हा आणि जसे केले जातात, त्याप्रमाणे त्यांची नफा-तोटा पत्रकात करण्यात येते.

अ) वेतनावरील खर्च (उपादान आणि रजा रोखीकरण वगळता) थेट प्रकल्पांशी संबंधित असेल तर बॉयलर टबाईल जनरेटर संबंधित कामे आणि कारखाना संबंधित इतर कामे आणि संबंधित योजनेचा खर्च पूर्ण होईपर्यंत केलेला खर्च प्रकल्प खर्चाचा भाग असेल.

ब) प्रकल्प संबंधित शिल्लक कामे पूर्ण होण्याच्या दृष्टिने, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ही एक वर्षापर्यंतचे प्रशासकीय व सामान्य खर्च जे प्रकल्प निर्मितीसाठी थेट कारणीभूत असतील त्यांचे भांडवलीकरण केले जाते. त्यानंतर त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाईल.

क) पर्यवेक्षी कार्यालयांचे कोणतेही खर्च लघू भांडवल योजनेमध्ये वाटप होणार नाही. लघू भांडवल योजना म्हणजे ज्या योजनांच्या बांधकामाच्या रचनेला, बारा महिन्यांपेक्षा कमी काळ लागतो अशा योजना आहेत.

ड) जर कंपनी एकापेक्षा जास्त प्रकल्प/भांडवली योजनांची (लघू योजना वगळून) अंमलबजावणी करीत असेल तर पर्यवेक्षी कार्यालय येथील सामाईक खर्चाचे वाटप वर्षभरातील प्रगती पथावरील कामातील वाढीच्या आधारे केले जाईल.

**४. परिसमापनातील नुकसान ज्यावर्षी निश्चित होईल त्यावर्षी मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या खर्चात समायोजित केले जातात.**

**५. कर्ज खर्च**

कर्ज खर्चांमध्ये, कर्जाचे घेण्यासंबंधीचे इतर खर्च आणि व्याज यांचा समावेश असतो. ज्या मत्ता यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यास बराच वेळ घेतात, त्यांच्या संपादनासाठी केलेल्या कर्ज खर्चाचे भांडवलीकरण ज्या महिन्यात मालमत्ता इच्छित वापरासाठी तयार होतात त्या महिन्यापर्यंत मालमत्तेचा किमतीचा भाग म्हणून केले जाते.

जोपर्यंत दीर्घमुदतीचा निधी मिळत नाही तोपर्यंत पात्र मालमत्तासाठी घेतलेल्या सर्वसामान्य कर्जावरच्या व्याजाचे सुद्धा भांडवलीकरण केले जाते. याशिवाय पात्र मालमत्ता संबंधित बांधिलकी आकारणीचे कर्जाच्या परतफेडीच्या वेळेप्रमाणे नफा तोटा पत्रकात नोंद केली जाते.

भांडवली मत्ता संपादन किंवा उभारणी यांच्या संबंधित नसलेले इतर कर्जासंबंधीचे खर्च हे ज्या कालावधीमध्ये केले जातात तेव्हा त्यांची नोंद नफा-तोटा पत्रकात खर्च म्हणून केली जाते.

**६. वित्तीय नसलेल्या मत्तांची मुल्यघट**

वस्तूसूची, स्थगित कर मत्ता आणि विक्रीस योग्य असे वर्गीकरण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता वगळून इतर वित्तीय नसलेल्या मत्तांचे ताळेबंदाच्या तारखेस मूल्यघट झाल्याबाबतचा आढावा घेतला जातो.

जर अशी चिन्हे दिसली तर किंवा जर मूल्यघट शोधण्यासाठी वार्षिक परिक्षणांची गरज असेल तर कंपनी तर्फे या मत्ताच्या वसूल होऊ शकणाऱ्या रकमांचा अंदाज केला जातो. अशी वसूली योग्य किंमत अशा मत्ता पासूनचा रोख निर्मितीचे रास्तमूल्य यापेक्षा वजा विल्हेवाटीचा खर्च आणि वापराचा खर्च यापेक्षा जास्त असावी. एखादी मत्ता इतर मत्तांपासून किंवा मत्तांच्या गटापासून वेगळी असून रोखीचा प्रवाह आत आणत नसेल तर त्या मत्तेची वसूली योग्य किंमत निश्चित केली जाते.

जेव्हा एखाद्या मत्तेची किंवा रोकड निर्माण कर्त्या घटकाची काळाप्रमाणे कमी झालेली रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त होत असेल तर त्या मत्तांचे मुल्यघट झाले असे समजून, तिचे रास्तमुल्य हे मुल्यघट विचारात घेऊन नोंदले जाते. वापरमुल्यांचे निर्धारण करताना, भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह हा त्याच्या विद्यमान मुल्य इतका कमी केला जातो, त्यासाठी कर-पूर्व सवलत दर वापरला जातो. कारण करपूर्व दरात, पैशाचे वेळेनूसार मुल्यांचे चालू बाजाराप्रमाणे निर्धारण व मत्तेचे विशिष्ट धोके अंतर्भूत असतात. विल्हेवाटीचा खर्च वजा करून रास्त मूल्य निश्चित करण्यासाठी सध्याच्या बाजारभावातील व्यवहार विचारात घेतले जातात. असे निश्चित व्यवहार ओळखून काढता येत नसेल तर योग्य मूल्यांकनाचे प्रारूप वापरले जाते.

**७. घसारा तरतूद**

अ) भाडेपट्टीच्या जमिनीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, नियमनाने विहित केलेल्या सरळ रेखा तत्व पद्धतीनुसार ३.३४ टक्के दराने घसाऱ्याची तरतूद केली जाते.

ब) मत्ता, कारखाने आणि साधने

१. कंपनी ही दर नियम असणारी संस्था असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहीत केल्याप्रमाणे घसाऱ्याचे दर कार्यपद्धती

आणि मत्तांचे आयुष्य मापन अनुसरण्यात येतात. त्याचप्रमाणे कंपनी सरळ रेषा पद्धतीनुसार मत्तांच्या खर्चाच्या ९०टक्के पर्यंत घसारा आकारते.

२. वर्षभरात मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्यातील वाढ/विल्हेवाट/काढून टाकणे यासाठीचा घसारा वरील कृतींच्या महिन्यात यथा प्रमाण तत्वाने केला जातो. ग्रीन फिल्ड/ब्राऊन फिल्ड यांचे वाणिज्यिक कार्य सुरू होण्याच्या तारखेपासून त्यांचे भांडवलीकरण नफा तोटा पत्रकात आकारले जाते.

३. ज्या मत्तांचा (खालील परिच्छेद ४ यात नमूद केलेल्या मत्ता वगळून) कार्यान्वयानंतर घसारा ७० टक्क्यांपर्यंत आकारलेला नाही, त्यांच्या ठोक किमतीवर घसाऱ्याची आकारणी ७० टक्के होण्याच्या वषापर्यंत येथे खाली दिलेल्या घसारा दराने आकारते. घसारा आकारणी ७० टक्के पर्यंत पोहचल्यानंतर मत्तांचे उर्वरीत आयुष्यावर ९० टक्के पर्यंत घसारा शिल्लक ठेऊन आकारणी ही केली जाते. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार औष्णिक वायु व सौर आधारीत वीज निर्मिती केंद्रासाठी २५ वर्षे आणि जल विद्युत केंद्रासाठी ३५ वर्षे असे उपयुक्त आयुष्य विहित केले आहे.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| जल विद्युत, वाफ वीज, वायु आधारीत वीज निर्मिती केंद्रातील कारखाने व यंत्रे, कुलींग टॉवर्स, जलविद्युत बांधकामे, ट्रान्सफॉर्मर्स व इतर स्थापित साधने, पारेषणाच्या तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८% |
| इमारती आणि इतर स्थापत्य कामे | ३.३४% |

४. खालील मत्तांच्या साठी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या मूल्यांचा ९० टक्के पर्यंत घसारा खालील दराने आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी | मत्तांचे आयुष्यमान |
|---|---|---|
| फर्नीचर जोडणी व कार्यालयाचे साहित्य | ६.३३% | १४ वर्षे |
| वाहने, पोर्टेबल एअर कंडिशनिंग प्लांट | ९.५०% | ९.५ वर्षे |
| माहिती तंत्रज्ञान साधने | १५.००% | ६ वर्षे |

५. मालमत्ता, कारखाने व साधने यातील ज्या वस्तू नगांचा खर्च, कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नाही. त्यांच्या घसारा संपादन वर्षात १०० टक्के केला जातो. मोबाईल फोन, टॅबलेट खर्चाचे भांडवलीकरण आणि त्यांचा १०० टक्के घसारा, खरेदी वर्षात केला जातो. यासाठी कंपनीची विहित मर्यादा विचारात घेतली जात नाही.

६. माहिती तंत्रज्ञान निगडीत मालमत्ता व उपकरणे तसेच संगणक सॉफ्टवेअर यांची उरलेली रक्कम १००% म्हणून घसारा म्हणून ज्यावर्षी त्या उपकरण व मत्तांचे आयुष्यमान संपेल त्या वर्षात करण्यात येईल. हे महाराष्ट्र वीज नियामक आयोगा द्वारे सांगितले गेले आहे

**क) अमुर्त मत्ता**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी केल्याचा भांडवली खर्च, बाह्य तृतीय पक्ष सल्लागाराकडून तयार केलेल्या सॉफ्टवेअरची अंमलबजावणी, सॉफ्टवेअरच्या परवान्याचे खरेदी, या सर्व मत्तांवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केल्याप्रमाणे खालील दराने घसारा आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी | मत्तांचे आयुष्यमान |
|---|---|---|
| सॉफ्टवेअर | ३०% | जास्तीत जास्त ४ वर्षे |
| इतर अमुर्त मत्ता | आधारीत | उपयुक्त आयुषमान |

**८. चालू नसलेल्या मत्तांची विक्री करणे**

सामान्यत: मालमत्तेचा उपयुक्त कालावधी संपल्यानंतर ती मालमत्ता भंगार म्हणून ओळखण्यात येते व भंगार साहित्य म्हणून लिलाव करून विकली जाते. तिच्या मालमत्ता या मूळ स्वरूपात विक्री केली जात नाही. परिणामी, दीर्घकालीन मालमत्ता जर त्या अद्याप वापरातून काढून टाकायच्या असतील व त्यांच्या विद्यमान स्थितीत त्वरित विक्रिसाठी उपलब्ध नसतील तर त्या विक्रीसाठी उपलब्ध म्हणून वर्गीकृत केल्या जात नाहीत.

चालू नसलेल्या ज्या मत्ता वापरात ठेवण्यापेक्षा विकल्यास त्यांच्या प्रचलीत रकमा वसूल होऊ शकते त्यांचे वर्गीकरण विक्री योग्य चालू मत्ता असे केले जाते. जर विक्रीची चांगली शक्यता असेल आणि मत्ता विद्यमान स्थितीत तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर वरील अट पूर्ण झाली असे मानले जाते. अशा विक्री योग्य चालू नसणाऱ्या मत्तांची मोजणी त्यांचा लेख्यांमधील किंमत आणि रास्त मूल्यातून विक्रीचा खर्च वजा केल्यानंतरची किंमत यापैकी किमान किंमतीस केली जाते. ज्यावेळी विक्रीसाठी योग्य मालमत्ता घसारायोग्य

मूल्यापर्यंत पोहचलेली नसते (ठोक मालमत्तेच्या ९०%) त्यावेळी कंपनी कमाल घसारायोग्य मुल्य आणि निव्वळ मालमत्तेच्या फरकाइतकी तरतूद करते.

ज्या मालमत्ता कारखाने व साधने आणि अमूर्त मत्ता विक्रीसाठी काढल्या जातात, त्यांच्या घसाऱ्याची तरतूद केली जात नाही.

## ९. वस्तूसूची

वीज निर्मितीसाठीचे साहित्य व इतर बाबी यांचे लेखन किमतीपेक्षा कमी दराने केले जात नाही. कारण विजेची विक्री निर्मिती खर्चा इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त दराने केली जाते. खर्चामध्ये खरेदी खर्च (मिळण्यायोग्य इनपूट टॅक्स क्रेडीटची निव्वळ) आणि त्या वस्तू त्यांच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा इतर खर्च समाविष्ट असतात. कोळसा साठ्याच्या संदर्भात कंपनी कोळसा साठाच्या पावत्या ओळखण्याच्या दृष्टीने कंपनी कोळशाची खरेदी किंमत व रेल्वे मालवाहतूकीचा खर्च विचारात घेते. धुतलेल्या कोळसा साठा संदर्भात कंपनी कोळशाची खरेदी किंमत तसेच तो कोळसा त्याच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा लाभ शुल्क व खर्च समाविष्ट करते. या व्यतिरिक्त इतर कोणताही आनुषंगिक किंवा कोळसा संबंधित खर्च नफा-तोटा पत्रकात जेव्हा होईल तेव्हा आकारला जातो.

कंपनीने वर्षभरात निर्माण झालेल्या पुनप्राप्त कोळशाच्या साठ्याचे मूल्यांकन वर्षअखेर मूळ कोळशाच्या चल सरासरी किमतीवर केले आहे. प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या पुर्नप्राप्त कोळशाच्या प्रमाणाचे मूल्यांकन फर्स्ट इन फर्स्ट आऊट (FIFO) पद्धतीने करण्यात येते व ते वापर करण्यावर आकारले जाते.

भांडारातील सामान, सुटे भाग यासाह मालसाठ्यांचे मूल्यांकन त्यांच्या खर्च आणि त्यांचे वसुली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते आणि खर्च हा वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो. भांडारातील सेवेस निरूपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्याबाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते. या हेतूसाठी, कंपनी मंद हलणाऱ्या वस्तूमालासाठी ३०%, २ वर्षापर्यंत अचल वस्तूमालासाठी ६०% आणि २ वर्षापेक्षा जास्त अचल वस्तूमालासाठी ८०% या दाराने तरतूद केली जाते. निकामी वस्तूमालासाठी पूर्णपणे तरतूद केली जाते.

## १०. महसूल मान्यता

१) विजेच्या विक्रीतून मिळणाऱ्या महसुलाचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वर्षाच्या सुरूवातीस पूर्वनिर्धारित केलेल्या वीज दर पत्रकाच्या आधारे केला जातो. त्यात इंधन समायोजन आकार समाविष्ट असतो, तसेच लेख्यांच्या आधारे कालावधीच्या अखेरीस उपार्जित झालेला विनादेयाचा महसूल सुद्धा समाविष्ट केला जातो. मात्र तो त्यापुढील वर्षात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या समायोजनाच्या प्रक्रियेच्या अधीन असतो.

२) महावितरण सोबत केलेल्या वीज खरेदी कराराच्या अटींनुसार क्रेडिट कालावधीच्या पलीकडे ऊर्जा बिले मिळण्यास विलंब झाल्यास कंपनी विलंब भरणा अधिभाराला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मार्जिन कॉस्ट ऑफ फंड बेस्ट लेडिंग रेट (एमसीएलआर) अधिक ३५० बेसिक पॉइंटस प्रति महिना दराने उपार्जित त्यानुसार मान्यता देते.

३) व्याजाचे उत्पन्न हे मुद्दल/थकबाकी आणि लागू होणारा व्याज दर यानुसार मान्य केले जाते.

४) फ्लाय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहका सोबत मान्य केलेला दराने केला जातो. त्याची रक्कम फ्लाय ॲश वापर निधी या वेगळया लेखा शीर्षात ठेवला जातो आणि पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. ०३.११.२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार त्याचा वापर केला जातो. या निधीचा वापर राख वापराच्या प्रोत्साहनासाठी करावयाच्या खर्चासाठी केला जातो.

५) अन्य उत्पन्नाला उपार्जन तत्वावर मान्यता दिली जाते. भंगार व नाकारलेला कोळसा इत्यादीची विक्री जेव्हा खरेदीदार कंपनीच्या जागेतून मालाची उचल करतो व कंपनी त्याची बीजके तयार करते, तेव्हाच त्याचा लेखा होतो. परिसमापनातील नुकसान जेव्हा ते प्रत्यक्ष ओळखले जातात त्यावर्षी आणि त्याची आकारणी झाल्यावर त्यांच्या वसुलीचे समायोजन प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट केले जाते. त्यातून प्रकल्पाचे जादा खर्च काही प्रमाणात कमी होतात. प्रकल्पाच्या कंत्राटदारांना दिलेल्या अग्रिमांच्या समायोजन जेव्हा उपार्जन होईल त्याप्रमाणे प्रकल्प खर्चात केले जाते. इतर सर्व प्रकरणी, वसूल केलेले परिसमापनातील नुकसान इतर उत्पन्नात जमा केले जाते.

जेव्हा कंपनी अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर कार्यरत किंवा कराराच्या आवश्यकतेनुसार खेळत्या भांडवलाच्या कर्जातून व्याज देणाऱ्या साधनांमध्ये निधी उपायोजित करते तेव्हा व्याज देय/व्याज प्राप्ती जसे असेल तसे निव्वळ वजा करून त्यानुसार केले जाते.

६) विक्री झाली नाही अशा ऊर्जा बचतींच्या प्रमाणपत्रांच्या मूल्याला कंपनी वित्तीय वर्षाच्या अखेरीस मान्यता देते व ते उपार्जन तत्त्वानुसार महसूलात जमा करते. ही प्रमाणपत्रे त्याचे उपार्जन मूल्य आणि प्रत्यक्ष विक्री मूल्य याचे समायोजन करून ते प्रत्यक्ष

विक्रीच्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकात दाखविले जाते.

७) उत्पन्न/प्राप्ती हे कंपनीच्या अहवालात तेव्हाच दाखवली जाते जेव्हा ही शक्यता असते की कंपनी ज्या मोबदल्यास पात्र आहे ते जमा करेल. हे पैसे देणाऱ्या संस्थेच्या हेतु आणि क्षमतेच्या मुल्यांकनावर अवलंबून असेल.

**११. खर्च आणि उत्पन्न यांचे लेखे करणे/वर्गीकरण करणे**

जर मागील काही वर्षातील एकत्रीत उत्पन्न/खर्च प्रारंभीच्या विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर ते पूर्वलक्षी प्रभावाने दुरूस्त केले जाईल.

विम्याचे दावे स्विकारल्यानंतरच त्यांचे लेखे केले जातील.

किंमतीतील फरकाचे दावे खर्चाच्या संदर्भात स्वीकृतीच्या आधारावर केले जातात.

इतर सर्व दावे/हक्क यांचे लेखे प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार केले जातात.

**१२. उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकी**

उपकंपन्या आणि संयुक्त उपक्रम कंपन्या तसेच सहयोगी कंपन्या यांच्या समभागातील गुंतवणूकीची नोंदणी, खर्च वजा संचित मूल्यघट (जर काही असेल तर) याप्रमाणे केली जाते आणि प्रत्येक अहवाल तारखेला गुंतवणूकीच्या कमतरतेसाठी परिक्षण केले जाते.

कंपनीने जेव्हा पूर्वीच्या सर्वसामान्यपणे मान्य केलेल्या लेखा पद्धतीतून भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण केले त्यावेळी उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकीला त्यांच्या प्रचलीत विद्यमान मूल्यानुसार मान्यता देण्याचे ठरविले होते.

**१३. परकीय चलनातील व्यवहार**

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्यांच्या व्यवहाराच्या तारखेला प्रचलीत असलेल्या संबंधित विनिमय दराने नोंदवले जातात.

परकीय चलनानुसार असलेली पैशातील मत्ता व पैशामधील दायित्वे यांचे रूपांतरण अहवाल तारखेला असलेल्या विनिमयाच्या स्पॉटरेट नुसार केले जाते.

हिशेबानंतर किंवा पूनर्लेखनानंतर विनिमयात उद्भवलेले फरकांना नफा व तोटा पत्रकात 'विनिमय दर' विचलन किंवा 'वित्त खर्च' (कर्जाच्या खर्चाचे समायोजन म्हणून विचारात घेतलेल्या मर्यादेपर्यंत) म्हणून मान्यता दिली जाते.

**१४. कर्मचारी लाभ**

**अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ**

कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी सेवा दिल्या, त्यावर्षीच्या नफा-तोटा पत्रकात अल्पकालीन कर्मचारी लाभ यांना खर्चाच्या विना सवलत रकमेवर मान्यता देण्यात येते.

**सानुग्रह अनुदान**

कर्मचाऱ्यांकरिता सानुग्रह जसे आणि जेव्हा जाहीर होईल तेव्हा कंपनी याचा व्यय लेखा वह्यांमध्ये उपार्जित करते.

**दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ**

**व्याख्यांकित लाभ योजना**

अ) कंपनी भविष्य निर्वाह निधी मध्ये निश्चित योगदान पूर्वनिर्धारित दराने देते. हे योगदान आणि कर्मचाऱ्याचे योगदान वेगळया ट्रस्टमध्ये जमा होते. ही ट्रस्ट इतर एमएसईबी ग्रुप कंपन्यांच्या निधीचे व्यवस्थापन देखील करते. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतीमध्ये केली जाते. या निधीत केलेले प्रत्येक कालावधीतील अंशदान यास 'व्यय' म्हणून मान्यता दिली जाते आणि त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

ब) उपदान या सारख्या व्याख्यांकित कर्मचारी लाभाचे दायित्व विमागणित शास्त्राच्या मूल्यांकनानुसार ठरविले जाते. हे मूल्यांकन स्वतंत्र विमागणित तज्ज्ञांकडून वर्षाच्या अखेरीला प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड वापरून करून घेण्यात येते.

पुनर्मापन केलेल्या निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्वांना इतर सर्वकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते. या दायित्वामध्ये विमागणिती प्राप्ती व हानी, नियोजन मत्तांचा परतावा (व्याज वगळून) आणि मत्ता मर्यादा (जर काही असेल तर व्याजाशिवाय) यांच्या समावेश होतो.

**क) इतर दिर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ**

इतर दीर्घ मुदतीचे लाभ म्हणजे रजेचे रोखीकरण याचे दायित्व प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड ही पद्धत वापरून स्वतंत्र विमागणित तज्ज्ञांकडून विमागणिती मूल्यांकनानुसार ठरविले जातात.

## १५. भाडेपट्टी

दि. ०१ एप्रिल २०१९ रोजीचे किंवा त्यानंतर जे करार करण्यात आले ते करार भाडेपट्टीचे असल्याबद्दल किंवा त्यात भाडेपट्टी समाविष्ट आहे किंवा कसे याचे कंपनी निर्धारण करते जर कराराच्या मुदतीत संबंधित ओळख निश्चिती केलेल्या मत्तांच्या वापराचे नियंत्रणाचा हक्क मोबदल्याच्या बदल्यात दिले गेले असतील तर तो करार भाडेपट्टीचा आहे याबद्दल निश्चिती करण्यासाठी, कंपनी खालील बाबींचे अंदाज करते.

- संबंधित करारात ओळख निश्चिती केलेल्या मत्तांचा वापर करण्यासंबंधी असल्यास त्यात असा वापर करण्याचे स्पष्ट केलेले असावे किंवा तशी सूचना असावी. त्यात तसा प्रत्यक्ष वापरास नेमकेपणाने मान्यता दिलेली असली पाहिजे किंवा त्यात एका प्रत्यक्ष अस्तित्वातील मत्तेच्या सर्व बाजूने सुस्पष्ट वेगळेपण दर्शविलेले पाहिजे. जर संबंधित मत्ता देणाऱ्याला मोठ्या प्रमाणात पर्यायी वापराचा हक्क त्यात असेल तर अशा मत्तांची तशी ओळख निश्चिती केली जात नाही.
- कंपनीला भाडेपट्टीच्या संपूर्ण कालावधीमध्ये अशा भाडेपट्टीच्या मत्ताच्या वापरातून मिळणारे सर्व आर्थिक लाभ प्राप्त करण्याचा हक्क असलाच पाहिजे.
- अशा मत्तांचा वापर करण्याविषयीचे आदेश देण्याचे हक्क कंपनीकडे असले पाहिजेत.

दि. ०१ एप्रिल २०१९ आधी केलेल्या कराराबद्दल कंपनीने असा निर्णय घेतला की, भाडेपट्टी आधारीत व्यवस्थेमध्ये खालील बाबींचे निर्धारण होते किंवा नाही हे निश्चित केले पाहिजे.

- व्यवस्थेची पूर्तता विशिष्ट मालमत्ता किंवा मालमत्तेच्या वापरावर अवलंबून होतो किंवा कसे आणि
- या व्यवस्थेत मत्ता वापराचा हक्क दिला आहे किंवा कसे.

### १. कंपनी भाडेकरू असल्यास

वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचा घसारा भाडेपट्टीची मुदत संपेपर्यंत 'सरळ रेषा' पद्धतीने केला जातो. याशिवाय अशा वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचे ठराविक अंतराने, जर काही कमी करण्याजोगी हाती असल्यास ती कमी करण्यात येते. तसेच जर काही भाड्याच्या दायित्वाचे संबंधी काही पूनर्मोजणी करावयाची असल्यास ती करून समायोजन केले जाते.

भाडेपट्टीचे दायित्वाच्या प्रारंभी करार सुरू होण्याच्या तारखेला न भरलेल्या भाडेपट्टीचे विद्यमान मूल्याप्रमाणे मोजणी केली जाते आणि कंपनीच्या इन्क्रीमेंट डिस्काउंट रेटनुसार कपात करण्यात येते. भाडेपट्टीचे दायित्व मुल्यघट तत्वानुसार मोजण्यात येते अल्पमुदतीचे भाडेपट्टी करार म्हणजे ज्यांची मुदत बारा महिने किंवा त्यापेक्षा कमी असेल आणि कमी किंमतीच्या भाडेपट्टीचे करार यांना कंपनीने 'वापरण्याचा अधिकार' या मत्तेत मान्यता न देण्याचे ठरविले आहे. कंपनी अशा भाडेपट्टी संबंधित देयकांना खर्च म्हणून मान्यता देते.

### २. कंपनी भाड्याने देणारी संस्था असल्यास

ज्यावेळी कंपनी स्वत: भाडेपट्टीने जागा देते. तेव्हा त्यांचे लेखे भारतीय लेखा मानक क्रमांक ११६ यामध्ये विहीत केलेल्या पद्धतीने केले जातात.

## १६. शासकीय अनुदान

शासकीय अनुदानाबाबात जेव्हा ते मिळण्याची योग्य हमी असेल आणि जेव्हा संलग्न शर्तीचे अनुपालन करण्यात येते, तेव्हाच त्याला लेख्यांमध्ये मान्यता देण्यात येते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबींशी निगडीत असते, तेव्हा त्या संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी आणि त्याच्या हेतुच्या भरपाईसाठी खर्च करण्यात येते तेव्हा तिला नफा व तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे मान्यता दिली जाते.

भारतीय लेखामानक २० यातील तरतुदीनुसार भारत सरकारने २० सप्टेंबर २०१८ रोजी जारी केलेल्या सुधारीत नियमावलीनुसार, मत्तांशी संबंधित शासकीय अनुदाने, स्थगित उत्पन्न म्हणून किंवा मत्तांच्या वहन रकमेतून अनुदान वजा करून त्याप्रमाणे ताळेबंदात दाखवण्यात यावी असे बदल केले, परिणामी, वित्तीय वर्षे २०२०-२१ मध्ये कंपनीने मत्तांच्या मुल्यांकन मधून अनुदाने वजा करण्याचा पर्याय निवडला आहे.

तथापि, मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या संपादनासाठी व्याज नसलेले कर्ज सरकारकडून प्राप्त झाल्यास, कंपनीस प्राप्त झालेल्या वर्षात सदर कर्जाला सध्याच्या मुल्यावर मान्यता देते आणि शिल्लक रक्कम स्थगित अनुदान म्हणून गणली जाते. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांचा वापर सुरू केल्यानंतर या वस्तुंच्या उपयुक्त आयुष्याच्या कालावधीत स्थगित अनुदान रद्द केले जाते. उपरोक्त कर्जाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत कंपनी दरवर्षी नफा आणि तोटा विवरणपत्राद्वारे वित्त खर्च ओळखून जी उपरोक्त कर्जाच्या

वर्तमान मुल्यात जमा होते. कर्जाच्या कालावधीच्या शेवटी, कर्जाची जमा झालेली शिल्लक (सध्याचे मुल्य म्हणून ओळखले जाते) ताळेबंदतून काढून टाकली जाते.

**१७. तरतुदी, आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता**

जेव्हा एखाद्या भूतकालीन घटनेमुळे सद्यस्थितीत काही दायित्वे आली असतील तर त्या दायित्वाच्या तरतुदींना मान्यता देण्यात येते. ही दायित्वे पूर्ण करण्यासाठी आर्थिक लाभ असलेल्या संसाधनांचे बहिर्गमन होणे संभवनीय असेल. दायित्वाच्या रकमांचे विश्वसनीय अंदाज लावता येईल.

जेव्हा पैशाच्या वेळेच्या मूल्याचा परिणाम महत्वाचा असतो, तेव्हा योग्य सवलतींच्या दराने तरतुदीमध्ये सवलत दिली. आकस्मिक दायित्व म्हणजे भविष्यात घडणाऱ्या घटना ज्यावर कंपनीचे पूर्णपणे नियंत्रण नसल्यामुळे निर्माण झालेले संभाव्य दायित्वे किंवा ज्यासाठी संसाधनांचे बहिर्गमन आवश्यक असेल अशी शक्यता नाही किंवा ज्या दायित्वातील रकमांचे मोजमाप पुरेशा विश्वासर्हतेने करता येत नाही.

आकस्मिक दायित्वांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता नसते, मात्र आर्थिक संसाधनांची बाहेर जाण्याची शक्यता अत्यंत दुरस्थ नसेल तर प्रकटीकरणात दर्शविली जातात.

ज्या बाबी प्रत्येक प्रकरणातील कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होतात तेव्हा त्या बाबतची आकस्मिक दायित्वे आणि भांडवली बांधिलकी, टिपा स्वरूपात प्रकट केली जाते.

आकस्मिक मत्ता यांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता दिली जात नाही, परंतु जर आकस्मिक मत्ता या विहीत मर्यादेपेक्षा जास्त असतील आणि त्यातून आर्थिक लाभ मिळण्याची शक्ता असेल तर त्या प्रकट केल्या जातात.

**१८. रास्त मूल्याची मोजणी करणे**

बाजारपेठेत सहभागी होणाऱ्यांमध्ये मत्ता विक्रीसाठी किंवा दायित्व हस्तांतरणासाठी, यापैकी जसे काही असेल त्या कायदेशीर व्यवहारात मूळ मापनाच्या तारखेला मिळणाऱ्या किंमतीला किंवा तसे नसल्यास कंपनीला सहजप्राप्त असणाऱ्या सर्वात लाभदायक बाजारपेठेला रास्त मूल्य म्हणतात.

कंपनी, मत्ता/दायित्वे यांचे रास्त मूल्य मोजण्यासाठी बाजारपेठेतील निरिक्षण करून योग्य माहिती मिळवून तिचा उपयोग करते मुल्यमापन तंत्रात वापरल्या जाणाऱ्या इनपुटस्च्या आधारे रास्त मुल्यांचे विविध स्तरांमध्ये वर्गीकरण केले जाते. ते खालील प्रमाणे आहे स्तर १ - समान मत्ता/दायित्वे यांच्या कार्यशील बाजारपेठेतील उद्धृत केल्या जाणाऱ्या किंमती (असमायोजित) आहे.

स्तर २ - मत्ता/दायित्वे यांच्या वरील स्तर - १ मधील उद्धृत किंमती व्यतिरिक्त अन्य निविष्टी शोधून त्याचे प्रत्यक्ष (किमतीचे) किंवा अप्रत्यक्ष (किंमती व्यतिरिक्त अन्य) निरिक्षण करणे.

स्तर ३ - मत्ता/दायित्वे यांच्या बाजार माहिती निरिक्षणांवर आधारलेल्या नाहीत, अशा निविष्टी विचारात घेणे, (ज्यांचे निरिक्षण करता येत नाही अशा) वित्तीय विवरणपत्रात मत्ता व दायित्वे यांना आवर्ती तत्वावर मान्यता दिली जाते. त्यासाठी कंपनी श्रेणीकरणाचे पूननिर्धारण करते आणि त्याद्वारे श्रेणीमध्ये स्थानांतरण झाले आहे किंवा कसे, (सर्वव्यापी रास्त मूल्य मोजणीसाठी महत्वपूर्ण असलेल्या सर्वात खालच्या निविष्टीच्या आधारे) याचे प्रत्येक अहवालात कालावधीच्या अखेरीस निश्चिती करते.

**१९. वित्तीय विलेख**

जेव्हा कंपनी एखाद्या कंत्राटातील विलेखाच्या तरतूदीमध्ये एका बाजूला पक्ष असते तेव्हा वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांना मान्यता दिली जाते. कंपनीच्या वित्तीय मत्तात खालील बाबींचा समावेश असतो.

१) चालू वित्तीय मत्ता यात व्यापारी येणी, रोख व रोख सममूल्य आणि बँकातील शिल्लक, अल्प मुदतीच्या ठेवी.

२) चालू नसलेल्या मत्ता यात प्रामुख्याने उपकंपन्यातील समभाग गुंतवणूक व त्यांना कर्जे आणि दीर्घ मुदतीची येणी इत्यादी.

**वित्तीय मत्ता**

**अ) प्रारंभिक नोदंणी व मोजणी**

सर्व वित्तीय मत्ता यांना प्रारंभी त्याचे रास्त मूल्य अधिक त्या संपादनासाठी केलेल्या व्यवहाराचे खर्च यानुसार मान्यता देण्यात येते.

नफा किंवा तोटाद्वारे रास्त मुल्य यामधील सर्व वित्तीय मत्तेचा व्यवहार खर्च नफा आणि तोटा विवरणपत्रात दाखवला जातो.

**ब) नंतर केलेली मोजणी**

संबंधित वित्तीय मत्ताच्या वर्गीकरणाच्या संदर्भानुसार नंतरची मोजणी केली जाते.

कंपनी वित्तीय मत्तांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करते.

अ) घसाऱ्या नंतरची मोजणी करणे

ब) आर्थिक मालमत्ता मोजणी

१) इतर सर्वकष उत्पन्नामार्फत रास्त मूल्य किंवा

२) नफा किंवा तोटाद्वारे रास्त मूल्य

वित्तीय मत्तांचे व्यवस्थापनासाठी कंपनीचे बिझनेस मॉडेलच्या आणि वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील वैशिष्ट्यांचा विचार केला जातो.

**परिशोधीत खर्च**

जर खालील दोन्ही अटी पूर्ण केल्या असतील तरच कर्ज साधनांचे मोजमाप परिशोधीत केलेल्या खर्चावर होते. अशी मत्ता बिझनेस मॉडेलमध्ये खालील उद्दिष्टांसाठी धारण केली असावी.

- कंत्राटानुसार रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी मत्ता धारण करणे आणि
- मत्तांच्या कंत्राटातील अटींमुळे मुद्दल रकमेचे आणि व्याज याप्रकारे रोकडता प्रवाह निश्चित तारखेस मिळणे प्रारंभिक मान्यतेनंतर अशा वित्तीय मत्ता पुन्हा परिशोधीत खर्च तरतुदीच्या वजावट केल्यावर मोजल्या जातात.

यासाठी परिणामकारक व्याजदर पद्धती वापरली जाते आणि अशा परिशोधीत तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**कर्ज विलेख नफा तोटाद्वारे रास्त मुल्यानुसार**

नफा व तोटा पत्रकाद्वारे काढलेले रास्त मूल्य हे कर्ज विलेखाच्या मोजणीसाठी उर्वरित श्रेणीचे आहे.

प्रारंभिक मोजणीनंतर रास्त मूल्यामध्ये बदल झाल्यास त्यास नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या बदलामध्ये व्याजाचे उत्पन्न व मूल्य घट यांचा अंर्तभाव असतो.

**समभागातील गुंतवणूकी**

भारतीय लेखा मानक क्र. १०९ याच्या व्याप्तीत अंतर्भाव होणाऱ्या समभागातील सर्व गुंतवणूकींची मोजणी रास्त मूल्याने केली जाते. समभागाचे जे विलेख व्यापारासाठी धारण केले जातात, त्यांचे वर्गीकरण नफा व तोटा द्वारे रास्त मूल्यनुसार केले जाते. इतर सर्व समभागांच्या विलेखांच्या वर्गीकरणासाठी कंपनीने इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य किंवा नफा तोटा पत्रकातील रास्त मूल्य अशाप्रकारे वर्गीकरण करण्याबाबत कंपनी निर्णय घेते हे वर्गीकरण प्रारंभीक मान्यतेवर केले जाते आणि ते उपरिवर्तनीय असते.

यानुसार वर्गीकरण केलेल्या समभागांच्या विलेखाच्या रास्त मुल्यातील सर्व बदलांना, (लाभांश वगळून) यांना इतर सर्वकष उत्पन्न यात मान्यता दिली जाते. अशा गुंतवणूकींची विक्री झाली तरी इतर सर्वकष उत्पन्नातील रकमांचा नफा व तोटा पत्रकामध्ये पूनर्चक्रीकरण केले जात नाही.

नफा व तोटा द्वारे रास्त मुल्य या श्रेणीत समाविष्ट केलेल्या समभाग विलेखांचे मापन रास्त मूल्याच्या बदलानुसार केले जाते व त्यांना नफातोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त उपक्रम कंपन्या आदि संस्थांच्या समभाग विलेखातील गुंतवणूकी खर्च वजा मूल्यघट यानुसार नोंदवल्या जातात.

**वित्तीय मत्तांची मूल्यघट**

भारतीय लेखा मानक १०९ नुसार ज्या वित्तीय मत्तांची मोजणी घसारा तरतूदी नंतर होते आणि ज्या इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मुल्यानुसार नोंदविल्या जातात, त्या मत्तांची मोजणी करणे त्याला मान्यता देणे यासाठी कंपनी अपेक्षित पत तोटा हे प्रारूप लागू करते.

व्यापारी येणी यासाठीच्या तोटा भरपाईचे मापन करण्यासाठी सोपी पद्धती अनुसरली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला त्याच्या पूर्ण आयुष्याच्या अपेक्षित पत तोटा च्या समान रक्कम यानुसार मापन केले जात. या मत्तांच्या प्रारंभिक किंमती आणि वर्षाखेरीस संभाव्य धोके विचारात घेऊन आलेली किंमत याचा विचार करून कंपनी या मत्तांची मूल्यघट ही नफा-तोटा पत्रकात अपेक्षित मूल्यघट तत्त्वानुसार नोंदविली जाते.

**वित्तीय मत्तांची मान्यता रद्द करणे**

कंपनीची एखादी वित्तीय मत्ता (किंवा जेव्हा लागू असेल तेव्हा वित्तीय मत्तांचा एक भाग किंवा तत्सम वित्तीय मत्तांच्या गटांचा भाग) हा प्राथमिकरित्या पुढील कारणांकरिता रद्द होतो:

जेव्हा या मत्तांद्वारे रोकडता प्रवाह मिळण्याचे हक्क संपले असतील किंवा

जर कंपनीने अशा मत्तांकडून रोकडता प्रवाह मिळण्याच्या हक्काचे हस्तांतरण केले असेल किंवा मिळालेले रोकडता प्रवाह संपूर्णपणे आणि प्रत्यक्ष विलंबाशिवाय तिसऱ्या पक्षाकडे पाठविण्याचे बंधन एखाद्या करार व्यवस्थेद्वारे स्वीकारले असेल आणि यापैकी

(अ) कंपनीने या मत्तेच्या सर्व जोखीमा व मोबदले भरीवपणे हस्तांतरित केले असतील किंवा

(ब) जर कंपनी या मत्तेच्या सर्व जोखीमा आणि मोबदले भरीवपणे त्याच स्वरूपात हस्तांतरित केल्या नसतील तर किंवा स्वत: कडे ठेवल्या नसतील, मात्र या मत्तेचे नियंत्रण हस्तांतरित केले असेल तर

वित्तीय मत्तांची मान्यता रद्द केल्यानंतर, चालू असलेले मूल्य आणि मिळालेला वाटा यांच्यातील फरकाला नफा तोटा पत्रकात मान्यता मिळते.

**वित्तीय दायित्वे**

**वित्तीय दायित्वे आणि समभाग विलेख**

**कर्ज किंवा समभाग असे वर्गीकरण**

कंपनी जेव्हा एखाद्या विलेखाचे वितरण करते तेव्हा विलेखाच्या कराराच्या भरीवपणानुसार विलेखाचे वर्गीकरण वित्तीय दायित्व किंवा समभाग विलेख असे करते.

**समभाग विलेख**

कंत्राटातील समभाग विलेख म्हणजे ज्यात संबंधित अस्तित्वात असलेल्या संस्थेची सर्व दायित्वे वजा केल्यानंतर मत्तांमधील उरलेला हिताच्या भागाचा पुरावा दाखविला जाणारा भाग होय. समभाग विलेखाच्या वितरणानंतर कंपनी त्याबद्दल मिळालेल्या रक्कमेच्या प्रमाणात समभाग विलेख दर्शविते.

**वित्तीय दायित्वे**

कंपनीच्या विद्यमान वित्तीय दायित्वामध्ये प्रमुख्याने (अ) कर्जे (ब) व्यापारी देणी (क) भांडवली खर्चाची दायित्वे (ड) सुरक्षा अनामती आणि (इ) इतर देणी यांचा समावेश होतो.

**प्रारंभिक मान्यता आणि मोजणी**

सर्व वित्तीय दायित्वे (नफा किंवा तोटा यांच्या रास्त मूल्यानुसार मोजणी केलेली नाही अशा) यांना प्रारंभी त्यांच्या संबंधित वित्तीय दायित्वाला थेट लागू असणाऱ्या व्यवहार खर्च वजा करून रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. कंपनीच्या वित्तीय दायित्वात व्यापारी आणि इतर देणी, कर्जे आणि उसनवारी यांचा समावेश आहे.

**नंतरची मोजणी**

वित्तीय दायित्वाची मोजणी त्यांच्या खालीलप्रमाणे केलेल्या वर्गीकरणावर अवलंबून असते.

**१) कर्जे**

कर्जे सुरूवातीला रास्त मूल्ये व केलेल्या व्यवहार खर्चाची निव्वळ याप्रमाणे त्यास मान्यता दिली जाते. नंतर उसनवारी कर्जाच्या फेडीसाठीच्या खर्चानुसार कर्जाची मोजणी केली जाते. उत्पन्न (व्यवहार खर्चाचा निव्वळ रक्कम) व विमोचन रक्कम यात जो काही फरक असेल त्याला परिणामकारक व्याज दराची पद्धत वापरून कर्जाच्या मुदतीसाठी नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. कर्ज सुविधा स्थापित करण्यासाठी दिलेल्या शुल्काला कर्जाचा व्यवहार म्हणून मान्यता दिली जाते. मात्र या सुविधा काही प्रमाणात किंवा संपूर्णपणे काढून घेतल्या जाऊ शकतात हे गृहित धरून त्यांच्या मर्यादेत ही मान्यता असते. अशा प्रकरणी सदर सुविधा काढून टाकण्यापर्यंत शुल्क स्थगित ठेवले जाते.

जेव्हा कर्जाच्या करारामध्ये काही बंधने विनिर्दिष्ट असतात. तेव्हा अशी बंधने चुकती/रद्द झाली असतील किंवा मुदत संपली असेल तर ती ताळेबंदातून काढून टाकली जातात. संपलेल्या वित्तीय दायित्वाची रक्कम आणि त्याची चुकती केलेली रक्कम यातील फरक नफा-तोटा पत्रकात इतर प्राप्ती/(तोटे) याप्रमाणे मान्य केला जातो.

जर कंपनीला एखाद्या दायित्वाचा चुकता अहवाल काळापासून किमान बारा महिने स्थगीत ठेवण्याचा विनाअट हक्क नसला, तर त्या दायित्वाचे 'चालू दायित्वे' असे वर्गीकरण केले जाते. जर कंपनीला एखाद्या दीर्घ मुदतीच्या कर्ज व्यवस्थेतील महत्वाच्या तरतुदींचा भंग अहवाल मुदत संपण्याची वेळी किंवा यापूर्वी झाला असला आणि ते दायित्व मागणीनुसार अहवालाच्या तारखेला देय होत असेल आणि जर संबंधित कर्जदारांनी अहवाल तारखेनंतर किंवा वित्तीय विवरणपत्रे मंजूर होण्यापूर्वी करारभंगासाठी

कोणत्याही रक्कमेची मागणी करणार नाही असे मान्य केल्यास अशा वित्तीय दायित्वांना 'चालू दायित्वे' असे मानण्यात येणार नाही.

**२. व्यापारी व इतर देणी**

यामध्ये वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी कंपनीला पुरविलेल्या माल व सेवा यांच्या दायित्वाच्या न दिलेल्या रक्कमा यांचा समावेश होतो. या रक्कमा अप्रतिभूत असतात व त्या निर्देशित केल्यानंतर बारा महिन्यात दिल्या जातात. व्यापारी व इतर देणी जर अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यात देय नसल्या असे नसेल तर त्यांना चालू दायित्व समजले जाते. त्यांना प्रारंभी त्यांच्या रास्त मूल्यांनुसार मान्यता दिली जाते आणि नंतर परिणामकारक व्याज दर वापरून घसारा वजा करून त्यांची मोजणी केली जाते.

**नोंद रद्द करणे**

जेव्हा एखाद्या वित्तीय दायित्वाचे बंधन चुकते केले जाते किंवा रद्द केले जाते किंवा त्याची मुदत संपते तेव्हा त्या वित्तीय दायित्वाची नोंद रद्द करण्यात येते. जेव्हा एका विद्यमान दायित्वाची जागा, त्याच कर्जदाराने वेगळ्या अटीनुसार दिलेले दुसरे दायित्वे घेते किंवा जर विद्यमान दायित्वाच्या अटींमध्ये महत्वाची रूपभेद सुधारणा केल्या जातात, अशावेळी मूळ दायित्व रद्द केले जाते आणि नवीन दायित्व मान्य केले आहे असे मानण्यात येते. त्यामुळे पुस्तकी रक्कमेतील फरकाला स्वायत्त नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**वित्तीय विलेखांचे समायोजन**

कायदेशीर तरतुदीप्रमाणे किंवा चालू काळातील संकेताप्रमाणे वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्व यांचे समायोजन होणार असेल तर अशा मत्ता व दायित्व यांची वजावट केल्यानंतर निव्वळ तत्वावर वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्व ताळेबंद पत्रकात दर्शविन्यात येतात.

**२०. ठेवी**

कंपनी तिच्या कामकाजाचा एक भाग म्हणून, इतर संस्थांकडून ठेवी प्राप्त करते आणि इतर संस्थांकडे ठेवी देखील ठेवते. जर बारा महिन्यांच्या कालावधीत ठेवींची पूर्तता अपेक्षित असेल, तर त्या चालू म्हणून वर्गीकृत केल्या जातात आणि ताळेबंदातील चालू मालमत्ता / चालू दायित्वे मध्ये दर्शविल्या जातात. जर ठेवी चालू नसलेल्या स्वरूपाच्या असतील तर खालील उपचार दिले जातात.

इतर संस्थांकडे ठेवलेल्या ठेवी -

अ. जर ठेव संबंधित संस्थेकडून ठेवीसंबंधी कामकाजाच्या अंमलबजावणीसाठी ठेवण्यात आलेली असेल, तर ती ठेव कार्यपूर्तीच्या तुलनेत समायोजित केली जाईल. त्यामध्ये कोणतेही आर्थिक व्यवहाराचे स्वरूप नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची सूट देण्याची आवश्यकता असणार नाही.

ब. इतर सर्व बाबतीत, ठेव कालावधी निश्चित असल्यास, ठरविलेल्या मर्यादेच्या अधीन राहून ठेव सवलतीची कार्यवाही करण्यात येईल.

कंपनीला मिळालेल्या ठेवी

अ. जर ठेवी कामगिरी सुरक्षा हमी म्हणून प्राप्त झाल्या असतील, तर संबंधित ठेव कामगिरी पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल. ती ठेव व्याज उत्पन्न मिळविण्याच्या उद्देशाने राखून ठेवलेली नाही तसेच तिच्याशी कोणतेही आर्थिक व्यवहार जोडलेले नाहीत, त्यामुळे सवलतीची आवश्यकता राहत नाही.

ब. इतर सर्व बाबतीत, ठेव कालावधी निश्चित असल्यास, ठरविलेल्या मर्यादेच्या अधीन राहून ठेव सवलतीची कार्यवाही करण्यात येईल.

**२१. रोख आणि रोख समतूल्यबाबी**

रोख आणि रोख समतूल्य बाबींमध्ये हातातील रोख रक्कम, बँकेतील शिल्लक, इतर अल्पमुदतीचे व चांगल्या प्रकारची रोकड सुलभता असलेल्या आणि मुळ मुदत तीन किंवा कमी महिन्यात पूर्ण होणाऱ्या गुंतवणूकी, तात्काळ रोखेत रूपांतर होऊ शकतील अशा आणि तसे करताना मूल्यात फारसा फरक पडणार नाही अशा बाबी समाविष्ट असतात.

**२२. रोकडता प्रवाह विवरण पत्रक**

भारतीय लेखा मानक क्र. ७ हे रोकडता प्रवाह विवरण पत्रकासंबंधी असुन, ते त्यानुसार अप्रत्यक्ष पद्धतीने तयार केले जाते. त्याच्या हेतुसाठी वरती व्याख्यांकित केलेल्या रोख व रोख समतूल्य बाबी विचारात घेण्यात येतात. तसेच बँकेच्या थकीत ओव्हरड्राफ्टची निव्वळ रक्कमही हिशोबात घेतली जाते कारण ती कंपनीच्या अंतर्गत रोकड व्यवस्थापनाचा एकात्मिक भाग असते.

**२३. प्रतिभाग मिळकत**

करोत्तर नफा/तोटा रकमेला वर्षभरातील वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर या संख्येने भागून प्रतिभाग मिळकतीचा हिशेब केला जातो. सौम्यकृत प्रतिभाग मिळकत शोधून काढण्यासाठी करोत्तर नफा/तोटाच्या रकमेचे लाभांश, व्याज आणि सौम्यकृत संभाव्य समभागासंबंधीत इतर आकाराचे व्यय किंवा उत्पन्नाचे समायोजन केले जाते. सर्व संभाव्य समभागाचे रुपांतर केल्यानंतर जे सौम्यकृत भाग वितरित केले गेले असते अशा वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सची संख्या विचारात घेतली जाते.

प्रतिभाग मिळकतीच्या हिशेबासाठी वाटप प्रलंबित असलेली शेअर अर्ज निधी हा वाटप योग्य आहे असे विचारात घेतले आहे. हा निधी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या बांधिलकीनुसार सूत्रधारी कंपनीमार्फत आणि निश्चितपणे वाटपासाठी मिळणार आहे.

**२४. कर**

आयकराच्या खर्चात चालू कर खर्च आणि वर्षभरातील स्थगित कर मत्ता किंवा दायित्व यातील निव्वळ बदल यांचा समावेश होतो. चालू आणि स्थगित कर यांना नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा त्यांचा संबंध इतर सर्वकष उत्पन्नातील बाबींशी असतो किंवा थेट समभागाशी असतो, अशा प्रकरणी अपवाद करून, चालू आणि स्थगित कर या दोन्ही बाबींना अनुक्रमे इतर सर्वकष उत्पन्न आणि प्रत्यक्ष समभागात मान्यता दिली जाते.

**अ) चालु कर**

आयकर कायदा १९६१ नुसार चालू कर निश्चित केले जाते, त्यासाठी परवानगी प्राप्त कर सवलती, वजावट/अमान्य बाबी यांचा विचार केला जातो. कर व जे कायदे तयार झाले आहेत किंवा अहवाल देण्याच्या वेळेपर्यंत अंमलात येतात त्यांचा वापर केला जातो.

वित्तीय वर्ष २०१९-२० पासून, कंपनीने आयकर कायदा १९६१ चे कलम ११५ बीएए नुसार नवीन सवलतीच्या दराने कर पद्धती अवलंबवली आहे.

**ब) स्थगित कर**

ताळेबंदाच्या दृष्टीकोनातून स्थगित कराला मान्यता दिली जाते. मत्ता व दायित्वे यांच्या करांचा आधार आणि त्यांचे वहन मूल्य यातील कपात योग्य आणि यात उद्भवणारे तात्पुरते करपात्र फरक यानुसार स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांना मान्यता दिली जाते.

स्थगित कर दायित्वे यातील सर्व तात्पुरते करपात्र फरक मान्य केले जातात.

सर्व कपात योग्य हंगामी फरकाच्या रकमा, वापर न केलेल्या कराच्या जमा, रकमा आणि जर काही वापर न केलेले करांचे तोटे असले तर त्यासाठी स्थगित कर मत्तांना मान्यता दिली जाते. कपात योग्य हंगामी फरक, वापर न केलेले कर जमांच्या रकमा आणि न वापरलेल्या कर तोट्याच्या रकमा यासाठी करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

प्रत्येक अहवाल तारखेला स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांचा आढावा घेण्यात येतो आणि स्थगित कर मत्ता संपूर्णपणे किंवा तिचा काही भाग वापरण्यांस करपात्र नफा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांमधे कपात केली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला अमान्य केलेल्या स्थगित कर मत्तांचा आढावा घेण्यात येतो आणि जर स्थगित कर मत्तांची भविष्यातील करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

वर्षभरात जेव्हा मत्ता, वसुली किंवा दायित्वे चुकती केली जातात त्यावेळी लागू होणाऱ्या अपेक्षित कर दराने स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांची मोजणी केली जाते. त्यासाठी तोपर्यंत कायद्यानुसार मंजूर झालेले कराचे दर (आणि करांचे फायदे) किंवा अहवाल तारखेपर्यंत केले जाणारे कायदे यांचा आधार घेतला जातो.

जर चालू कर मत्ता व चालू कर दायित्वे या समवेत चुकता करण्याचा कायदेशीर अंमलबजावणी योग्य हक्क असला आणि स्थगित कर या संबंधित कराची अस्तित्वातील बाबींशी संलग्न असेल आणि त्या समान कर प्राधिकरणाकडे असतील तर स्थगित कर दायित्व कर मत्ता यांची भरपाई करता येते.

**२५. व्यापारी येणी**

व्यापारी येण्यांचे कंपनीने परिशोधीत खर्चानुसार वित्तीय विलेख असे वर्गीकरण केले आहे. व्यापारी येणी त्यांच्या मुळ बिजकातील रक्कम वजा अपेक्षित पत हानी यांच्या तरतुदीप्रमाणे पुढे नेलेल्या आहेत. अशा वित्तीय मत्ता कमी करण्यास मान्यता देण्याकरीता कंपनी त्यांचे प्रारंभीक मान्यता मिळाल्यापासून पत जोखिमेमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे किंवा नाही यांचे मूल्यांकन करते.

**२६. अलीकडील घोषणा**

कंपनीने १२/०७/२०२४ च्या संचालक मंडळाच्या ठराव क्रमांक २०२४/३८९८ नुसार, छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादितमधून भागधारक म्हणून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे आणि या प्रकरणाचा कायमचा निपटारा करण्यासाठी ४.३४ कोटी रुपयांची जबाबदारी फेडण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये, कंपनीने ही परतफेड केली आहे.. छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादितच्या संचालक मंडळावर कंपनीचा कोणताही प्रतिनिधी नाही. तथापि, कंपनीने ही गुंतवणूक विक्रीसाठी राखून ठेवलेली म्हणून वर्गीकृत केल्यामुळे, कंपनीने छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादितची आर्थिक विवरणपत्रे आपल्या एकत्रित आर्थिक विवरणपत्रांमध्ये समाविष्ट केलेली नाहीत.

**टिपा क्र. ४३ इ**

मे. महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ मर्यादित (एमएसएमसी) सोबत महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने कोळसा लाभ आणि वितरण करार केलेला आहे. या कराराच्या व्याप्तीत एमएसएमसीने महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादितच्या वतीने कोळशा कंपन्यांनी जारी केलेल्या रिलीझ ऑर्डरनुसार खाण प्रधिकरणाकडून कच्च्या कोळशाची डिलिव्हरी घेणे, कच्च्या कोळशाची वॉशरीपर्यन्त वाहतूक करणे, विशिष्ट मापदंड मिळविण्यासाठी कच्च्या कोळशावर प्रक्रिया करणे / शुद्धीकरण करणे, लाभदायक कोळशाचे रेल्वे साईडिंगपर्यंत वाहतूक, फायदेशीर कोळसा रेल्वे वॅगन्समध्ये लोड करणे, आणि असा लाभदायक कोळसा नियुक्त केलेल्या औष्णिक वीज केंद्राना वितरित करणे याचा समावेश होतो. कच्च्या कोळशाच्या गुणवत्तेतील कमतरता भरून काढण्यासाठी आणि एमओडी (मेरिट ऑर्डर डिस्पॅच) संकल्पनेत राज्याच्या निर्मितीची मागणी पूर्ण करण्यासाठी सुधारित गुणवत्तेसह (जीसीव्ही आणि ॲश सामग्री) शुद्ध केलेला कोळशाचा वापर केला जातो तसे न झाल्यास गुणवत्ता आणि प्राणाणातील अपयशयामुळे वीज निर्मितीवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे एमएसएमसी तांत्रिक तपशीलानुसार (ॲश कंटेंट, माउस्टयुअर इ.) लाभार्थी कोळसा वितरीत करेल, असे न केल्यास करारामध्ये निर्दिष्ट केलेला दंड एमएसएमसीकडून वसूल केला जाईल. उच्च राख सामग्रीसाठी दंडाच्या कलमानुसार, राखेचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा वाढल्यास, एमएसएमसीला उत्पन्नातील फरकाच्या समतुल्य (म्हणजे सुधारित कॉरोस्पॉन्डन्स उत्पन्न आणि वाढीमुळे सुधारित मानक उत्पन्न यांच्यातील फरक) परतफेड करावी लागेल. त्यानुसार कंपनीने तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्याखाली अशा कोळशाच्या वसुलीचा हिशेब ठेवला आहे (टिप क्र. ५ पहा). अशा कोळशाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | २०२४-२५ | | २०२३-२४ (पुनर्लिखित) | |
|---|---|---|---|---|
| | मेट्रिक टन मध्ये प्रमाण | (₹ कोटीत) | मेट्रिक टन मध्ये प्रमाण | (₹ कोटीत) |
| कच्चा कोळसा | २१.३२ लाख | ५७१.०० | १६.६६ लाख | ४५०.१५ |
| धुतलेल्या कोळशाच्या बाबतीत | १६.८२ लाख | | १३.५४ लाख | |

**टिपा क्र. ४३ फ**

देशांतर्गत कोळशाच्या उपलब्धतेतील कमतरता भरून काढण्यासाठी, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, ऊर्जा मंत्रालय , भारत सरकारने, भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाकडून अपेक्षित वीज निर्मिती आणि अंदाजित कोळसा उत्पादनाच्या आधारे संपूर्ण भारतातील वीज कंपन्यांकडून आयात कोळशाच्या गरजेचे सूचक मूल्यांकन केले. त्यानुसार, भारत सरकारच्या मंत्रालयाने कंपनीसह विविध वीज कंपन्यांना कोळशाच्या आयातीसाठी तात्पुरते वार्षिक लक्ष्य दिले. ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितला जून, २०२४ पर्यंत वजनाने ६% मिश्रण आणि जुलै २०२४ ते ऑक्टोबर, २०२४ या कालावधीसाठी ४% मिश्रण करण्याचे लक्ष्य दिले. कंपनीने हे लक्ष्य प्रकल्प स्तरावर न घेता कंपनी स्तरावर स्वीकारले आहे.

**टिपा क्र. ४३ ग**

कंपनीने स्वेच्छेने लेखापरीक्षण समितीची स्थापना केली असून त्यामध्ये एका स्वतंत्र संचालकाची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या असोसिएशनच्या कलमांनुसार, संचालकांची (स्वतंत्र संचालकांसह) नियुक्ती महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित (एमएसईबीएचसीएल) द्वारे केली जाते जी १००% महाराष्ट्र शासनाच्या मालकीची आणि नियंत्रणाखाली आहे. त्यामुळे, कंपनी कायद्याच्या कलम १७७ नुसार लेखापरीक्षण समितीवर आणखी एका संचालकाची नियुक्ती महाराष्ट्र शासनाद्वारे स्वतंत्र संचालकाची नियुक्ती झाल्यानंतरच केली जाईल. त्यामुळे, वार्षिक आर्थिक विवरणपत्राचा आढावा, संबंधित पक्षाच्या व्यवहाराची मान्यता इत्यादी अनिवार्य कार्ये कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे थेट पार पाडण्यात आली आहेत.

**टिपा क्र. ४३ ह**

**कंपनीकडे दिनांक ३१.०३.२०२५ रोजी बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ महाराष्ट्र येथे खालीलप्रमाणे बँक खाती आहेत, जी कंपनीच्या लेखावहीत प्रतिबिंबित होत नाहीत.**

| अ. क्र. | बँकेचे नाव | खाते क्रमांक | उद्देश |
|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया | १६०२०११०००००००१ | पीएफसी सोबत त्रिपक्षीय करार |
| २ | बँक ऑफ इंडिया | १६०२०११००००००१५ | पीएफसी सोबत त्रिपक्षीय करार |
| ३ | बँक ऑफ महाराष्ट्र | ६०५२९२२३९९६ | हुडको कर्ज खाते |
| ४ | बँक ऑफ इंडिया | १६०२०११००००००९२ | मध्य रेल्वे त्रिपक्षीय करार |
| ५ | बँक ऑफ इंडिया | १६०२०११०००००३२४ | ईस्क्रो खाते |

अ) वरीलपैकी, अनुक्रमांक १ ते ३ मधील बँक खाती कंपनी त्रिपक्षीय करार किंवा कर्ज कराराचा भाग म्हणून उघडले आहेत.

१. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन(पीएफसी)

२. ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ (आरईसी) आणि

३. गृहनिर्माण आणि शहरी विकास महामंडळ लिमिटेड (हूडको)

ही खाती केवळ कर्ज घेण्याच्या उद्देशाने सुरक्षा यंत्रणा म्हणून ठेवण्यात आलेली आहेत. कर्ज व व्याजाची परतफेड कर्जदात्यांना कंपनीच्या नियमित बँक खात्यांद्वारे केली जाते.

ब) वरीलपैकी, अनुक्रमांक ४ वरील बँक खाते हे केंद्रीय रेल्वेसोबत झालेल्या त्रिपक्षीय कराराच्या परिणामी उघडण्यात आलेले असून, प्रत्यक्षात ते एक पूल खाते आहे. या खात्यातील निधी स्वयंचलित यंत्रणेद्वारे मार्गक्रमित होऊन अखेरीस भारतीय रेल्वेला जमा केला जातो.

क) वरीलपैकी, अनुक्रमांक ५ वरील बँक खाते हे एस्क्रो खाते असून ते डिफॉल्ट एस्क्रो खाते या स्वरूपाचे आहे आणि या खात्यातून कोणत्याही पक्षाला थेट पैसे दिले जात नाहीत. त्यामुळे, ही खाती कराराचा एक भाग म्हणून उघडण्यात आलेली असून निधी केवळ

या खात्यांद्वारे मार्गक्रमित केला जातो. परिणामी, ही खाती कंपनीच्या लेखावहीत प्रतिबिंबित होत नाहीत तसेच या बँक खात्यांद्वारे मार्गक्रमित व्यवहार कंपनीच्या लेखावहीत नोंदविले जात नाहीत.

कंपनीच्या मते, याचा कंपनीच्या लेखावहीवर कोणताही लक्षणीय परिणाम होत नाही.

**टिपा क्र. ४३ आय**

**अंतिम लाभार्थी**

कंपनीने कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला (परदेशी संस्थांसह) (मध्यस्थ) कोणतेही निधी (जे स्वतंत्रपणे किंवा एकत्रित स्वरूपात महत्त्वपूर्ण आहेत) आगाऊ दिलेले नाहीत, कर्जरूपाने दिलेले नाहीत किंवा गुंतवणूक केलेली नाही (कर्जरूप निधी, शेअर प्रीमियम किंवा इतर कोणत्याही स्रोत अथवा प्रकारच्या निधीतून), अशा समजुतीवर ती लेखी स्वरूपात नोंदविलेली असो वा नसो की संबंधित मध्यस्थाने थेट किंवा अप्रत्यक्षरित्या कंपनीच्या वतीने किंवा कंपनीद्वारे ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांमध्ये (अंतिम लाभार्थी) कर्ज द्यावे किंवा गुंतवणूक करावी अथवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा इत्यादी द्यावी.

तसेच, कंपनीला कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेकडून (परदेशी संस्थांसह) (निधी पुरवठादार) कोणतेही निधी (जे स्वतंत्रपणे किंवा एकत्रित स्वरूपात महत्त्वपूर्ण आहेत) प्राप्त झालेले नाहीत, अशा समजुतीवर ती लेखी स्वरूपात नोंदविलेली असो वा नसो की कंपनीने थेट किंवा अप्रत्यक्षरित्या निधी पुरवठादाराच्या वतीने किंवा निधी पुरवठादाराद्वारे ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांमध्ये (अंतिम लाभार्थी) कर्ज द्यावे किंवा गुंतवणूक करावी अथवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा इत्यादी द्यावी.

**टिप क्र. ४४ वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांचे वर्गीकरण**

**खालील तक्ता रोकडता प्रवाह दाखवते** **(₹ कोटीत)**

| तपशील | ३१.०३.२०२५ | | | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नफा व तोटा या पत्रकाद्वारे रास्त मूल्य | इतर सर्वंकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य | कर्जफेडीचा खर्च | नफा व तोटा या पत्रकाद्वारे रास्त मूल्य | इतर सर्वंकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य | कर्जफेडीचा खर्च |
| **वित्तीय मत्ता** | | | | | | |
| (१) व्यापारी येणी | ४,०८४.७२ | | २७,४६४.८१ | ७,२५६.१७ | | २४,००८.२२ |
| (२) रोख व रोख सममूल्य | | | ४.२८ | | | ७.५८ |
| (३) बँकेतील शिल्लक वरील (२) व्यतिरिक्त | | | | | | - |
| (४) कर्जे | | | १.३५ | | | १.८९ |
| (५) इतर वित्तीय मत्ता | | | ४११.६९ | | | ५१५.१४ |
| **एकूण** | **४,०८४.७२** | **-** | **२७,८८२.१३** | **७,२५६.१७** | **-** | **२४,५३२.८२** |
| **वित्तीय दायित्वे** | | | | | | |
| (१) कर्जे - उसनवारी | | | ४१,३४०.८२ | | | ४०,७६९.१६ |
| (२) व्यापारी देणी | | | १०,६०६.७३ | | | ९,८१५.३० |
| (३) भाडेपट्टी दायित्व | | | २,८५८.५२ | | | ३,०३२.४३ |
| (४) इतर वित्तीय दायित्वे | | | ४,२६६.३० | | | ४,३७७.४७ |
| **एकूण** | **-** | **-** | **५९,०७२.३७** | **-** | **-** | **५७,९९४.३६** |

**वित्तीय जोखीमांचे व्यवस्थापन**

**जोखीम व्यवस्थापनांचा आकृतीबंध**

सर्व सामान्य कार्य करताना, कंपनीच्या कृतींना विविध धोक्यांना सामोरे जावे लागते. त्यातील काही धोके वित्तीय विलेखासंबंधीचे आणि हे विलेख ज्या बाजारपेठेत कार्यरत असतात त्यासंबंधी असतात. महानिर्मिती कंपनीची स्वत:ची जोखीम व्यवस्थापनाची यंत्रणा असून तिचे नियमित अंतराने संचलन केले जाते. महत्त्वाच्या जोखीमा संक्षिप्त स्वरूपात खाली दिलेल्या आहेत.

**४४ अ नियमकांमुळे जोखिमा**

महानिर्मिती कंपनी तिच्या वार्षिक महसूल गरजा महाराष्ट्र विद्युत नियमाक आयोग यांना सादर करते. त्यांनी मंजूर केलेल्या दरपत्रकाच्या आधारे महानिर्मिती ग्राहकांना ऊर्जा देयके देते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेले दर या आयोगाच्या (बहुवर्षीय वीज दर) पत्रकावर आधारलेले असतात. या दरात ठराविक कालावधीनंतर सुधारणा होते. या आयोगाच्या नियमकांच्या प्रमाणक मापदंडानुसार दर निश्चिती होते. या प्रमाणित मापदंडात किंवा नियमनाच्या मार्गदर्शक तरतुदीमध्ये कोणतेही बदल झाल्यास त्यांचे परिणाम महानिर्मितीच्या वीज विक्रीच्या महसुलावर होतात.

**४४ ब. कंपनीचे वित्तीय धोके ओळखून त्याच्या तीन श्रेणी केल्या आहे त्या अशा १) पत जोखीम २) रोकड सुलभता ३) बाजारातील जोखिमा, या प्रत्येक श्रेणीतील धोक्यांचे उगमस्थानाचा तपशील आणि कंपनी या धोक्यांचे करीत असलेले व्यवस्थापन याचे स्पष्टीकरण खालील टिपांमध्ये केले आहे.**

**टिपा क्र. ४४ ब-१ पत जोखीमा**

जेव्हा कंपनीच्या ग्राहक किंवा अन्य व्यवहारातील संस्था तिचे करारानुसार असलेली बंधने पूर्ण करू शकत नाही, तेव्हा कंपनीला वित्तीय नुकसान करणारी पत विषयक जोखीम उद्भवते. त्यामुळे ग्राहकांकडील येणी आणि गुंतवणूकीच्या प्रतिभूती याबाबत धोके निर्माण होतात. म्हणून कंपनी संशयास्पद ऋणे, येणी आणि कमी होणारी प्राप्ती यासाठी भरपाईची तरतूद करते. तसेच व्यापारातून आणि इतर येणी व गुंतवणूकी यांचे तोट्यांचा अंदाज कंपनी करून ठेवते. खाली दिलेल्या वित्तीय विलेखांच्या प्रकरणी पत पुरवठयांवर होणारे कमाल धोके हे त्यांच्या निर्देशित रकमांच्या संदर्भात मर्यादित केले जातात.

**व्यापारी येणी**

व्यापारी येण्यांचा (चांगली मानलेल्या) अपेक्षित पत तोट्यांचा अंदाज करण्यासाठी कंपनी शासकीय बॉण्डचा, उत्पन्नाच्या संबधित वर्षासाठी सवलत घटक म्हणून वापर करते आणि अशा व्यापारी येण्यांशी संलग्न असणाऱ्या वेळेच्या मुल्यांच्या धोक्यांचे निर्धारण करते. व्यापारी येण्याचा संबंध महावितरणाला पुरविलेल्या वीजेच्या येण्याशी आहे. ही सहोदर कंपनी असल्याने तसेच सार्वभौम संस्था असल्याने तिच्या व्यवहारात पत संबंधीचा धोका असल्याचे वाटत नाही. पत संबंधातील धोके दर्शन व तोट्यांची तजवीज (अपेक्षित पत तोट्याच्या तरतुदीसह) यांची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे. **(₹ कोटीत)**

| तपशील | ३१.०३.२०२५ | | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित | |
|---|---|---|---|---|
| | ठोक धरलेली रक्कम | तोट्यासाठी तजबीज | ठोक धरलेली रक्कम | तोट्यासाठी तजबीज |
| मागील येणे ०-१८० दिवस | २४,२६४.६२ | | १९,२३५.११ | |
| मागील येणे १८०-३६० दिवस | १०,३६७.१० | | ११,९८७.७२ | |
| ३६० पेक्षा जास्त दिवस | १९४.४८ | ३,२६३.२७ | २२५.२३ | ७१८.०७ |
| **एकूण** | **३४,८२६.२१** | **३,२६३.२७** | **३१,४४८.०७** | **७१८.०७** |
| सूचना: वरील माहितीत विनादेयकाचा महसूल पण धरलेला आहे. | | | | |

**या वर्षात व्यापारी येण्याच्या संदर्भात अपेक्षित पत तोट्यासाठी केलेल्या तजवीजीचे स्थानांतर खालील तक्त्यात दिले आहे.**

**(₹ कोटीत)**

| | |
|---|---|
| **०१ .०४ .२०२३ ची शिल्लक (पुनर्लिखित)** | **९८०.०२** |
| अधिक: मान्य केलेला अपेक्षित पत तोटा | - |
| वजा: निलंबित केलेली रक्कम | (२६१.९५) |
| **३१ .०३ .२०२४ ची शिल्लक (पुनर्लिखित)** | **७१८.०७** |
| अधिक: मान्य केलेला अपेक्षित पत तोटा | २,८३३.०० |
| वजा: निलंबित केलेली रक्कम | (२८७.८०) |
| **३१ .०३ .२०२५ ची शिल्लक** | **३,२६३.२७** |

**रोख व रोख सममूल्य**

| तपशील | ३१.०३.२०२५ रोजी | ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| रोख व रोख सममूल्य | ४.२८ | ७.५८ |

**टिपा क्र. ४४ ब. २ - रोकड सुलभतेचे धोके**

रोकड सुलभतेचे धोके रोकड सुलभतेचे धोके म्हणजे जेव्हा कंपनी तिची वित्तीय बंधने पूर्ण करू शकत नाही ते धोके. कंपनी तिचे व्यवहार आणि वित्तीय आश्वासने वेळेवर पूर्ण करण्याची हमी मिळावी म्हणून रोकड सुलभतेचे प्रभावी व्यवस्थापन करण्यावर लक्ष केंद्रीत करते. कंपनीच्या कर्जावर पूरेशा मर्यादा असतात, त्याला भागधारक व मंडळाची योग्य मान्यता असते. कंपनीच्या रोकड सुलभतेच्या स्त्रोतांमध्ये प्रवर्तनीय रोकडता प्रवाह रोख व समतूल्य बँकाचे निधी व विना निधी आधारीत प्रवाह यांचा समावेश होतो. उद्योग व्यवसायाचे काम सुरळीत व सतत चालू रहावे यासाठी रोख व निधी प्रवाह व्यवस्थापन याकडे लक्ष दिले जाते.

**१) वित्तीय रचना:**

कंपनीच्या विविध बँकेतील निधी व विनानिधी यावर मर्यादा असतात. कंपनीचे भागधारक आणि मंडळ यांनी मंजूर केलेल्या कर्ज, उसनवारी यांच्या मर्यादा पुरेशा आहेत. कंपनीच्या पतस्थितीला दर्जा देणाऱ्या नामांकित संस्थांकडून चांगला दर्जा मिळाल्यास देशांतर्गत बाजारपेठेकडून निधी प्राप्त होण्यास त्याची मदत मिळते. निधीच्या स्त्रोताची विविधता आणि शक्तीवान रोकडता प्रवाह आवश्यक भांडवली शिस्त राखण्यासाठी सक्षम असते. महानिर्मिती कंपनीने तिच्या भांडवली पुरवठ्याच्या रचनेत विविधता ठेवली आहे. यामध्ये कालानुसार मुदत पूर्ण होणाऱ्या ठेवी आणि चलनी पैसा यांच्या वित्तीय उत्पादनाचे मिश्रण आहे. या वित्तीय उत्पादनामध्ये खरेदीदारांचे क्रेडिट लोन, स्वच्छ व प्रतिभूती असलेली देशांतर्गत मुदतीची कर्जे (तसेच भारत सरकार व महाराष्ट्र शासनाकडून व महाराष्ट्र सरकारकडून परतफेडीची वसुली करण्याच्या तत्वावर) इत्यादी यांचा समावेश होतो. महानिर्मिती कंपनी देशांतर्गत तसेच जागतिक बँक, आय. बी.आर.डी.के. एफ. डब्ल्यू यासारख्या परदेशी वित्तीय संस्थांशी संपर्क साधून योग्य प्रकारे विविध स्वरूपात निधी मिळविते. यामध्ये भौगोलिक वैविध्यही आहे.

**२) वित्तीय दायित्वांची मुदत पूर्ण होणे**

करारानुसार आणि पात्र नसलेल्या रोकडता प्रवाहातील रकमा खालील तक्त्यात प्रकट केल्या आहेत. **(₹ कोटीत)**

| तपशील | कंत्राटचा रोकडता प्रवाह | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०२५ | | | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) | | |
| | १ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा अधिक | १ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा अधिक |
| **डेरिव्हेटीव्ह नसलेले वित्तीय दायित्वे** | | | | | | |
| कर्जे (दिर्घ मुदतीत) | ६,०१०.७२ | १२,५६७.८३ | ११,८१८.२१ | २,९३०.४७ | १२,४१०.५३ | १२,३१४.०१ |
| कर्जे (अल्प मुदतीत) | १०,९४४.०७ | | | ९,६९४.२९ | | |
| व्यापार देय | १०,६०६.७३ | | | ९,८१५.३० | | |
| भाडेपट्टी दायित्वे | १८४.७१ | ४३०.४७ | २,२४३.३४ | १७३.९१ | ३९२.०९ | २,५१९.१२ |
| इतर दायित्वे | ४,२६६.३० | | | ४,३७७.४७ | - | - |
| **एकूण** | **३२,०१२.५२** | **१२,९९८.३०** | **१४,०६१.५५** | **२६,९९१.४४** | **१२,८०२.६२** | **१४,८३३.१३** |

**टिपा क्र. ४४ क - बाजारपेठेतील धोके पुढीलप्रमाणे**

**टिपाक्र. ४४ क - १ चलनातील धोके**

कंपनीने के. एफ. डब्ल्यू. जर्मनी आणि आय.बी.आर.डी. (जागतिक बँक) यांचेकडून परकीय चलनात घेतलेल्या कर्जाना परकीय चलनातील बदलाचे धोके संभवतात. आम्हांला २.९१ कोटी यू एस डॉलर (मागील वर्षी. ३.१० कोटी यू एस डॉलर) अशी कर्जे आढळली. मात्र कंपनी दर नियमनाच्या वातावरणात काम करते परिणामी, परकीय चलनातील बदलाची समस्या प्रत्यक्ष ग्राहकाकडील वसूलीने हातात येऊ शकते. म्हणून परकीय चलनातील बदलांचा मोठा धोका कंपनीला नाही.

**टिपा क्र. ४४ क - २ व्याजदरातील धोके**

व्याज दरातील धोके हाताळणे

| | निर्देशित रक्कम कोटीत | |
|---|---|---|
| | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) |
| **स्थिर दरांचे विलेख** | | |
| वित्तीय मत्ता | - | - |
| वित्तीय दायित्वे | - | ४१.२४ |
| **दर बदल होणारे विलेख** | | |
| वित्तीय मत्ता | - | - |
| वित्तीय दायित्वे | ४१,३४०.८२ | ४०,७२७.९२ |

**दर बदल होणाऱ्या विलेखाची रोकडता विश्लेषण**

अहवालाच्या तारखेला व्याज दरात १०० आधार बिंदू इतका रास्त व शक्य बदल झाला असता तर त्यामुळे नफा किंवा तोटा यात होणारी वाढ / (घट) खालील तक्त्यात दिली आहे. तसेच निदर्शक १०० आधार बिंदू (१ टक्के) स्थलांतर हे केवळ दिशादर्शक आहे आणि त्यातून व्यवस्थापनाचे व्याज दर बदलाचे अंदाज व्यक्त होत नाहीत. या विश्लेषणात असे गृहित धरले आहे की, इतर सर्व फरक, विचलन विशेषत: परकीय चलन विनिमय दर हे स्थिर आहेत.

| तपशील | (नफा किंवा तोटा) | | | |
|---|---|---|---|---|
| | १०० आधार बिंदू वाढ | १०० आधार बिंदू घट | १०० आधार बिंदू वाढ | १०० आधार बिंदू घट |
| | ३१.०३.२०२५ | | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) | |
| तरता दराचे कर्ज | ४१३.४१ | (४१३.४१) | ४०७.२८ | (४०७.२८) |
| व्याज दर अदलाबदल (संकल्पनेतील मुद्दल रक्कम) | - | - | - | - |
| रोकडता प्रवाहाची संवेदनशिलता (निव्वळ) | ४१३.४१ | (४१३.४१) | ४०७.२८ | (४०७.२८) |

**टिपा क्र. ४४ क - ३ वस्तु संबंधी धोके**

कंपनीचे कार्य हे जेथे दराचे नियमन केले जाते अशा वातावणात चालते. कंपनीच्या खर्चात मुख्य वाटा कोळशाच्या खर्चाचा आहे. कोळसा खर्चातील प्रत्यक्ष बदलाची वसूली ग्राहकांच्या येण्यातून करण्यास परवानगी आहे. मात्र ती कामगिरीचे मापदंड पूर्ण करण्याच्या अटीच्या अधीन आहे. म्हणून कोळसा किंमतीतील बदलाचा कंपनीस मोठा धोका नाही.

**टिप क्र. ४५ भाडेपट्टी**

**अ) भाडेकरू म्हणून भाडेपट्टी**

महानिर्मिती कंपनी जलविद्युत निर्मिती केंद्रे (मुद्दा क्र. ड बघा), जमिनी, कार्यालयाच्या जागा, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आणि इतर हेतुसाठी भाड्याने जागा कराराने घेते. हे करार रद्द करणे / न करणे अशा स्वरूपाचे असतात. भारतीय लेखा मानक ११६ यातील बंधनकारक तरतूदीनुसार कंपनीने तिच्या ताळेबंदात मता वापरण्याचे हक्क आणि त्यानुसार भाड्याचे दायित्व यांना मान्यता दिलेली आहे. याचा परिणाम म्हणून भाड्याच्या मतांचा घसारा आणि भाडेपट्टीच्या दायित्वाचे व्याज यांना नफातोटा पत्रकात मान्यता देण्यात आलेली आहे. रद्द न करता येणाऱ्या भाडेपट्टीच्या भाडे दायित्वासाठी विनाविलंब रोख प्रवाह खालीलप्रमाणे:

**१) भाड्याच्या दायित्वातील बदल** **(₹ कोटीत)**

| तपशील | ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| १ एप्रिल, २०२४ रोजीची शिल्लक | ३,०३२.४३ | ३,०६९.९० |

| | | |
|---|---|---|
| भर / वजा | (०.१०) | १२६.४९ |
| या मुदतीत उपार्जित वित्त खर्च | ३१०.८१ | ३२७.६२ |
| भाडेपट्टी दायित्वाचा भरणा | ४८४.६३ | ४९१.५८ |
| **३१ मार्च २०२५ रोजीची शिल्लक** | **२,८५८.५२** | **३,०३२.४३** |

**ब) भाडेपट्टी दायित्वाच्या मुदतपूर्तीचे विश्लेषण** **(₹ कोटीत)**

| तपशील | ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| मुदतपूर्तीचे विश्लेषण- कंत्राटानुसार विना सवलतीचा रोकडता प्रवाह | | |
| एक वर्षापेक्षा कमी | १८४.७१ | १७३.८१ |
| एक ते पाच वर्षासाठी | १,०५१.१३ | १,०१६.३३ |
| पाच वर्षांपेक्षा जास्त | १,६२२.६९ | १,८४२.१९ |
| **एकूण विनासवलत भाडे दायित्व** | **२,८५८.५२** | **३,०३२.३३** |

**क) नफा तोटा पत्रकात मान्यता दिलेल्या रकमा** **(₹ कोटीत)**

| तपशील | ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| भाडेपट्टी दायित्वाचे व्याज | ३१०.८१ | ३२७.६२ |
| भाडेपट्टीच्या मत्ताचा घसारा | २५७.५५ | २५७.५५ |

**ड) विविध जलविद्युत निर्मिती सुविधांबाबत महाराष्ट्र सरकारसोबतचे भाडेपट्टा करार अद्याप अंमलात आलेले नाहीत वीज खरेदी व्यवस्थेत भाडेपट्टीची निश्चिती**

महानिर्मिती कंपनीने महावितरण या कंपनी सोबत वीज खरेदी करार केलेला आहे. महानिर्मितीने निर्माण केलेल्या विजेचा बहुतांश वाटा महावितरणला विकण्यात येतो. म्हणून भारतीय लेखा मानक ११७ मधील परिशिष्ट सी यातील अटींनुसार कंपनीने वीज खरेदी कराराचे परिक्षण केले. जेणेकरून या करारामध्ये भाडेपट्टी संबंधी तरतूद आहे किंवा कसे हे समजावे. त्यातून असे निदर्शनास आले की, या करारानुसार महावितरण कंपनीला मत्ता वापरण्याचा हक्क आहे परंतु वीज निर्मितीसाठी उपलब्ध वीज केंद्राची देखभाल केलेली नसल्यामुळे होणारे तोटे महानिर्मिती कंपनीला सोसावे लागतील. त्यासाठी या मर्यादितील अधिकार आणि मोबदले यांचे महावितरणकडे हस्तांतरण केलेले नाही. यामुळे ही व्यवस्था वित्तीय भाडेपट्टीचे निकष पूर्ण करीत नाही.

**टिप क्र. ४६ प्रतिभाग मिळकत (ईपीएस )**

समभाग धारकांना देय असलेल्या प्रतिभाग मिळकतीचा हिशेब वर्षातील नफ्याला त्यावर्षातील वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सच्या संख्येने भागून केला जातो.

सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीचा हिशेब भागाधारकांना देय असलेल्या वर्षातील निव्वळ नफा किंवा तोटा यास वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सच्या संस्थेने त्यासाठी सौम्य करण्याजोगे जे सर्व संभाव्य इक्विटी शेअर्स दिले गेले असते त्याची वेटेड ॲव्हरेज संख्या विचारात घेण्यात येते. प्रतिभाग मिळकतीचा हिशोब करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने सुधारी कंपनीमार्फत जी बांधिलकी वाटप प्रलंबित असलेल्या शेअर्स ॲप्लिकेशन मनीसाठी दिलेला आहे, त्याचे वाटप कायम झालेले आहे असे समजण्यात आले आहे.

| तपशील | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| समभाग धारकांना देय नफा: मूळ प्रतिभाग मिळकतीसाठी (₹) | ३५९.९७ | १३५.६९ |
| समभाग धारकांना देय नफा: सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीसाठी (₹) | ३५९.९७ | १३५.६९ |
| **२. सामान्य वेटेड ॲव्हरेज शेअर्सची संख्या:** | | |

| तपशील | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| समभाग ज्याचे नाममात्र मूल्य १० प्रतिसमभाग | २६,३०,४१,८६,३२९ | २६,७४,२९,१६,६३२ |
| **मूळ आणि सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीसाठी वेटेड ॲव्हरेज शेअर्सची संख्या** | **२६,३०,४१,८६,३२९** | **२६,७४,२९,१६,६३२** |
| **मूळ आणि सौम्यकृत प्रतिभाग मिळकत (₹)** | **०.१४** | **०.०५** |

**टिप क्र. ४७ भांडवल व्यवस्थापन**

कंपनीच्या भागधारकांना विश्वास कायम असावा आणि भविष्यात उद्योग कायम चालावा यामागे भक्कम भांडवल पाया असला पाहिजे असे कंपनीचे धोरण आहे. भांडवलाच्या परताव्याकडे व्यवस्थापन लक्ष देत असते. त्यासाठी कंपनी कर्ज व समभाग यांच्या गुणोत्तराचा उपयोग करून भांडवलाचे नियोजन करते. ३१ मार्च २०२५ रोजी कंपनीचे कर्ज समभाग गुणोत्तर खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| दिर्घ मुदतीचे कर्ज ( कोटीत) | २४,३८६.०३ | २८,१४४.४० |
| समभाग भांडवल ( कोटीत) | २६,३०४.१९ | २६,११५.४० |
| **कर्ज व समभाग यांचे गुणोत्तर** | **०.९३** | **१.०८** |

**टिप क्र. ४८ लाभांश**

कंपनीने वर्षभरात कोणताही लाभांश जाहीर केलेला नाही/दिलेला नाही.

**टिप क्र. ४९**

मागील वर्षाच्या आकडेवारीचे जेथे गरज असेल तेथे पुनर्वर्गीकरण केलेले आहे.

**टिप क्र. ४९ अ)**

कंपनी सर्व रक्कम करोड रूपयांमध्ये रूपांतरण केल्यानंतर वार्षिक विवरणपत्र तयार करते. सर्व आकडे, पूर्ण बेरज, आणि उपबेरीज यांच्याशी जुळतात, तथापि कोटीमध्ये सादर करताना गणितीय त्रुटी दिसू शकतात. अशा काल्पनिक गणितीय त्रुटी दूर करण्यासाठी कंपनीकडून कोणतेही समायोजन केले जात नाही.

**टिप क्र. ४९(ब) पुनर्लिखितची कारणे** **(₹ कोटीत)**

| नफा आणि तोटा विवरणपत्र | ३१ मार्च २०२४ (मागील नोंदवलेले) | त्रुटी सुधारल्यामुळे वाढ/(कमी) | ३१ मार्च २०२४ (पुनर्लिखित) | कारण |
|---|---|---|---|---|
| वीज विक्री | २९६७३.३५ | -१.५१ | २९६७४.८६ | आर्थिक वर्ष २०२३-२४ शी संबंधित ऊर्जा बिल आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये बुक केले आहे. |
| इतर उत्पन्न | ३०११.४१ | ०.२५ | ३०११.१६ | मागील वर्षाची किरकोळ प्राप्ती |
| वापरलेल्या साहित्याचा खर्च | २२११९.३० | ५.१२ | २२१२४.४२ | कोळसा खर्चातील सुधारणा |
| कर्मचारी लाभ खर्च | २२५७.०६ | ३४.४० | २२९१.४६ | सीपीएफ नुकसानीची तरतूद वगळणे |
| वित्त खर्च | ३६१०.९४ | १.४६ | ३६१२.४० | विक्रेत्यांना दिलेले व्याज |
| घसारा आणि मूल्यऱ्हास खर्च | २६८७.७४ | ६.५० | २६९४.२४ | मागील वर्षाच्या घसाऱ्यात सुधारणा करणे |
| इतर खर्च | २२९७.६८ | ४.२४ | २३०१.९२ | कायदेशीर आणि व्यावसायिक शुल्क |
| स्थगित कर खर्च / (प्राप्ती) | १८२.४९ | -१२.७० | १६९.७९ | करपूर्व नुकसानीच्या रकमेत बदल झाल्यामुळे कर तरतुदीत बदल. |

| ताळेबंद पत्रक | ३१ मार्च २०२४ (मागील नोंदवलेले) | त्रुटी सुधारल्यामुळे वाढ/ (कमी) | ३१ मार्च २०२४ (पुनर्लिखित) | कारण | १ एप्रिल २०२३ (मागील नोंदवलेले) | त्रुटी सुधारल्यामुळे वाढ / (कमी) | १ एप्रिल २०२३ (मागील नोंदवलेले) (पुनर्लिखित) | कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मालमत्ता, कारखाने व साधने | २९,२५३.३९ | ३५.६९ | २९,२८९.०८ | एका गटातून दुसऱ्या गटात वस्तूंचे पुनर्गठन आणि इतर सुधारणा | ३१,०३१.६६ | ११९.५५ | ३१,१५१.२१ | एका गटातून दुसऱ्या गटात वस्तूंचे पुनर्गठन |
| १२ महिन्यांपेक्षा जास्त मुदतीच्या बँक ठेवी | १५३.९४ | (५३.९४) | १००.०० | १२ महिन्यांपेक्षा कमी मुदत ठेवीची मुदतपूर्ती वेगवेगळी दाखवली आहे. | | | | |
| इतर चालू नसलेल्या मत्ता | ७४८.९३ | ५३.६४ | ८०२.५७ | सिंचन विभागाला देय असलेली रक्कम आता ₹ ६५.७९ कोटी वेगळी दाखवली आहे. पूर्वी ती महाराष्ट्र सरकारच्या सिंचन विभागाला दिलेल्या आगाऊ रकमेशी जुळवून घेण्यात आली होती. शिवाय, मागील वर्षी आयकर तरतूद होती. | ६२१.९३ | ५२.२१ | ६७४.१४ | सिंचन विभागाला देय असलेली रक्कम आता ₹ ६५.७९ कोटी वेगळी दाखवली आहे. पूर्वी ती महाराष्ट्र सरकारच्या सिंचन विभागाला दिलेल्या आगाऊ रकमेशी जुळवून घेण्यात आली होती. शिवाय, मागील वर्षी आयकर तरतूद होती. |
| रोख व रोख समतुल्य | ६.८५ | ०.७३ | ७.५८ | एका गटातून दुसऱ्या गटात वस्तूंचे पुनर्गठन | | | | |
| रोख रक्कम आणि समतुल्य रोख रकमेव्यतिरिक्त इतर बँक शिलकी | - | ५३.९४ | ५३.९४ | १२ महिन्यांपेक्षा कमी मुदत ठेवीची मुदतपूर्ती वेगवेगळी दाखवली आहे. | | | | |
| विक्री/ विल्हेवाटी साठी वर्गीकरण केलेल्या मत्ता | ४२.१९ | (४२.१९) | - | एका गटातून दुसऱ्या गटात वस्तूंचे पुनर्गठन | ११९.५५ | (११९.५५) | - | एका गटातून दुसऱ्या गटात वस्तूंचे पुनर्गठन |
| इतर समभाग - राखीव आणि अधिक्य | (९,९६७.०३) | ४९.९० | (१०,०१६.९३) | नफा आणि तोटा खात्यातील बदलाचा परिणाम | (१०,१०९.७०) | १२.१५ | (१०,१२१.८५) | मागील वर्षाच्या कर तरतुदीतील बदलांचा परिणाम |
| चालू नसलेली - कर्जे | २४,७२४.५४ | (३,४१९.८६) | २८,१४४.४० | चालू कर्जापासून चालू नसलेल्या कर्जापर्यंतच्या बाबींचे पुनर्गठन | २४,६८७.३४ | १.४३ | २४,६८५.९१ | एका गटातून दुसऱ्या गटात वस्तूंचे पुनर्गठन |
| स्थगित कर दायित्वे | ६९.६८ | १२.७० | ५६.९८ | करपूर्व नुकसानीच्या रकमेत बदल झाल्यामुळे कर तरतुदीत बदल. | | | | |
| चालू -कर्जे | १६,०४३.८९ | ३,४१९.१३ | १२,६२४.७६ | करपूर्व नुकसानीच्या रकमेत बदल झाल्यामुळे कर तरतुदीत बदल. | | | | |
| व्यापारी देणी (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक व्यतिरिक्त) | ९,७४७.६५ | (६५.७९) | ९,८१३.४४ | सिंचन विभागाला देय असलेली रक्कम आता वेगळी दाखवली आहे. पूर्वी ती महाराष्ट्र सरकारच्या सिंचन विभागाला दिलेल्या अग्रिम रकमेशी समायोजित केली जात होती. | ८,१०२.१९ | (६५.७९) | ८,१६७.९७ | सिंचन विभागाला देय असलेली रक्कम आता वेगळी दाखवली आहे. पूर्वी ती महाराष्ट्र सरकारच्या सिंचन विभागाला दिलेल्या अग्रिम रकमेशी समायोजित केली जात होती. |
| इतर वित्तीय दायित्वे | ४,३३३.५२ | (४३.९५) | ४,३७७.४७ | नफा आणि तोटा बाबींमुळे देयतेचा परिणाम | | | | |

## टिप क्र. ५० गुणोत्तर विश्लेषण

| अ. क्र. | तपशील | ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता (पुनर्लिखित) | % भिन्नता | भिन्नतेची कारणे (जिथे भिन्नता २५% पेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १ | चालू मालमत्ता (अ) | ३५,६६७.२२ | ३१,२७८.९६ | | |
| | चालू दायित्वे (ब) | ३२,४२२.३१ | २७,४२८.९९ | | |
| | वर्तमान गुणोत्तर (अ/ब) | १.१० | १.१४ | (४%) | |
| २ | कर्ज | ४१,३४०.८२ | ४०,७६९.१६ | | |
| | समभाग | १६,४०२.५२ | १६,०९८.४६ | | |
| | कर्ज समभाग गुणोत्तर | २.५२ | २.५३ | ०% | |
| ३ | घसारा व्याज व कर पूर्वीचा नफा (अ) | ७,२०१.२४ | ६,६१२.१३ | | |
| | परतफेड व व्याज (ब) | ८,८३२.८७ | ८,६८१.७८ | | |
| | कर्जसेवा कव्हरेज प्रमाण (अ/ब) | ०.८२ | ०.७६ | ७% | |
| ४ | कर नंतरचा नफा (अ) | ३०४.०६ | ७.२७ | | वर्षभरात कंपनीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहुवर्षीय दर आदेशानुसार ‘टू-अप’ उत्पन्नाची नोंद केली आहे. |
| | समभाग (ब) | १६,२५०.४९ | १५,९४७.५६ | | |
| | समभागावर परतावा (अ/ब) | १.८७% | ०.०५% | ४००६% | |
| ५ | विक्री केलेल्या वस्तूंचा खर्च (अ) | २३,३३१.७१ | २२,६८०.१३ | | |
| | वस्तुमाल (ब) | ३,२९८.६० | २,५२९.१८ | | |
| | वस्तुमालचे उलाढालीशी प्रमाण (अ/ब) | ७.०७ | ८.९७ | (२१%) | |
| ६ | उलाढाल (अ) | ३४,३५५.७८ | २९,६७४.८६ | | |
| | व्यापारी येणी (ब) | २८,६६८.४५ | २४,८२२.२६ | | |
| | व्यापारी येणीचे उलाढालीशी प्रमाण (अ/ब) | १.२० | १.२० | ०% | |
| ७ | विक्री केलेल्या वस्तूंचा खर्च (अ) | २३,३३१.७१ | २२,६८०.१३ | | |
| | व्यापार देयके (ब) | १०,२११.०१ | ८,९९२.१४ | | |
| | व्यापार देयके उलाढालीशी प्रमाण (अ/ब) | २.२८ | २.५२ | (९%) | |
| ८ | उलाढाल (अ) | ३४,३५५.७८ | २९,६७४.८६ | | |
| | निव्वळ भांडवल (ब) | १६,४०२.५२ | १६,०९८.४६ | | |
| | निव्वळ भांडवल याचे उलाढालीशी प्रमाण (अ/ब) | २.०९ | १.८४ | १४% | |
| ९ | कर नंतरचा नफा (अ) | ३०४.०६ | ७.२७ | | वर्षभरात कंपनीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहुवर्षीय दर आदेशानुसार ‘टू-अप’ उत्पन्नाची नोंद केली आहे. |
| | उलाढाल (ब) | ३४,३५५.७८ | २९,६७४.८६ | | |
| | निव्वळ नफ्याचे प्रमाण (अ/ब) | ०.८९% | ०.०२% | ३५१४% | |
| १० | व्याज व कर पूर्वीचा नफा (अ) | ४,२२१.९८ | ३,९१७.८९ | | |
| | भांडवलीचे वापर (ब) म्हणजे संपूर्ण मत्ता वजा चालू दायित्वे | ४०,७८८.५६ | ४४,२४२.८६ | | |
| | नियोजित भांडवलावर परतावा (अ/ब) | १०.३५% | ८.८६% | १७% | |

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## एकत्रित लेखापरिक्षक यांचा अहवाल

प्रति, मा. सदस्य, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी एकत्रित वित्तीय वितरण पत्रकांच्या लेखापरिक्षणाचा अहवाल.**

**पात्र मत**

१. आम्ही **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित** (यापुढे कंपनीचा उल्लेख ''एमएसपीजीसीएल/महानिर्मिती''/''सुत्रधारी कंपनी'' असा केला आहे) तसेच तिच्या उपकंपन्यांच्या संलग्न वित्तीय विवरणांचे लेखापरीक्षण केले आहे (सुत्रधारी कंपनी व उपकंपन्या एकत्रितपणे ''कंपनी समुह'' म्हणून संबोधले जातात). तसेच कंपनी समुहाच्या सहयोगी व संयुक्त उपक्रमातील नफ्याचा वाटा, ज्यामध्ये दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी पर्यंतचा एकत्रित ताळेबंद, याच तारखेला संपलेल्या वर्षासाठी एकत्रित नफा आणि तोटा पत्रक (इतर सर्वकष उत्पन्नासह), एकत्रित इक्विटीतील बदलांचे विवरणपत्र, एकत्रित रोकडता प्रवाहाची विवरण पत्रके तसेच एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील टिपा, महत्त्वपूर्ण लेखा धोरणांचा सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे. (येथून पुढे या सर्वांचा ''एकत्रित वित्तीय विवरण पत्रके'' असा उल्लेख केला आहे.)

२. आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार, आमच्या अहवालातील पात्र मताचा आधार या विभागात वर्णन केलेल्या बाबींचे परिणाम/संभाव्य परिणाम तसेच महत्त्वाच्या बाबींचा भर या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबी वगळता, वरील एकत्रित वित्तीय विवरण पत्रके, कंपनी कायदा, २०१३ (कायदा) अंतर्गत आवश्यक त्या पद्धतीने अपेक्षित माहिती प्रदान करतात आणि कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत अधिसूचित भारतीय लेखा मानके तसेच कंपन्या (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ मध्ये केलेल्या सुधारणा व भारतात सर्वसाधारणपणे स्वीकृत इतर लेखा तत्त्वांशी सुसंगत राहून कंपनी समुह व त्याच्या सहयोगी व संयुक्त उपक्रमाची दिनांक ३१ मार्च २०२५ रोजीची स्थिती, त्यांचा एकत्रित नफा, त्यांचे एकत्रित सर्वसमावेशक उत्पन्न, एकत्रित इक्विटीतील बदल आणि त्या दिनांकास समाप्त झालेल्या वर्षासाठी एकत्रित रोकडता प्रवाह यांच्या स्थितीबद्दल यथार्थ आणि रास्त दर्शन घडवतात.

**पात्र मताचा आधार:**

**सुत्रधारी कंपनी - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

३. आम्ही खालील बाबींकडे लक्ष वेधू इच्छितो

अ) टिप क्रमांक ४३(अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, सुत्रधारी कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) ला देय करावयाच्या विलंब भरणा अधिभार (एलपीएस) उत्पन्नाची गणना ₹ ३,१४९.८३ कोटी (मागील वर्षी ₹ २,६७४.१८ कोटी) थकबाकीच्या उशिरा देयकासाठी व्याज म्हणून केली आहे. अशा उत्पन्नाचा मागील वर्षांमध्ये महावितरणने अंशत: स्वीकार केलेला नाही. मागील वर्षांमध्ये महावितरणने न स्वीकारलेली विलंब भरणा अधिभाराची एकूण रक्कम ३१ मार्च २०२५ रोजी ₹ १६,९९६.१९ कोटी आहे (मागील वर्षी ₹ १५,५९३.६३ कोटी). या व्यतिरिक्त, महावितरणने वीज आणि पूरक बिले आणि मागील कालावधी समायोजनासंदर्भात इतर बिले विवादित केली आहेत. ३१ मार्च २०२५ रोजी वीज आणि पूरक बिलांच्या संदर्भात वादग्रस्त बिलांची शिल्लक आणि मागील कालावधीचे समायोजन ₹ ३३८.०८ कोटी (मागील वर्षी ₹ ४२९.२५ कोटी) आणि ₹ १३७.६१ कोटी (मागील वर्षी ₹ १३७.६१ कोटी) इतके आहे. या वादग्रस्त रकमेच्या वसुलीच्या अनिश्चिततेमुळे, सुत्रधारी कंपनीच्या नफ्यावर आणि समभागावर होणारा परिणाम आणि त्याचा व्यापार प्राप्ती आणि विना देय येणीवर (टिप ६) होणारा परिणाम यावर आम्ही भाष्य करू शकत नाही. या वर्षी सुत्रधारी कंपनीने सदर प्राप्ती योग्य रकमेविरुद्ध ₹२,८३३.०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अशा तरतुदीचा कोणताही आधार आम्हाला उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. याव्यतिरिक्त, सुत्रधारी कंपनीने वरील बिलांना ''चालू नसलेल्या मत्ता'' अंतर्गत विवादित व्यापारी येणी असे न नोंदवता ''चालू मत्ता'' अंतर्गत व्यापारी येणी (टिप ६) अशी नोंद केली आहे. जे भारतीय लेखा मानक १ ''वित्तीय विवरणपत्रांचे सादरीकरण'' मध्ये नमूद केलेल्या प्रकटीकरण आवश्यकतांच्या विरुद्ध आहे. तसेच सुत्रधारी कंपनीने वरील प्राप्ती निर्विवाद म्हणून उघड केल्या आहेत जे कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची III नुसार नाही. सुत्रधारी कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

ब) टिप क्रमांक ४३(ई) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्यामध्ये (टिप ५) महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ लिमिटेड (एमएसएमसी) कडून धुतलेला कोळसा (पुनर्प्राप्त) २१.३२ लाख मेट्रिक टन कच्चा कोळसा (१६.८२ लाख मेट्रिक टन धुतलेल्या कोळशात रूपांतरित) (मागील वर्षी १६.६६ लाख मेट्रिक टन कच्चा कोळसा १३.५४ लाख मेट्रिक टन धुतलेल्या कोळशात रूपांतरित) ₹ ५७१.०० कोटी (मागील वर्षी ₹ ४५०.१५ कोटी) यांचा समावेश आहे. तथापि,

एमएसएमसीने अशा दाव्याच्या स्वीकृतीबाबत पुरेसा आणि योग्य लेखापरीक्षण पुरावा नसल्यामुळे, अशा पुनर्प्राप्त कोळशाच्या प्रमाणाची पुनर्प्राप्ती आणि त्याचा कंपनीचा नफा आणि तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्यावर परिणाम यावर आम्ही भाष्य करण्यास असमर्थ आहोत. सुत्रधारी कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

क) सुत्रधारी कंपनीने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा, २००६ (एमएसएमई कायदा) अंतर्गत आवश्यक कालावधीपेक्षा बिलंबीत भरण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) देय व्याज म्हणून ₹ २.१८ कोटी (मागील वर्षी ₹ १.६८ कोटी) नोंदविले आहेत. एमएसएमई कायद्याच्या कलम १६ नुसार आवश्यक असलेले व्याज सुत्रधारी कंपनीने संबंधित विक्रेत्यांना दिलेले नाही (टिपा क्र. ३४(अ) पहा). शिवाय, एमएसएमई कायद्यांतर्गत येणाऱ्या उद्योगांची ओळख पटविण्यासाठी सुत्रधारी कंपनीकडे योग्य व्यवस्था नाही. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची ओळख पटविण्यासाठी योग्य प्रणाली आणि लेखा संगणक प्रणालीमध्ये एमएसएमई कायद्यांतर्गत ओळखल्या जाणाऱ्या उद्योगांची स्थिती जाणण्यासाठी आवश्यक प्रणाली नसल्यामुळे, अशा उद्योगांसाठी असलेल्या व्याजाच्या तरतुदी, सुत्रधारी कंपनीच्या नफ्यावर होणारा परिणाम आणि एकत्रित वित्तीय विवरणपत्रांच्या टिप क्रमांक ३४(अ) मध्ये केलेल्या खुलाशावर आम्ही भाष्य करू शकत नाही. सुत्रधारी कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

ड) भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने (एमओइएफ) जारी केलेल्या ०३ नोव्हेंबर २००९ च्या राजपत्र अधिसूचनेनुसार (सूचना) फ्लाय ॲशच्या विक्रीतून जमा होणारी रक्कम १००% फ्लाय ॲश वापर पातळी गाठेपर्यंत पायाभूत सुविधा किंवा सुविधांच्या विकासासाठी, फ्लाय ॲशच्या वापरासाठी प्रोत्साहन आणि सुविधा उपक्रमांसाठी वापरली जाणे आवश्यक आहे. सदर अधिसूचनेनुसार सुत्रधारी कंपनीने अशी माहिती वेगळ्या शीर्षकात ठेवणे देखील आवश्यक आहे. वर्षअखेर सुत्रधारी कंपनीने इतर चालू आर्थिक देणी (टिप क्र. १९) या शीर्षकाखाली ₹ ४०१.७५ कोटी (मागील वर्षी ₹ ३१९.३६ कोटी) फ्लाय ॲश वापर निधी जमा केला आहे. सुत्रधारी कंपनीने निर्माण केलेल्या फ्लाय ॲश निधीचा वापर तिच्या कामकाजासाठी केला आहे जो सदर अधिसूचनेचे उल्लंघन आहे. शिवाय सुत्रधारी कंपनीने वेगळ्या बँक खात्यात निधी जमा केलेला नाही. सुत्रधारी कंपनीच्या मते, निधी वेगळ्या बँक खात्यात ठेवण्याची कोणतीही अट नाही. (टिप क्र. ३१ पहा). सुत्रधारी कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

इ) व्यापार देय, व्यापार प्राप्ती, पुरवठादारांना आगाऊ रक्कम, सुरक्षा ठेव, राखीव ठेवी, महाराष्ट्र सरकारची खाती आणि कर्जे ही सामंजस्य आणि परिणामी समायोजनाच्या अधीन आहेत. अशा सामंजस्य आणि समायोजनाच्या अनुपस्थितीत, या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर उद्भवू शकणाऱ्या समायोजनांचा किंवा प्रकटीकरणाचा, जर काही असेल, तर त्याचा काय परिणाम होईल हे आम्ही निश्चित करू शकत नाही. सुत्रधारी कंपनीच्या संविधानिक लेखापरीक्षकांनी मागील वर्षांमध्ये वरील बाबीबाबत पात्र मत व्यक्त केले आहे.

फ) सुत्रधारी कंपनीला ''वित्तीय साधनांवर'' भारतीय लेखा मानक १०९ नुसार आवश्यक असलेल्या वित्तीय मत्तेवर ''अपेक्षित तोट्याची तरतूद'' करणे आवश्यक आहे. सुत्रधारी कंपनी व्यापारी येणी यावर अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची गणना करण्यासाठी प्रोव्हिजन मॅट्रिक्स वापरत नाही, तसेच अशा येण्यावरील क्रेडिट जोखीम मूल्यांकन करताना कोणत्याही क्रेडिट मूल्यांकन आणि आजीवन क्रेडिट मूल्यांकनाचा विचार करत नाही आणि 'इतर वित्तीय मत्तेच्या' बाबतीत, त्यांनी भारतीय लेखा मानक १०९ च्या तरतुदींमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांनुसार, अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची गणना करण्यासाठी सामान्य दृष्टिकोन अवलंबलेला नाही.

तथापि, सुत्रधारी कंपनी विशिष्ट तरतुद आणि कंपनीच्या सर्वोत्तम अंदाजांवर आधारित अपेक्षित तोट्याच्या तरतूदीची नोंद करते. वरील बाबी लक्षात घेता, सुत्रधारी कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर त्याचा परिणाम काय होईल यावर आम्ही भाष्य करू शकत नाही.

ग) सुत्रधारी कंपनीच्या लेखा धोरणानुसार, भांडारातील सामान सुटे भाग या सह माल साठयाचे मूल्यांकन त्यांचा खर्च आणि त्यांचे वसूली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते. आणि खर्च हा वेटेड अव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो.भांडारातील सेवेस निरूपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्या बाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते. या हेतुसाठी सुत्रधारी कंपनी मंद हलणाऱ्या वस्तु मालासाठी ३०%, २ वर्षा पर्यन्त अचल वस्तु मालासाठी ६०% आणि २ वर्षापेक्षा जास्त अचल वस्तु मालासाठी ८०% या दराने तरतूद केली जाते. निकामी वस्तु मालासाठी पूर्णपणे तरतूद केली जाते. ३१ मार्च २०२५ रोजी अशा साठ्यासाठी एकूण तरतूद ₹ ३९९.८२ कोटी आहे (मागील वर्षी ₹ ४१०.५९ कोटी). अशा तरतुदीची गणना लेखा संगणक प्रणालीमध्ये केली गेली आहे. आमच्याकडून केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आम्हाला अशा निकामी वस्तु मालाची ओळख पटवण्यात आणि अशा तरतुदीची गणना करण्यात त्रुटी आढळून आल्या आहेत.

गणनेतील अशा चुकांचा तरतुदीवर होणारा परिणाम सुत्रधारी कंपनीने निश्चित केलेला नाही. त्यामुळे, सुत्रधारी कंपनीच्या नफ्यावर आणि समभागावर होणारा परिणाम आणि परिणामी भांडारातील सामानाच्या मूल्यावर(टिप क्रमांक ५) होणारा परिणाम यावर आम्ही भाष्य करू शकत नाही.

ह) ३१ मार्च २०२५ रोजी प्रगतीपथावर असलेल्या भांडवली कामाच्या बाबतीत, सुत्रधारी कंपनीला प्रकल्प पूर्ण होण्याची अपेक्षित तारीख आणि मालमत्ता/प्रकल्पाची प्रत्यक्ष किंमत मूळ योजनेनुसार अंदाजे खर्चापेक्षा जास्त असल्याचे किंवा मालमत्ता/प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष वेळेची मर्यादा मूळ योजनेनुसार अंदाजे वेळेपेक्षा जास्त असल्याचे, जर असेल तर, उघड करणे आवश्यक आहे. सुत्रधारी कंपनीने एकत्रित वित्तीय विवरणपत्रांमध्ये असे कोणतेही खुलासे केलेले नाहीत, जे कायद्याच्या अनुसूची २ च्या विभाग ३ च्या आवश्यकतांचे काटेकोरपणे पालन करत नाही.

४. या बाबींचा पुरेसे आणि योग्य ऑडिट पुरावे मिळविण्यात अक्षमतेमुळे काही प्रकरणांमध्ये अज्ञात असलेल्या वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे, एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर होणारा परिणाम महत्त्वाचा आहे. काही समायोजन आवश्यक आहे की नाही यावर आम्ही भाष्य करू शकत नाही.

५. आम्ही आमचे लेखापरीक्षण कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) अंतर्गत केलेल्या लेखापरीक्षणाची मानके यानुसार केले आहे. त्या मानकांखालील आमच्या जबाबदाऱ्यांचे अधिक तपशीलवार वर्णन आमच्या अहवालातील एकत्रित वित्तीय वितरण पत्रकाचे लेखापरीक्षण संबंधी लेखा परीक्षकाच्या जबाबाऱ्या या विभागात दिल्या आहेत. आम्ही कंपनी कायदा २०१३ आणि नियमाच्या तरतुदींच्या अंतर्गत स्वतंत्र वित्तीय वितरण पत्रकांच्या आमच्या लेखापरिक्षणाशी संबंधित असलेल्या नैतिक आवश्यकतांसह भारताच्या सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या आचारसंहितेनुसार कंपनीपासून स्वतंत्र आहोत. आणि या आवश्यकता आणि आचारसंहितेनुसार आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबऱ्या पूर्ण केल्या आहेत. आम्हाला विश्वास आहे की आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे आमच्या मताला आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत

**भर देण्याची प्रकरणे**

६. खालील बाबीवर लक्ष वेधतो.

अ) टिप क्रमांक ४१ कोळसा कंपन्यांनी दावा केल्यानुसार कामगिरी प्रोत्साहन देयके / कोळशाच्या कमी उचलण्याबद्दल, आणि विलंबित देयकावरील व्याज इ. आकस्मिक दायित्वे म्हणून दर्शविले आहेत आणि महानिर्मितीने कोळसा कंपन्यांवर काही प्रतिदावे देखील दाखल केले आहेत जसे की कमी पुरवठा, दर्जाची घसरण, व्याज इ. ते आकस्मिक मत्ता म्हणून दर्शविले आहेत आणि संबंधित कोळसा कंपन्यांनी केलेले सामंजस्य यांचा सारांश मेळ:

| पुरवठादारांची नावे | कोळसा कंपन्यांचे दावे आकस्मिक दायित्व म्हणून दाखवले आहेत (₹ कोटी मध्ये)* | कंपनीकडून प्रतिदावे (₹ कोटी मध्ये)* |
|---|---|---|
| वेर्स्टन कोलफिल्डस लिमिटेड | ३,३०५.११<br>(३,२३५.९४) | ४,६६३.९४<br>(४,३६६.५९) |
| साउथ ईस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड | ९४५.९९<br>(९४५.९९) | ४,०१२.६७<br>(३,६८१.०७) |
| महानदी कोलफिल्ड लिमिटेड | २१२.३६<br>(२१२.३६) | ८९८.५४<br>(८२०.२०) |
| सिंगरेनी कोलायरीज कंपनी लिमिटेड | १४९.१९<br>(११३.७२) | ३१२.१४<br>(७२.१६) |

*कंसात दर्शविलेले आकडे मागील वर्षाचे आहेत.

ब) टिप क्रमांक ४३(एफ) नुसार केंद्रीय विद्युत प्राधिकरण, ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारच्या सल्लागाराबाबत, आयात केलेल्या कोळशाचे मिश्रणाबाबत सुत्रधारी कंपनीने परिपत्रकाचे पालन प्रकल्प स्तरावर न करता सुत्रधारी कंपनी स्तरावर केले आहे.

क) टिप क्रमांक ४३(जी) ज्यामध्ये असे म्हटले आहे की सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाकडे वर्षभरात फक्त एक स्वतंत्र संचालक होता. त्यानुसार, त्यांच्या उपसमित्यांची रचना, ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच लेखापरीक्षण समितीचा समावेश आहे, ती

सुत्रधारी कंपनी कायदा २०१३ च्या कलम १७७ नुसार नाही. सदर नोंदीवरून सूचित केल्याप्रमाणे, वार्षिक आर्थिक विवरणपत्रांचा आढावा, संबंधित पक्ष व्यवहारांना मान्यता देणे इत्यादी लेखापरीक्षण समितीची अनिवार्य कामे सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाने थेट पार पाडली आहेत. त्यानुसार, संलग्न एकत्रित वित्तीय विवरणपत्रे संचालक मंडळाने थेट मंजूर केली आहेत.

ड) टिप क्रमांक ४३(एच), मागील वर्षामध्ये उघडलेल्या काही बँक खात्यांच्या संदर्भात, ही खाती प्रतिबिंबित करत नाहीत किंवा या बँक खात्यांद्वारे होणारे व्यवहार सुत्रधारी कंपनीच्या खात्यांच्या पुस्तकात नोंदवलेले नाहीत. सुत्रधारी कंपनीच्या दृष्टीने, कंपनीच्या लेखा पुस्तकांवर कोणताही महत्त्वपूर्ण परिणाम झालेला नाही.

इ) टिप क्रमांक ४३(ड), महाराष्ट्र सरकारकडून विविध जलविद्युत निर्मिती सुविधांच्या भाडेपट्ट्यासंदर्भात, जिथे भाडेपट्टी कराराचे नूतनीकरण अद्याप झालेले नाही.

वरील बाबींबाबत आमचे मत पात्र नाही.

**एकत्रित वित्तीय विवरण पत्रके आणि त्यावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाव्यतिरिक्त इतर माहिती**

७. इतर माहिती तयार करण्याची जबाबदारी सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळावर आहे. इतर माहितीमध्ये वार्षिक अहवालात समाविष्ट आहे, परंतु एकत्रित वित्तीय विवरण पत्रके, स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रके त्यावरील लेखापरीक्षकांचे अहवालाचा समावेश नाही. लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या तारखेनंतर वार्षिक अहवाल आम्हाला उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

८. एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील आमच्या मतात इतर माहितीचा अंतर्भाव करत नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही प्रकारचे आश्वासन निष्कर्ष व्यक्त करत नाही.

९. एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या आमच्या परिक्षणा संदर्भात, आमची जबाबदारी ही आहे की इतर माहिती वाचणे आणि असे करताना, इतर माहिती एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांशी भौतिकदृष्ट्या विसंगत आहे किंवा कसे किंवा लेखापरीक्षणात आम्ही मिळालेले ज्ञान यात काही मोठ्या प्रमाणात गैरविवरण झाले किंवा नाही याचा विचार करावा लागतो.

१०. आम्ही इतर माहितीचे परीक्षण करताना त्यामध्ये कोणतेही महत्त्वपूर्ण चुकीचे विधान आढळल्यास, त्या बाबीची माहिती शासनाची जबाबदारी असलेल्या व्यक्तींना देणे आवश्यक आहे आणि संबंधित कायदे व नियमांनुसार योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

**एकत्रित वित्तीय विवरण पत्रकासाठी व्यवस्थापन आणि प्रशासनाच्या जबाबदाऱ्या**

११. कंपनी कायदा २०१३ ('अधिनियम') चे कलम १३४ (५) या मधील दिलेल्या विषयासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. त्यामध्ये भारतातील सर्वसाधरण पणे स्वीकृत केलेली लेखा विषयी तत्वे आणि कलम १३३ यात विहित केलेली लेखा मानके यांच्याशी सुसंगत असे कंपनीची वित्तीय स्थिती, वित्तीय कामगिरी, समभागातील बदल, रोकडता प्रवाह यांचे यथार्थ आणि रास्त दर्शन घडविणारी एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी समाविष्ट आहे.

१२. यामध्ये कंपनीच्या मत्तांचे संरक्षण करणे, फसवणूक आणि इतर अनियमितता यांना शोधणे किंवा आळा घालणे. योग्य लेखा धोरणे निवडून ती लागू करणे, प्रमाणाबद्ध व सुज्ञ असे निर्णय व अंदाज करणे, अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची रचनेची अंमलबजावणी करून ती कार्यरत ठेवणे आणि कंपनीचे सत्य व योग्य दर्शन घडवणारी आणि अन्य कोणतीही मोठी लबाडी किंवा चूकभूल यापासून मुक्त असलेली स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे तयार करणे या कामाचा समावेश असतो.

१३. एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करताना, जोपर्यंत संबंधित संचालक मंडळ त्यांच्या संस्थांचे परिसमापन करण्याचा किंवा कार्य थांबविण्याचा मानस व्यक्त करत नाही किंवा तसे करण्याशिवाय अन्य कोणताही व्यवहार्य पर्याय उपलब्ध नाही असे संबंधित संचालक मंडळाचे मत नसेल तर कंपनी समुहामध्ये समाविष्ट असलेल्या कंपन्यांचे तसेच त्यांच्या सहयोगी व संयुक्त उपक्रमांचे संचालक मंडळ हे संबंधित संस्थांची सतत कार्यरत असणारी संस्था म्हणून काम करण्यास सक्षम असल्याचे मुल्यांकन करण्यास जबाबदार आहेत. तसेच आवश्यकतेनुसार सतत कार्यरत संस्था संबंधी प्रकटन करणे व त्याआधारे लेखे करणे ही संबंधित संचालक मंडळांची जबाबदारी असते.

१४. कंपनी समुहामध्ये समाविष्ट कंपन्यांचे तसेच त्यांच्या सहयोगी व संयुक्त उपक्रमांचे संचालक मंडळ गटाचा तसेच सहयोगी व संयुक्त उपक्रमांचा आर्थिक अहवाल प्रक्रिया देखरेख करण्यास देखील संबंधित संचालक मंडळ जबाबदार आहेत.

**एकत्रित वित्तीय वित्तीय विवरण पत्रकाच्या परीक्षणासाठी लेखापरीक्षकांच्या जबाबदाऱ्या**

१५. आमचे लेखापरीक्षणाचे उद्दिष्ट असे आहे की, एकत्रित वित्तीय वित्तीय विवरण पत्रे फसवणूक किंवा त्रुटीमुळे होऊ शकणाऱ्या महत्वाच्या चूकीच्या विधानापासून संपूर्णत: मुक्त आहेत की नाही याबद्दल वाजवी हमी मिळवणे आणि आमचे मत समाविष्ट करणारा

लेखापरीक्षकांचा अहवाल जारी करणे हे आहेत. वाजवी हमी ही उच्च पातळीची हमी आहे. परंतु लेखामानका नुसार केलेले लेखापरीक्षण नेहमीच चुकीचे विधान शोधून काढेल याची हमी देता येत नाही. फसवणूक किंवा त्रुटीमुळे गैर विवरण उद्भवू शकतात आणि जेव्हा वापर कर्त्यांच्या आर्थिक निर्णयावर त्यांचा एकत्रितपणे मोठा प्रभाव पडत असेल तर ते मोठ्या प्रमाणातील गैर विवरण आहे असे समजण्यात येते.

१६. लेखामानका नुसार परीक्षणाचा एक भाग म्हणून, आम्ही व्यावसायिक निर्णय घेतो आणि संपूर्ण परीक्षणामध्ये व्यावसायिक साशंकता राखतो आम्ही खालील बाबी अनुसरल्या आहेत:

- एकत्रित वित्तीय विवरण पत्रकातील महत्वाची गैरविवरणाचे धोके शोधणे आणि त्यांचे मुल्यमापन करणे, ही गैरविववरणे लबाडी मुळे किंवा चुकीमुळे झालेली आहेत किंवा कसे ते शोधणे, या जोखिमांना प्रतिबंधात्मक लेखा परीक्षण पध्दतीची संरचना करणे व त्यादृष्टीने काम करणे आणि आमच्या मतांना आधार देणारे पुरेसे व योग्य पुरावे लेखापरीक्षणातून मिळवणे, लबाडी मधून होणाऱ्या गैरविवरणांचे धोके शोधणे हे चुकीने निर्माण झालेल्या गैर विवरणपेक्षा मोठे असतात. कारण लबाडीमध्ये संगनमत, बनावट दस्त ऐवज हेतुपूरस्पर माहिती वगळणे, चुकीचा अर्थ लावणे, विपर्यास करणे किंवा अंतर्गत नियंत्रणांचे उल्लंघन करणे आदि कृतीचा समावेश असतो.
- आम्ही लेखा परीक्षणासंबंधीची अंतर्गत नियंत्रणे समजावून घेतली आहेत त्यामुधून परिस्थितिनुरूप योग्य लेखा परीक्षण कार्यपद्धतीची रचना केली आहे. कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३ (३) (आय) नुसार आम्ही कंपनीमध्ये अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आहे किंवा कसे आणि वित्तीय विवरण पत्रके नियंत्रणे योग्य व प्रभाविरीत्या कार्यरत आहेत किंवा कसे यावर आमची मते देण्याची आमच्यावर जबाबदारी आहे.
- कंपनीने वापरलेल्या लेखा धोरणाच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, तसेच व्यवस्थापनाने केलेल्या अंदाज आणि प्रकटणे समर्थनीय असल्याने निश्चित करणे.
- कंपनी ही सतत चालू राहणारी संस्था आहे असे गृहीत धरून व्यवस्थापनाने त्याच्या आधारे मांडलेल्या लेख्यांच्या योग्यते विषयी निष्कर्ष काढणे, त्यासाठी लेखा परीक्षणात्मक पुरावे मिळविणे, कंपनीमध्ये घडलेल्या संबंधित घटना आणि स्थिती यांच्यावरून मोठी अनिश्चितता अस्तित्वात आहे किंवा कसे या आधारे कंपनीकडे कार्यरत संस्था यासाठी सामर्थ्य आहे किंवा कसे या बाबतचे निष्कर्ष नोंदवणे.

  जर कंपनी विषयी अशी अनिश्चितता मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे असा आमचा निष्कर्ष असेल तर आम्ही त्याकडे आमच्या लेखापरीक्षण अहवालात लक्ष्य वेधणे आवश्यक असते आणि एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या संबंधित प्रकटनात तसे उल्लेख असले पाहिजे. आमचे मतात रूपभेद करण्यासाठी ही प्रकटने अपूर्ण असतील तर त्याकडे लक्ष वेधणे ही आमची जबाबदारी आहे. आमच्या लेखा परीक्षणाच्या अहवालाच्या तारखेपर्यंत जे लेखापरीक्षणाचे पुरावे आम्ही मिळविले, त्यावर आमचे निष्कर्ष आधारलेले आहे. मात्र भविष्यात अन्य काही घटना किंवा स्थिति यांचा सुद्धा परिणाम होवून कंपनी 'सतत चालू राहणारी संस्था' या प्रमाणे काम करणे थांबू शकते.
- एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे सर्वागीण सादरीकरण, रचना आणि त्यातील समाविष्ट विषय यांचे मूल्यांकन करणे, यात प्रकटणे ही येतात आणि या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकातून कंपनीचे व्यवहार आणि प्रसंग यांचे योग्यरित्या दर्शन होते आहे. त्याबद्दल मत देणे.

१७. आम्ही ज्यांच्याकडे कंपनीचा प्रशासनाचा कारभार आहे, अशा सर्वासोबत संपर्क केला त्यामध्ये इतर विषयांसोबत लेखा परीक्षणाची व्याप्ती, वेळ आणि आढळलेली महत्वाची माहीती यावर चर्चा केली. यात आमच्या लेखा परीक्षणात आम्हाला आढळलेल्या अंतर्गत नियंत्रणातील महत्वाच्या उणिवांचीही समावेश होता.

१८. तसेच आम्हाला आवश्यक असलेल्या आमच्या स्वातंत्र्यसंबंधीच्या नैतिक आवश्यकतेची पूर्तता करण्यासाठी आम्ही संबंधित कार्यभार सांभाळणाऱ्यांना एक निवेदनपत्र दिले. आमच्या स्वतंत्र कामाच्या जबाबदारीसाठी आम्हाला सर्व नाते हितसंबंध आणि इतर विषयी माहिती दिली तसेच जेथे लागू असेल तेथे सुरक्षेसंबंधीची माहिती दिली.

**इतर बाबी**

१९. आम्ही पुढील बाबींवर लक्ष वेधतो

i) आम्ही दोन उपकंपन्यांची वित्तीय विवरण पत्रके यांचे लेखापरीक्षण केलेले नाही. या उपकंपन्यांच्या वित्तीय विवरण पत्रकांमध्ये दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी एकूण मालमत्ता ₹ १०.३९ कोटी, एकूण उत्पन्न ₹ ०.१८ कोटी आणि त्या दिनांकाला संपलेल्या वर्षाकरिता निव्वळ रोख प्रवाह ₹ १०.०४ कोटी दर्शविलेले आहेत, जे एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांमध्ये विचारात

घेतलेले आहेत. ही वित्तीय विवरण पत्रके इतर लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षित केलेली असून त्यांचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हाला उपलब्ध करून दिलेले आहेत. आमचे एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवरील मत, या उपकंपन्यांशी संबंधित रक्कम व खुलाशांबाबत, तसेच अधिनियमाच्या कलम १४३(३) अंतर्गत आमचा अहवाल, वरील उपकंपन्यांशी संबंधित बाबींमध्ये केवळ इतर लेखापरीक्षकांच्या अहवालांवर आधारित आहे.

ii) एकत्रित वित्तीय विवरण पत्रके/ वित्तीय माहितीमध्ये कंपनी समूहाचा करानंतरचा निव्वळ तोटा ₹ ०.०७ कोटी आणि एकूण सर्वसमावेशक उत्पन्न ₹ ०.०७ कोटी यांचा समावेश आहे, जो दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिता एका संयुक्त उपक्रम व एका सहयोगी कंपनीशी संबंधित आहे, ज्यांची वित्तीय विवरण पत्रके आमच्याकडून लेखापरीक्षित केलेली नाहीत. ही वित्तीय विवरण पत्रके/ वित्तीय माहिती लेखापरीक्षण न केलेली असून ती व्यवस्थापनाने आम्हाला उपलब्ध करून दिलेली आहे. आमचे एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवरील मत, या संयुक्त उपक्रम व सहयोगी कंपनीशी संबंधित रक्कम व खुलाशांबाबत, तसेच अधिनियमाच्या कलम १४३(३) अंतर्गत आमचा अहवाल, वरील संयुक्त उपक्रम व सहयोगी कंपनीशी संबंधित बाबींमध्ये केवळ अशा लेखापरीक्षण न केलेल्या वित्तीय विवरण पत्रके/ वित्तीय माहितीवर आधारित आहे. आमच्या मतानुसार व व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, ही वित्तीय विवरण पत्रके/ वित्तीय माहिती कंपनी समुहासाठी महत्त्वपूर्ण नाहीत.

iii) तसेच, एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांमध्ये समाविष्ट असलेल्या एका उपकंपनीची वित्तीय विवरण पत्रके /आर्थिक माहिती, ज्यामध्ये दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी एकूण मालमत्ता ₹ ५४.४४ कोटी, एकूण उत्पन्न रुपये शून्य आणि त्या दिनांकाला संपलेल्या वर्षाकरिता निव्वळ रोख प्रवाह ₹ ०.०१ कोटी दर्शविलेले आहेत, ती विचारात घेतलेली आहेत. ही वित्तीय विवरण पत्रके /आर्थिक माहिती लेखापरीक्षण न केलेली असून ती व्यवस्थापनाने आम्हाला उपलब्ध करून दिलेली आहे. आमचे एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवरील मत, या उपकंपनीशी संबंधित रक्कम व खुलाशांबाबत, तसेच अधिनियमाच्या कलम १४३(३) अंतर्गत आमचा अहवाल, वरील उपकंपनीशी संबंधित बाबींमध्ये केवळ अशा लेखापरीक्षण न केलेल्या वित्तीय विवरण पत्रके / आर्थिक माहितीवर आधारित आहे. आमच्या मतानुसार व व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, ही वित्तीय विवरण पत्रके /आर्थिक माहिती कंपनी समुहासाठी महत्त्वपूर्ण नाहीत.

वरील एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवरील आमचे मत आणि खालील इतर कायदेशीर व नियामक आवश्यकता यावरील आमचा अहवाल, व्यवस्थापनाने प्रमाणित केलेल्या वित्तीय विवरण पत्रके तसेच इतर लेखापरीक्षकांनी केलेल्या कामावर व त्यांच्या अहवालांवर आमच्या अवलंबित्वाशी संबंधित वरील बाबींमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

२०. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी गट कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रांचे लेखापरीक्षण शाह आणि टपारिया आणि उम्मेद जैन अँड कंपनी यांनी केले. २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या त्यांच्या अहवालात कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रांवर मत व्यक्त केले, त्यानुसार जी. एम. कपाडिया अँड कंपनी आणि कल्याणीवाला अँड मिस्त्री एलएलपी ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी एकत्रित वित्तीय विवरणपत्रांवर कोणतेही मत व्यक्त करत नाहीत.

वरील बाबींबाबत आमचे मत पात्र नाही.

**इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांबुल अहवाल**

२१. कंपनी कायदा अधिनियमाच्या कलम १४३(११) अंतर्गत केंद्र सरकारने जारी केलेल्या कंपन्या (लेखापरीक्षकांचा अहवाल) आदेश, २०२० ('आदेश') मधील परिच्छेद ३(xxi) आणि ४ मध्ये नमूद केलेल्या बाबींशी संबंधित, ज्यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या अहवालात करावयाचा आहे, आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रांमध्ये समाविष्ट असलेल्या संबंधित कंपन्यांच्या लेखापरीक्षकांनी जारी केलेल्या कंपन्यांचा लेखापरीक्षकांचा अहवाल आदेश (कारो) अहवालांच्या आधारे, ज्यांच्यावर कंपन्यांचा लेखापरीक्षकांचा अहवाल आदेश (कारो) अंतर्गत अहवाल देणे लागू आहे, तसेच सुत्रधारी कंपनीच्या व्यवस्थापनाने आम्हाला उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या आधारे आणि संबंधित घटक लेखापरीक्षकांनी त्यांच्या कंपन्यांचा लेखापरीक्षकांचा अहवाल आदेश (कारो) अहवालांमध्ये नमूद केलेल्या पात्रता किंवा प्रतिकूल निरीक्षणांच्या बाबींच्या ओळखीनुसार, आम्ही परिशिष्ट १ मध्ये त्यांच्या कंपन्यांचा लेखापरीक्षकांचा अहवाल आदेश (कारो) अहवालांमध्ये नमूद केलेल्या पात्रता किंवा प्रतिकूल निरीक्षणांवरील निवेदन अहवालित करतो.

२२. कंपनी कायदा अधिनियमाच्या कलम १४३(३) अंतर्गत आवश्यकतेनुसार, आमच्या लेखापरीक्षणावर तसेच वरील इतर बाबी विभागात संदर्भित उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त उपक्रम यांच्या स्वतंत्र आर्थिक विवरणपत्रे व इतर आर्थिक माहितीवरील इतर लेखापरीक्षकांच्या अहवालांचा विचार करून, लागू मर्यादेपर्यन्त आम्ही अहवाल देतो की:

ए) आमचे सर्वोतोपरी ज्ञान आणि विश्वास यानुसार आमचे लेखा परीक्षणाच्या हेतुसाठी आवश्यक ती सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे मिळविले आहेत. वरील तथापी 'पात्र मत्तांचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेली तिसऱ्या पक्षांकडील शिलकीची निश्चिती, मेळ आणि समायोजन करणे यांचा अपवाद आहे. त्याचा जर काही परिणाम या वित्तीय विवरण पत्रांवर होणार असेल तर त्याचे अंदाज करता येत नाहीत.

बी) आमच्या मतानुसार, खालील बाबींचा अपवाद वगळता

१. वरील 'पात्र मताचा आधार' परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे आणि एकत्रित वित्तीय विवरण पत्राच्या टिप ४३(एच) मध्ये नमूद केल्याप्रमाणे बाबींचे परिणाम/संभाव्य परिणाम,

२. नियम ११(जी) अंतर्गत अहवाल देण्याबाबत खालील परिच्छेदामध्ये नमुद केलेल्या बाबी,

आमच्या तपासणीत असे दिसून येते की, गट कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असलेल्या योग्य हिशेब पुस्तके ठेवली आहेत

सी) एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा तोट्याचे विवरण (इतर सर्वकष उत्पन्नासह), एकत्रित समभागा मधील बदल आणि एकत्रित रोकडता पत्रक, ही कागदपत्रके लेखापुस्तकांशी सुसंगत आहेत.

डी) वरील आमच्या पात्र मतांचा आधार भर देण्याची प्रकरणे आणि इतर बाबी या परिच्छेदात वर्णन केलेल्या या विषयाचे संभाव्य परिणाम याला अधीन राहून आमचे असे मत आहे की, उपरोक्त एकत्रित वित्तीय विवरण पत्रके ही अनुषंगिक नियमावली सह वाचल्या जाणाऱ्या कायदयाचे कलम क्र. १३३ अंतर्गत विनिर्देशित लेखा मानकांचे अनुपालन करतात.

इ) आम्ही वरील पात्र मतांचा आधार आणि भर देण्याची प्रकरणे या परिच्छेदात दिलेली परिक्षणे यांचे कंपनीच्या समुहाच्या कामकाजावर विपरीत परिणाम घडवू शकतात.

एफ) शासकीय कंपनी असल्यामुळे, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ४६३ (इ) दि. ५ जून २०२५ नुसार, कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम १६४(२) यामधील संचालकांची अपात्रता; याविषयीच्या तरतुदी सुत्रधारी कंपनी, तिच्या उपकंपन्या, संयुक्त उपक्रम आणि सहयोगी कंपन्यांना लागू होत नाहीत.

जी) हिशेबपुस्तके ठेवण्या संबंधित पात्रता आणि त्यासंबंधित इतर बाबी या पात्र मतांचा आधार या विभागात नमूद केल्याप्रमाणे आहेत.

एच) समुह कंपनीचे वित्तीय अहवालासंबंधीत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा पर्याप्तता आणि या नियंत्रणाचा प्रभाव या विषयी आमचा स्वतंत्र पात्र अहवाल 'जोडपत्र दोन' मध्ये दिला आहे. एकत्रित वित्तीय विवरण संदर्भात आमचा अहवाल समुहाच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणाच्या पर्याप्तेवर आणि कार्यक्षमतेवर बदल केलेले मत व्यक्त करतो.

आय) ही कंपनी शासकीय असल्याने, भारत सरकारची अधिसूचना क्र. ४६३ (इ) दिनांक ०५ जून २०१५ याप्रमाणे कायद्यातील कलम १९७ च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

जे) कंपनी (लेखा परीक्षण व लेखा परीक्षक) नियमावली २०१४ यातील नियम क्र.११ नुसार जे अन्य विषय या अहवालात समाविष्ट करावयाचे असतात त्याबाबत आम्ही आमचे सर्वोपरी ज्ञान आणि आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही खालील मते नोंदवितो.

१) समुहाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रामध्ये प्रलंबित कायदेशीर बाबीचे परिणाम प्रकट केले आहेत. त्यासाठी एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाची टिप क्र. ४० पहावी.

२) ज्यात भविष्यात तोटे येऊ शकतील असे कोणतेही दीर्घ मुदतीचे करार सुत्रधारी, उपकंपन्या तसेच सहयोगी कंपन्यांनी केलेले नाहीत (यात डेरिव्हेटीव कंत्राटे पण समाविष्ट आहेत.)

३) गटकंपनीद्वारे या वर्षी गुंतवणूकदार शिक्षण आणि रक्षण निधीत स्थानांनतरीत करण्यास आवश्यक रकमा नाही.

४) ए) व्यवस्थापनाने असे प्रतिनिधित्व केले आहे की, त्याच्या उत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे, कंपनीने परदेशी संस्थांसह (मध्यस्थ) कोणत्याही व्यक्ती (व्यक्ती) किंवा संस्थांमध्ये (मध्यस्थ) कोणताही निधी किंवा कर्ज (उधार घेतलेल्या निधीतून किंवा सिक्युरिटीज किंवा इतर कोणत्याही स्त्रोतातुन किंवा अन्य प्रकारच्या निधीतून) दिलेल्या नाही किंवा गुंतवलेला नाही किंवा या समजुतीने, लेखी किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी मध्यस्थ इतर व्यक्तीना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कर्ज देईल किंवा गुंतवणूक करेल किंवा कंपनी (अंतिम लाभार्थी) द्वारे किंवा त्याच्या वतीने कोणत्याही प्रकारे ओळखल्या जाणाऱ्या संस्था किंवा अंतिम लाभार्थ्याच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा तत्सम प्रदान करतात. (टिपा क्र. ४३ (आय) पहावी).

बी) व्यवस्थापनाने असे प्रतिनिधित्व केले आहे की, त्याच्या उत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे, परदेशी संस्थांसह (फंडिग

पार्टीज) कोणत्याही व्यक्ती(व्यक्ती) किंवा संस्थांकडून कंपनीला कोणताही निधी प्राप्त झालेला नाही. हे समज, लेखी किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी, कंपनी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फंडिग पार्टी (अंतीम लाभार्थी) द्वारे किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांना कर्ज देईल किंवा गुंतवणूक करेल किंवा कोणतीही तरतूद करेल. अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने हमी, सुरक्षा किंवा यासारखे (टिप क्रं. ४३ आय) पहावी) आणि

सी) परिस्थितीमध्ये वाजवी आणि योग्य मानल्या गेलेल्या अशा लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे वरील उप-खंड (अ) आणि (ब) अंतर्गत व्यवस्थापन प्रस्तुतीमध्ये कोणतेही महत्वपूर्ण चुकीचे विधान असलेबाबबत आम्हांला आढळले नाही.

५) सुत्रधारी कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षात कोणताही लाभांश घोषित किंवा वितरित केलेल्या नाही आणि म्हणूनच कंपनी अधिनियमाच्या कलम १२३ अंतर्गत अनुपालनासंबंधी अहवाल देण्याची गरज नाही.

६ आमच्या लेखापरीक्षेच्या आधारावर, ज्यामध्ये चाचणी तपासण्यांचा समावेश होतो, तसेच भारतात नोंदणीकृत असलेल्या उपकंपन्यांच्या संबंधित लेखापरीक्षकांनी केलेले व अहवालित केलेले परीक्षण, ज्यांची वित्तीय विवरण पत्रके कंपनी अधिनियमांतर्गत लेखापरीक्षित आहेत, त्यानुसार सुत्रधारी कंपनीने आपल्या लेखावही ठेवणीसाठी लेखाविषयक सॉफ्टवेअरचा वापर केला आहे. या सॉफ्टवेअरमध्ये ऑडिट ट्रेल (एडिट लॉग) नोंदविण्याची सुविधा आहे आणि वर्षभरातील सर्व संबंधित व्यवहारांसाठी लेखापरीक्षणाखाली ते वापरले गेले आहे. तथापि, सुत्रधारी कंपनीच्या बाबतीत या सॉफ्टवेअरमध्ये थेट डेटाबेस स्तरावर केलेल्या बदलांसाठी ऑडिट ट्रेल नोंदविण्याची सुविधा उपलब्ध नाही.

एका उपकंपनीसंदर्भात लेखापरीक्षकांनी नमूद केले आहे की, कंपनीने आपल्या लेखावही ठेवणीसाठी अशा लेखा सॉफ्टवेअरचा वापर केलेला नाही ज्यामध्ये ऑडिट ट्रेल (एडिट लॉग) नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे. सुत्रधारी कंपनीने कायदेशीर नोंदवही जतन करण्याच्या आवश्यकतांनुसार ऑडिट ट्रेल जतन केली आहे, तथापि मागील आर्थिक वर्षाच्या कालावधीत सुत्रधारी कंपनीच्या डेटाबेससाठी लेखापरीक्षण ऑडिट ट्रेलची सुविधा सक्षम केलेली नसल्यामुळे ती जतन केलेली नाही.

**जी एम कपाडिया अँड कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४७६७डब्लू**

**हितेन विरा**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १४२६९१**
यूडीआयएन: २५१४२६९१बीएमओएयूके५३२३

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४६०७ डब्लू/डब्लू १००१६६**

**साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १०७०१७**
यूडीआयएन: २५१०७०१७बीएमएलएफआरटी १७२२

दिनांक: २५ सप्टेंबर २०२५
स्थळ: मुंबई

## जोडपत्र १ - आदेशातील परिच्छेद ३(xxi) आणि ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींवरील विधान

| अनु. क्र. | कंपनीचे नाव | सीआयएन | सुत्रधारी कंपनी/ उपकंपनी/ सहयोगी/ संयुक्त उपक्रम | लेखा परीक्षक आदेश अहवालाचे कलम क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित | यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८ | सुत्रधारी कंपनी | ३ (i)(ब),<br>३ (i)(क),<br>३ (ii)(अ),<br>३ (iii)(ब) आणि ३ (xiii) |
| २ | धोपावे कोस्टल पॉवर कंपनी मर्यादित | यु४०१०८एमएच२००७एसजीसी१६८८३६ | उपकंपनी | ३ (xix) |
| ३ | महाजेनको रिन्युएबल एनर्जी मर्यादित | यु४०१०५एमएच२००७एसजीसी१७३४३३ | उपकंपनी | शून्य |

## जोडपत्र २ - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्या सदस्यांना ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या सम तारखेच्या अहवालाच्या परिच्छेद २३ (एच) मध्ये इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल या शीर्षकाखाली संदर्भित केलेला परिशिष्ट.

**कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') च्या कलम १४३ च्या उप-कलम (३) च्या कलम (i) अंतर्गत एकत्रित वित्तीय विवरणांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणांवरील अहवाल**

**पात्र मत:**

१. आम्ही महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (''एमएसपीजीसीएल''/''महाजेनको''/''सुत्रधारी कंपनी'') तसेच तिच्या भारतात नोंदणीकृत उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम यांच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांसंदर्भात अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे लेखापरीक्षण केले आहे. हे लेखापरीक्षण आम्ही कंपनी समुहाच्या ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखापरीक्षणासोबत केले आहे.

२. आमच्या मतानुसार, खालील ''पात्र मताचे आधार'' परिच्छेदात वर्णन केलेल्या गंभीर दुर्बलतेच्या संभाव्य परिणामांचा अपवाद वगळता, नियंत्रण निकषांच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसंदर्भात कंपनी समुहाने सर्व महत्त्वपूर्ण बाबींमध्ये एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांसंबंधी पुरेसे अंतर्गत आर्थिक नियंत्रण राखले आहे आणि अशा अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची कार्यक्षमता ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या स्थितीनुसार प्रभावीपणे कार्यरत होती.

३. आम्ही वरीलप्रमाणे ओळखलेल्या आणि अहवालित केलेल्या गंभीर दुर्बलतांचा विचार करून, कंपनी समुहाच्या ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखापरीक्षणामध्ये लागू केलेल्या लेखापरीक्षण चाचण्यांचे स्वरूप, वेळ आणि व्याप्ती निश्चित केली आहे.

४. आमच्या ''पात्र मताचे आधार'' या विभागातील परिच्छेद ६(i), (viii) आणि (x) मध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात पुरवठादारांना दिलेल्या आगाऊ रकमांचे व त्यासाठी करण्यात आलेल्या दायित्वांच्या तरतुदी यांचे वेळेवर समायोजन तसेच वॉशरी/तृतीय पक्षांकडे ठेवलेल्या कोळशाच्या प्रत्यक्ष पडताळणी अहवाल/पुष्टीकरण यांबाबतची कमकुवतता, कंपनी समुहाच्या एकत्रित वित्तीय विवरणांवरील आमच्या मतावर परिणामकारक ठरली असून, आम्ही आमच्या मुख्य लेखापरीक्षण अहवालात पात्र मत नोंदविले आहे.

५. आमच्या ''पात्र मताचे आधार'' या विभागातील परिच्छेद ६ (ii) ते (vii), (i) आणि (xi) मध्ये नमूद केलेल्या इतर कमकुवत बाबी कंपनी समुहाच्या एकत्रित वित्तीय विवरणांवरील आमच्या मतावर परिणामकारक ठरत नाहीत..

**पात्र मताचा आधार**

**सुत्रधारी कंपनी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

६. आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार आणि आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे, ३१ मार्च २०२५ रोजी खालील महत्त्वाच्या कमकुवतपणा ओळखल्या गेल्या आहेत ज्यामध्ये अंतर्गत आर्थिक नियंत्रणे प्रभावीपणे कार्यरत नव्हती:

१) पुरवठादारांना दिलेल्या आगाऊ रकमा व त्यासाठी करण्यात आलेल्या दायित्वांच्या तरतुदी यांचे वेळेवर समायोजन; ओळखलेले पुरवठादार, न ओळखलेले पुरवठादार, अयशस्वी बँक व्यवहारांशी संबंधित दायित्वे अशा विविध खात्यांमध्ये नोंदविलेल्या नोंदीचे समायोजन/ताळमेळ/निर्मूलन; तसेच जुन्या प्रलंबित शिल्लक रकमेचे समायोजन/ताळमेळ/निर्मूलन.

२) औष्णिक विद्युत केंद्रांसाठी ऊर्जा खरेदी करारानुसार विलंब भरणा अधिभार (एलपीएस) संबंधी मासिक बिले वेळेवर न काढल्याबाबत.

३) परिसमापनातील नुकसानभरपाईची वेळेवर अंतिमीकरण व आकारणी करण्याबाबत.

४) कर्जे व आगाऊ रक्कम, रोखून ठेवलेली रक्कम आणि धनको यांच्याशी संबंधित प्रणाली-आधारित वयोमान अहवालाबाबत.

५) एकत्रित वित्तीय विवरणांमध्ये दायित्वांच्या बाजूस डेबिट शिल्लक खात्यांचे आणि मालमत्तांच्या बाजूस क्रेडिट शिल्लक खात्यांचे मॅपिंग असण्याबाबत.

६) व्यवस्थापनाच्या प्रक्रियेच्या आधारे, अंतर्गत लेखापरीक्षकांनी जोखीम मूल्यांकन प्रक्रिया व अंतर्गत आर्थिक नियंत्रण यांची पडताळणी केली आहे. तथापि, काही ठिकाणी जोखीम नियंत्रण मॅट्रिक्स किंवा मानक कार्यपद्धती अद्ययावत करणे आवश्यक आहे किंवा उपलब्ध नाहीत, असे आम्ही निरीक्षण केले आहे. त्यामुळे अशा नियंत्रणांच्या कार्यक्षमतेबाबत आम्ही मत व्यक्त करू शकत नाही.

७) अंतर्गत लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात झालेला विलंब आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल प्राप्त होण्यात झालेला विलंब.

८) वॉशरी/तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाची कोणताही प्रत्यक्ष पडताळणी अहवाल/पुष्टीकरण उपलब्ध नाही.

९) कर्ज विभाग, प्रकल्प कार्यालये, बांधकाम विभाग आणि विद्युत केंद्रे यासारख्या विविध विभागांमधील कर्ज खर्चाच्या भांडवलीकरणावरील समन्वयावर अंतर्गत नियंत्रण सक्षम करणे आवश्यक आहे.

१०) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची (एमएसएमइ) ओळख पटविण्यासाठी योग्य प्रणाली उपलब्ध नाही तसेच एमएसएमइ अधिनियमांतर्गत ओळखल्या गेलेल्या उद्योगांचा दर्जा लेखा सॉफ्टवेअरमध्ये नोंदविण्यासाठी आवश्यक प्रणाली उपलब्ध नाही.

११) बँक खाते उघडणे आणि ती खाती सुत्रधारी कंपनीच्या लेख्यांमध्ये नोंदविण्याबाबतचे नियंत्रण अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. तसेच, सुत्रधारी कंपनीने केलेल्या व्यवहारांची नोंदणी करण्याची धोरणे आणि त्या व्यवहारांसाठी मेकर-चेकर यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे.

महत्त्वपूर्ण कमकुवतता म्हणजे एक त्रुटी किंवा त्रुटींचा एकत्रित परिणाम, जो एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणामध्ये आढळतो, ज्यामुळे सुत्रधारी कंपनीच्या वार्षिक आर्थिक विवरणांमध्ये महत्त्वपूर्ण चुकीची नोंद वेळेवर रोखली जाण्याची किंवा शोधली जाण्याची शक्यता कमी होते.

**अंतर्गत आर्थिक नियंत्रणांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी**

७. भारतात नोंदणीकृत असलेल्या सुत्रधारी कंपनी, तिच्या उपकंपन्या, सहयोगी संस्था आणि संयुक्त उपक्रम यांच्या संचालक मंडळांची जबाबदारी आहे की त्यांनी अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची स्थापना व देखभाल करावी. हे नियंत्रण संबंधित कंपन्यांनी एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित निकषांच्या आधारे, तसेच इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) यांनी जारी केलेल्या आर्थिक अहवालांवरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील ''मार्गदर्शक टिपा'' मध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या आवश्यक घटकांचा विचार करून स्थापित केलेले आहे. या जबाबदाऱ्यांमध्ये व्यवसायाचे सुव्यवस्थित व कार्यक्षम संचालन सुनिश्चित करण्यासाठी पुरेसे अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे डिझाइन, अंमलबजावणी आणि देखभाल यांचा समावेश होतो. यात कंपनी समुहाच्या धोरणांचे पालन, मालमत्तांचे संरक्षण, फसवणूक व चुका यांची प्रतिबंध व शोध, लेखा नोंदींची अचूकता व पूर्णता, तसेच कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत आवश्यक असलेली विश्वासार्ह आर्थिक माहिती वेळेवर तयार करणे यांचा समावेश आहे.

**लेखापरीक्षकांची जबाबदारी**

८. आमची जबाबदारी म्हणजे भारतात नोंदणीकृत असलेल्या सूत्रधारी कंपनी, तिच्या उपकंपन्या, सहयोगी संस्था आणि संयुक्त उपक्रम यांच्या एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांवर आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे. आम्ही आमचे लेखापरीक्षण आर्थिक अहवालांवरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील ''मार्गदर्शक टिपा'' तसेच कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत निर्धारित लेखापरीक्षण मानकांनुसार, एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणास लागू होईल त्या मर्यादेपर्यंत केले आहे. त्या मानकांनुसार आणि मार्गदर्शक टिपेनुसार आम्हाला नैतिक आवश्यकतांचे पालन करणे तसेच लेखापरीक्षणाची योजना आखून ते पार पाडणे आवश्यक आहे, जेणेकरून एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित पुरेसे अंतर्गत आर्थिक नियंत्रण स्थापित व राखले गेले आहेत का आणि अशी नियंत्रणे सर्व महत्त्वपूर्ण बाबींमध्ये प्रभावीपणे कार्यरत आहेत का याबाबत वाजवी खात्री मिळवता येईल.

९. आमच्या लेखापरीक्षणामध्ये एकत्रित वित्तीय विवरणपत्रकाशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणालीची पुरेशी क्षमता आणि तिच्या कार्यक्षमतेबाबत लेखापरीक्षण पुरावे मिळविण्यासाठी आवश्यक कार्यपद्धतींचे पालन करणे समाविष्ट आहे. आमच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकाशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या लेखापरीक्षणामध्ये, त्या नियंत्रणांचे आकलन करणे, महत्त्वपूर्ण कमकुवतपणा अस्तित्वात असल्याचा धोका मूल्यांकन करणे, तसेच मूल्यांकन केलेल्या धोक्याच्या आधारे अंतर्गत नियंत्रणाच्या डिझाइन व कार्यक्षमतेची चाचणी व मूल्यांकन करणे यांचा समावेश आहे. निवडलेल्या कार्यपद्धती या लेखापरीक्षकांच्या निर्णयावर अवलंबून असतात, ज्यामध्ये एकत्रित वित्तीय विवरण पत्राकमध्ये फसवणूक किंवा चूक यांमुळे महत्त्वपूर्ण चुकीची नोंद होण्याच्या धोक्याचे मूल्यांकन समाविष्ट असते.

१०. आम्हाला प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण पुराव्यांवर तसेच भारतात नोंदणीकृत असलेल्या उपकंपन्या, सहयोगी संस्था आणि संयुक्त उपक्रम कंपन्यांच्या इतर लेखापरीक्षकांनी त्यांच्या अहवालांमध्ये (खालील इतर बाबी परिच्छेदात संदर्भित) नमूद केलेल्या लेखापरीक्षण पुराव्यांवर आधारित, आम्हाला असे वाटते की हे पुरावे पुरेसे व योग्य आहेत. यावर आमचे लेखापरीक्षण मत आधारित असून ते भारतात नोंदणीकृत असलेल्या सुत्रधारी कंपनी, तिच्या उपकंपन्या, सहयोगी संस्था आणि संयुक्त उपक्रम यांच्या एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांबाबत आहे.

**एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचा अर्थ**

११. कंपनीचे एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रण हे एक असे प्रक्रिया तंत्र आहे, जे आर्थिक अहवालांच्या विश्वासार्हतेबाबत वाजवी खात्री प्रदान करण्यासाठी आणि सर्वसाधारणपणे स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा तत्त्वांनुसार बाह्य उद्देशांसाठी एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांची तयारी करण्यासाठी तयार केलेले आहे. कंपनीचे एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणामध्ये खालील धोरणे व कार्यपद्धतींचा समावेश होतो:

अ) लेखा नोंदींचे जतन करणे, ज्यामध्ये व्यवहार व कंपनीच्या मालमत्तेतील बदल यांचे अचूक व न्याय्य प्रतिबिंब वाजवी तपशीलात दिसून येईल.

ब) व्यवहारांची नोंद सर्वसाधारणपणे स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा तत्त्वांनुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांची तयारी करण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात करण्यात आली आहे याबाबत वाजवी खात्री प्रदान करणे, तसेच कंपनीचे प्राप्ती व खर्च हे केवळ व्यवस्थापन व संचालक मंडळाच्या मंजुरीनुसारच करण्यात आले आहेत याची खात्री करणे. आणि

क) कंपनीच्या मालमत्तेचे अनधिकृत अधिग्रहण, वापर किंवा विल्हेवाट यांची प्रतिबंध किंवा वेळेवर ओळख होईल याबाबत वाजवी खात्री प्रदान करणे, ज्याचा एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाणवर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो.

**एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची अंतर्निहित मर्यादा**

१२. एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या अंतर्निहित मर्यादांमुळे, ज्यामध्ये संगनमताची शक्यता किंवा नियंत्रणांवर व्यवस्थापनाने अयोग्यरीत्या मात करणे यांचा समावेश आहे, चुका किंवा फसवणुकीमुळे महत्त्वपूर्ण चुकीच्या नोंदी होऊ शकतात आणि त्यांचा शोध लागू शकत नाही. तसेच, एकत्रित वित्तीय विवरणांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे कोणतेही मूल्यांकन भविष्यातील कालावधीसाठी प्रक्षेपित केल्यास, परिस्थितीतील बदलांमुळे ही नियंत्रणे अपुरी ठरू शकतात किंवा धोरणे व कार्यपद्धतींचे पालन करण्याची पातळी कमी होऊ शकते, असा धोका असतो.

**इतर बाबी**

१३. अधिनियमाच्या कलम १४३(३)(i) अंतर्गत एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या पुरेशी क्षमता व कार्यक्षमतेबाबत आमचा वरील अहवाल, भारतात नोंदणीकृत असलेल्या उपकंपन्या, सहयोगी संस्था आणि संयुक्त उपक्रम कंपन्यांशी संबंधित बाबींमध्ये, केवळ त्या कंपन्यांच्या लेखापरीक्षकांच्या संबंधित अहवालांवर आधारित आहे. तसेच, या उपकंपन्या, सहयोगी संस्था आणि संयुक्त उपक्रम कंपन्यांच्या संदर्भात वित्तीय विवरण पत्रकांशी संबंधित अंतर्गत आर्थिक नियंत्रणांबाबत आमचे मत हे केवळ इतर लेखापरीक्षकांच्या संबंधित अहवालांवर आधारित आहे. वरील बाबींशी संबंधित आमचे पात्र मत नाही.

**जी एम कपाडिया अँड कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४७६७डब्लू**

**हितेन विरा**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १४२६९१**
यूडीआयएन: २५१४२६९१बीएमओएयूके५३२३

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपीसाठी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४६०७ डब्लू/डब्लू १००१६६**

**साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार
**आयसीएआय एम नं. १०७०१७**
यूडीआयएन: २५१०७०१७बीएमएलएफआरएसटी१७२२

दिनांक: २५ सप्टेंबर २०२५
स्थळ: मुंबई

## ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद पत्रक (एकत्रित) (सीआयएन - यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)

(₹ कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) | ०१.०४.२०२३ (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|---|
| **मत्ता** | | | | |
| **चालू नसलेल्या मत्ता** | | | | |
| मालमत्ता कारखाने व साधन | १ | ३४,०७२.५६ | २९,२८९.०८ | ३१,१५१.२१ |
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | २ | २,२७४.२२ | ७,१९५.१० | ५,७५७.२९ |
| मत्ता वापरण्याचे हक्क | १अ | ३,०३०.६२ | ३,२८८.१८ | ३,४१९.२४ |
| अमूर्त मत्ता | १ब | २.३१ | २.४७ | ४.२९ |
| अमूर्त मत्ता विकसनशील | २ | ९४२.१० | ६४२.०८ | ५७४.१६ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| - चालू नसलेल्या गुंतवणूक | ३ | (४८.२४) | (४७.६६) | (४७.३९) |
| - बँक ठेवी | ३अ | १००.०० | १००.०० | ९१.२१ |
| - व्यापारी येणी | ३ब | १,१३६.६७ | ४,३४०.३३ | ७,२५६.१९ |
| निव्वळ स्थगित कर मालमत्ता | १५ | - | - | ६९.६१ |
| इतर चालू नसलेल्या मत्ता | ४ | १,५६८.९९ | ८५६.९७ | ७२८.५५ |
| **एकूण चालू नसलेल्या मत्ता** | | **४३,०७९.२४** | **४५,६६६.५५** | **४९,००४.३८** |
| **चालू मत्ता** | | | | |
| वस्तुमाल सूची | ५ | ३,६५३.६२ | २,९४३.५८ | २,११४.७८ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| - व्यापारी येणी | ६ | ३०,४१२.८६ | २६,९२४.०५ | २२,७२०.४७ |
| - रोख व रोख समतुल्य | ७ | १४.५९ | ७.७३ | २६३.८३ |
| - रोख व रोख समतुल्य व्यतिरिक्त इतर बँक शिलकी | ७अ | ९४.५१ | ५३.९४ | - |
| - कर्जे | ८ | १.३५ | १.८९ | १.७८ |
| - इतर वित्तीय मत्ता | ९ | ४११.६९ | ५१५.१४ | २९८.८० |
| इतर चालू मत्ता | १० | १,०८९.०९ | ८३२.८२ | ९३३.१७ |
| **एकूण चालू मत्ता** | | **३५,६७७.७०** | **३१,२७९.१५** | **२६,३३२.८४** |
| **इतर मत्ता** | | | | |
| विक्री/ विल्हेवाटी साठी वर्गीकरण केलेल्या मत्ता | १क | - | - | - |
| **एकूण इतर मत्ता** | | **-** | **-** | **-** |
| **एकूण मत्ता** | | **७८,७५६.९४** | **७६,९४५.७०** | **७५,३३७.२१** |
| **समभाग आणि दायित्वे** | | | | |
| **समभाग** | | | | |
| समभाग भांडवल | ११ | २६,३०४.३१ | २६,११५.४२ | २५,९१८.५२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इतर समभाग | १२ | (९,९२१.२१) | (१०,०३४.६२) | (१०,१३८.९८) |
| महानिर्मितीला देय असलेले एकूण समभाग | | १६,३८३.०९ | १६,०८०.८० | १५,७७९.५४ |
| महानिर्मिती व्यतिरिक्त नियंत्रक हितसंबंध | १२ | २१.६३ | २१.६६ | २१.६५ |
| **एकूण समभाग** | | **१६,४०४.७३** | **१६,१०२.४६** | **१५,८०१.१९** |
| **दायित्वे** | | | | |
| **चालू नसलेली दायित्वे** | | | | |
| **वित्तीय दायित्वे** | | | | |
| - कर्जे | १३ | २४,३८६.०३ | २८,१४४.४० | २४,६८५.९१ |
| - भाडेपट्टीचे दायित्वे | १३अ | २,६७३.८२ | २,८५८.५२ | २,९२६.५६ |
| तरतूद | १४ | १,६८६.४५ | १,५०४.१५ | १,१५३.४५ |
| निव्वळ स्थगीत कर दायित्वे | १५ | २७४.१५ | ५६.९८ | - |
| इतर चालू नसलेली दायित्वे | १६ | ९०९.१४ | ८४९.९२ | ६५४.६८ |
| **एकूण चालू नसलेली दायित्वे** | | **२९,९२९.५९** | **३३,४१३.९८** | **२९,४२०.६०** |
| **चालू दायित्वे** | | | | |
| **वित्तीय दायित्वे** | | | | |
| - कर्जे | १७ | १६,९५४.७९ | १२,६२४.७६ | १७,२७२.७३ |
| - भाडेपट्टीचे दायित्वे | १७अ | १८४.७१ | १७३.९१ | १४३.३४ |
| - व्यापारी देणी (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक) | १८ | १.०७ | १.८६ | १.०० |
| - व्यापारी देणी (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक व्यतिरिक्त) | १८ | १०,६०५.९२ | ९,८१३.६४ | ८,१६८.२० |
| - इतर वित्तीय दायित्वे | १९ | ४,२६६.३० | ४,३७७.४७ | ४,१०८.६७ |
| इतर चालू दायित्वे | २० | १५२.८० | १५४.९३ | १८२.४१ |
| तरतूद | २१ | २५७.०५ | २८२.६९ | २३९.०७ |
| **एकूण चालू दायित्वे** | | **३२,४२२.६३** | **२७,४२९.२६** | **३०,११५.४३** |
| **एकूण समभाग आणि दायित्वे** | | **७८,७५६.९४** | **७६,९४५.७०** | **७५,३३७.२१** |

महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिपा १ ते ५० हे आर्थिक विवरणपत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.
सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा आणि तोटा पत्रक (एकत्रित) (सीआयएन - यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)

(₹ कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ पुनर्लिखित |
|---|---|---|---|
| **महसूल** | | | |
| प्रवर्तनातील महसूल | | | |
| वीज विक्री | २२ | ३४,३५५.७८ | २९,६७४.८६ |
| इतर प्रवर्तन महसूल | २३ | २७१.७३ | ४०३.२७ |
| इतर उत्पन्न | २४ | ३,७०६.२६ | ३,०११.१७ |
| **एकूण उत्पन्न** | | **३८,३३३.७७** | **३३,०८९.३१** |
| **खर्च** | | | |
| वापरलेल्या साहित्याचा खर्च | २५ | २३,३३१.७१ | २२,१२४.४२ |
| वीज खरेदी | २५अ | ५३१.३६ | ५५५.७२ |
| कर्मचारी लाभ खर्च | २६ | २,१५७.७६ | २,२९१.८२ |
| वित्त खर्च | २७ | ३,६२६.०३ | ३,६१२.४० |
| घसारा आणि मुल्यऱ्हास खर्च | १,१अ,१ब | २,९७९.२७ | २,६९४.२४ |
| इतर खर्च | २८ | ५,६४८.१३ | २,३०२.०८ |
| **एकूण खर्च** | | **३८,२७४.२६** | **३३,५८०.६८** |
| सहयोगी संस्थांच्या नफ्याचा हिस्सा व करापूर्वीचा नफा | | ५९.५१ | (४९१.३७) |
| सहयोगी कंपन्यांच्या नफ्यातील वाटा | २४अ | (०.०६) | (०.१२) |
| अपवादात्मक बाबी आणि कराच्या आधी नफा / (तोटा) | | ५९.४५ | (४९१.४९) |
| वजा: अपवादात्मक बाबी | २८ब | (५३४.३९) | (७९६.३४) |
| **करपूर्व नफा/(तोटा)** | | **५९३.८४** | **३०४.८५** |
| **कर खर्च:** | | - | - |
| नफा व (तोटा) बाबीवर चालू कर | | - | - |
| स्थगित कर खर्च/ (प्राप्ती) | २८अ | २३५.९७ | १६९.७९ |
| एकूण कर खर्च | | **२३५.९७** | **१६९.७९** |
| **कालावधीतील नफा / (तोटा)** | | **३५७.८६** | **१३५.०६** |
| **इतर सर्वंकष उत्पन्न** | | | |
| नफा किंवा तोटा यात विवरण न केलेल्या बाबी: | | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांची पूर्णमोजणी | २६अ | (७४.७२) | (१७१.६२) |
| इतर सर्वंकष उत्पन्नावरील स्थगित कर खर्च लाभ / (व्यय) | | (१८.८१) | (४३.१९) |

| | | | |
|---|---|---|---|
| **कालावधीतील इतर सर्वंकष उत्पन्नांकडून (करांची मिळकत)** | | **(५५.९२)** | **(१२८.४३)** |
| **कालावधीतील एकूण सर्वंकष उत्पन्न (करांची निव्वळ)** | | **३०१.९५** | **६.६४** |
| **खालील बाबींना देय** | | | |
| कंपनीच्या मालकांना | | ३५७.९७ | १३५.१४ |
| नियंत्रण नसलेले हितसंबंध | | (०.११) | (०.०७) |
| **वर्ष भरातील नफा** | | **३५७.८६** | **१३५.०६** |
| **इतर सर्वकष उत्पन्न खालील बाबींना देय** | | | |
| कंपनीच्या मालकांना | | (५५.९२) | (१२८.४३) |
| नियंत्रण नसलेले हितसंबंध | | - | - |
| **इतर सर्वकष उत्पन्न** | | **(५५.९२)** | **(१२८.४३)** |
| **एकूण सर्वकष उत्पन्न खालील बाबींना देय** | | | |
| कंपनीच्या मालकांना | | ३०२.०५ | ६.७१ |
| नियंत्रण नसलेले हितसंबंध | | (०.११) | (०.०७) |
| **एकूण सर्वकष उत्पन्न** | | **३०१.९५** | **६.६४** |
| प्रतिभाग मिळकत (मूळ) (समभाग प्रत्येकी ₹ १०) | ४४ | ०.१४ | ०.०५ |
| **प्रतिभाग मिळकत (सौम्यकत - प्रतिभाग) (समभाग प्रत्येकी ₹ १०)** | | ०.१४ | ०.०५ |

महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिपा १ ते ५० हे आर्थिक विवरणपत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.
सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## समभागातील बदलांचे विवरणपत्रक (एकत्रित)

### १ . समभाग भांडवल

| तपशील | रक्कम (₹ कोटीत) |
|---|---|
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **२५,४५०.४७** |
| समभाग भांडवलातील बदल | ६६४.९५ |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **२६,११५.४२** |
| समभाग भांडवलातील बदल | १८८.८९ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **२६,३०४.३१** |

### २. इतर समभाग

(₹ कोटीत)

| तपशील | वाटप प्रलंबित असलेल्या समभागाचे अर्ज | ठेवलेली मिळकत | इतर सर्वंकष उत्पन्न | इतर समभाग | एकूण इतर समभाग | एकूण कंपनीच्या मालकांना देय | नियंत्रण नसलेल्या हितसंबंधास देय | एकूण इतर समभाग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **९१.१४** | **(८,७८५.६२)** | **(२७३.१६)** | **२९.४७** | **(८,९३८.२३)** | **(८,९५९.८८)** | **२१.६५** | **(८,९३८.२३)** |
| लेखा धोरणातील बदल किंवा आधीच्या कालावधीतील त्रुटी | | (१,१७९.१०) | | | (१,१७९.१०) | (१,१७९.१०) | | (१,१७९.१०) |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **९१.१४** | **(९,९६४.७२)** | **(२७३.१६)** | **२९.४७** | **(१०,११७.३३)** | **(१०,१३८.९८)** | **२१.६५** | **(१०,११७.३३)** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | १७२.८१ | | | १७२.८१ | १७२.८९ | (०.०७) | १७२.८१ |
| वर्षातील इतर सर्वंकष उत्पन्न | | | (१२८.४३) | | (१२८.४३) | (१२८.४३) | - | (१२८.४३) |
| वाटप प्रलंबित असलेल्या समभागाचे अर्जातील भर | २९४.५५ | | | ०.०९ | २९४.६४ | २९४.५५ | ०.०९ | २९४.६४ |
| वर्षभरात वितरण केलेले समभाग | (१९६.९०) | | | | (१९६.९०) | (१९६.९०) | - | (१९६.९०) |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **१८८.७९** | **(९,७९१.९१)** | **(४०१.५९)** | **२९.५६** | **(९,९७५.२१)** | **(९,९९६.८७)** | **२१.६६** | **(९,९७५.२१)** |
| लेखा धोरणातील बदल किंवा आधीच्या कालावधीतील त्रुटी | | (३७.७५) | | | (३७.७५) | (३७.७५) | | (३७.७५) |
| **पुनर्लिखित शिल्लक ०१.०४.२०२४ रोजी** | **१८८.७९** | **(९,८२९.६६)** | **(४०१.५९)** | **२९.५६** | **(१०,०१२.९६)** | **(१०,०३४.६३)** | **२१.६६** | **(१०,०१२.९६)** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | ३५७.८६ | | | ३५७.८६ | ३५७.९७ | (०.११) | ३५७.८६ |
| वर्षातील इतर सर्वंकष उत्पन्न | | | (५५.९२) | | (५५.९२) | (५५.९२) | - | (५५.९२) |
| वाटप प्रलंबित असलेल्या समभागाचे अर्जातील भर | - | | | ०.३२ | ०.३२ | ०.२४ | ०.०७ | ०.३२ |
| वर्षभरात वितरण केलेले समभाग | (१८८.८९) | | | | (१८८.८९) | (१८८.८९) | - | (१८८.८९) |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **(०.१०)** | **(९,४७१.८०)** | **(४५७.५०)** | **२९.८७** | **(९,८९९.५८)** | **(९,९२१.२१)** | **२१.६३** | **(९,८९९.५८)** |

महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिपा १ ते ५० हे आर्थिक विवरणपत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांक: १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचा रोकडता प्रवाह (एकत्रित)

(₹ कोटीत)

| तपशील | ३१ .०३ .२०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी | ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| अ) प्रवर्तन कार्यापासूनचा रोकडता प्रवाह | | |
| करोत्तर नफा/तोटा | ३०१.९५ | ६.६४ |
| **कर पूर्व नफ्याचा प्रवर्तन कार्यात वापरलेल्या निव्वळ रोखींशी मेळ करण्यासाठी समायोजने** | | |
| मालमत्ता, कारखाना व उपकरणे आणि अमूर्त मत्तावरील घसारा | २,९७९.२७ | २,६९४.२४ |
| वित्त खर्च | ३,६२६.०३ | ३,६१२.४० |
| विनिमय दरातील वसूल न झालेला फरक | (०.०३) | ०.०० |
| किरकोळ पत शिल्लक - | (८१.७९) | (१८.४८) |
| संशयास्पद अग्रिमांसाठी तरतूद | १७०.७१ | ४७.३७ |
| अपेक्षित पतहाणीसाठी तरतूद | २,८३३.०० | - |
| उलट नोंदणी केलेले व्याज | (५३४.३९) | (७९६.३४) |
| व्याजाचे उत्पन्न | (३.९१) | (०.०६) |
| निकामी वस्तू मालासाठी तरतूद | १०.७८ | (२४.६४) |
| **खेळत्या भांडवलातील बदला पूर्वीचा प्रवर्तनातील नफा (उपबेरीज) १** | **९,३०१.६१** | **५,५२१.१३** |
| खेळत्या भांडवलातील स्थानांतर | | |
| व्यापारी येण्यातील (वाढ)/घट | (२,७५४.४६) | (५३८.७५) |
| कर्ज, अग्रिमे व इतर मत्ता यातील (वाढ)/घट | (९०४.८७) | (२३७.५१) |
| वस्तू माल सूचींतील (वाढ)/घट | (७२०.८२) | (८०४.१५) |
| दायित्वे व इतर देणी यातील वाढ/(घट) | १,३४४.५४ | २,६७०.११ |
| **(उपबेरीज २)** | **(३,०३५.६१)** | **१,०८९.६९** |
| प्रवर्तनातून निर्माण झालेली रोकड ((१)+(२)) | | |
| वजा: थेट कर/एफ बी टी परतावा / भरलेले - निव्वळ | ६,२६६.०० | ६,६१०.८२ |
| प्रवर्तनातून निर्माण झालेली निव्वळ रोकडप्रवाह (अ) | ६,२६६.०० | ६,६१०.८२ |
| ब) गुंतवणूक कार्यापासूनचा रोकडप्रवाह | | |
| मालमत्ता, कारखाना व उपकरणे यांची खरेदी | (२,९९२.९६) | (३,०१५.३३) |
| मालमत्ता, कारखाना व उपकरणे यांची विक्री | १०८.७९ | ८१०.३७ |
| उपकंपन्यातील गुंतवणूक | (११.४२) | (०.१६) |
| मिळालेले व्याज | ३.९१ | ०.०६ |
| गुंतवणूक कार्यातून निर्मिलेल्या/(वापरलेला) निव्वळ रोकड प्रवाह (ब) | (२,८९१.६९) | (२,२०५.०६) |
| क) वित्तीय कार्यापासूनचा रोकड प्रवाह | | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची मिळकत | ४,५३०.९४ | ८,४४८.७३ |

| | | |
|---|---|---|
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड | (५,२०६.८४) | (५,०६९.३८) |
| समभागाच्या वितरणातून मिळालेली मिळकत | १०.१० | २९४.५५ |
| अल्पमुदतीच्या कर्जाची मिळकत/(परतफेड) | १,२६०.८२ | (३,९९७.८३) |
| भांडवल अनुदान प्राप्ती | - | २१०.४९ |
| वित्तीय खर्च (दिलेला) | (३,५००.३९) | (३,४८६.२५) |
| भाडेपट्टी | (४५१.०४) | (४९१.५८) |
| **वित्तीय कामातून निर्माण झालेली/वापरलेली निव्वळ रोकड प्रवाह (क)** | **(३,३५६.४१)** | **(४,०९१.२६)** |
| रोख व रोख समतुल्य यातील निव्वळ वाढ /(घट) (अ+ब+क) | १७.९१ | ३१४.५० |
| वर्षाच्या सुरुवातीची रोख व रोख समतूल्य | (२९.१८) | (३४३.६८) |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतुल्य** | **(११.२७)** | **(२९.१८)** |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतुल्य यांचा तपशील** | | |
| रोख व रोख समतुल्य रोजी | | |
| बँकतील शिलकी | | |
| - चालू/बचत खात्यांवर (टिपा क्र ७ पहा) | १४.५८ | ७.७२ |
| रोख समतुल्य | - | - |
| ओव्हरड्राफ्ट (टिपा क्र १७ पहा) | (२५.८६) | (३६.९१) |
| हातातील रोख | ०.०१ | ०.०१ |
| **वर्षाअखेरीची रोख व रोख समतुल्य** | **(११.२७)** | **(२९.१८)** |
| **टिपः रोख प्रवाह विवरणपत्र लेखा धोरण क्रमांक २१ नुसार तयार केले आहे.** | | |

महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिपा १ ते ५० हे आर्थिक विवरणपत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.
सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**जी एम कपाडिया आणि कंपनीसाठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४७६७ डब्ल्यू )

**सीए हितेन विरा**
भागीदार आयसीएआय क्रमांकः १४२६९१

**कल्याणीवाला आणि मिस्त्री एलएलपी साठी**
सनदी लेखापाल
(एफआरएन १०४६०७ डब्ल्यू / डब्ल्यू १००१६६)

**सीए साई वेंकटा रमना दामरला**
भागीदार आयसीएआय क्रमांकः १०७०१७
मुंबई, २५ सप्टेंबर, २०२५

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**मनेष वाघीरकर**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन नं: ११२०२०३९

**राधाकृष्णन बी.**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन नं: ०७७८१३३०

**विश्वनाथ कुलकर्णी**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए १४२१३

## दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रांवर टिपा

**अ) कंपनीची माहिती**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (''सूत्रधारी कंपनी'') ही कंपनी अधिनियम १९५६ नुसार संस्थापित झालेली कपंनी आहे आणि ती भारत देशातील अधिवासी संस्था आहे. सदर सूत्रधारी कंपनी आणि तिच्या उपकंपन्या या सुचिबद्ध (लिस्टेड) कंपन्या नाहीत. तिचे १०० टक्के समभाग महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीने धारण केलेले आहेत.

सदर सूत्रधारी कंपनी ही विजेची निर्मिती करण्याच्या व्यवसायात कार्यरत आहे. त्यासाठी कंपनीची महाराष्ट्र राज्यात सर्वत्र औष्णिक, जलविद्युत, आणि वायु आधारीत वीज निर्मिती केंद्रे आहेत. ती प्रामुख्याने तिची सहोदर उपकंपनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) या कंपनीला महाराष्ट्र वीज नियामक आयोग या नियामक संस्थेने ठरविलेल्या दराने वीज पुरवठा करते. तसेच महानिमिर्ती कंपनी सौर ऊर्जा आधारित महाराष्ट्रात वीज निर्मिती करते आणि ती महावितरण सह इतर ग्राहकांना वीज पुरवठा करते.

येथे जोडलेले एकत्रित वित्तीय विवरण पत्रके यामध्ये महानिर्मिती आणि तिच्या उपकंपन्याच्या वित्तीय विवरणपत्रकाचा (या सर्व समूहाला एकत्रितपणे 'कंपनी गट' असे येथे संबांधले आहे) आणि या गटाचे संयुक्त उपक्रम कंपन्यातील हितसंबंध यांचा समावेश होतो,

एकत्रित गटातील समाविष्ट कंपन्यांची माहिती खाली दिली आहे.

| अनु. क्र. | नाव | स्थापनेचा देश | स्वरूप | मालकीचे हितसंबंधाच्या प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| १) | धोपावे कोस्टल पॉवर मर्यादित | भारत | उपकंपनी | १००% |
| २) | महाजेनको नविकरणीय ऊर्जा मर्यादित | भारत | उपकंपनी | १००% |
| ३) | महागूज कोलायरीज मर्यादित | भारत | उपकंपनी | ६०% |
| ४) | यू. सी. एम. कोल कंपनी मर्यादित | भारत | सहयोगी कंपनी | १८.७५% |
| ५) | महाजेनको एनटिपीसी ग्रीन एनर्जी प्रायव्हेट मर्यादित | भारत | संयुक्त उपक्रम | ५०% |

**ब) वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठीची आधारभूत तत्वे:**

**१. भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन करण्यासंबंधीचे निवेदन**

ही एकत्रित वित्तीय विवरण पत्रके सर्वार्थाने भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन करून तयार केली आहेत. ही भारतीय लेखा मानके कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १३३, ज्याचे सहवाचन कंपन्यासाठी (भारतीय लेखा मानके) नियमावली २०१५, यातील नियम ३ आणि कंपन्यांची (भारतीय लेखा मानके) दुरूस्त केलेली नियमावली २०१६ यामध्ये सूचित केलेले आहेत. तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतुदी यांचे अनुपालन करतात.

कंपनी गटाच्या सादरीकरणासाठी आणि व्यवहारासाठी भारतीय रूपया हे चलन वापरले आहे. तसेच तिच्या व्यवहाराचे चलनसुद्धा भारतीय रूपया हेच आहे. वित्तीय विवरण पत्रकातील सर्व रकमांच्या आकडेवारीचे जवळच्या कोटी रूपयामध्ये (कोटी) रूपांतरण केले आहे. (जेथे इतर काही निर्देश असेल त्याला अपवाद)

**एकत्रिकरणाची तत्वे:**

**उपकंपन्या**

उपकंपन्या म्हणजे कंपनीतर्फे नियंत्रित केल्या जातात अशा सर्व संस्था (यांमध्ये विशेष हेतूसाठी अस्तित्वात आणलेल्या संस्थाचाही समावेश आहे). जेव्हा अस्तित्वात आणलेल्या संस्था मधील गुंतवणूकीपासून सूत्रधारी कंपनीला परताव्याची अपेक्षा किंवा अधिकार असतो आणि संस्थेवर आपल्या शक्तीचा वापर करून त्या परताव्यांवर परिणाम करण्यासाठी सूत्रधारी कंपनीकडे सामर्थ्य असते तेव्हा ती नियंत्रणे कार्यरत आहेत असे मानले जाते. नियंत्रणाचे मूल्यांकन करण्यासाठी, जर हक्क सबल असतील तरच संभाव्य मतदानाचे हक्क विचारात घेतले जातात. नियंत्रण सुरू होण्याच्या तारखेपासून ते संपण्याच्या तारखेपर्यंतची वित्तीय विवरणपत्रके या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकामध्ये समाविष्ट केली आहेत. कंपनी, उपकंपन्या व संयुक्त नियंत्रणातील संस्था यांचे एकत्रीकरण करण्यासाठी त्यांचे समान व्यवहार व समान परिस्थितीतील इतर घटना यासाठी समान लेखा धोरण वापरले आहे व त्यात नमूद केलेल्या पद्धतीचा उपयोग केला आहे. कंपनी गटाची एकत्रित वित्तीय विवरण पत्रके लाईन बाय लाईन या तत्वाने एकत्रित केली आहेत.

**सहयोगी / संयुक्त उपक्रम कंपन्या (समभागात गुंतवणूकीचे लेखे)**

संयुक्त उपक्रम कंपनी म्हणजे अशी एक रचना असते ज्यात एका संमत कराराद्वारे कंपनीचे संयुक्त नियंत्रणे संस्थापित केलेली असतात आणि त्यातील वित्तीय व प्रवर्तनाच्या निर्णयासाठी सर्वानुमते संमती आवश्यक असते. संयुक्त नियंत्रणातील संस्थेतील गुंतवणूकीचे लेखे करण्यासाठी इक्विटी मेथड (समभागामध्ये गुंतवणूकदारांचा समावेश) वापरली जाते व प्रारंभी तिला खर्चानुसार मान्यता दिली जाते.

अशा संस्थेत जर नियंत्रण नसणाऱ्या हितसंबंधी धारणकर्त्याकंडे मोठया प्रमाणात सहभागी होण्याचे अधिकार असतील आणि त्यामुळे त्यांना सर्वसामान्य व्यवहारातील निर्णयामध्ये प्रभाव मिळत असेल तर कंपनी अश्या संस्थाचे एकत्रीकरण करीत नाही. अशा संस्थेतील गुंतवणूकीचे लेखे इक्विटी मेथड ऑफ अकाऊंटीग या प्रकारे केले जाते.

**एकत्रिकरणासाठी वगळलेले काही व्यवहार**

एकत्रित वित्तीय विवरण पत्रे तयार करताना कंपनी गटातंर्गत शिलकी व्यवहार आणि कंपनी गटातंर्गत झालेल्या व्यवहारातून वसूली न झालेले उत्पन्न व काही खर्च हे पूर्णपणे वगळते जातात. समभाग गुंतवणूकदारांचा समावेश असणाऱ्या संस्था यामधील व्यवहारातून वसूल न झालेली प्राप्ती किंवा तोटे हे कंपनीचे त्या संस्थेतील गुंतवणूकीच्या प्रमाणात वगळले जातात.

**अनियंत्रित हितसंबंधी**

अनियंत्रित समभाग धारकांच्या वाटयाचे मापन अश्या हितसंबधाकडे असलेल्या संपादनाच्या तारखेला ज्याची निव्वळ ओळख निश्चिती करता येईल अश्या मत्तांच्या भागाच्या प्रमाणात केली जाते. कंपनी समुहातील उपकंपन्याच्या समभागातील हितसंबधातील बदल ज्यामुळे नियंत्रण गमावले जात नाही. ते समभाग व्यवहार म्हणून नोंदविला जातात.

**२. चालू /चालू नसलेल्या मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण**

कंपनी अधिनियम २०१३ ची परिशिष्ट क्र. ३ यात दिलेले निकष आणि कंपनीचे सामान्यत: कार्यचक्र यानुसार गटातील मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण चालू आणि चालू नसणाऱ्या या प्रकारामध्ये केले आहे. स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांचे त्यांच्या निव्वळ तत्वावर चालू नसणाऱ्या असे वर्गीकरण केले आहे.

वरील हेतुसाठी कंपनी गटाने त्याचे कार्यचक्र बारा महिन्यासाठी निश्चित केले आहे. ते उत्पादनाचे स्वरूप आणि उत्पादनासाठी लागणारी निवेश साहित्य यांचे संपादन करून त्यांचे रोख आणि रोख समतूल्य यात रूपांतरण करण्यासाठी लागणारा वेळ यावर आधारलेले असते.

सुत्रधारी कंपनी विद्युत अधिनियम २००३ द्वारे शासित आहे. विद्युत अधिनियम २००३ व त्याची नियमावली यातील तरतूदी जेव्हा कंपनी अधिनियम २०१३ च्या अन्वये लागू होणाऱ्या तरतुदींशी सुसंगत होत नसतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १७४ च्या अटीनुसार विद्युत अधिधिनयम २००३ आणि त्यांची नियमावली अभिभावी होतील.

**३. ऐतिहासिक खर्च संकेतावर टिपा**

ऐतिहासिक किंमत सामान्यत: वस्तू आणि सेवांच्या बदल्यात दिलेल्या मोबदल्याच्या रास्त मुल्यांवर आधारित असते.

विक्रीसाठी काढलेल्या मत्ता, ज्यांचे मूल्य मापन त्यांच्या चालू मूल्य आणि रास्त मूल्य वजा विक्रीचा खर्च यातील किमान मूल्या इतके केले आहे, त्यांचे मापन प्रत्येक अहवाल कालावधीच्या अखेरीस केले जाते; याबाबतचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या लेखा धोरणात केले आहे.

मेसर्स महागूज कंपनीच्या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांचा आदेश दि. २५.०८.२०१४ (ज्याचे वाचन आदेश

दि. २४.०९.२०१४ सोबत होते) यानुसार, भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने वर्ष १९९३ ते २०१३ या काळातील कोळसा खाणी वाटप रद्द केले. यामध्ये महागूज कंपनीच्या प्रवर्तकांनी दिलेल्या मच्छाकाटा - महानदी कोळसा ब्लॉकचा समावेश आहे. भारत सरकारने रद्द केलेल्या कोळसा खाणींच्या पुर्नवाटप प्रक्रियेसाठी कोळसा खाणी (विशेष तरतुद) कायदा २०१५ (क्र. ११ वर्ष २०१५ चा) दि. २१.१०.२०१४ पासून पूर्नलक्षी प्रभावाने अमलाता आणला. त्यानुसार कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी आदेश दिल्यावर या कोळसा ब्लॉकचे पूनर्वाटप व कागदपत्रांचे आणि अधिकारांचे हस्तांरतण केले जाईल. या कागदपत्रात, भूगर्भशास्त्रीय अहवाल, खाण विकास योजना व नंतर ती बंद करण्याच्या योजना आदिंचा समावेश आहे. वरील कारणामुळे महागुज कंपनीही सतत चालू राहणारी कंपनी आहे. या तत्वानुसार तिची वित्तीय विवरण पत्रके तयार करणे चालू ठेवले आहे.

धोपावे कोस्टल पॉवर कंपनी मर्यादित या कंपनीच्या प्रकरणात लेखे चालू असलेली संस्था या तत्वानुसार केलेले नाहीत. कारण सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाने सदर धोपावे कोस्टल पॉवर कंपनी मर्यादित या नावाची कंपनी बंद करण्यास मान्यता दिली असून त्याच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाशी संपर्क साधला आहे

**४. सुज्ञ निर्णय आणि अंदाज यांचा उपयोग करणे**

कंपनीची वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी व्यवस्थापनाला काही सुज्ञ निर्णय, अंदाज करावे लागतात तसेच गृहिते धरावी लागतात. त्याचा परिणाम अहवालात दिलेल्या महसुल, खर्च, यांच्या रकमा तसेच मत्ता व दायित्वे आणि त्यासोबतची प्रकटने, आकस्मिक दायित्वे यांच्यावर होतो. या अंदाज व गृहितकातील अनिश्चिततेचा परिणाम, भविष्यकाळात मत्ता व दायित्वे यांच्या लेखात नोंदविलेल्या रकमामध्ये प्रभावी समायोजन असा होऊ शकतो. कंपनी अंदाज व गृहिते यांच्या सर्वोत्तपरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे सतत मूल्यमापन करते.

विशेषत: लेखा धोरणे लागू करताना महत्वाच्या क्षेत्रातील अंदाज व न्याय निर्णय यांच्या माहितीचे एकत्रित वित्तीय विवरण पत्रांतील

मान्य रकमांवर होणारे महत्वाचे परिणाम खाली दिले आहेत.

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आणि उर्वरित आयुष्य याविषयीचे अंदाज करणे.
- वित्तीय नसलेल्या मत्ताची मूल्यघट करणे.
- वित्तीय विलेखांच्या रास्त मुल्यांची मोजणी.
- व्याख्यांकित लाभ बंधनाचे व महत्वाच्या विमागणिती गृहितांचे मापन
- तरतूदी आणि आकस्मिक परिस्थिती
- स्थगित कर मत्ता यांच्या वसुली योग्यतेचे मूल्य मापन

लेखांचे अंदाजामध्ये सुधारणा केल्यास एकत्रित वित्तीय विवरण पत्रांच्या कालावधीकरिता भविष्यातील परिणाम विचारात घेऊन त्यांना प्रक्षेपाने मान्यता दिली जाते, जर भविष्यातील काळात बाधा येणार असेल तर, संबंधित लेखा मानकांनुसार त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने समजणे आवश्यक असेल, तशी मान्यता देण्यात येते.

**क) महत्वाची लेखा धोरणे**

ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार करणे आणि सादर करणे यासाठी खालील लेखा धोरणे अंगिकारण्यात आलेली आहेत. या लेखा धोरणांचे कंपनी सातत्याने पालन करत आहे.

**१. मत्ता कारखाने आणि साधने**

१. मालकीची जमीन खरेदी किंमती प्रमाणे नमूद केली जाते. मत्ता, कारखाने आणि साधने यांचे मूल्य हे खरेदी किमतींमधुन संचित घसारा व मूल्य घट यांची वजावट विचारात घेऊन नमूद केले जाते.

२. कोणत्याही मत्तांच्या प्रारंभिक खर्चात पुढील बाबी समाविष्ट असतात, खरेदीची किंमती किंवा मत्ता उभारणीचे खर्च (यांमध्ये आयात शुल्क, माल वाहतूक भाडे परतावा न मिळणारे कर यांचा अंतर्भाव असतो) याशिवाय सदर मत्ता तिच्या जागेवर आणण्यासाठी प्रत्यक्ष केलेले खर्च, ती इच्छित कामासाठी संचलीत करण्यासाठी केलेले खर्च आणि पात्र मत्तेसाठी कर्ज खर्च. (पात्र मत्ता म्हणजेच अशी मत्ता जी त्यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यासाठी आवश्यक असणारा बराच काळ घेते.)

मत्तेचे खरेदी मुल्य म्हणजे एकत्रित दिलेली रक्कम आणि सदर मत्ता संपादनासाठी विचारात घेतलेल्या इतर बाबीचे रास्त मूल्य होय. यंत्राच्या खर्चात यंत्र प्रायोगिक तत्वावर चालविण्याचे खर्च प्रायोगिक तत्वावर चालवण्याच्या कालावधी दरम्यान उत्पादीत कोणत्याही बाबीच्या विक्रीतून मिळणारी रक्कम वजा केल्यावर आणि प्रवर्तनाचे इतर खर्च म्हणजे वाहतूक खर्च, स्थापन करण्याचे आकार, इत्यादी बांधकाम उभारणी कालावधीतील इतर उत्पन्नाची निव्वळ रक्कम इत्यादी यांचा समावेश केला जातो. ज्या प्रकल्पांचे काम चालू आहे त्याचा प्रचलीत खर्च धरला जातो. त्यात थेट खर्च, संबंधित प्रवर्तन पूर्व प्रासंगिक खर्च आणि देय व्याज यांचा समावेश असतो.

जर एखाद्या बाबीपासून कंपनीला भविष्यात आर्थिक लाभ मिळणे संभवनीय असेल आणि अशा मत्तांचा खर्च जर विश्वसनीयरीत्या मोजता येत असेल तरच असे नंतरचे खर्च त्या मतांच्या प्रचलीत रकमेत समाविष्ट केले जातात किंवा त्यांना स्वतंत्र मत्ता म्हणून मान्यता देण्यात येते.

३. जर कंपनीने केलेल्या भांडवली खर्चातून जिच्यावर कंपनीची मालकी किंवा नियंत्रण नाही अशी मत्ता निर्माण केली जात असेल तर असे खर्च मत्तांचे बांधकाम चालू असे पर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये दाखविले जातात आणि त्यांच्या समतूल्य रक्कम निकामी मत्तांची तरतूद खर्च म्हणून वजा केली जाते आणि ती ज्यावर्षी खर्च केली त्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकात आकारली जाते. बांधकाम पूर्ण झाल्यावर वरील भांडवली खर्चाचे भांडवलीकरण केली जाईल आणि त्याचे समायोजन कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्ता यांच्या तरतुदीत केले जाईल. कंपनीची मालकी नसलेला मत्ता आणि कंपनीच्या सामाजिक जबाबदाऱ्यांना कार्यासाठी दिलेले अंशदान जेव्हा खर्च होईल तेव्हा त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाईल.

४. पुरक मालमत्ता: कंपनीला तिच्या अन्य काही मत्ताद्वारे भविष्यात आर्थिक लाभ मिळविण्यासाठी मालमत्ता, कारखाने व साधने यातील काही उपयुक्त बाबी संपादन कराव्या लागतात (या बाबी स्वत: भविष्यात आर्थिक लाभ मिळवून देतीलच असे नसते) अशा बाबींना मत्ता म्हणून मालमत्ता, कारखाने व साधने यात पात्रता द्यावी लागते. कारण त्यामुळे कंपनीला भविष्यात अन्य संबधीत मत्तांद्वारे आर्थिक लाभ मिळविता येतात. या बाबी संपादन केल्या नसल्या तर असे जादा आर्थिक लाभ मिळू शकले नसते. मात्र कंपनी या मत्तांचे त्यांच्या प्रकरण निहाय स्वरूपाची पडताळणी केल्यानंतर, त्यांचे भांडवलीकरण करते.

५. प्रगतीपथावरील भांडवली कामांमध्ये कंत्राटदाराचे देयकाचे अंतिमीकरण करणे जिथे राहिले आहे, त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर केले जाते. मात्र ते अंतीम चुकते होण्याच्या वर्षात समायोजन करण्याचे अधीन असते.

६. भांडवली कंत्राटाच्या किमतीच्या विचलनाच्या दाव्यांच्या प्रकरणी, कंपनीने दावे स्वीकारले तरच त्यांचे लेखे केले जातात.

७. जेव्हा मत्ता, कारखाने व साधने आणि एखादा महत्वाचा भाग ज्याला सुरूवातीपासून मत्ता, कारखाने व साधने म्हणून मान्यता दिलेली आहे याची विल्हेवाट केल्यास त्याची मान्यता काढून घेतली जाते किंवा जर अशा मत्ताच्या वापरातून भविष्यात कोणतेही आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा नसते तेव्हा त्यांची मान्यता काढून घेतली जाते. ही मान्यता काढल्यानंतर होणारी प्राप्ती किंवा हानी यांचा समावेश नफा-तोटा पत्रकात समाविष्ट केला जातो.

८. नव्याने कार्यान्वित केलेल्या प्रकल्पांच्या भांडवली खर्चाकरिता कंपनी निम्नलिखित धोरणाचे पालन करते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांची बहुवर्षीय वीज दर नियमने २०१९ यांच्याशी हे धोरण सुसंगत आहेत.

कंपनी अधिकचे अनिवार्य स्पेअर्स/महत्वाचे स्पेअर्स सुरूवातीचे स्पेअर्स जे मूळ प्रकल्प स्थापने बरोबर घेतले जातात किंवा स्थापने नंतर ३ वर्षात घेतले जातात ज्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांची परवानगी असते याचे भांडवलीकरण प्रकल्पाच्या ४ टक्के इतकी केली जाते.

९. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या आवश्यक सुट्टया भागाचे मूल्य त्यांच्या विहीत मर्यादेपेक्षा जास्त असेल तर त्यांचे भांडवलीकरण मालमत्ता, कारखाने आणि साधने यामध्ये केले जाते. अन्य प्रकरणी सुटे भाग संपादन केल्याबरोबर त्या वस्तूमालसाठा सूचीमध्ये समाविष्ट केले जातात आणि त्या वापरल्यानंतर त्यांची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

१०. यंत्राचे जे सुटे भाग ज्या वर्षी निकामी होतात, त्यावर्षी त्यांचे कमी केलेले लिखित मूल्य नफा-तोटा आकारले जाते, मात्र या जुन्या भागाच्या ऐवजी नवे भाग कार्यान्वित झाले पाहिजे आणि जुने भाग निरूपयोगी झाले पाहिजेत. जर जुने भाग दुरूस्त करुन पुर्नवापरासाठी योग्य झाले तर त्या दोन्ही भागांचे त्यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्याच्या काळासाठी घसारा करण्यात येईल. जून्या संबंधीत भागांच्या दुरूस्तीच्या खर्चाची आकारणी नफा-तोटा पत्रकात होईल

११. जेव्हा मत्ता किंवा भांडवली सुटे भाग बदलल्यास मत्ता/भांडवली सुटे भागाच्या मूळ भागाचे कमी झालेली मूल्य माहिती नसेल तर. मत्ता/मत्तांच्या नव्या भागांची/भांडवली सुट्टया भागांची किंमत/निव्वळ पुस्तकी मूल्य निर्लेखित केले जाईल.

१२. मालमत्ता, कारखाने व साधने नष्ट करणे किंवा एखाद्या साईटला त्याच्या उपयुक्त आयुष्याच्या शेवटी त्याच्या पूर्वीच्या स्थितीत पुर्नसंचयित करण्याचे बंधन (कायदेशीर किंवा रचनात्मक) अस्तित्वात आहे आणि त्याची आकारणी नफा तोटा पत्रकात होईल. त्यांचे अंदाजे खर्चाचे वर्तमान मूल्य, साईट काढून टाकणे किंवा पुर्नसंचयित करणे हे संपादनाच्या खर्चासह भांडवल केले जाते, किंवा बांधकाम पुर्ण झाल्यावर आणि कार्यान्वित नसलेले तरतुदीच्या रूपात संबंधित दायित्व ओळखले जाते. मालमत्ता, कारखाने व साधने या बाबींचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत, नफा तोटा पत्रकातील वित्त खर्चातून ही निकामी तरतुद रद्द करण्यात येते.

१३. कंपनीने पूर्वीच्या सर्व सामान्य मान्य केलेली लेखा तत्वानुसार मालमत्ता, कारखाने यांचे चालू मुल्य हेच भारतीय लेखा मानकाच्या संक्रमण तारखेस अभिदत्त मूल्य म्हणून मानल्याचे ठरविले आहे.

१४) कंपनीच्या आकारमान व्यवसायाचे स्वरूप व भौगोलिक विस्तार विचारात घेता, कंपनीकडून मालमत्ता, यंत्रसामग्री व उपकरणे यांची प्रत्यक्ष पडताळणी दर तीन वर्षांच्या कालावधीत एकदा करण्यात येते. अशा प्रकारची मागील पडताळणी वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये करण्यात आलेली आहे. चालू वर्ष हे विश्रांती वर्ष असल्याने, मालमत्ता, यंत्रसामग्री व उपकरणे यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आलेली नाही.

**२. अमुर्त मत्ता**

अमुर्त मत्ता या खरेदी किंमत मधून संचित घसारा आणि मुल्यघट यांची वजावट घेऊन नोंदल्या जातात. अमूर्त मत्ता (सॉफ्टवेअर व्यतिरिक्त) यांची त्यांचे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने घसाराची तरतुद केली जाते आणि जेव्हा अमूर्त मत्तांचे मूल्यघट झाल्याची चिन्हे असतील तेव्हा त्यांचे मूल्यघट करण्यासाठी मुल्यांकन केले जाते. सॉफ्टवेअरच्या घसाऱ्याची तरतूद महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी विहित केलेल्या दराप्रमाणे केली जाते. अमूर्त मत्तांचे घसारा व मूल्यघट यांची नोंद नफा व तोटा पत्रकात करण्यात येते. कंपनीने अस्तित्वातील अमूर्त मत्तांचे पूर्वीच्या सर्वसामान्य मान्य केलेल्या लेखा तत्वानुसार विद्यमान मुल्य, यालाच भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेचे अभिदत्त मूल्य मानण्याचे ठरविले आहे.

**३. प्रगतीपथावरील भांडवली कामे**

मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या बाबतीत नवीन प्रकल्प क्षमता विस्तार यांच्या प्रकरणी असे प्रकल्प/ कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत संबंधीत खर्च आणि कर्जावरील व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते. तसेच संबधित प्रकल्पांची तांत्रिक आणि वाणिज्य वर्धनक्षमता या विषयीचे अभ्यास पूर्ण करून नंतर त्यांची अंमलबजावणीचा प्रारंभ करण्यासाठी करण्यात येत असलेल्या खर्चाचे कंपनीच्या संचालक मंडळाच्या मंजूरीनंतर भांडवलीकरण करणे सुरू केले जाते. अशा प्रकल्पांच्या शक्यते विषयी अभ्यास करण्याचे खर्च जेव्हा आणि जसे केले जातात, त्याप्रामाणे त्यांची आकारणी नफा–तोटा पत्रकात करण्यात येते.

अ) वेतनावरील खर्च थेट प्रकल्पाशी संबंधित असेल तर, बॉयलर टर्बाइन जनरेटर संबंधित कामे आणि कारखाना संबंधित इतर कामे पूर्ण होईपर्यंत वेतनावर केलेला खर्च प्रकल्प खर्चाचा भाग असेल.

ब) प्रकल्प संबंधित शिल्लक कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ही एक वषापर्यंतचे प्रशासकीय व सामान्य खर्च जे प्रकल्प निर्मितीसाठी थेट कारणीभूत असतील त्यांचे भांडवलीकरण केले जाते. त्यानंतर त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

क) पर्यवेक्षी कार्यालयांचे कोणतेही खर्च लघू भांडवल योजनेमध्ये वाटप होणार नाही. लघू भांडवल योजना म्हणजे ज्या योजनांच्या बांधकामाच्या रचनेला, बारा महिन्यांपेक्षा कमी काळ लागतो अशा योजना आहेत.

ड) जर कंपनी एकापेक्षा जास्त प्रकल्प/भांडवली योजनांची (लघू योजना वगळून) अंमलबजावणी करीत असेल तर पर्यवेक्षी कार्यालय येथील सामाईक खर्चाचे वाटप वर्षभरातील प्रगती पथावरील कामातील वाढीच्या आधारे केले जाईल.

**४. परिसमापनातील नुकसान ज्यावर्षी निश्चित होईल त्यावर्षी मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या खर्चात समायोजित केले जातात.**

**५. कर्ज खर्च**

कर्ज खर्चामध्ये, कर्जाचे घेण्यासंबंधीचे इतर खर्च आणि व्याज यांचा समावेश असतो. ज्या मत्ता यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यास बराच वेळ घेतात, त्यांच्या संपादनासाठी केलेल्या कर्ज खर्चाचे भांडवलीकरण ज्या महिन्यात मालमत्ता इच्छित वापरासाठी तयार होतात त्या महिन्यापर्यंत मालमत्तेचा किमतीचा भाग म्हणून केले जाते.

जोपर्यंत दीर्घमुदतीचा निधी मिळत नाही तोपर्यंत पात्र मालमत्तासाठी घेतलेल्या सर्वसामान्य कर्जावरच्या व्याजाचे सुद्धा भांडवलीकरण केले जाते. याशिवाय पात्र मालमत्ता संबंधित बांधिलकी आकारणीचे कर्जाच्या परतफेडीच्या वेळेप्रमाणे नफा तोटा पत्रकात नोंद केली जाते.

भांडवली मत्ता संपादन किंवा उभारणी यांच्या संबंधित नसलेले इतर कर्जासंबंधीचे खर्च हे ज्या कालावधीमध्ये केले जातात तेव्हा त्यांची नोंद नफा-तोटा पत्रकात खर्च म्हणून केली जाते.

**६. अवित्तीय मत्तांची मुल्यघट**

वस्तूसूची, स्थगित कर मत्ता आणि विक्रीस योग्य असे वर्गीकरण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता वगळून इतर अवित्तीय मत्तांचे ताळेबंदाच्या तारखेस मूल्यघट झाल्याबाबतचा आढावा घेतला जातो.

जर अशी चिन्हे दिसली तर किंवा जर मूल्यघट शोधण्यासाठी वार्षिक परिक्षणांची गरज असेल तर कंपनी समुहातर्फे या मत्ताच्या वसूल होऊ शकणाऱ्या रकमांचा अंदाज केला जातो. अशी वसूली योग्य किंमत अशा मत्ता पासून रोख निर्मितीचे रास्तमूल्य वजा विल्हेवाटीचा खर्च आणि वापराचा खर्च यापेक्षा जास्त असावी. एखादी मत्ता इतर मत्तांपासून किंवा मत्तांच्या गटापासून वेगळी असून रोखीचा प्रवाह आत आणत नसेल तर त्या मत्तेची वसूली योग्य किंमत निश्चित केली जाते.

जेव्हा एखाद्या मत्तेची किंवा रोकड निर्माण कर्त्या घटकाची काळाप्रमाणे कमी झालेली रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त होत असेल तर त्या मत्तांचे मुल्यघट झाले असे समजून, तिचे रास्तमुल्य हे मुल्यघट विचारात घेऊन नोंदले जाते. वापरमुल्यांचे निर्धारण करताना, भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह हा त्याच्या विद्यमान मुल्य इतका कमी केला जातो, त्यासाठी कर-पूर्व सवलत दर वापरला जातो. कारण करपूर्व दरात, पैशाचे वेळेनूसार मुल्यांचे चालू बाजाराप्रमाणे निर्धारण व मत्तेचे विशिष्ट धोके अंतर्भूत असतात. विल्हेवाटीचा खर्च वजा करून रास्त मूल्य निश्चित करण्यासाठी सध्याच्या बाजारभावातील व्यवहार विचारात घेतले जातात. असे निश्चित व्यवहार ओळखून काढता येत नसेल तर योग्य मूल्यांकनाचे प्रारूप वापरले जाते.

मेसर्स महागूजच्या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांचे दि. २५.०८२०१४ चे निकालपत्र आणि दि. २४.०९.२०१४ रोजी डब्ल्यू. पी. (क्रिमिनल) नं. १२० वर्ष २०१२ चे इतर संलग्न विषयी दिलेल्या आदेशात स्क्रिनिंग कमिटी आणि सरकारी वितरणाच्या मार्गे, वर्ष १९९३ पर्यंतचे सर्व कोळसा खाण वितरणे बेकायदा ठरवली आणि २०४ कोळसा खाणीचे झालेले वाटप रद्दबातल केले. कोळसा मंत्रालयाने त्याचे पत्र दि. ०१.१०.२०१४ यात त्याची माहिती दिली आणि वेबसाईटवर सुद्धा प्रदर्शित केली. त्यामध्ये मच्छकाटा महानदी कोळसा खाणीचा समावेश होता.

त्यानंतर कोळसा मंत्रालयाने कोळसा खाण ज्यांना आधी मिळाले होते, त्यांच्याकडून मूल्यांकनाचा तपशील मागवली होती. त्यानंतर मूल्यांकनाचे तपशील शपथ पत्रामधून सादर करावयाचे होते. तशी माहिती शपथपत्राद्वारे सादर करण्यात आली. ही माहिती कोळसा मंत्रालयाने मागवली आहे कारण त्यांच्याकडे पूर्वीची वाटप झालेल्यांकडून कागदपत्र व हक्क नंतरच्या बोलीदाराकडे हस्तांतरीण करण्याची यत्रंणा आहे. या कागदपत्रात भूगर्भशास्त्रीय अहवाल, खाणी योजना, खाण बंद करण्याची पद्धत इ. समाविष्ट आहे. कोळसा मंत्रालयाने मार्च २०१५ पासून स्पर्धात्मक बोलीद्वारे कोळसा ब्लॉकचे पूनर्वाटप केले असून त्यांच्या प्रकरणात पूर्वीच्या खाणकाम मिळालेल्या संस्थानी केलेल्या खर्चाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू केलेली आहे.

मच्छकाटा-महानदी कोळसा खाणीचे पूनर्वाटप दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत कोणत्याही बोलीदारांना झालेले नव्हते. कंपनीला कोळसा मंत्रालयानेही कंपनीने केलेल्या खर्चाच्या मुल्यांकनाबाबत कळविलेले नव्हते. त्यामुळे व्यवस्थापनाचे असे मत आहे की, कंपनीच्या कोणत्याही मत्तांची मुल्यघट करावाची गरज नाही.

वित्तीय वर्ष २०१४-२०१५ पर्यंत केलेल्या खर्चाची रक्कम ₹ ५४,४०,७०,१११/- ही ताळेबंदात इतर चालु नसणाऱ्या मत्ता या शीर्षकाखाली दाखवली आहे. या खर्चात प्रामुख्याने कंपनी गठीत करण्याचे खर्च, सल्लागाराचे शुल्क देणे, भूगर्भशास्त्रीय अहवाल, खरेदीसाठी सी.एम.पी.डी.आय.एल. कडे भरलेले शुल्क, वॉशिबिलीटीचा परिक्षा अहवाल, अन्य सल्ला मसलती, कायदेशीर आणि व्यावसायिक आकार आणि कोळसा खाण विकसित करण्यासाठीचे प्रवर्तन खर्च यांचा समावेश आहे. कंपनीचे असे मत आहे की भूगर्भशास्त्रीय अहवाल खरेदीसाठी मागील काही वर्षात केलेले खर्च यांचा अन्वयार्थ खाणीचे पायाभुत खर्च असा करावा आणि तशी मागणी कोळसा मंत्रालय भारत सरकार यांचे कडे केली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, कोळसा ब्लॉक वाटप रद्द केल्यानंतर, कोळसा मंत्रालयाने, कोळसा खाणीत (विशेष तरतूद) वटहुकुम २०१४ नुसार पूर्वीच्या वाटप प्राप्त संस्थाच्या भरपाईचे मूल्यांकन सूरू केले. महागूज कंपनीत (एमजीसीएल) केलेल्या खर्चाची माहिती कळविण्यात आणि याशिवाय जेथे यशस्वी बोलीदारांना पुर्नवाटप/विहीत आदेश देण्यात आले त्या पूर्वीच्या ब्लॉक प्राप्त झालेल्या संस्थाच्या खर्चाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू केली आहे. मच्छकाटा कोळसा ब्लॉक अद्याप कुणाही बोलीदारांना दिलेला नाही, त्यामुळे कोळसा मंत्रालयाने त्याच्या मूल्यांकनाचा विचार सुरू केलेला नाही.

कंपनीने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती, कोळसा खाणी (विशेषत तरतुदी) वटहुकुम २०१४ यात दिलेल्या मूल्यांकन प्रक्रिया आणि तरतुदीप्रमाणे गुणवत्तेच्या आध तरतुदीप्रमाणे गुणवत्तेच्या आधारे होण्याची शक्यता आहे. सध्या कोळसा मंत्रालयाकडून प्रतिपूर्ती केली जाण्याची शक्यता नसलेल्या खर्चासाठी तरतूद केलेली नाही. मात्र कोळसा मंत्रालयाने मूल्यांकन प्रक्रियेचे अंतिमीकरण केल्यानंतर लेख्यांमध्ये आवश्यक ती समायोजना/तरतुदी करण्यात येतील.

## ७. घसारा तरतूद

अ) भाडेपट्टीच्या जमिनीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, नियमनाने विहित केलेल्या सरळ रेखा तत्व पद्धतीनुसार ३.३४ टक्के दराने घसाऱ्याची तरतूद केली जाते.

**ब) मत्ता, कारखाने आणि साधने**

१. कंपनी ही दर नियमन असणारी संस्था असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहीत केल्याप्रमाणे घसाऱ्याचे दर कार्यपद्धती आणि मत्तांचे आयुष्य मापन अनुसरण्यात येतात. त्याचप्रमाणे कंपनी सरळ रेषा पद्धतीनुसार मत्तांच्या खर्चाच्या ९०टक्के पर्यंत घसारा आकारते.

२. वर्षभरात मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्यातील वाढ/विल्हेवाट/काढून टाकणे यासाठीचा घसारा वरील कृतींच्या महिन्यात यथा प्रमाण तत्वाने केला जातो. ग्रीन फिल्ड/ब्राऊन फिल्ड यांचे वाणिज्यिक कार्य सुरू होण्याच्या तारखेपासून त्यांचे भांडवलीकरण नफा तोटा पत्रकात आकारले जाते.

३. ज्या मत्तांचा (खालील परिच्छेद ४ यात नमूद केलेल्या मत्ता वगळून) कार्यान्वयानंतर घसारा ७० टक्क्यापर्यंत आकारलेला नाही, त्यांच्या ठोक किमतीवर घसाऱ्याची आकारणी ७० टक्के होण्याच्या वषापर्यंत येथे खाली दिलेल्या घसारा दराने आकारते. घसारा आकारणी ७० टक्के पर्यंत पोहचल्यानंतर मत्तांचे उर्वरीत आयुष्यावर ९० टक्के पर्यंत घसारा आकारणी ही केली जाते. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार औष्णिक वायु व सौर आधारीत वीज निर्मिती केंद्रासाठी २५ वर्षे आणि जल विद्युत केंद्रासाठी ३५ वर्षे असे उपयुक्त आयुष्य विहित केले आहे.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| जल विद्युत, वाफ वीज, वायु आधारीत वीज निर्मिती केंद्रातील कारखाने व यंत्रे, कुलींग टॉवर्स, जलविद्युत बांधकामे, ट्रान्सफॉर्मर्स व इतर स्थापित साधने, पारेषणाच्या तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८% |
| इमारती आणि इतर स्थापत्य कामे | ३.३४% |

४. खालील मत्तांच्या साठी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या मूल्यांचा ९० टक्के पर्यंत घसारा खालील दराने आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी | मत्तांचे आयुष्यमान |
|---|---|---|
| फर्नीचर जोडणी व कार्यालयाचे साहित्य | ६.३३% | १४ वर्षे |
| वाहने, पोर्टेबल एअर कंडिशनिंग प्लांट | ९.५०% | ९.५ वर्षे |
| माहिती तंत्रज्ञान साधने | १५.००% | ६ वर्षे |

५. मालमत्ता, कारखाने व साधने यातील ज्या वस्तू नगांचा खर्च, कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नाही. त्यांच्या घसारा संपादन वर्षात १०० टक्के केला जातो. मोबाईल फोन, टॅबलेट खर्चाचे भांडवलीकरण आणि त्यांचा १०० टक्के घसारा, खरेदी वर्षात केला जातो. यासाठी कंपनीची विहित मर्यादा विचारात घेतली जात नाही.

६. माहिती तंत्रज्ञान निगडीत मालमत्ता व उपकरणे तसेच संगणक सॉफ्टवेअर यांची उरलेली रक्कम १००% घसारा म्हणून ज्यावर्षी त्या उपकरण व मत्तांचे आयुष्यमान संपेल त्या वर्षात करण्यात येईल. हे महाराष्ट्र वीज नियामक आयोगा द्वारे सांगितले गेले आहे

**क) अमुर्त मत्ता**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी केल्याचा भांडवली खर्च, बाह्य तृतीय पक्ष सल्लागाराकडून तयार केलेल्या सॉफ्टवेअरची अंमलबजावणी, सॉफ्टवेअरच्या परवान्याचे खरेदी, या सर्व मत्तांवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केल्याप्रमाणे खालील दराने घसारा आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी | मत्तांचे आयुष्यमान |
|---|---|---|
| सॉफ्टवेअर | ३०% | जास्तीत जास्त ४ वर्षे |
| इतर अमुर्त मत्ता | आधारीत | उपयुक्त आयुषमान |

कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या उपयुक्त आयुष्यमानानुसार उपकंपन्यांच्या मालमत्तेवरील घसारा सरळ रेषेच्या पद्धतीने आकारला जातो.

## ८. चालू नसलेल्या मत्तांची विक्री करणे

सामान्यत: मालमत्तेचा उपयुक्त कालावधी संपल्यानंतर ती मालमत्ता भंगार म्हणून ओळखण्यात येते व भंगार साहित्य म्हणून लिलाव करून विकली जाते. तिच्या मालमत्ता या मूळ स्वरूपात विक्री केली जात नाही. परिणामी, दिर्घकालीन मालमत्ता जर त्या अद्याप वापरातून काढून टाकायच्या असतील व त्यांच्या विद्यमान स्थितीत त्वरित विक्रिसाठी उपलब्ध नसतील तर त्या विक्रीसाठी उपलब्ध म्हणून वर्गीकृत केल्या जात नाहीत.

चालू नसलेल्या ज्या मत्ता वापरात ठेवण्यापेक्षा विकल्यास त्यांच्या प्रचलीत रक्कम वसूल होऊ शकते त्यांचे वर्गीकरण विक्री योग्य मत्ता असे केले जाते. जर विक्रीची चांगली शक्यता असेल आणि मत्ता विद्यमान स्थितीत तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर वरील अट पूर्ण झाली असे मानले जाते. अशा विक्री योग्य चालू नसणाऱ्या मत्तांची मोजणी त्यांचा लेख्यांमधील किंमत आणि रास्त मूल्यातून विक्रीचा खर्च वजा केल्यानंतरची किंमत यापैकी किमान किंमतीस केली जाते. ज्यावेळी विक्रीसाठी योग्य मालमत्ता घसारायोग्य मूल्यापर्यंत पोहचलेली नसते (ठोक मालमत्तेच्या ९०%) त्यावेळी कंपनी कमाल घसारायोग्य मुल्य आणि निव्वळ मालमत्तेच्या फरकाइतकी तरतूद करते.

ज्या मालमत्ता कारखाने व साधने आणि अमूर्त मत्ता विक्रीसाठी काढल्या जातात, त्यांच्या घसाऱ्याची तरतूद केली जात नाही.

## ९. वस्तूसूची

वीज निर्मितीसाठीचे साहित्य व इतर बाबी यांचे लेखन किमतीपेक्षा कमी दराने केले जात नाही. कारण विजेची विक्री निर्मिती खर्चा इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त दराने केली जाते. खर्चामध्ये खरेदी खर्च (मिळण्यायोग्य इनपूट टॅक्स क्रेडीटची निव्वळ) आणि त्या वस्तू त्यांच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा इतर खर्च समाविष्ट असतात. कोळसा साठ्याच्या संदर्भात कंपनी कोळसा साठाच्या पावत्या ओळखण्याच्या दृष्टीने कोळशाची खरेदी किंमत व रेल्वे मालवाहतूकीचा खर्च विचारात घेते. धुतलेल्या कोळसा साठा संदर्भात कंपनी कोळशाची खरेदी किंमत तसेच तो कोळसा त्याच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा लाभ शुल्क व खर्च समाविष्ट करते. या व्यतिरिक्त इतर कोणताही आनुषंगिक किंवा कोळसा संबंधित खर्च नफा-तोटा पत्रकात जेव्हा होईल तेव्हा आकारला जातो.

कंपनीने वर्षभरात निर्माण झालेल्या पुर्नप्राप्त कोळशाच्या साठ्याचे मूल्यांकन वर्षअखेर मूळ कोळशाच्या चल सरासरी किमतीवर केले आहे. प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या पुर्नप्राप्त कोळशाच्या प्रमाणाचे मूल्यांकन फर्स्ट इन फर्स्ट आऊट पद्धतीने करण्यात येते व ते वापरलेल्या साहीत्याचा खर्च यात आकारले जाते.

भांडारातील सामान, सुटे भाग यासाह मालसाठ्यांचे मूल्यांकन त्यांच्या खर्च आणि त्यांचे वसुली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते आणि खर्च हा वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो. भांडारातील सेवेस निरूपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्याबाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते. या हेतूसाठी, कंपनी मंद हलणाऱ्या वस्तूमालासाठी ३०%, २ वर्षापर्यंत अचल वस्तूमालासाठी ६०% आणि २ वर्षापेक्षा जास्त अचल वस्तूमालासाठी ८०% या दाराने तरतूद केली जाते. निकामी वस्तूमालासाठी पूर्णपणे तरतूद केली जाते.

**१०. महसूल मान्यता**

१) विजेच्या विक्रीतून मिळणाऱ्या महसुलाचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वर्षाच्या सुरूवातीस पूर्वनिर्धारित केलेल्या वीज दर पत्रकाच्या आधारे केला जातो. त्यात इंधन समायोजन आकार समाविष्ट असतो, तसेच लेख्यांच्या आधारे कालावधीच्या अखेरीस उपार्जित झालेला विनादेयाचा महसूल सुद्धा समाविष्ट केला जातो. मात्र तो त्यापुढील वर्षात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या समायोजनाच्या प्रक्रियेच्या अधीन असतो.

२) महावितरण सोबत केलेल्या वीज खरेदी कराराच्या अटींनुसार क्रेडिट कालावधीच्या पलीकडे ऊर्जा बिले मिळण्यास विलंब झाल्यास कंपनी विलंब भरणा अधिभाराला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मार्जिन कॉस्ट ऑफ फंड बेस्ट लेडिंग रेट (एमसीएलआर) अधिक ३५० बेसिक पॉइंटस प्रति महिना दराने उपार्जित त्यानुसार मान्यता देते.

३) व्याजाचे उत्पन्न हे मुद्दल/थकबाकी आणि लागू होणारा व्याज दर यानुसार मान्य केले जाते.

४) फ्लाय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहका सोबत मान्य केलेला दराने केला जातो. त्याची रक्कम फ्लाय ॲश वापर निधी या वेगळया लेखा शीर्षात ठेवला जातो आणि पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. ०३.११.२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार त्याचा वापर केला जातो. या निधीचा वापर राख वापराच्या प्रोत्साहनासाठी करावयाच्या खर्चासाठी केला जातो.

५) अन्य उत्पन्नाला उपार्जन तत्वावर मान्यता दिली जाते. भंगार व नाकारलेला कोळसा इत्यादीची विक्री जेव्हा खरेदीदार कंपनीच्या जागेतून मालाची उचल करतो व कंपनी त्याची बीजके तयार करते, तेव्हाच त्याचा लेखा होतो. परिसमापनातील नुकसान जेव्हा ते प्रत्यक्ष ओळखले जातात त्यावर्षी आणि त्याची आकारणी झाल्यावर त्यांच्या वसुलीचे समायोजन प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट केले जाते. त्यातून प्रकल्पाचे जादा खर्च काही प्रमाणात कमी होतात. प्रकल्पाच्या कंत्राटदारांना दिलेल्या अग्रिमांच्या समायोजन जेव्हा उपार्जन होईल त्याप्रमाणे प्रकल्प खर्चात केले जाते. इतर सर्व प्रकरणी, वसूल केलेले परिसमापनातील नुकसान इतर उत्पन्नात जमा केले जाते. जेव्हा कंपनी अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर कार्यरत किंवा कराराच्या आवश्यकतेनुसार खेळत्या भांडवलाच्या कर्जातून व्याज देणाऱ्या साधनांमध्ये निधी उपायोजित करते तेव्हा व्याज देय/व्याज प्राप्ती जसे असेल तसे निव्वळ वजा करून त्यानुसार केले जाते.

६) विक्री झाली नाही अशा ऊर्जा बचतींच्या प्रमाणपत्रांच्या मूल्याला कंपनी वित्तीय वर्षाच्या अखेरीस मान्यता देते व ते उपार्जन तत्त्वानुसार महसूलात जमा करते. ही प्रमाणपत्रे विकल्यास त्याचे उपार्जन मूल्य आणि प्रत्यक्ष विक्री मूल्य याचे समायोजन करून ते प्रत्यक्ष विक्रीच्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकात दाखविले जाते.

७) उत्पन्न/प्राप्ती हे कंपनीच्या अहवालात तेव्हाच दाखवली जाते जेव्हा ही शक्यता असते की कंपनी ज्या मोबदल्यास पात्र आहे ते वसूल करेल. हे पैसे देणाऱ्या संस्थेच्या हेतु आणि क्षमतेच्या मुल्यांकनावर अवलंबून असेल.

**११. खर्च आणि उत्पन्न यांचे लेखे करणे/वर्गीकरण करणे**

जर मागील काही वर्षातील एकत्रीत उत्पन्न/खर्च विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर ते पूर्वलक्षी प्रभावाने दुरूस्त केले जातात.

विम्याचे दावे स्विकारल्यानंतरच त्यांचे लेखे केले जातात.

किंमतीतील फरकाचे दावे खर्चाच्या संदर्भात स्वीकृतीच्या आधारावर केले जातात.

इतर सर्व दावे/हक्क यांचे लेखे प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार केले जातात.

**१२. उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकी**

उपकंपन्या आणि संयुक्त उपक्रम कंपन्या तसेच सहयोगी कंपन्या यांच्या समभागातील गुंतवणूकीची नोंदणी, खर्च वजा संचित मूल्यघट (जर काही असेल तर) याप्रमाणे केली जाते आणि प्रत्येक अहवाल तारखेला गुंतवणूकीच्या मूल्यघटाचे परिक्षण केले जाते.

कंपनीने जेव्हा पूर्वीच्या सर्वसामान्यपणे मान्य केलेल्या लेखा पद्धतीतून भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण केले त्यावेळी उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकीला त्यांच्या प्रचलीत विद्यमान मूल्यानुसार मान्यता देण्याचे ठरविले होते.

**१३. परकीय चलनातील व्यवहार**

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्यांच्या व्यवहाराच्या तारखेला प्रचलीत असलेल्या संबंधित विनिमय दराने नोंदवले जातात.

परकीय चलनानुसार असलेली पैशातील मत्ता व पैशामधील दायित्वे यांचे रूपांतरण अहवाल तारखेला असलेल्या विनिमयाच्या स्पॉटरेट नुसार केले जाते.

हिशेबानंतर किंवा पूनर्लेखनानंतर विनिमयात उद्भवलेले फरकांना नफा व तोटा पत्रकात 'विनिमय दर' विचलन किंवा 'वित्त खर्च' (कर्जाच्या खर्चाचे समायोजन म्हणून विचारात घेतलेल्या मर्यादेपर्यंत) म्हणून मान्यता दिली जाते.

**१४. कर्मचारी लाभ**

**अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ**

कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी सेवा दिल्या, त्यावर्षीच्या नफा-तोटा पत्रकात अल्पकालीन कर्मचारी लाभ यांना खर्चाच्या विना सवलत रकमेवर मान्यता देण्यात येते.

**सानुग्रह अनुदान**

कर्मचाऱ्यांकरिता सानुग्रह जसे आणि जेव्हा जाहीर होईल तेव्हा कंपनी याचा व्यय लेखा वह्यांमध्ये उपार्जित करते.

**दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ**

**व्याख्यांकित लाभ योजना**

अ) कंपनी भविष्य निर्वाह निधी मध्ये निश्चित योगदान पूर्वनिर्धारित दराने देते. हे योगदान आणि कर्मचाऱ्याचे योगदान वेगळया ट्रस्टमध्ये जमा होते. ही ट्रस्ट इतर एमएसईबी ग्रुप कंपन्यांच्या निधीचे व्यवस्थापन देखील करते. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतीमध्ये केली जाते. या निधीत केलेले प्रत्येक कालावधीतील अंशदान यास 'व्यय' म्हणून मान्यता दिली जाते आणि त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

ब) उपदान या सारख्या व्याख्यांकित कर्मचारी लाभाचे दायित्व विमागणित शास्त्राच्या मूल्यांकनानुसार ठरविले जाते. हे मूल्यांकन स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून वर्षाच्या अखेरीला प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड वापरून करून घेण्यात येते.

पुनर्मापन केलेल्या निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्वांना इतर सर्वकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते. या दायित्वामध्ये विमागणिती प्राप्ती व हानी, नियोजन मत्तांचा परतावा (व्याज वगळून) आणि मत्ता मर्यादा (जर काही असेल तर व्याजाशिवाय) यांच्या समावेश होतो.

**क) इतर दिर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ**

इतर दीर्घ मुदतीचे लाभ म्हणजे रजेचे रोखीकरण याचे दायित्व प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड ही पद्धत वापरून स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून विमागणिती मूल्यांकनानुसार ठरविले जातात.

**१५. भाडेपट्टी**

दि. ०१ एप्रिल २०१९ रोजीचे किंवा त्यानंतर जे करार करण्यात आले ते करार भाडेपट्टीचे असल्याबद्दल किंवा त्यात भाडेपट्टी समाविष्ट आहे किंवा कसे याचे कंपनी निर्धारण करते. जर कराराच्या मुदतीत संबंधित ओळख निश्चिती केलेल्या मत्तांच्या वापराचे नियंत्रणाचा हक्क मोबदल्याच्या बदल्यात दिले गेले असतील तर तो करार भाडेपट्टीचा आहे याबद्दल निश्चिती करण्यासाठी, कंपनी खालील बाबींचे अंदाज करते.

- संबंधित करारात ओळख निश्चिती केलेल्या मत्तांचा वापर करण्यासंबंधी असल्यास त्यात असा वापर करण्याचे स्पष्ट केलेले असावे किंवा तशी सूचना असावी. त्यात तसा प्रत्यक्ष वापरास नेमकेपणाने मान्यता दिलेली असली पाहिजे किंवा त्यात एका प्रत्यक्ष अस्तित्वातील मत्तेच्या सर्व बाजूने सुस्पष्ट वेगळेपण दर्शविलेले पाहिजे. जर संबंधित मत्ता देणाऱ्याला मोठ्या प्रमाणात पर्यायी वापराचा हक्क त्यात असेल तर अशा मत्तांची तशी ओळख निश्चिती केली जात नाही.
- कंपनीला भाडेपट्टीच्या संपूर्ण कालावधीमध्ये अशा भाडेपट्टीच्या मत्ताच्या वापरातून मिळणारे सर्व आर्थिक लाभ प्राप्त करण्याचा हक्क असलाच पाहिजे.
- अशा मत्तांचा वापर करण्याविषयीचे आदेश देण्याचे हक्क कंपनीकडे असले पाहिजेत.

दि. ०१ एप्रिल २०१९ आधी केलेल्या कराराबद्दल कंपनीने असा निर्णय घेतला की, भाडेपट्टी आधारीत व्यवस्थेमध्ये खालील बाबींचे निर्धारण होते किंवा नाही हे निश्चित केले पाहिजे.

- व्यवस्थेची पूर्तता विशिष्ट मालमत्ता किंवा मालमत्तेच्या वापरावर अवलंबून होतो किंवा कसे आणि
- या व्यवस्थेत मत्ता वापराचा हक्क दिला आहे किंवा कसे.

**१. कंपनी भाडेकरू असल्यास**

वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचा घसारा भाडेपट्टीची मुदत संपेपर्यंत 'सरळ रेषा' पद्धतीने केला जातो. याशिवाय अशा वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचे ठराविक अंतराने, जर काही कमी करण्याजोगी हानी असल्यास ती कमी करण्यात येते. तसेच जर काही भाड्याच्या दायित्वाचे संबंधी काही पूनर्मोजणी करावयाची असल्यास ती करून समायोजन केले जाते.

भाडेपट्टीचे दायित्वाच्या प्रारंभी करार सुरू होण्याच्या तारखेला न भरलेल्या भाडेपट्टीचे विद्यमान मूल्याप्रमाणे मोजणी केली जाते

आणि कंपनीच्या इन्क्रीमेंट डिस्काउंट रेटनुसार कपात करण्यात येते. भाडेपट्टीचे दायित्व मुल्यघट तत्वानुसार मोजण्यात येते. अल्पमुदतीचे भाडेपट्टी करार म्हणजे ज्यांची मुदत बारा महिने किंवा त्यापेक्षा कमी असेल आणि कमी किंमतीच्या भाडेपट्टीचे करार यांना कंपनीने 'वापरण्याचा अधिकार' या मत्तेत मान्यता न देण्याचे ठरविले आहे. कंपनी अशा भाडेपट्टी संबंधित देयकांना खर्च म्हणून मान्यता देते.

**२. कंपनी भाड्याने देणारी संस्था असल्यास**

ज्यावेळी कंपनी स्वत: भाडेपट्टीने जागा देते, तेव्हा त्यांचे लेखे भारतीय लेखा मानक क्रमांक ११६ यामध्ये विहीत केलेल्या पद्धतीने केले जातात.

**१६. शासकीय अनुदान**

शासकीय अनुदानाबाबात जेव्हा ते मिळण्याची योग्य हमी असेल आणि जेव्हा संलग्न शर्तींचे अनुपालन करण्यात येते, तेव्हाच त्याला लेख्यांमध्ये मान्यता देण्यात येते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबींशी निगडीत असते, तेव्हा त्या संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी आणि त्याच्या हेतुच्या भरपाईसाठी खर्च करण्यात येते तेव्हा तिला नफा व तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे मान्यता दिली जाते.

भारतीय लेखामानक २० यातील तरतुदीनुसार भारत सरकारने २० सप्टेंबर २०१८ रोजी जारी केलेल्या सुधारीत नियमावलीनुसार, मत्तांशी संबंधित शासकीय अनुदाने, स्थगित उत्पन्न म्हणून किंवा मत्तांच्या वहन रकमेतून अनुदान वजा करून त्याप्रमाणे ताळेबंदात दाखवण्यात यावी असे बदल केले, परिणामी, वित्तीय वर्षे २०२०-२१ मध्ये कंपनीने मत्तांच्या मुल्यांकन मधून अनुदाने वजा करण्याचा पर्याय निवडला आहे.

तथापि, मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या संपादनासाठी व्याज नसलेले कर्ज सरकारकडून प्राप्त झाल्यास, कंपनीस प्राप्त झालेल्या वर्षात सदर कर्जाला रास्त मुल्यावर मान्यता देते आणि शिल्लक रक्कम स्थगित अनुदान म्हणून गणली जाते. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांचा वापर सुरू केल्यानंतर या वस्तुंच्या उपयुक्त आयुष्याच्या कालावधीत स्थगित अनुदान रद्द केले जाते. उपरोक्त कर्जाचा कालावधी पूर्ण होइपर्यंत कंपनी दरवर्षी नफा आणि तोटा विवरणपत्राद्वारे वित्त खर्च ओळखून जी उपरोक्त कर्जाच्या वर्तमान मुल्यात जमा होते. कर्जाच्या कालावधीच्या शेवटी, कर्जाची जमा झालेली शिल्लक (रास्त मुल्य म्हणून ओळखले जाते) चुकती केली जाते.

**१७. तरतुदी, आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता**

जेव्हा एखाद्या भूतकालीन घटनेमुळे सद्यस्थितीत काही दायित्वे आली असतील तर त्या दायित्वाच्या तरतुदींना मान्यता देण्यात येते. ही दायित्वे मान्य करण्यासाठी आर्थिक लाभ असलेल्या संसाधनांचे बहिर्गमन होणे आणि दायित्वाच्या रकमांचे विश्वसनीय अंदाज लावता येणे संभवनीय असेल.

जेव्हा पैशाच्या वेळेच्या मूल्याचा परिणाम महत्वाचा असतो, तेव्हा योग्य सवलतींच्या दराने तरतुदीमध्ये सवलत दिली जाते. आकस्मिक दायित्व म्हणजे भविष्यात घडणाऱ्या घटना ज्यावर कंपनीचे पूर्णपणे नियंत्रण नसल्यामुळे निर्माण झालेले संभाव्य दायित्व किंवा ज्यासाठी संसाधनांचे बहिर्गमन आवश्यक असेल अशी शक्यता नाही किंवा ज्या दायित्वातील रकमांचे मोजमाप पुरेशा विश्वासर्हतेने करता येत नाही.

आकस्मिक दायित्वांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता नसते, मात्र आर्थिक संसाधनांची बाहेर जाण्याची शक्यता अत्यंत दुरस्थ नसेल तर प्रकटीकरणात दर्शवली जातात.

ज्या बाबी प्रत्येक प्रकरणातील कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होतात तेव्हा त्या बाबतची आकस्मिक दायित्वे आणि भांडवली बांधिलकी, टिपा स्वरूपात प्रकट केली जाते.

आकस्मिक मत्ता यांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता दिली जात नाही, परंतु जर आकस्मिक मत्ता या विहीत मर्यादेपेक्षा जास्त असतील आणि त्यातून आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता असेल तर त्या प्रकट केल्या जातात.

**१८. रास्त मूल्याची मोजणी करणे**

बाजारपेठेत सहभागी होणाऱ्यांमध्ये मत्ता विक्रीसाठी किंवा दायित्व हस्तांतरणासाठी, यापैकी जसे काही असेल त्या कायदेशीर व्यवहारात मूळ मापनाच्या तारखेला मिळणाऱ्या किंमतीला किंवा तसे नसल्यास कंपनीला सहजप्राप्त असणाऱ्या सर्वात लाभदायक बाजारपेठेला रास्त मूल्य म्हणतात.

कंपनी, मत्ता/दायित्वे यांचे रास्त मूल्य मोजण्यासाठी बाजारपेठेतील निरिक्षण करून योग्य माहिती मिळवून तिचा उपयोग करते मुल्यमापन तंत्रात वापरल्या जाणाऱ्या इनपुटस्च्या आधारे रास्त मुल्यांचे विविध स्तरांमध्ये वर्गीकरण केले जाते. ते खालील प्रमाणे आहे.
स्तर १ - समान मत्ता/दायित्वे यांच्या कार्यशील बाजारपेठेतील उद्धृत केल्या जाणाऱ्या किंमती (असमायोजित)

स्तर २ - मत्ता/दायित्वे यांच्या वरील स्तर - १ मधील उद्धृत किंमती व्यतिरिक्त अन्य निविष्टी शोधून त्याचे प्रत्यक्ष (किमतीचे) किंवा अप्रत्यक्ष (किंमती व्यतिरिक्त अन्य) निरिक्षण करणे.

स्तर ३ - मत्ता/दायित्वे यांच्या बाजार माहिती निरिक्षणांवर आधारलेल्या नाहीत, अशा निविष्टी विचारात घेणे, (ज्यांचे निरिक्षण करता येत नाही अशा)

वित्तीय विवरणपत्रात मत्ता व दायित्वे यांना आवर्ती तत्वावर मान्यता दिली जाते. त्यासाठी कंपनी श्रेणीकरणाचे पूननिर्धारण करते आणि त्याद्वारे श्रेणीमध्ये स्थानांतरण झाले आहे किंवा कसे, (सर्वव्यापी रास्त मूल्य मोजणीसाठी महत्वपूर्ण असलेल्या सर्वात खालच्या निविष्टीच्या आधारे) याचे प्रत्येक अहवालात कालावधीच्या अखेरीस निश्चिती करते.

## १९. वित्तीय विलेख

जेव्हा कंपनी एखाद्या कंत्राटातील विलेखाच्या तरतूदीमध्ये एका बाजूला पक्ष असते तेव्हा वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांना मान्यता दिली जाते. समुहाच्या वित्तीय मत्तात खालील बाबींचा समावेश असतो.

१) चालू वित्तीय मत्ता यात व्यापारी येणी, रोख व रोख सममूल्य आणि बँकातील शिल्लक, अल्प मुदतीच्या ठेवी.

२) चालू नसलेल्या मत्ता यात प्रामुख्याने उपकंपन्यातील समभाग गुंतवणूक व त्यांना कर्जे आणि दीर्घ मुदतीची येणी इत्यादी.

**वित्तीय मत्ता**

**अ) प्रारंभिक नोदंणी व मोजणी**

सर्व वित्तीय मत्ता यांना प्रारंभी त्याचे रास्त मूल्य अधिक त्या संपादनासाठी केलेल्या व्यवहाराचे खर्च यानुसार मान्यता देण्यात येते. नफा किंवा तोटाद्वारे रास्त मुल्य यामधील सर्व वित्तीय मत्तेचा व्यवहार खर्च नफा आणि तोटा विवरणपत्रात दाखवला जातो.

**ब) नंतर केलेली मोजणी**

संबंधित वित्तीय मत्ताच्या वर्गीकरणाच्या संदर्भानुसार नंतरची मोजणी केली जाते.

कंपनी वित्तीय मत्तांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करते.

अ) घसाऱ्या नंतरची मोजणी करणे

ब) आर्थिक मालमत्ता मोजणी

क) इतर सर्वकष उत्पन्नामार्फत रास्त मूल्य किंवा

ड) नफा किंवा तोटाद्वारे रास्त मूल्य

वित्तीय मत्तांचे व्यवस्थापनासाठी कंपनीचे बिझनेस मॉडेलच्या आणि वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील वैशिष्ट्यांचा विचार केला जातो.

**परिशोधीत खर्च**

जर खालील दोन्ही अटी पूर्ण केल्या असतील तरच कर्ज साधनांचे मोजमाप परिशोधीत केलेल्या खर्चावर होते. अशी मत्ता बिझनेस मॉडेलमध्ये खालील उद्दिष्टांसाठी धारण केली आहे.

- कंत्राटानुसार रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी मत्ता धारण करणे आणि
- मत्तांच्या कंत्राटातील अटींमुळे मुद्दल रकमेचे आणि व्याज याप्रकारे रोकडता प्रवाह निश्चित तारखेस मिळणे.
- प्रारंभिक मान्यतेनंतर अशा वित्तीय मत्ता पुन्हा परिशोधीत खर्च तरतुदीच्या वजावट केल्यावर मोजल्या जातात. यासाठी परिणामकारक व्याजदर पद्धती वापरली जाते आणि अशा परिशोधीत तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**कर्ज विलेख नफा तोटाद्वारे रास्त मुल्यानुसार**

नफा व तोटा पत्रकाद्वारे काढलेले रास्त मूल्य हे कर्ज विलेखाच्या मोजणीसाठी उर्वरित श्रेणीचे आहे.

प्रारंभिक मोजणीनंतर रास्त मूल्यामध्ये बदल झाल्यास त्यास नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या बदलामध्ये व्याजाचे उत्पन्न व मूल्य घट यांचा अंर्तभाव असतो.

**समभागातील गुंतवणूकी**

भारतीय लेखा मानक क्र. १०९ याच्या व्याप्तीत अंतर्भाव होणाऱ्या समभागातील सर्व गुंतवणूकींची मोजणी रास्त मूल्याने केली जाते. समभागाचे जे विलेख व्यापारासाठी धारण केले जातात, त्यांचे वर्गीकरण नफा व तोटा द्वारे रास्त मूल्यनुसार केले जाते. इतर सर्व समभागांच्या विलेखांच्या वर्गीकरणासाठी कंपनीने इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य किंवा नफा तोटा पत्रकातील रास्त मूल्य अशाप्रकारे वर्गीकरण करण्याबाबत कंपनी निर्णय घेते हे वर्गीकरण प्रारंभीक मान्यतेवर केले जाते आणि ते अपरिवर्तनीय असते.

यानुसार वर्गीकरण केलेल्या समभागांच्या विलेखाच्या रास्त मुल्यातील सर्व बदलांना, (लाभांश वगळून) यांना इतर सर्वकष उत्पन्न यात मान्यता दिली जाते. अशा गुंतवणूकींची विक्री झाली तरी इतर सर्वकष उत्पन्नातील रकमांचा नफा व तोटा पत्रकामध्ये पूनर्चक्रीकरण केले जात नाही.

नफा व तोटा द्वारे रास्त मुल्य या श्रेणीत समाविष्ट केलेल्या समभाग विलेखांचे मापन रास्त मूल्याच्या बदलानुसार केले जाते व त्यांना नफातोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त उपक्रम कंपन्या आदि संस्थांच्या समभाग विलेखातील गुंतवणूकी खर्च वजा मूल्यघट यानुसार नोंदवल्या जातात.

**वित्तीय मत्तांची मूल्यघट**

भारतीय लेखा मानक १०९ नुसार ज्या वित्तीय मत्तांची मोजणी घसारा तरतूदी नंतर होते आणि ज्या इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मुल्यानुसार नोंदविल्या जातात, त्या मत्तांची मोजणी करणे त्याला मान्यता देणे यासाठी कंपनी अपेक्षित पत तोटा हे प्रारूप लागू करते.

व्यापारी येणी यासाठीच्या तोटा भरपाईचे मापन करण्यासाठी 'सोपी पद्धती' अनुसरली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला त्याच्या पूर्ण आयुष्याच्या अपेक्षित पत तोटा च्या समान रक्कम यानुसार मापन केले जात. या मत्तांच्या प्रारंभिक किंमती आणि वर्षाखेरीस संभाव्य धोके विचारात घेऊन आलेली किंमत याचा विचार करून कंपनी या मत्तांची मूल्यघट ही नफा-तोटा पत्रकात अपेक्षित मूल्यघट तत्त्वानुसार नोंदविते.

**वित्तीय मत्तांची मान्यता रद्द करणे**

कंपनीची एखादी वित्तीय मत्ता (किंवा जेव्हा लागू असेल तेव्हा वित्तीय मत्तांचा एक भाग किंवा तत्सम वित्तीय मत्तांच्या गटांचा भाग) हा प्राथमिकरित्या पुढील कारणांकरिता रद्द होतो:

जेव्हा या मत्तांद्वारे रोकडता प्रवाह मिळण्याचे हक्क संपले असतील किंवा

जर कंपनीने अशा मत्तांकडून रोकडता प्रवाह मिळण्याच्या हक्काचे हस्तांतरण केले असेल किंवा मिळालेले रोकडता प्रवाह संपूर्णपणे आणि प्रत्यक्ष विलंबाशिवाय तिसऱ्या पक्षाकडे पाठविण्याचे बंधन एखाद्या करार व्यवस्थेद्वारे स्वीकारले असेल आणि यापैकी

(अ) कंपनीने या मत्तेच्या सर्व जोखीमा व मोबदले भरीवपणे हस्तांतरित केले असतील किंवा

(ब) जर कंपनी या मत्तेच्या सर्व जोखीमा आणि मोबदले भरीवपणे त्याच स्वरूपात हस्तांतरित केल्या नसतील तर किंवा स्वत: कडे ठेवल्या नसतील, मात्र या मत्तेचे नियंत्रण हस्तांतरित केले असेल तर

वित्तीय मत्तांची मान्यता रद्द केल्यानंतर, चालू असलेले मूल्य आणि मिळालेला वाटा यांच्यातील फरकाला नफा तोटा पत्रकात मान्यता मिळते.

**वित्तीय दायित्वे**

**वित्तीय दायित्वे आणि समभाग विलेख**

**कर्ज किंवा समभाग असे वर्गीकरण**

कंपनी जेव्हा एखाद्या विलेखाचे वितरण करते तेव्हा विलेखाच्या कराराच्या भरीवपणानुसार विलेखाचे वर्गीकरण वित्तीय दायित्व किंवा समभाग विलेख असे करते.

**समभाग विलेख**

कंत्राटातील समभाग विलेख म्हणजे ज्यात संबंधित अस्तित्वात असलेल्या संस्थेची सर्व दायित्वे वजा केल्यानंतर मत्तांमधील उरलेला हिताच्या भागाचा पुरावा दाखविला जाणारा भाग होय. समभाग विलेखाच्या वितरणानंतर कंपनी त्याबद्दल मिळालेल्या रक्कमेच्या प्रमाणात समभाग विलेख दर्शविते.

**वित्तीय दायित्वे**

कंपनीच्या विद्यमान वित्तीय दायित्वामध्ये प्रमुख्याने (अ) कर्जे (ब) व्यापारी देणी (क) भांडवली खर्चाची दायित्वे (ड) सुरक्षा अनामती आणि (इ) इतर देणी यांचा समावेश होतो.

**प्रारंभिक मान्यता आणि मोजणी**

सर्व वित्तीय दायित्वे (नफा किंवा तोटा यांच्या रास्त मूल्यानुसार मोजणी केलेली नाही अशा) यांना प्रारंभी त्यांच्या संबंधित वित्तीय दायित्वाला थेट लागू असणाऱ्या व्यवहार खर्च वजा करून रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. कंपनीच्या वित्तीय दायित्वात व्यापारी आणि इतर देणी, कर्जे आणि उसनवारी यांचा समावेश आहे.

**नंतरची मोजणी**

वित्तीय दायित्वाची मोजणी त्यांच्या खालीलप्रमाणे केलेल्या वर्गीकरणावर अवलंबून असते.

**१) कर्जे**

कर्जे सुरूवातीला रास्त मूल्ये व केलेल्या व्यवहार खर्चाची निव्वळ याप्रमाणे त्यास मान्यता दिली जाते. नंतर उसनवारी कर्जाच्या फेडीसाठीच्या खर्चानुसार कर्जाची मोजणी केली जाते. उत्पन्न (व्यवहार खर्चाचा निव्वळ रक्कम) व विमोचन रक्कम यात जो काही फरक असेल त्याला परिणामकारक व्याज दराची पद्धत वापरून कर्जाच्या मुदतीसाठी नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. कर्ज सुविधा स्थापित करण्यासाठी दिलेल्या शुल्काला कर्जाचा व्यवहार म्हणून मान्यता दिली जाते. मात्र या सुविधा काही प्रमाणात किंवा संपूर्णपणे काढून घेतल्या जाऊ शकतात. हे गृहित धरून त्यांच्या मर्यादेत ही मान्यता असते. अशा प्रकरणी सदर सुविधा काढून टाकण्यापर्यंत शुल्क स्थगित ठेवले जाते.

जेव्हा कर्जाच्या करारामध्ये काही बंधने विनिर्दिष्ट असतात. तेव्हा अशी बंधने चुकती/रद्द झाली असतील किंवा मुदत संपली असेल तर ती ताळेबंदातून काढून टाकली जातात. संपलेल्या वित्तीय दायित्वाची रक्कम आणि त्याची चुकती केलेली रक्कम यातील फरक नफा-तोटा पत्रकात इतर प्राप्ती/(तोटे) याप्रमाणे मान्य केला जातो.

जर कंपनीला एखाद्या दायित्वाचा चुकता अहवाल काळापासून किमान बारा महिने स्थगीत ठेवण्याचा विनाअट हक्क नसला, तर त्या दायित्वाचे 'चालू दायित्वे' असे वर्गीकरण केले जाते. जर कंपनीला एखाद्या दीर्घ मुदतीच्या कर्ज व्यवस्थेतील महत्वाच्या तरतुदींचा भंग अहवाल मुदत संपण्याची वेळी किंवा यापूर्वी झाला असला आणि ते दायित्व मागणीनुसार अहवालाच्या तारखेला देय होत असेल आणि जर संबंधित कर्जदारांनी अहवाल तारखेनंतर किंवा वित्तीय विवरणपत्रे मंजूर होण्यापूर्वी करारभंगासाठी कोणत्याही रक्कमेची मागणी करणार नाही असे मान्य केल्यास अशा वित्तीय दायित्वांना 'चालू दायित्वे' असे मानण्यात येणार नाही.

**२. व्यापारी व इतर देणी**

यामध्ये वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी कंपनीला पुरविलेल्या माल व सेवा यांच्या दायित्वाच्या न दिलेल्या रक्कमा यांचा समावेश होतो. या रक्कमा अप्रतिभूत असतात व त्या निर्देशित केल्यानंतर बारा महिन्यात दिल्या जातात. व्यापारी व इतर देणी जर अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यात देय नसल्या असे नसेल तर त्यांना चालू दायित्व समजले जाते. त्यांना प्रारंभी त्यांच्या रास्त मूल्यांनुसार मान्यता दिली जाते आणि नंतर परिणामकारक व्याज दर वापरून घसारा वजा करून त्यांची मोजणी केली जाते.

**नोंद रद्द करणे**

जेव्हा एखाद्या वित्तीय दायित्वाचे बंधन चुकते केले जाते किंवा रद्द केले जाते किंवा त्याची मुदत संपते तेव्हा त्या वित्तीय दायित्वाची नोंद रद्द करण्यात येते. जेव्हा एका विद्यमान दायित्वाची जागा, त्याच कर्जदाराने वेगळ्या अटीनुसार दिलेले दुसरे दायित्वे घेते किंवा जर विद्यमान दायित्वाच्या अटींमध्ये महत्वाची रूपभेद सुधारणा केल्या जातात, अशावेळी मूळ दायित्व रद्द केले जाते आणि नवीन दायित्व मान्य केले आहे असे मानण्यात येते. त्यामुळे पुस्तकी रक्कमेतील फरकाला स्वायत्त नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**वित्तीय विलेखांचे समायोजन**

कायदेशीर तरतुदीप्रमाणे किंवा चालू काळातील संकेताप्रमाणे वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्व यांचे समायोजन होणार असेल तर अशा मत्ता व दायित्व यांची वजावट केल्यानंतर निव्वळ तत्वावर वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्व ताळेबंद पत्रकात दर्शविण्यात येतात.

**२०. ठेवी**

कंपनी तिच्या कामकाजाचा एक भाग म्हणून, इतर संस्थांकडून ठेवी प्राप्त करते आणि इतर संस्थांकडे ठेवी देखील ठेवते. जर बारा महिन्यांच्या कालावधीत ठेवींची पूर्तता अपेक्षित असेल, तर त्या चालू म्हणून वर्गीकृत केल्या जातात आणि ताळेबंदातील चालू मालमत्ता / चालू दायित्वे मध्ये दर्शविल्या जातात. जर ठेवी चालू नसलेल्या स्वरूपाच्या असतील तर खालील प्रकारे हाताळले जातात.

**इतर संस्थांकडे ठेवलेल्या ठेवी -**

अ. जर ठेव संबंधित संस्थेकडून ठेवीसंबंधी कामकाजाच्या अंमलबजावणीसाठी ठेवण्यात आलेली असेल, तर ती ठेव कार्यपूर्तीच्या तुलनेत समायोजित केली जाईल. त्यामध्ये कोणतेही आर्थिक व्यवहाराचे स्वरूप नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची सूट देण्याची आवश्यकता असणार नाही.

ब. इतर सर्व बाबतीत, ठेव कालावधी निश्चित असल्यास, ठरविलेल्या मर्यादेच्या अधीन राहून ठेव सवलतीची कार्यवाही करण्यात येईल.

**कंपनीला मिळालेल्या ठेवी**

अ. जर ठेवी कामगिरी सुरक्षा हमी म्हणून प्राप्त झाल्या असतील, तर संबंधित ठेव कामगिरी पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल. ती ठेव व्याज उत्पन्न मिळविण्याच्या उद्देशाने राखून ठेवलेली नाही तसेच तिच्याशी कोणतेही आर्थिक व्यवहार जोडलेले नाहीत, त्यामुळे सवलतीची आवश्यकता राहत नाही.

ब. इतर सर्व बाबतीत, ठेव कालावधी निश्चित असल्यास, ठरविलेल्या मर्यादेच्या अधीन राहून ठेव सवलतीची कार्यवाही करण्यात येईल.

**२१. रोख आणि रोख समतूल्य बाबी**

रोख आणि रोख समतूल्य बाबींमध्ये हातातील रोख रक्कम, बँकेतील शिल्लक, इतर अल्पमुदतीचे व चांगल्या प्रकारची रोकड सुलभता असलेल्या आणि तीन किंवा कमी महिन्यात मुदत पूर्ण होणाऱ्या गुंतवणूकी, तात्काळ रोखेत रूपांतर होऊ शकतील अशा आणि तसे करताना मूल्यात फारसा फरक पडणार नाही अशा बाबी समाविष्ट असतात.

**२२. रोकडता प्रवाह विवरण पत्रक**

भारतीय लेखा मानक क्र. ७ हे रोकडता प्रवाह विवरण पत्रकासंबंधी असुन, रोकडता विविरण पत्र हे त्यानुसार अप्रत्यक्ष पद्धतीने तयार केले जाते. त्याच्या हेतुसाठी वरती व्याख्यांकित केलेल्या रोख व रोख समतूल्य बाबी विचारात घेण्यात येतात. तसेच बँकेच्या थकीत ओव्हरड्राफ्टची निव्वळ रक्कमही हिशोबात घेतली जाते कारण ती कंपनीच्या अंतर्गत रोकड व्यवस्थापनाचा एकात्मिक भाग असते.

**२३. प्रतिभाग मिळकत**

करोत्तर नफा/तोटा रकमेला वर्षभरातील वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर या संख्येने भागून प्रतिभाग मिळकतीचा हिशेब केला जातो. सौम्यकृत प्रतिभाग मिळकत शोधून काढण्यासाठी करोत्तर नफा/तोटाच्या रकमेचे लाभांश, व्याज आणि सौम्यकृत संभाव्य समभागासंबंधीत इतर आकाराचे व्यय किंवा उत्पन्नाचे समायोजन केले जाते. सर्व संभाव्य समभागाचे रुपांतर केल्यानंतर जे सौम्यकृत भाग वितरित केले गेले असते अशा वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सची संख्या विचारात घेतली जाते.

प्रतिभाग मिळकतीच्या हिशेबासाठी वाटप प्रलंबित असलेली शेअर अर्ज निधी हा वाटप योग्य आहे असे विचारात घेतले आहे. हा निधी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या बांधिलकीनुसार सूत्रधारी कंपनीमार्फत आणि निश्चितपणे वाटपासाठी मिळणार आहे.

**२४. कर**

आयकराच्या खर्चात चालू कर खर्च आणि वर्षभरातील स्थगित कर मत्ता किंवा दायित्व यातील निव्वळ बदल यांचा समावेश होतो. चालू आणि स्थगित कर यांना नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा त्यांचा संबंध इतर सर्वकष उत्पन्नातील बाबींशी असतो किंवा थेट समभागाशी असतो, अशा प्रकरणी अपवाद करून, चालू आणि स्थगित कर या दोन्ही बाबींना अनुक्रमे इतर सर्वकष उत्पन्न आणि प्रत्यक्ष समभागात मान्यता दिली जाते.

**अ) चालूकर**

आयकर कायदा १९६१ नुसार चालू कर निश्चित केले जाते, त्यासाठी परवानगी प्राप्त कर सवलती, वजावट/अमान्य बाबी यांचा विचार केला जातो. कर व जे कायदे तयार झाले आहेत किंवा अहवाल देण्याच्या वेळेपर्यंत अंमलात येतात त्यांचा वापर केला जातो.

वित्तीय वर्ष २०१९-२० पासून, कंपनीने आयकर कायदा १९६१ चे कलम ११५ बीएए नुसार नवीन सवलतीच्या दराने कर पद्धती अवलंबवली आहे.

**ब) स्थगित कर**

ताळेबंदाच्या दृष्टीकोनातून स्थगित कराला मान्यता दिली जाते. मत्ता व दायित्वे यांच्या करांचा आधार आणि त्यांचे वहन मूल्य यातील कपात योग्य आणि यात उद्भवणारे तात्पुरते करपात्र फरक यानुसार स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांना मान्यता दिली जाते.

स्थगित कर दायित्वे यातील सर्व तात्पुरते करपात्र फरक मान्य केले जातात.

सर्व कपात योग्य हंगामी फरकाच्या रकमा, वापर न केलेल्या कराच्या जमा, रकमा आणि जर काही वापर न केलेले करांचे तोटे असले तर त्यासाठी स्थगित कर मत्तांना मान्यता दिली जाते. कपात योग्य हंगामी फरक, वापर न केलेले कर जमांच्या रकमा आणि न वापरलेल्या कर तोट्याच्या रकमा यासाठी करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

प्रत्येक अहवाल तारखेला स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांचा आढावा घेण्यात येतो आणि स्थगित कर मत्ता संपूर्णपणे

किंवा तिचा काही भाग वापरण्यांस करपात्र नफा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांमधे कपात केली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला अमान्य केलेल्या स्थगित कर मत्तांचा आढावा घेण्यात येतो आणि जर स्थगित कर मत्तांची भविष्यातील करपात्र नफ्यातून वसूली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

वर्षभरात जेव्हा मत्ता, वसुली किंवा दायित्वे चुकती केली जातात त्यावेळी लागू होणाऱ्या अपेक्षित कर दराने स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांची मोजणी केली जाते. त्यासाठी तोपर्यंत कायद्यानुसार मंजूर झालेले कराचे दर (आणि करांचे फायदे) किंवा अहवाल तारखेपर्यंत केले जाणारे कायदे यांचा आधार घेतला जातो.

जर चालू कर मत्ता व चालू कर दायित्वे या समवेत चुकता करण्याचा कायदेशीर अंमलबजावणी योग्य हक्क असला आणि स्थगित कर या संबंधित कराची अस्तित्वातील बाबींशी संलग्न असेल आणि त्या समान कर प्राधिकरणाकडे असतील तर स्थगित कर दायित्व कर मत्ता यांची भरपाई करता येते.

## २५. व्यापारी येणी

व्यापारी येण्यांचे कंपनीने परिशोधीत खर्चानुसार वित्तीय विलेख असे वर्गीकरण केले आहे. व्यापारी येणी त्यांच्या मुळ बिजकातील रक्कम वजा अपेक्षित पत हानी यांच्या तरतुदीप्रमाणे पुढे नेलेल्या आहेत. अशा वित्तीय मत्ता कमी करण्यास मान्यता देण्याकरीता कंपनी त्यांचे प्रारंभीक मान्यता मिळाल्यापासून पत जोखिमेमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे किंवा नाही यांचे मूल्यांकन करते.

## २६. अलीकडील घोषणा

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ०७ मे २०२५ आणि १३ ऑगस्ट २०२५ रोजी कंपन्या (भारतीय लेखा मानके) सुधारणा नियम, २०२५अधिसूचित केले आहेत जे ०१ एप्रिल २०२५ पासून लागू होणाऱ्या खालील भारतीय लेखा मानकांमध्ये सुधारणा करण्यासाठी आहेत.

**भारतीय लेखा मानक १ - आर्थिक विवरणांचे सादरीकरण आणि भारतीय लेखा मानक १० - अहवाल कालावधीनंतर घडणाऱ्या घटना**

सुधारणा करारांच्या अधीन असलेल्या दायित्वांचे सादरीकरण स्पष्ट करतात, सुसंगत वर्गीकरण सुनिश्चित करतात आणि अर्थ लावण्याच्या आव्हानांना कमी करतात.

**भारतीय लेखा मानक ७ - रोख प्रवाहाचे विवरण आणि भारतीय लेखा मानक १०७ - वित्तीय साधने**

या वित्तपूरवठा संरचनामध्ये अधिक दृश्यमानता प्रदान करण्यासाठी पुरवठादार वित्त व्यवस्थासाठी नवीन प्रकटीकरण आवश्यकता सादर केल्या.

**भारतीय लेखा मानक २१ - परकीय चलन विनिमय दरांतील बदलांचे परिणाम**

चलनाच्या विनिमयक्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी, विनिमय न करण्यायोग्य चलनांसाठी स्पॉट एक्सचेंज दर निश्चित करण्यासाठी आणि अशा परिस्थितीत आवश्यक प्रकटीकरणांची रूपरेषा तयार करण्यासाठी विशिष्ट मार्गदर्शन प्रदान करा.

## २७. ऑडिट ट्रेल

कंपनीने तिच्या खात्यांच्या पुस्तकांची देखभाल करण्यासाठी SAP प्रणालीचा वापर केला आहे. ज्यामध्ये रेकॉर्डिंग ऑडिट ट्रेल (एडिट लॉग) सुविधा आहे आणि सॉफ्टवेअरमध्ये नोंदविलेल्या सर्व संबंधित व्यवहारासाठी वर्षभर कार्यरत आहे, या लॉगमध्ये बदल केलेला नाही.

कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदी आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार, कंपनीने तिच्या खात्यांच्या पुस्तकांची देखभाल करण्यासाठी फक्त अशाच अकाउंटिंग सॉफ्टवेअरचा वापर करणे आवश्यक आहे ज्यामध्ये प्रत्येक व्यवहारासाठी ऑडिट ट्रेल रेकॉर्ड करण्याची सुविधा आहे. खात्याच्या पुस्तकांमध्ये केलेल्या प्रत्येक बदलांचा संपादन लॉग तयार करणे आणि असे बदल कधी केले गेले याची तारीख आणि १ एप्रिल २०२३ पासून ऑडिट ट्रेल अक्षम किंवा छेडछाड करता येणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. तथापि, डेटा बेस स्तरावर थेट बदलांसाठी रेकॉर्डिंग ऑडिट ट्रेलची वैशिष्ट्ये अद्याप सदर सॉफ्टवेअरमध्ये समाविष्ट केलेली नाहीत.

## टिपा क्र. १ मालमत्ता, कारखाने आणि साधने (एकत्रित)

(₹ कोटीत)

| किंमत | मूर्तमालमत्ता | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जमीन विकासासह | | इमारती | | हायड्रॉलिक कामे | इतर स्थापत्य कामे | | कारखाने यंत्र व साधने | लाइनव केबल नेटवर्क | वाहने | फर्निचर व जोडणी | कार्यालयीन साधने | कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तासाठी भांडवली खर्च | आयटी उपकरणे | एकूण मूर्त मत्ता |
| | मालकीची | भाड्याची | कारखान्याच्या इमारती | इतर | | रेल्वे लाइन साईडिंग | रस्ते व इतर | | | | | | | | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **१,६७८.७५** | **१०६.११** | **८९८.३७** | **१,२३६.८९** | **२,७२७.१०** | **१,२३८.२३** | **१,२२९.६०** | **३९,१६१.६६** | **५५२.२२** | **६०.५६** | **३८.२४** | **७८.८१** | **५७.९३** | - | **४९,०६४.४७** |
| भर | ९.७५ | १२.१२ | २.४४ | २०.६६ | ६४.०० | २.५७ | ७३.२७ | ४६३.१७ | २.९२ | १२.०८ | १.४९ | ८.८४ | - | - | ६७३.३२ |
| कपात | - | - | ८.९१ | ६.८६ | ७८.७४ | ०.१२ | ५.७९ | ७०५.१२ | १.१२ | ०.६६ | ०.८१ | २.२५ | - | - | ८१०.३७ |
| **दि.३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **१,६८८.५१** | **११८.२३** | **८९१.९०** | **१,२५०.६८** | **२,७१२.३७** | **१,२४०.६८** | **१,२९७.०९** | **३८,९१९.७१** | **५५४.०२** | **७१.९८** | **३८.९२** | **८५.४०** | **५७.९३** | - | **४८,९२७.४१** |
| भर | ७.७३ | - | १८३.९८ | २१.७० | ६५.६२ | २०५.०६ | ८.९४ | ७,०३८.५२ | ०.०३ | १.२६ | ४.२७ | २७.७१ | - | ०.१७ | ७,५६४.९८ |
| कपात | १८.२५ | - | - | - | - | - | - | १०.०५ | - | - | ०.२१ | ०.२७ | - | - | १०८.७९ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | १,६७७.९८ | **११८.२३** | **१,०७५.८८** | **१,२७२.३८** | **२,७७७.९९** | **१,४४५.७४** | **१,३०६.०३** | **४५,८६८.१८** | **५५४.०५** | **७३.२३** | **४२.९८** | **११२.८४** | **५७.९३** | **०.१७** | **५६,३८३.६०** |
| **मूल्यऱ्हास आणि मुल्यघट** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | - | ३५.९१ | २१२.३६ | ५०९.२० | १,१२२.९१ | ३७३.३० | ३०३.२२ | १५,०००.५२ | २२८.२२ | १४.१४ | १८.५२ | ३७.४५ | ३५.४२ | - | १७,८९१.१७ |
| भर | - | ४.६६ | ३८.७० | ३१.१३ | १३४.४० | ४५.६७ | ४६.६१ | २,०९०.४३ | २६.९३ | ५.५८ | २.६१ | ९.१८ | १.१२ | ०.०० | २,४३७.०२ |
| कपात / समायोजने | - | - | ७.७० | ५.९८ | ७०.६१ | ०.११ | ५.२१ | ६१४.६१ | १.०१ | ०.६० | ०.७३ | २.०४ | - | - | ७०८.६० |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | - | ४०.५७ | २४३.३५ | ५३४.३५ | १,१८६.६९ | ४१८.८७ | ३४४.६२ | १६,४७६.३४ | २५४.१५ | १९.१२ | २०.४० | ४४.५९ | ३६.५४ | ०.०० | **१९,६१९.५९** |
| भर | - | ४.६४ | ४१.७२ | ५६.७७ | १३६.५५ | ५७.६३ | ६२.६४ | २,३२२.९६ | २६.१८ | ६.६० | २.६६ | ९.३० | ०.९२ | ०.०२ | २,७२८.६२ |
| कपात /समायोजने | - | - | (०.०६) | (०.०५) | - | (०.२५) | ०.२८ | ५५.०६ | - | - | ०.१६ | ०.२७ | - | - | ५५.४० |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | - | ४५.२२ | २८५.१४ | ५९१.१७ | १,३२३.२४ | ४७६.७५ | ४०६.९८ | १८,७४४.२५ | २८०.३३ | २५.७२ | २२.९० | ५३.६३ | ३७.४७ | ०.०२ | २२,२९२.८१ |
| **पुढे नेलेल्या रकमा** | | | | | | | | | | | | | | | - |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी** | १,६७८.७५ | ७०.१९ | ६८६.०१ | ७२७.६९ | १,६०४.२० | ८६४.९२ | ९२६.३७ | २४,१६१.१४ | ३२४.०० | ४६.४३ | १९.७२ | ४१.३६ | २२.५१ | - | ३१,१७३.३० |
| **वजा: निकामी साहित्यासाठी तरतूद** | - | - | - | - | - | - | - | २२.०९ | - | - | - | - | - | - | २२.०९ |
| **दि. ०१ .०४ .२०२३ रोजी निव्वळ (पुनर्लिखित)** | १,६७८.७५ | ७०.१९ | ६८६.०१ | ७२७.६९ | १,६०४.२० | ८६४.९२ | ९२६.३७ | २४,१३९.०५ | ३२४.०० | ४६.४३ | १९.७२ | ४१.३६ | २२.५१ | - | ३१,१५१.२१ |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी** | **१,६८८.५१** | **७७.६६** | **६४८.५४** | **७१६.३४** | **१,५२५.६८** | **८२१.८१** | **९५२.४७** | **२२,४४३.३७** | **२९९.८७** | **५२.८६** | **१८.५२** | **४०.८०** | **२१.३९** | **(०.००)** | २९,३०७.८२ |
| **वजा: निकामी साहित्या साठी तरतूद** | - | - | - | - | - | - | - | १८.७३ | - | - | - | - | - | - | १८.७३ |
| **दि. ३१ .०३ .२०२४ रोजी निव्वळ (पुनर्लिखित)** | १,६८८.५१ | ७७.६६ | ६४८.५४ | ७१६.३४ | १,५२५.६८ | ८२१.८१ | ९५२.४७ | २२,४२४.६३ | २९९.८७ | ५२.८६ | १८.५२ | ४०.८० | २१.३९ | (०.००) | २९,२८९.०८ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | १,६७७.९८ | ७३.०१ | ७९०.७४ | ६८१.२१ | १,४५४.७५ | ९६८.९९ | ८९९.०५ | २७,१२३.९३ | २७३.७२ | ४७.५१ | २०.०७ | ५९.२१ | २०.४६ | ०.१४ | ३४,०९०.७९ |
| **वजा: निकामी साहित्या साठी तरतूद** | - | - | - | - | - | - | - | १८.२३ | - | - | - | - | - | - | १८.२३ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | १,६७७.९८ | ७३.०१ | ७९०.७४ | ६८१.२१ | १,४५४.७५ | ९६८.९९ | ८९९.०५ | २७,१०५.७० | २७३.७२ | ४७.५१ | २०.०७ | ५९.२१ | २०.४६ | ०.१४ | ३४,०७२.५६ |

**टिप १): वर नमूद केल्याप्रमाणे एकूण जमिनीपैकी ₹ २०७.३९ कोटीची (मागील वर्षी ₹ २४८.०८ कोटी) इतकी जमीन महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ऐवजी कंपनीच्या कार्यालयाच्या नावावर आहे. कंपनीच्या नोंदणीकृत नावावर मा लकी हक्क दस्तएवज हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेत आहे.**

**२) वर्षभरात ₹ ८.०८ कोटी (मागील वर्षी ₹ २.२१ कोटी) घसारा रक्कम भांडवली करण्यात आली आहे.**

**टिपा क्र. १ अ: अमूर्त मत्ता - मत्ता वापराचा हक्क (एकत्रित)** **(₹ कोटीत)**

| किंमत | इमारती | जमीन | एकूण |
|---|---|---|---|
| ठोक रक्कम | | | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **११३.१३** | **४,३२६.५१** | **४,४३९.६५** |
| भर | १२६.४९ | - | १२६.४९ |
| कपात | - | - | - |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **२३९.६२** | **४,३२६.५१** | **४,५६६.१४** |
| भर | | | - |
| कपात | ८३.५१ | - | ८३.५१ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | १५६.११ | ४,३२६.५१ | ४,४८२.६३ |
| संचित मूल्यऱ्हास | | | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **९८.३२** | **९२२.०९** | **१,०२०.४१** |
| भर | २९.०० | २२८.५५ | २५७.५५ |
| कपात | - | - | - |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **१२७.३२** | **१,१५०.६४** | **१,२७७.९६** |
| भर | २९.०० | २२८.५५ | २५७.५५ |
| कपात/समायोजने | ८३.५१ | - | ८३.५१ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **७२.८१** | **१,३७९.१९** | **१,४५२.०१** |
| पुढे नेलेल्या रकमा | | | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **१४.८१** | **३,४०४.४३** | **३,४१९.२४** |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **११२.३०** | **३,१७५.८७** | **३,२८८.१८** |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **८३.३०** | **२,९४७.३२** | **३,०३०.६२** |

**टिपा क्र. १ ब: अमूर्त मालमत्ता (एकत्रित)** **(₹ कोटीत)**

| किंमत | सॉफ्टवेअर परवाने |
|---|---|
| ठोक रक्कम | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **४०.१७** |
| भर | ०.०६ |
| कपात | - |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **४०.२३** |
| भर | १.०२ |
| कपात | - |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **४१.२५** |
| संचित मूल्यऱ्हास | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **३५.८८** |
| भर | १.८८ |
| कपात | - |

| | |
|---|---|
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **३७.७६** |
| भर | १.१८ |
| कपात /समायोजने | - |
| **दि. ३१ .०३ .२०२५ रोजी** | **३८.९४** |
| पुढे नेलेल्या रकमा | |
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **४.२९** |
| **दि. ३१ .०३ .२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **२.४७** |
| सुरक्षा खर्च | १७३.४५ | १६२.६१ |
| कार्यालयाची देखभाल खर्च | ६६.३१ | ७२.१६ |
| टॅक्सी/वाहन भाड्याने घेतलेल्या शुल्कावरील खर्च | ५१.९७ | ४०.७७ |
| इतर सामान्य खर्च | १०५.२४ | ८३.३४ |
| निकामी स्थिर मत्ताचा तोटा | ०.०१ | - |
| परकीय चलन - विनिमयातील फरकामुळे तोटा (निव्वळ) | - | ०.०० |
| डेव्हिएशन सेटलमेंट मेकॅनिझम (डीएसएम) शुल्क | २१६.९३ | ६८.७८ |
| **लेखा परीक्षीकाना देय** | | |
| - लेखा परीक्षण शुल्क | ०.८३ | ०.९० |
| - खर्चाची परतफेड | ०.०३ | ०.०२ |
| - कराची परतफेड | ०.०९ | ०.१२ |
| **एकूण** | **५,६४८.१३** | **२,३०२.०८** |

**टिपा क्र. २८अ) स्थगीत कर खर्च (एकत्रित)** (₹ कोटीत)

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी | दि. ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| इतर सर्वकष उत्पन्नांव्यतिरिक्त स्थगित कर प्राप्त / (खर्च) | २३५.९७ | १६९.७९ |
| इतर सर्वकष उत्पन्नावरील स्थगित कर प्राप्ती / (खर्च) | (१८.८१) | (४३.१९) |
| **एकूण** | **२१७.१७** | **१२६.६०** |

**टिपा क्र. २८ब) अपवादात्मक बाबी (एकत्रित)** (₹ कोटीत)

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी | दि. ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| रास्त मूल्य समायोजन | - | - |
| उलट नोंदणी केलेले व्याज | (५३४.३९) | (७९६.३४) |
| **एकूण** | **(५३४.३९)** | **(७९६.३४)** |

**टिपा क्र. २९ वित्तीय विवरण पत्रांवर टिपा (एकत्रित)**

महानिर्मिती कंपनी भारतातील खालील व्याख्यांकित कर्मचारी लाभाच्या योजनांमध्ये अंशदान करीत असते.

**व्याख्यांकित लाभ योजना**

**१) भविष्य निर्वाह योजना**

अ) भविष्य निर्वाह योजना भविष्य निर्वाह निधीमध्ये कंपनीचे योगदान पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार, सर्व ग्रुप कंपन्यांसाठी स्थगित केलेल्या एक वेगळ्या विश्वस्त निधीत जमा होते. ते अंशदान कंपनीच्या नफा व तोटा पत्रकात आकारले जाते. यामध्ये जर शासनाने विनिर्देशित केलेल्या किमान परतावा दराच्या आधारे तूट झाल्यास त्याच्या भरणा कंपनी करील आणि तो नफा-तोटापत्रकात आकारला जाईल. कंपनी या योजनांचे देय अंशदान योजनांच्या नियमात निर्दिष्ट दराने करते.

ब) कंपनीच्या भविष्य निर्वाह निधीचे संचालन महाराष्ट्र राज्य वीज मंडळ अंशदायी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्था (विश्वस्त) यांचे मार्फत केले जाते. पात्र कर्मचाऱ्यांना या भविष्य निर्वाह निधीतून लाभ मिळतात. या योजनेचे संरक्षण प्राप्त कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनाला विनिर्दिष्ट केलेल्या टक्केवारीच्या समान एवढे अंशदान दरमहा कर्मचारी आणि कंपनी या दोघांतर्फे या भविष्य निर्वाह निधीमध्ये केले जाते. या विश्वस्तांकडून लाभधारकांना दरवर्षी शासनाकडून अधिसूचित केलेल्या दराने किमान व्याज देय असते.

कंपनीवर जर काही तुटवडा असेल तर ती भरून काढण्याची जबाबदारी कंपनीची आहे. वर्षभरात, नफा आणि तोटा खात्यात मान्यताप्राप्त अलेखापरीक्षित खात्याच्या देणग्यांवर आधारित शून्य कोटी रुपये आहे. (मागील वर्षी ₹ ५०.१६ कोटी) होते.

**व्यवस्थापन खात्यांनुसार नियोजन मालमत्तेचे वर्णन**

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ रोजी | दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) | दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| श्रेणी - १ (अ) भारत सरकार | ४६.६२% | ४९.४४% | ४२.१३% |
| श्रेणी - १ (अ) एस डी एल | ०.००% | ०.००% | ५.१४% |
| श्रेणी - १ (ब) राज्य/केंद्र सरकार हमी | ९.९५% | ४.५७% | २७.८७% |
| श्रेणी - २ (अ) कर्ज साधन | २०.९५% | २२.५०% | १.९७% |
| श्रेणी - २ (ब) शाश्वत बँक बाँड | १.८२% | २.०३% | ०.००% |
| श्रेणी - ४ (क) विनिमय व्यवहारातील निधी | ५.९८% | ४.३८% | ४.४६% |
| विशेष ठेव योजना | १४.६८% | १७.०८% | १८.४३% |

**२) उपदान व रजारोखीकरण**

दीर्घ मुदतीचे व्याख्यांकित कर्मचारी लाभ रजारोखीकरण, उपदान यांची निश्चिती स्वतंत्र विमागणिती तज्ज्ञ यांनी वर्षानिहाय केलेल्या विमागणिती मूल्यांकनानुसार केली जाते. त्यासाठी प्रोजेक्टेड युनिट क्रेडीट मेथड वापरली जाते. या प्रकरणी निश्चित केलेल्या दायित्वाचा निधी नसतो

**उपदान**

**अ) निव्वळ व्याख्यांकित लाभ (मत्ता) दायित्वामधील स्थानांतरण**

निव्वळ व्याख्यांकित लाभ (मत्ता), दायित्व आणि त्यांचे भाग यातील सुच्वातीच्या आणि शेवटच्या शिल्लकांशी मेळ पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | व्याख्यांकित लाभ बंधन | | |
|---|---|---|---|
| | दि. ३१.०३.२०२५ रोजी | दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) | दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित) |
| आरंभीची शिल्लक | ८३६.९६ | ६५५.२४ | ६५८.०१ |
| नफा किंवा तोटा यात समाविष्ट व्याज खर्च | ६०.२६ | ४९.१० | ४७.३० |
| चालू सेवा खर्च | ४४.६८ | ३४.४९ | ३३.७० |
| मागील सेवा खर्च | | - | - |
| व्याज खर्च (उत्पन्न) | | | |
| | **९४१.९०** | **७३८.८३** | **७३९.०२** |
| इतर सर्वंकष उत्पन्नात समाविष्ट | | | |
| पुनर्मोजणी केलेले तोटा (प्राप्ती) | | | |
| विमा गणिती तोटा (प्राप्ती) खालील बाबींपासून: | | | |
| लोकसंख्या गृहितके | | | |
| वित्तीय गृहितके | २५.९६ | १७.३९ | (१३.१०) |
| अनुभव समायोजन | ४८.७६ | १५४.२३ | ३२.८६ |
| नियोजन मत्तांचा परतावा (व्याज उत्पन्न वगळून) | | | |
| **एकूण** | **७४.७२** | **१७१.६२** | **१९.७५** |
| **इतर** | | | |
| मालकाने भरलेले अंशदान | | | |
| दिलेले लाभ | (९८.१४) | (७३.४८) | (१०३.५३) |
| अखेरची शिल्लक | ९१८.४८ | ८३६.९६ | ६५५.२४ |
| प्रतिनिधित्व केलेले | | | |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ - मत्ता | - | - | - |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्व | ९१८.४८ | ८३६.९६ | ६५५.२४ |
| **एकूण** | **९१८.४८** | **८३६.९६** | **६५५.२४** |

**ब) व्याख्यांकित लाभ बंधने**

**१. विमागणिती गृहितके**

भविष्यातील मृत्यूदरासंबंधीची गृहिते प्रसिद्ध झालेली आकडेवारी आणि मृत्यू विषयक तत्त्वे यावर आधारित आहेत. सध्या दर्शविल्याप्रमाणे यामध्ये व्याख्यांकित लाभ बंधने यांचे अहवाल तारखेचे मूल्य खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ | दि. ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) | दि. ०१.०४.२०२३ (पुनर्लिखित) | दि. ३१.०३.२०२२ | दि. ३१.०३.२०२१ |
|---|---|---|---|---|---|
| योजनेच्या मालमत्तेवर अपेक्षित परतावा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| सवलत दर | ६.८३% | ७.२२% | ७.५२% | ७.२३% | ६.८२% |
| वेतन वृद्धी दर | ५.००% | ५.००% | ५.००% | ५.००% | ५.००% |
| कर्मचारी उलाढालीचा दर | २.००% | २.००% | २.००% | २.००% | २.००% |
| नोकरी दरम्यान मृत्यू दर | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २००६-०८ (अंतिम) |

**२. सूक्ष्मभेद संवेदनशीलता विश्लेषण**

संबंधित विमा गणिती गृहितांमध्ये अहवाल तारखेला होऊ शकणाऱ्या बदलांचा व्याख्यांकित लाभ बंधनांच्या रकमांवर जे योग्य परिणाम झाले असते जे योग्य परिणाम झाले असते ते खाली दर्शविले आहेत. या तारखेला इतर गृहिते स्थिर आहे असे धरले आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२५ | | दि. ३१.०३.२०२४ (पुनर्लिखित) | | दि. ०१.०४.२०२३ (पुनर्लिखित) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (वाढ) | (घट) | (वाढ) | (घट) | (वाढ) | (घट) |
| सवलत दर (०.५ टक्के स्थलांतर) | (३३.०४) | ३५.४० | (२८.६०) | ३०.६४ | (२१.४१) | २२.९३ |
| भविष्यातील वेतनवाढ (०.५ टक्के स्थलांतर) | ३५.८६ | (३३.७५) | ३१.१६ | (२९.३२) | २३.३८ | (२२.००) |
| कर्मचारी उलाढाल (०.५ टक्के स्थलांतर) | ५.०० | (५.२७) | ५.४६ | (५.७६) | ४.७२ | (४.९८) |

जरी हे विश्लेषण या योजनेतील अपेक्षित रोख प्रवाहाचे पूर्ण वाटप विचारात घेत नसले तरी ते दर्शविलेल्या गृहितांची संवेदनशीलता प्रभावी स्वरूपात निश्चितपणे पुरविते

**३. व्याख्यांकित लाभ बंधनातील परिपक्वतेच्या संख्येचे विश्लेषण**

अहवाल तारखेनंतरच्या भविष्यातील वर्षात देय होऊ शकतील असे व्याख्यांकित लाभ (₹ कोटीत)

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ रोजी | दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) | दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| नंतरच्या १ ल्या वर्षात | ९९.७९ | ११७.१६ | ९७.०३ |
| नंतरच्या २ ऱ्या वर्षात | ७१.२२ | ५९.३४ | ५१.०८ |
| नंतरच्या ३ ऱ्या वर्षात | १००.२८ | ८९.४१ | ७०.५७ |
| नंतरच्या ४ थ्या वर्षात | ८२.१९ | ७८.१८ | ६८.१२ |
| नंतरच्या ५ व्या वर्षात | ७५.८४ | ७४.१५ | ६०.२९ |
| ६ ते १० वर्षांची बेरीज | ३३४.८५ | ३१२.०४ | २४८.१७ |
| ११ व त्यावरील वर्षांची बेरीज | ९७१.१९ | ८८४.२९ | ६८४.५८ |

**रजा रोखीकरण**

**अ) निव्वळ व्याख्यांकित लाभ (मत्ता) दायित्व यातील स्थलांतर**

निव्वळ व्याख्यांकित लाभ (मत्ता) दायित्व आणि त्यांचे घटक यांचे आरंभीच्या शिल्लकीपासून अखेरच्या शिल्लकीचा मेळ खालील तक्त्यात दिला आहे. (₹ कोटीत)

| तपशील | व्याख्यांकित लाभ बंधने | | |
|---|---|---|---|
| | दि. ३१.०३.२०२५ रोजी | दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) | दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित) |
| आरंभीची शिल्लक | ९४९.८४ | ७३७.२९ | ७१८.७५ |
| नफा किंवा तोटा यात समाविष्ट व्याज खर्च | ६७.४२ | ५३.७९ | ५०.७८ |
| चालू सेवा खर्च | २१.६५ | १७.२७ | १६.६७ |
| मागील सेवा खर्च | - | - | - |
| व्याज खर्च (उत्पन्न) | - | - | - |
| | **१,०३८.९१** | **८०८.३५** | **७८६.२०** |
| **पुनर्मोजणी केलेले तोटा (प्राप्ती)** | | | |
| खालील बाबींपासून विमा गणिती तोटा (प्राप्ती) | | | |
| लोकसंख्या गृहितके | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| वित्तीय गृहितके | ३०.३० | २१.१२ | (१५.८३) |
| अनुभव समायोजन | ८६.१३ | २०८.८० | ८०.०८ |
| नियोजन मत्तांचा परतावा (व्याज उत्पन्न वगळून) | | | |
| | **११६.४३** | **२२९.९१** | **६४.२६** |
| **इतर** | | | |
| मालकाने भरलेले अंशदान | | | |
| दिलेले लाभ | (१३०.३६) | (८८.४३) | (११३.१७) |
| अखेरची शिल्लक | १,०२४.९७ | ९४९.८४ | ७३७.२९ |
| **प्रतिनिधित्व केलेले** | | | |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ - मत्ता | - | - | - |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ - दायित्व | १,०२४.९७ | ९४९.८४ | ७३७.२९ |
| **एकूण** | **१,०२४.९७** | **९४९.८४** | **७३७.२९** |

**ब) व्याख्यांकित लाभ बंधने**

१. विमागणिती गृहितके

अहवालाच्या तारखेला खालील प्रधान गृहितके होती. (वेटेड ॲव्हरेज म्हणून दर्शविली आहे.)

| **तपशील** | **३१.०३.२०२५** | **३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **३१.०३.२०२२** | **३१.०३.२०२१** |
|---|---|---|---|---|---|
| योजनेच्या मालमत्तेवर अपेक्षित परतावा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| सवलत दर | ६.८३% | ७.२२% | ७.५२% | ७.२३% | ६.८२% |
| वेतन वृद्धी दर | ५.००% | ५.००% | ५.००% | ५.००% | ५.००% |
| कर्मचारी उलाढालीचा दर | २.००% | २.००% | २.००% | २.००% | २.००% |
| नोकरी दरम्यान मृत्यू दर | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २०१२-२०१४ (शहरी) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण २००६-०८ (अंतिम) |

**टिपा क्र. ३०** (₹ कोटीत)

| **भांडवल / शासकीय अनुदान)** | |
|---|---|
| **दि. ०१.०४.२०२३ रोजी (पुनर्लिखित)** | **४४६.९०** |
| वित्तीय वर्ष २०२३-२४ दरम्यान प्राप्त | १५.२४ |
| अधिक: महाराष्ट्र सरकारकडून स्थगित अनुदान सहाय्य | १९५.२५ |
| वजा: वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये कर्जफेड केलेले शासकीय अनुदान | ७८.९३ |
| **दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित)** | **५७८.४६** |
| वित्तीय वर्ष २०२४-२५ दरम्यान प्राप्त | ०.०० |
| अधिक: महाराष्ट्र सरकारकडून स्थगित अनुदान सहाय्य | |
| वजा: अनुदान परतावा/मत्ता व खर्चात समायोजित अनुदान | १८.२५ |
| वजा: वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये कर्जफेड केलेले शासकीय अनुदान | ३.४५ |
| **दि. ३१.०३.२०२५ रोजी** | **५५६.७६** |

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ रोजी | दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| चालू | - | १८.०० |
| चालू नसलेले | ५५६.७६ | ५६०.४६ |
| **एकूण** | **५५६.७६** | **५७८.४६** |
| (टिपा क्र. १६ आणि २० पहा - भांडवली / सरकारी अनुदान) | | |

**टिपा क्र. ३१ फ्लाय ॲश वापरासाठी तरतूद (एकत्रित)** (₹ कोटीत)

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ रोजी | दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | **३१९.३६** | **२२३.९९** |
| अधिक: फ्लाय ॲश विक्री महसूल | १३५.७२ | १२६.३४ |
| वजा: वर्तमान कालावधीत वापरलेले | - | - |
| - भांडवली खर्च | २८.४६ | २६.४१ |
| - इतर खर्च | २४.८७ | ४.५६ |
| अखेरची शिल्लक | **४०१.७५** | **३१९.३६** |
| (एमओई आणि एफ द्वारे ०३-११-२००९ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा संदर्भ घ्या.) | | |

**टिपा क्र. ३२ कंपनीने बँका/वित्तीय संस्थांकडे भरलेले त्रैमासिक वस्तुसूची आणि ऋणकोचे विवरण/परतावे** (₹ कोटीत)

| बँकेचे नाव | एकूण कार्यरत भांडवल मर्यादा मंजूर (₹ कोटीत) | सुरक्षा म्हणून देऊ केलेले | त्रैमासिक समाप्ती | त्रैमासिक परतावा/ पत्रकानुसार जाहीर केलेली रक्कम | हिशोबाच्या वह्यांनुसार रक्कम | फरक (₹ कोटीत) | फरकाची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कन्सोर्टियम बँक | १०,५०० | संदर्भ नोंद | जून ३०, २०२४ | ३२,७७८.६७ | ३२,५०१.४७ | २७७.२० | ऊर्जेच्या पुरवठ्याबाबत पूरक/ फरकात्मक बिले पुढील कालावधीत जारी करून लेखाबद्ध केली जातात व त्यानुसार साठ्यातील मूल्याचे समायोजन करण्यात येते |
| कन्सोर्टियम बँक | १०,५०० | संदर्भ नोंद | सप्टेंबर ३०, २०२४ | ३१,८४०.३६ | ३१,५५२.०२ | २८८.३४ | ऊर्जेच्या पुरवठ्याबाबत पूरक/ फरकात्मक बिले पुढील कालावधीत जारी करून लेखाबद्ध केली जातात व त्यानुसार साठ्यातील मूल्याचे समायोजन करण्यात येते |
| कन्सोर्टियम बँक | १०,५०० | संदर्भ नोंद | डिसेंबर ३१, २०२४ | ३१,६०८.५९ | ३१,४४९.४३ | १५९.१६ | ऊर्जेच्या पुरवठ्याबाबत पूरक/ फरकात्मक बिले पुढील कालावधीत जारी करून लेखाबद्ध केली जातात व त्यानुसार साठ्यातील मूल्याचे समायोजन करण्यात येते |
| कन्सोर्टियम बँक | १०,५०० | संदर्भ नोंद | मार्च ३१, २०२५ | ३३,८८६.७७ | ३२,११७.४८ | १,७६९.३० | ऊर्जेच्या पुरवठ्याबाबत पूरक/ फरकात्मक बिले पुढील कालावधीत जारी करून लेखाबद्ध केली जातात व त्यानुसार साठ्यातील मूल्याचे समायोजन करण्यात येते |

टिपा:-कंपनीच्या संपूर्ण चालू मालमत्तेवर म्हणजेच कच्चा माल, वापरायचे साहित्य, साठा व सुटे भाग तसेच देयखाते (Book Debts) यांवर,

कारखाना स्थळांवर किंवा इतर कुठेही असलेल्या, बँकेच्या हितासाठी समान हक्काने (Pari-passu) तारण ठेवण्यात आलेले आहे.

**टिपा क्र. ३३ प्रतिभूतीसाठी गहाण ठेवलेल्या मत्ता (एकत्रित)**

चालू किंवा चालू नसलेल्या कर्जासाठीच्या प्रतिभूत म्हणून/गहाण ठेवलेल्या मत्तांची रक्कम खालीलप्रमाणे आहे. (₹ कोटीत)

| तपशील | दि. ३१.०३.२०२५ रोजी | दि. ३१.०३.२०२४ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| **चालू नसलेल्या कर्जासाठी निर्माण केलेल्या प्रतिभूती** | | |
| मत्ता, कारखाना व साधन - भाडेपट्टीच्या जमिनी वगळून | ३२,९२८.६९ | २८,०९०.४९ |
| **चालू कर्जासाठी निर्माण केलेल्या प्रतिभूती** | | |
| १) वस्तूलाभ सूची | ३,६५३.६२ | २,९४३.५८ |
| २) व्यापारी येणी | ३०,४१२.८६ | २६,९२४.०५ |
| **प्रतिभूती म्हणून ठेवलेल ठेवलेल्या एकूण मत्ता** | **३४,०६६.४८** | **२९,८६७.६३** |

**टिपा क्र. ३३ अः प्रलंबित तारण समाधानाबाबत टिपा (एकत्रित)** (₹ कोटीत)

| अ. क्र. | कर्जदाता / तारणधारकाचे नाव | तारणाची रक्कम | तारण निर्मिती अथवा बदलाची तारीख | तारण आयडी / एस.आर.एन. (उपलब्ध असल्यास) | विलंबाचे कारण / सध्याची स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया | २००.०० | २२/०९/२०२० | आर६६९०१८४४ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| २ | बँक ऑफ महाराष्ट्र | ७००.०० | २९/१०/२०२० | आर ७१७०६४२८ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| ३ | बँक ऑफ महाराष्ट्र | ४७.०० | १६/०६/२०२० | आर ४५००३८११ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| ४ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ३४.०० | २२/०७/२०२० | आर ५०६७२०७० | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| ५ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १,०००.०० | २८/०३/२०१३ | बी७१९२२९२६ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| ६ | गृहनिर्माण आणि शहरी विकास महामंडळ मर्यादित | २८.४० | १५/०३/२०१३ | बी७१९५५८६८ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| ७ | आयएल अँड एफएस ट्रस्ट कंपनी लिमिटेड | १६८.७५ | १०/१०/२०१४ | सी३२०१४५९९ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| ८ | भारतीय बँक | ४०.०० | ३०/०९/२०२० | आर६५९९३१५६ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| ९ | भारतीय बँक | १५०.०० | ०२/०८/२००७ | ए२२५८१०८६ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |
| १० | भारतीय अक्षय ऊर्जा विकास एजन्सी लिमिटेड | ३९.३९ | २६/०३/२०१३ | बी७४४९६२६६ | कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तारणाची पूर्तता (समाधान) झाली मानले जाईल. |

**टिपा क्र. ३४**

आंतर-गट कंपनी व्यवहारांचे सतत ताळमेळन केले जाते. तसेच, वर्षअखेरची शिल्लकची रक्कम ज्यावर भौतिक परिणाम होण्याची शक्यता नाही, ते पुष्टीकरण/ताळमेळनाच्या अधीन असते.

**टिपा क्र. ३४ (अ)-एकत्रित**

सूक्ष्म व लघु उद्योजक ज्या मर्यादित निश्चित केले त्यानुसार त्यांच्या थकीत रकमा आणि जर ताळेबंद तारखेपर्यंत त्यावर काही व्याज असेल तर ते समाविष्ट करून ते प्रकट केले आहे आणि त्यावर लेखापरीक्षकांनी विश्वास ठेवला आहे. (₹ कोटीत)

| अनु क्र. | तपशील | २०२४-२५ | २०२३-२४ (पुनर्लिखित) | २०२२-२३ (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|---|
| १ | सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायद्याअंतर्गत पुरवठादारांना देय असलेल्या रकमा ३१/०३/२५: | | | |
| | - मुद्दल | १.०७ | ०.१८ | ०.२२ |
| | - व्याज | २.१८ | १.६८ | ०.७८ |
| २ | सूक्ष्म लघू व मध्यम उद्योग विकास कायद्यानुसार पुरवठादारांना त्या या वित्तीय वर्ष मध्ये दिलेल्या रकमा (त्या चालू वर्षीच्या किंवा मागील वर्षीच्या आहेत किंवा कसे याचा संबंध आहे. | | | |
| | - मुद्दल | ८२.५० | ७४.७९ | ४०.११ |
| | - व्याज | ०.३१ | - | - |
| ३ | चालू वर्षी यापूर्वीच दिलेल्या / (सव्याज किंवा व्याजाचा काही भाग यांसा) मुद्दलावर देय असलेले व्याज / विलंबाने मुद्दल दिल्यामुळे देय झालेली व्याजाची रक्कम | - | - | ०.२७ |
| ४ | लेखा वर्षाच्या अखेरीस उपर्जित झालेली आणि देणे प्रलंबित असलेली रक्कम | ३.२५ | १.८६ | ०.५९ |
| ५ | व्याजाची थकीत व देय असलेली परंतु मागील वर्षानंतर पुढे केलेली रक्कम | १.६८ | ०.७८ | ०.४८ |

**टिपा क्र. ३५ संबंधित संस्था/ पक्षाबाबतची प्रकटने**

**अ) संबंधित संस्था/ पक्षाची नावे आणि नातेसंबंध**

**१. सहयोगी संस्था**

१) मे. युसीएम कोल कंपनी मर्यादित

२) मे. छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादित (टिपा क्र ४३ (ड) पहा)

**२. संयुक्त उपक्रम कंपन्या**

१) मे महाजेनको एनटिपीसी ग्रीन एनर्जी मर्यादित

**३. सहोदर उपकंपन्या**

१) मे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

२) मे. महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी मर्यादित

**ब) कंपनीचे भारतीय लेखामानक २४ ला अनुसरून खालील शासन संबंधित संस्थांविषयीचे प्रकटन केलेले नाही.**

**१. सहयोगी संस्था**

१) मे. युसीएम कोल कंपनी मर्यादित

२) मे. छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादित (टिपा क्र ४३ (ड) पहा)

**२. संयुक्त उपक्रम कंपन्या**

१) मे महाजेनको एनटिपीसी ग्रीन एनर्जी मर्यादित

**३. सहोदर उपकंपन्या**

१) मे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

२) मे. महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी मर्यादित

**४. व्यवस्थापनातील महत्त्वाची पदे धारणकर्त्या व्यक्ती व त्यांचा कार्यकाळ**

| अ. क्र. | व्यवस्थापनातील महत्त्वाच्या पदावरील व्यक्तीचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | आयएएस श्री राधाकृष्णन बी. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (२६.१२.२०२४ पासून) |
| २ | आयएएस डॉ. श्री पी. अन्बलगन | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (२६.१२.२०२४ पर्यंत) |
| ३ | श्री. बाळासाहेब बी. थिटे | संचालक (वित्त) |
| ४ | डॉ. श्री. धनंजय सावळकर | संचालक (इंधन) (२५.०९.२०२४ पर्यंत) |
| ५ | श्री. अभय हरणे | संचालक (प्रकल्प) |
| ६ | श्री. संजय मारुडकर | संचालक (संचलन) |
| ७ | श्री. अभय हरणे | संचालक (इंधन) (२७.०९.२०२४ पासून) |
| ८ | श्री राहुल दुबे | कंपनी सचिव |

**५. अकार्यकारी संचालक**

| अ. क्र. | पदनाम | व्यवस्थापनातील महत्त्वाच्या पदावरील व्यक्तीचे नाव |
|---|---|---|
| १ | संचालक | श्रीमती आभा शुक्ला |
| २ | संचालक | श्री. विश्वास पाठक |

**क) व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्तींना दिलेले पारिश्रमिक** (₹ कोटीत)

| अ. क्र. | संबंधित व्यक्तींची नावे | संबंधाचे स्वरूप | २०२४-२५ | २०२३-२४ (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री आयएएस राधाकृष्णन बी. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | ०.१० | - |
| २ | आयएएस डॉ. श्री पी. अन्बलगन | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | ०.३० | ०.३९ |
| ३ | श्री. बाळासाहेब बी. थिटे | संचालक (वित्त) | ०.३४ | ०.३४ |
| ४ | श्री. संजय मारुडकर | संचालक (संचलन) | १.४० | ०.४८ |
| ५ | श्री. अभय हरणे | संचालक (प्रकल्प) | ०.५५ | ०.३९ |
| **व्यवस्थापनातील महत्त्वाच्या पदावरील व्यक्तींचे पारिश्रमिक** | | | | |
| १ | श्री राहुल दुबे | कंपनी सचिव | ०.५१ | ०.३७ |
| २ | डॉ. श्री. धनंजय सावळकर | संचालक (मा सं) | ०.२२ | ०.३६ |
| ३ | श्री. नितीन चांदुरकर | कार्यकारी संचालक | ०.६० | ०.४७ |
| ४ | श्री. नितीन वाघ | कार्यकारी संचालक | ०.५२ | ०.४५ |
| ५ | श्री. राजेश पाटील | कार्यकारी संचालक | ०.५६ | ०.४४ |
| ६ | श्री. पंकज सपाटे | कार्यकारी संचालक | ०.५६ | ०.४१ |

भारतीय लेखा मानक - १९ कर्मचारी लाभ/ सेवानिवृत्ती लाभ या मानकानुसार वित्तीय विवरण पत्रकात मान्यता दिलेले, नोकरी नंतरचे लाभ आणि इतर दीर्घ मुदतीचे लाभांश यासाठी व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्ती पात्र आहेत. सदर कर्मचारी लाभ हे विमागणिती मूल्यांकनाप्रमाणे एकत्रित दिले जातात त्यामुळे त्यांचा समावेश वरील माहितीत केलेला नाही. शेअर -आधारित देयके प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना लागू होत नाहीत.

**ड. अकार्यकारी संचालकांना बैठक उपस्थिती शुल्क** (₹ कोटीत)

| बैठकींचा तपशील | श्री. विश्वास पाठक |
|---|---|
| मंडळ बैठका | ०.००२० |
| लेखापरिक्षण समिती | ०.००१५ |
| **एकूण उपस्थितीचे शुल्क प्राप्ती** | **०.००३५** |

**टिपा क्र. ३६ (एकत्रित)**

भारतीय लेखा मानक २७-स्वतंत्र विवरण पत्रके याच्या अनुपालनासाठी आवश्यक माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे. (₹ कोटीत)

| तपशील | कंपनीचा देश | गुंतवणुकीचे स्वरूप | मालकीची हिताची टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ३१.०३.२५ रोजी | ३१.०३.२४ रोजी (पुनर्लिखित) | ०१.०४.२३ रोजी (पुनर्लिखित) |
| मे. महागूज कोलायरीज मर्यादित | भारत | उपकंपनी | ६०.००% | ६०.००% | ६०.००% |
| मे. धोपावे कोस्टल पॉवर मर्यादित | भारत | उपकंपनी | १००.००% | १००.००% | १००.००% |
| मे. महाजेनको रिनीव्हेबल एनर्जी मर्यादित | भारत | उपकंपनी | १००.००% | १००.००% | १००.००% |
| मे. युसीएम कोल कंपनी मर्यादित | भारत | सहयोगी कंपनी | १८.७५% | १८.७५% | १८.७५% |
| मे. छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादित | भारत | सहयोगी कंपनी | २६.००% | २६.००% | २६.००% |
| मे महाजेनको एनटिपीसी ग्रीन एनर्जी मर्यादित | भारत | संयुक्त उपक्रम कंपनी | ५०.००% | ०.००% | ०.००% |

**टिपा क्र. ३७ (एकत्रित)**

महानिर्मितीच्या सहोदर कंपन्यासोबत वित्तीय वर्षाअखेरच्या व्यापारी येण्या व्यतिरिक्त अन्य थकीत शिलकी. (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२५ रोजी | ३१.०३.२४ रोजी (पुनर्लिखित) | ०१.०४.२३ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला देय | ५४५.२६ | ५४६.०० | ५४६.५८ |
| महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कडून येणे | १५४.५४ | १५३.१४ | १३४.८१ |

**टिपा क्र. ३८ संबंधित संस्थांकडून व्यापारी येणे** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२५ रोजी | ३१.०३.२४ रोजी (पुनर्लिखित) | ०१.०४.२३ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित | २८,४११.९१ | ३०,३५८.६५ | २५,९८६.९८ |
| महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित | १९०.३७ | १७५.०९ | १६०.५५ |

**टिपा क्र. ३९ कंपनीची सामाजिक जबाबदारी (एकत्रित)**

कंपनी कायद्याचे कलम १३५ हे २०२४-२५ मध्ये कंपनीला लागू आहे, परंतु, मागील तीन वर्षात सरासरी नफा नसल्याने, कंपनी सामाजिक जबाबदारी खर्चाअंतर्गत खर्च करण्यास जबाबदार नाही. तरी, २०२४-२०२५ मध्ये सामाजिक जबाबदारी खर्च कंपनीच्या धोरणानुसार करण्यात आला आहे. (₹ कोटीत)

| अ. क्र. | खर्चाचे लेखाशीर्षक | २०२४-२५ | २०२३-२४ (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षकांना वेतन | ३.७५ | २.९१ |
| २ | कोराडी येथील देवी मंदिरात पुरवठा उभारणी चाचणी व कार्यान्वयन संरचनात्मक ग्लेझिंग बसविणे छताचे काम तसेच दर्शन बारी शेड उभारणीचे काम | ३.२८ | - |
| ३ | फेकरी निभोरे कपिलवस्ती आणि फुलगाव गावाचे पाणी शुल्क (आर्थिक वर्ष २३-२४ खापरी गावात आणि महादुला येथे (आर्थिक वर्ष २४-२५) | १.८१ | ०.०६ |
| ४ | कोराडी टिपीएस येथील तलावाचे सुशोभीकरण | ०.२१ | ५.२० |
| ५ | राष्ट्रीय शाळा.मैदानी खेळ | | ०.०५ |
| ६ | यात्री शेडचे बांधकाम | | १.८४ |
| | **एकूण** | **९.०५** | **१०.०६** |

**टिपा क्र. ४० आकस्मिक दायित्वे आणि बांधिलकी (एकत्रित)** (₹ कोटीत)

| १. | तपशील | ३१.०३.२५ रोजी | ३१.०३.२४ रोजी (पुनर्लिखित) |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ही सीआयएल, एसइसीएल, डब्लूसीएल आणि एमसीएल यांच्या व्याज दाव्यासाठी ₹ २५२३.१६ कोटी (मागील वर्षीचा व्याज दावा एसइसीएल, डब्लूसीएल आणि एमसीएल ₹ २५२३.१६ कोटी) इतकी संभाव्य देयता असू शकते. तसेच सिंगरेणीसाठी ₹ १०८.३८ कोटी (मागील वर्षी ₹ ७२.९१ कोटी) व्याज दावा, कामगिरी प्रोत्साहन ₹ ९०८.८६ कोटी (मागील वर्षी ₹ ८३९.६९ कोटी), शॉर्ट लिफ्टिंग ₹ १००१.८२ कोटी (मागील वर्षी ₹ १००१.८२ कोटी), डब्लूसीएल कडून दंड दावा ₹ २९.६२ कोटी (मागील वर्षी ₹ २९.६२ कोटी) आणि सिंगरेणीसाठी डेबिट नोट रिबेट रिव्हर्सल ₹ ४०.८१ कोटी (मागील वर्षी ₹ ४०.८१ कोटी) इतकी देयता आहे. एकूण संभाव्य देयता ₹ ४६१२.६५ कोटी (मागील वर्षी ₹ ४५०८.०१ कोटी<br>[टिप: महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने कोळसा कंपन्या व वॉशरी ऑपरेटर यांच्याकडे प्रतिदावे दाखल केले आहेत, जे कंपन्यांनी प्राप्ती म्हणून विचारात घेतलेले नाहीत. यामध्ये स्टोन क्लेम्स ₹ ५६.३ कोटी (मागील वर्षी ₹ ३७.०६ कोटी), एसआरएन क्लेम्स ₹ १००.८१ कोटी (मागील वर्षी ₹ १००.८१ कोटी), व्याज दावे ₹ २२०७ कोटी (मागील वर्षी ₹ ३६४७.४५ कोटी), जीसीडब्लुएल क्लेम्स ₹ १९९०.६८ कोटी (मागील वर्षी ₹ १८७१.९३ कोटी), ओलावा दावे ₹ २८१.५० कोटी (मागील वर्षी ₹ २८१.५० कोटी), शॉर्ट डिलिव्हरी ₹ २१५४.६५ कोटी (मागील वर्षी ₹ २१५४.६५ कोटी), ग्रेड स्लिपेजवरील रॉयल्टी, डीएमएफ व एनएमइटी ₹ ५९२.४० कोटी (मागील वर्षी ₹ ५७७.२२ कोटी), क्रेडिट नोट न मिळाल्याबाबत व्याज दावा ₹ २१२६.७३ कोटी, लम्पी कोळसा/क्रशिंग चार्जेसवरील क्रेडिट नोट ₹ ३७७.२२ कोटी (मागील वर्षी ₹ २६९.४० कोटी) यांचा समावेश आहे. एकूण प्रतिदावे ₹ ९८८७.२९ कोटी (मागील वर्षी ₹ ८९४०.०२ कोटी)] | ४,६१२.६५ | ४,५०८.०१ |
| २ | सिंचन विभागाकडून जास्त पाण्याबाबतचे शुल्क आणि स्थापत्य खर्च यांसाठी मागणीबाबतची आकस्मिक दायित्वे ₹ ६०४.८९ कोटी आहे, यापैकी पुस्तकांमध्ये तरतूद ₹ ९८.९३ कोटी आहे. त्यामुळे एकूण आकस्मिक दायित्वे ₹ ५०५.९६ कोटी आहे. (मागील वर्षी ₹ २६६.२३ कोटी) | ५०५.९६ | २६६.२३ |
| ३ | प्रकरण क्रमांक ८४/एमपी/२०२४ एमएसएलडीसी यांनी महानिर्मितीच्या स्थानकांना दिलेल्या वेळापत्रकातील विचलनासाठी व्हीईआरसी शुल्क आकारले असून त्यापैकी ३६५.४० कोटी रुपयांची बिले कोयना जलविद्युत केंद्राच्या विरुद्ध आकारलेले आहे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने या बिलिंग पद्धतीविरुद्ध माननीय आयोगासमोर दाखल करून आव्हान दिले आहे. पहिली ई-सुनावणी दि. १५.१०.२०२४ रोजी पार पडली असून पुढील ई-सुनावणीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. | ३६५.४० | ३६५.४० |
| ४ | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने पूरक डीएसएम बिलांबाबतच्या कार्यपद्धतीला आव्हान दिले आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ पासून आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एमएसएलडीसीकडे आकस्मिक दायित्व ₹ १९३.४३ कोटी आहे | १९३.४३ | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मे. सुनील हायटेक इंजिनिअर्स मर्यादित, नागपूर व महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्यात परळी युनिट-८ प्रकल्पातील बॅलन्स ऑफ प्लांट पॅकेजेस संदर्भातील नागरी, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन या करारातील विविध वादांबाबत मध्यस्थी प्रक्रिया सुरू आहे. या कराराची रक्कम ₹ ९५३.८६ कोटी (मागील वर्षी ₹ ९५३.८६ कोटी) इतकी आहे. अंतिम मध्यस्थी निर्णय दिनांक १०.०३.२०२३ रोजी जाहीर झाला असून, त्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने मे. सुनील हायटेक यांना ₹ १४४.७२ कोटी तसेच निर्णयाच्या दिनांकापासून (१०.०३.२०२३) अंतिम देयकापर्यंत ८% व्याज अदा करणे अपेक्षित आहे. अंतिम निर्णयाच्या मूल्यमापनासाठी ओ/एन प्रक्रिया सुरू आहे. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आला असून, तो ग्राह्य धरला गेला आहे. पुढील सुनावणी दिनांक १७.०४.२०२४ पासून प्रलंबित आहे<br>[टिप: महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने मे. सुनील हायटेक इंजिनिअर्स मर्यादित, नागपूर विरुद्ध परळी युनिट-८ प्रकल्पातील नागरी, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन या करारातील विविध वादांबाबत प्रतिदावे दाखल केले आहेत. एकूण प्रतिदावे ₹ १५३१.०५ कोटी (मागील वर्षी ₹ १५३१.०५ कोटी) इतके आहेत. यामध्ये सुनील हायटेक इंजिनिअर्स मर्यादित कडून वसुली ₹ २२४.२९ कोटी, प्रतिसादकाने सोसलेले तोटे ₹ ८१२.४० कोटी,<br>न वसूल झालेल्या रकमेसाठी वहन खर्च ₹ ७०.५६ कोटी व प्रतिसादकाने सोसलेला अतिरिक्त तोटा ₹ ४२३.८० कोटी यांचा समावेश आहे.] | १६९.६२ | १४४.७२ |
| ६ | न्यायमूर्ती. श्री. व्ही. जी. पळशीकर मुंबई यांच्याकडे लवाद क्र. ए. बी. एन/सी/क्र. ६३/२०१४ एकमेव लवाद न्यायाधीश, ॲड. राठोड एशियन नॅचरल रिसोर्सेस लि. (पूर्वीची मेसर्स भाटीया इंटरनॅशनल लि. इंदूर) विरुद्ध महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, मुख्य प्रलंबित विषय रेल्वे मालवाहतूक आकारातील बदल आणि १६ रेफ्री नमुने आणि सन २०१०-११ या वर्षातील आयात कोळसा कराराशी संबंधित विविध आर्थिक दावे आहेत.<br>याशिवाय, मेसर्स आव्या रिअल इस्टेट (एशियन नॅचरल रिसोर्सेस (इंडिया) मर्यादित), यांच्या वतीने श्री. अभिषेक नागोरी, लिक्विडेटर (मूळ दावा करणारे) आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्यात देखील मध्यस्थी सुरू आहे.<br>ही मध्यस्थी परदेशी उगमाच्या नॉन-कोकिंग (स्टीम) कोळशाच्या पुरवठ्याच्या देयकांबाबतच्या वादासंदर्भात असून, सदर कोळसा भुसावळ, चंद्रपूर व खापरखेडा औष्णिक वीज केंद्रांना पुरवठा करण्यात आला होता. हा पुरवठा सन २०१०-११ मधील करारांनुसार करण्यात आला होता<br>एकमेव लवादाधिकारी न्या. व्ही. जी. पळशीकर (सेवानिवृत्त) यांची दोन्ही बाजूच्या संमतीने १७.०४.२०१४ रोजी नियुक्ती झाली. दावे व प्रतिदावे दाखल करण्यात आले. सुनावणीची प्रक्रिया चालू आहे. दाव्याची रक्कम ₹ १२७.४५ कोटी (मा. वर्षी ₹ १२७.४८ कोटी) (एफएससी)<br>[टिप: महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने ३१.०१.२०१७ रोजी एशियन नॅचरल रिसोर्सेस मर्यादित (पूर्वीचे मेसर्स भाटिया इंटरनॅशनल लिमिटेड. इंदूर) कडे प्रतिदावे दाखल केले आहेत जे प्राप्त करण्यायोग्य मानले गेले नाहीत. प्रतिदाव्यामध्ये पुरवठ्याच्या कमतरतेमुळे एएफसी परवानगी रद्द करणे ₹ ४७.२६ कोटी, उष्णता दरात वाढ झाल्यामुळे होणारे नुकसान ₹ २३.०३ कोटी, सहाय्यक वीज वापरामुळे होणारे नुकसान ₹ २८.५५ कोटी आणि ३.०६ कोटी रुपयांचे नुकसान शुल्क समाविष्ट आहे. एकूण प्रतिदावा ₹ १०१.९० कोटी रुपये (मा. वर्षी ₹ १०१.९० कोटी)] | १२७.४५ | १२७.४५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | महालक्ष्मी इन्फ्रा प्रोजेक्ट मर्यादित पुणे या कंपनीचे आकस्मिक दायित्व ₹ ४०७.९९ कोटी अधिक व्याजाचे ₹ ४५.३८ कोटी असे एकूण ४५३.३७ कोटींचे आकस्मिक दायित्व उद्भवू शकते. (मागील वर्षी ₹ ३४५.७५ कोटी अधिक व्याजाचे ₹ ४५.३८ कोटी एकूण ₹ ३९१.१३ कोटी). याचा संबंध आरसीसी (लोअर) मून बॅरेजचे बांधकाम आणि संलग्न कामे म्हणजे रेडीयल गेट्स, स्टॉप लॉग गेट, गोलीएथ क्रेन आणि रोप ड्रम आरोहण इ. चे उत्पादन, पुरवठा, उभारणी, परिक्षण आणि कार्यान्वयन करणे, या कामांशी आहे. निविदा अटींनुसार मध्यस्थ न्यायाधिकरणातील सदस्यांची निवड करण्यासाठी एजन्सीकडून दावा रकमेची मागणी करण्यात आली आहे.<br>त्यावर लवाद संस्थेचे सदस्य, निविदांच्या अटीनुसार निर्णय करू शकतील. लवाद २०११-२०१४ रोजी, एकमेव लवाद सदस्य श्री. एस. पी. कुर्डूरकर यांनी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितला ५६ कोटी देण्याचा निर्णय दिला. याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले (संदर्भ क्र. ओएसएआरबीपी / ४६६ / २०१५). यासंदर्भात दावेदाराने अर्ज दाखल केला आहे (अर्ज क्र. ५२६० / २०१५). महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने श्री. एस. आर. नारगोळकर या नवीन अधिकाऱ्यांना नियुक्त केले. मुंबई उच्च न्यायालयाने पुढील कार्यवाहीसाठी श्री. ठक्कर यांची एकमेव मध्यस्थ म्हणून नियुक्ती केली आहे. उच्च न्यायालय आदेश दिनांक १६.१०.२०२० नुसार महानिर्मिती कंपनीने ₹ ५७ कोटी आणि बँक हमीचे ₹ ४८,४९,२८,६२८/- जमा केले. एकूण आकस्मिक दायित्व ₹ २८५.६४ कोटी (₹ ४०७.९९ + ₹ ४५.३८ - ₹ ५७-४८.४९ = ₹ ३४७.४९ कोटी). मध्यस्थीची कार्यवाही पूर्ण झाली असून अंतिम निकाल दिनांक ०१.०९.२०२३ रोजी घोषित करण्यात आला आहे. यासंदर्भात महानिर्मिती ₹ २५.४४ कोटी अधिक १४% वार्षिक व्याज यास्वरूपात भरावे असे लवादाने सांगितले आहे. या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. अंतिम सुनावणी १३.०२.२०२५ रोजी पूर्ण झाली आणि निकालाची वाट पाहत आहे. | १०६.७७ | १०६.७७ |
| ८ | वॉशरी ऑपरेटर (₹ ४१.८२ कोटी) आणि मेसर्स गुप्ता (₹ ३३.१५ कोटी) यांनी दाखल केलेल्या ₹ ७४.९७ कोटी रुपयांच्या प्रतिदावांसाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी आकस्मिकपणे जबाबदार असू शकते. (₹ ४१.८२ कोटी + ₹ ३३.१५ कोटी) | ७४.९७ | ७४.९७ |
| ९ | चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रासंबंधी जलसिंचन विभागाने पाण्याच्या रॉयल्टी शुल्काबाबत विवादित दावा ₹ ७४.७१ कोटी इतका केलेला आहे. (मागील वर्षी ₹ ८४.३६ कोटी इतका दावा होता) | ७४.७१ | ८४.३६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित आणि मे. टाटा प्रकल्प लि. यांच्यातील वाद लवादाकडे आहे. हा वाद भुसावळ २×५०० मे. वॅ. प्रकल्पासंबंधी आहे. मे. टाटा यांनी दीर्घ कालाचा खर्च, बँक हमी आकार, कार्यक्षमता हमीच्या परिक्षणांनुसार पैसे देणे आणि बँक हमीची जादा रक्कम आकारणी तसेच महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने केलेली वसूली चुकीची असल्याबद्दल आहेत. तसेच जादा काम व कंत्राटाच्या कामगिरीसाठी बँक हमी परत करण्याची मागणी केली आहे.<br>लवाद न्यायाधिकरणाने १६.०७.२०२२ रोजी निवाडा जाहीर केला आणि पुढील सुधारीत लवादाचा निवाडा ३०.०८.२०२२ रोजी प्राप्त झाला.<br>महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या वकिलाने २१.११.२०२२ रोजी माननीय उच्च न्यायालयात या निवाड्याला आव्हान दिले. वाणिज्यिक मध्यस्थी याचिका (लॉजिंग) क्र. ३७०५४/२०२२ दाखल करण्यात आली आहे. मे. टाटा प्रकल्प लि. यांनी कॅ नव्हेट दाखल केले आहे. अंतरिम अर्जही दाखल केलेला आहे. त्याचा क्रमांक आयए (एसटी) क्र. ३७१८४/ २०२२ हा आहे.<br>महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित अपेक्षित भार - प्रलंबित खर्च ₹ ४.८ कोटी - अतिरिक्त कामाचा खर्च ₹ ९.१५ कोटी - लवाद खर्च ₹ ०.११ कोटी - प्रत्यक्ष भरावे लागणारे बँक हमी शुल्क ₹ ३.६९ कोटी, चुकीच्या वसुलीसाठी परत करावी लागणारी राखीव रक्कम - ₹ १५.१९ कोटी आणि ₹ ९,९२, कोटी.<br>निवाद्यानुसार ₹ १८९ कोटी बँक हमी जारी केली आहे. तसेच ₹ ४६ कोटी मुंबई उच्च न्यायालयात ०४.०७.२०२३ रोजी जमा केले आहेत. आता हे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. एकूण ₹ ४६ कोटी (मागील वर्षी ₹ ४६ कोटी)<br>१२.०९.२०२३ पासून पुढील सुनावणी अद्याप निश्चित केलेली नाही. | ४६.०० | ४६.०० |
| **अ.** | **कंपनीच्या विरोधात इतर संकीर्ण दावे - मात्र त्यांना कर्ज अशी मान्यता नाही.** | **२३५.११** | **२७४.७६** |
| ११ | कंपनी ही नवीन प्रकल्पांच्या नागरी बांधकामावर (इमारत व अन्य बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम) अंतर्गत १% बी.ओ.सी.डब्ल्यू. उपकर न भरल्याबाबत आकस्मिक दायित्वाखाली आहे. सदर प्रकल्पांमध्ये कोराडी ३×६६० मेगावॅट प्रकल्प, चंद्रपूर २×५०० मेगावॅट प्रकल्प व परळी १×२५० मेगावॅट प्रकल्प यांचा समावेश आहे. | ५.९३ | ५.९३ |
| १२ | मे. अदानी एंटरप्रायजेस लिमिटेडने महागूज कोलायरीज मर्यादितच्या विरोधात लवाद प्रक्रिया सुरु केली आहे<br>लवाद न्यायाधिकरणाने २६.०३.२०२२ रोजी मेसर्स एईएलच्या बाजूने अंतिम निर्णय जाहीर केला असून त्यामध्ये ₹ १८३.१२ कोटींचा समावेश आहे. तसेच, आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत ₹ १३२.५० कोटी इतक्या व्याजाचा समावेश आहे.<br>अंतिम निवाडाला आव्हान २६.०३.२०२२ रोजी दिले आहे . एईएलने लवाद कार्यवाहीसाठी ₹ ५.८७ कोटी खर्च केले आहेत<br>मेसर्स एईएलला दिलेली संपूर्ण रक्कम ₹ ३२१.७७ कोटी इतकी आहे (म्हणजे ₹ १८३.१२ कोटी + आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंतचे ₹ १३२.५० कोटी व्याज + ₹ ५.८७ कोटी + ₹ ०.२८ कोटी). हे प्रकरण सुनावणीसाठी प्रलंबित आहे | १९३.०६ | १०९.८७ |
| १३ | मे. अदानी एंटरप्रायजेस लिमिटेडने (एईएल) म्हणजेच एमडीओने यु.सी.एम. कोल कंपनी मर्यादित विरुद्ध लवाद प्रक्रिया सुरु केलेली आहे. | २३.७४ | २३.४६ |
| १४ | युसीएम कोल कंपनी मर्यादित ही संयुक्त उपक्रम कंपनी असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ही मेसर्स अदानी एंटरप्रायझेस लिमिटेड (AEL) विरुद्ध ₹ ३.८० कोटी इतक्या रकमेबाबत आकस्मिक दायित्वाखाली येऊ शकते. | ३.८४ | ३.८० |

| | | | |
|---|---|---|---|
| **अ.** | **एकूण दावे** | **६,७३८.६४** | **६,१४१.७३** |
| १५ | कंपनीच्या मते वादग्रस्त व थकीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराच्या मागण्या | ३,७०७.०३ | २,९५७.३७ |
| १६ | कंपनीने वाढवलेल्या हमी | १,५००.२१ | १,५१४.४५ |
| **ब.** | **एकूण आकस्मिक दायित्वे** | **११,९४५.८८** | **१०,६१३.५५** |
| | टिप: अप्रत्यक्ष कर प्रकरणांकरिता देय रक्कम ₹ १२५.३७ कोटी आहे. त्यापैकी पूर्वजमा कर ₹ ७.८९ कोटी आहे. | | |
| **२.** | **भांडवली बांधिलकी** | | |
| **अ** | भांडवली खात्यात कार्यवाही करावयाची असलेल्या आणि तरतूद नसलेल्या कंत्राटाची अंदाजे किंमत | २,३१४.९८ | ३,६३३.६९ |
| **३** | **महत्वाच्या इतर बांधिलकी** | | |
| अ) | महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेल्या वीज विक्रीसाठी महावितरण या कंपनी सोबत करार केला आहे आणि जर हा करार मध्येच खंडीत केला नाही किंवा त्याची मुदत वाढविली नाही तर तो पंचवीस वर्षे अमलात राहील. | | |
| ब) | कंपनीला ५३.७६४ दशलक्ष मेट्रीक टन कोळशासाठी कोळसा लिंकेज मिळाले आहे. (यामध्ये ब्रीज लिंकेज व सामंजस्य करार समाविष्ट आहे) त्यानुसार महानिर्मिती कोळसा कंपन्यांकडून सवलती बाजारभावाने कोळसा घेण्यास बांधील आहे. | | |
| क) | कंपनीने गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लि. सोबत दि. ०५.०७.२०२६ पर्यंत ३.५ एमएमएससीएमडी इतका गॅस खरेदी व वाहतुकीचा करार केला. | | |

**टिपा क्र. ४१ अ मालमत्तेचे अवमूल्यन (एकत्रित)**

प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला, व्यवस्थापनाने मालमत्ता, कारखाने आणि साधने आणि सर्व आर्थिक मत्ता यांचे मूल्यांकन केले आणि त्यांच्यामध्ये कोणतीही हानी झाल्याची चिन्हे आहेत का याची तपासणी केली.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २५.०८.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयाद्वारे व दिनांक २४.०९.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाद्वारे, डब्ल्यू.पी. (क्रिमिनल) क्र. १२०/२०१२ तसेच इतर संबंधित प्रकरणांमध्ये, १९९३ पासून स्क्रीनिंग समितीमार्फत व शासन वितरण मार्गाने केलेल्या सर्व कोळसा खाणींच्या वाटपांना बेकायदेशीर ठरविले असून २०४ कोळसा खाणींचे वाटप रद्द केले आहे. याबाबत कोळसा मंत्रालयाने दिनांक ०१.१०.२०१४ रोजी आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या पत्राद्वारे माहिती दिली असून त्यामध्ये मच्छकाटा-महानदी कोळसा खाण देखील समाविष्ट आहे.

त्यानंतर, कोळसा मंत्रालयाने कोळसा खाणींच्या आधीच्या वाटपाकडून मूल्यांकनाचा तपशील मागविला होता आणि त्यानंतर मूल्यांकनाचा तपशील देखील प्रतिज्ञापत्रावर सादर करणे आवश्यक होते. कोळसा खाणीच्या विकासासंबंधीची ही माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्यात आली. ही माहिती कोळसा मंत्रालयाने मागविली कारण पूर्वीच्या वाटपधारकाकडून यशस्वी बोलीदाराकडे भूवैज्ञानिक अहवाल, खाण योजना, खाण बंद योजना इत्यादी दस्तऐवज व हक्क हस्तांतरित करण्याची यंत्रणा अस्तित्वात आहे.

कोळसा मंत्रालयाने मार्च २०१५ पासून स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे कोळसा खाणींचे पुनर्वाटप केलेल्या प्रकरणांमध्ये, पूर्वीच्या वाटपधारकांनी केलेल्या खर्चाचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया हाती घेतली आहे.

३१ मार्च २०२० पर्यंत मच्छकाटा - महानदी कोळसा खाण कोणत्याही बोलीदारास पुनर्वाटप करण्यात आलेली नाही आणि कंपनीला कोळसा मंत्रालयाकडून कंपनीने केलेल्या खर्चाच्या मूल्यांकनाबाबत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. या अनुषंगाने, व्यवस्था पनाचे मत असे आहे की कंपनीच्या कोणत्याही मालमत्तेचे अवमूल्यन करणे आवश्यक नाही.

आर्थिक वर्ष २०१४-१५ पर्यंत रू. ५४,४०,७०,१११/- इतका झालेला खर्च ताळेबंदात इतर चालू नसलेल्या मालमत्तांतर्गत दर्शविण्यात आला होता. या खर्चामध्ये प्रामुख्याने कंपनी स्थापनेचा खर्च, भूवैज्ञानिक अहवालाच्या खरेदीसाठी सीएमपीडीआयएलला देयक, वॉशबिलिटी टेस्ट रिपोर्ट, सल्लामसलत, कायदेशीर आणि व्यावसायिक शुल्क आणि कोळसा खाणीच्या विकासा साठी केलेले विविध परिचालन खर्च खर्च यांचा समावेश आहे. कंपनीचे असे मत आहे की मागील वर्षांत भूगर्भीय अहवालाच्या खरेदीसाठी केलेल्या खर्चाला खाण पायाभूत सुविधा खर्च म्हणू शकतो, ज्यादा दावा भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाकडे केला गेला आहे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने कोळसा खाण वाटप रद्द केल्यानंतर, कोळसा खाण (विशेष तरतूद) अध्यादेश २०१४ नुसार आधीच्या वाटपकर्त्यांना नुकसान भरपाईचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया सुरू केली, त्याला उत्तर देताना एमजीएलने कंपनीने केलेल्या खर्चाची माहिती

सादर केली. शिवाय एमओसीने आधीच्या वाटपकर्त्यांच्या खर्चाची मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली आहे ज्यामध्ये यशस्वी निविदाकारांना पुन्हा वाटप/निहित आदेश जारी करण्यात आले आहेत. मच्छकाटा कोल ब्लॉक अद्याप कोणत्याही निविदाकाराला देण्यात आलेला नसल्यामुळे, एमओसीने मूल्यांकनासाठी त्याचा विचार केलेला नाही. कोळसा खाणी (विशेष तरतूद) अध्यादेश, २०१४ मधील मूल्यांकन प्रक्रिया आणि तरतुदीनुसार कंपनी खर्चाची प्रतिभूती गुणवत्तेवर असू शकते. सध्या, खर्चासाठी खात्यात कोणतीही तरतूद केली जात नाही. ज्याता भरपाईसाठी एमओसीद्वारे विचार केला जाणार नाही. तथापि, एमओसीद्वारे मूल्यांकन प्रक्रियेस अंतिम रूप दिल्यानंतर खात्यांमध्ये आवश्यक समायोजन/तरतूद केली जाईल.

**टिपा क्र: ४२ अ विभाग अहवाल देणे (एकत्रित)**

**अ) भौगोलिक माहिती:**

कंपनीच्या उत्पन्न व दीर्घकालीन मालमत्तांचे विश्लेषण कंपनीच्या मूळ देशानुसार तसेच इतर देशांनुसार करण्यात आले आहे. भौगोलिक माहिती सादर करताना, विभागीय उत्पन्न हे ग्राहकांच्या भौगोलिक स्थानावर आधारित आहे, तर विभागीय मालमत्ता या संबंधित चालू नसलेल्या मत्तांच्या भौगोलिक स्थानावर आधारित आहेत. (₹ कोटीत)

| भूगोल | दि. ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी | दि. ३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी (पुनर्लिखित) |
|---|---|---|
| **१. महसूल** | | |
| भारतामध्ये | ३८,३३३.७७ | ३३,०८९.३१ |
| भारताबाहेर | निरंक | निरंक |
| **२. प्रमुख मोठ्या ग्राहकांची माहिती** | | |
| एकत्रित महसूल - प्रत्येक ग्राहक १० टक्के पेक्षा जास्त | | |
| भारत | | |
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित | ३७,१९२.९१ | ३२,३०६.९५ |
| भारताबाहेर | निरंक | निरंक |

**टिपा क्र. ४२ ब (एकत्रित)**

वित्तीय विवरण पत्रकाच्या विहीत मर्यादा खाली दिल्या आहेत.

| विहीत मर्यादांच्या बाबी | | मापनाचे एकक | विहित मर्यादा |
|---|---|---|---|
| मालमत्ता, कारखाना व साधने यांच्या व्याख्येनुसार असलेल्या सुट्या भागांचे भांडवलीकरण | वैयत्तिकरित्या | ₹ कोटीत | १०.०० |
| मागील वर्षाच्या आर्थिक अहवालांचे पुनर्निर्धारण करण्याच्या उद्देशाने निव्वळ मागील कालावधीतील बाबी | संचयी | ₹ कोटीत | ५०.०० |
| आकस्मिक दायित्वांचे प्रकटीकरण | वैयत्तिकरित्या | ₹ कोटीत | १.०० |
| भांडवली बांधिलकीचे प्रकटीकरण | वैयत्तिकरित्या | ₹ कोटीत | १.०० |
| ज्यांचा घसारा संपादन वर्षात १०० टक्के आहे अशा मत्ता ५००० पर्यंत आणि सर्व मोबाईल फोन्स | | ₹ कोटीत | १.०० |
| कर्जे व आगाऊ रक्कम / समभाग व वित्त उभारणीचा खर्च | वैयक्तिक कर्ज / समभाग | ₹ कोटीत | १.०० |
| मालमत्तेचा वापर करण्याचा हक्क व भाडेपट्टी दायित्वांची नोंदणी यास मान्यता देणे | | | |
| अ) वार्षिक भाडेपट्टी | प्रत्येक बाबतीस | ₹ कोटीत | १.०० |
| ब) संबंधित मत्तांचे मूल्य | प्रत्येक बाबतीस | ₹ कोटीत | १०.०० |

**टिपा क्र. ४३ अ**

**विलंबित भरणा अधिभारावर टिपा**

कंपनीने विलंबित भरणा अधिभार याची नोंद उद्योगमान्य पद्धतीनुसार लेखावहीमध्ये केली आहे. लेखांकन करताना महावितरणकडून आलेली विलंबित भरणा अधिभार रक्कम प्रथम विलंबित भरणा अधिभारासाठी आणि उर्वरित शिल्लक मूळ थकबाकीसाठी धरण्यात आली आहे. ही प्रक्रिया २०२०-२१ पर्यंत सातत्याने राबविण्यात आली असून ते महावितरणला विलंबित भरणा अधिभार बील देऊन नियमितपणे कळवण्यात आली आहे.

सन २०२१-२२ दरम्यान, भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या विलंबित भरणा अधिभार योजनेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितने व्यक्त केलेल्या तातडीच्या गरजेमुळे, ऊर्जा प्रधान सचिव व होल्डिंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितला निर्देश दिले की, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितने अवलंबिलेल्या पद्धतीनुसार थकबाकीची गणना करावी. या पद्धतीनुसार, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितकडून प्राप्त झालेल्या रकमेचे प्रथम विनियोग मूळ थकबाकीकडे आणि उर्वरित शिल्लक रक्कम विलंबित भरणा अधिभाराकडे करण्यात यावे, कारण हीच पद्धत विलंबित भरणा अधिभार योजनेत अवलंबावी लागणार होती.

विलंबित भरणा अधिभार योजनेत सहभागाच्या अंतिम तारखेपर्यंत महानिर्मिती आणि महावितरण यांच्यात शिल्लक आणि एकमताचा समेट होऊ शकला नाही. म्हणून महावितरणकडून थकबाकीबाबतची पद्धत सामंजस्य प्रक्रियेत सुरू असल्याची पुष्टी मिळाल्यावर महानिर्मितीने विलंबाने भरलेल्या अधिभाराची रक्कम सुधारित केली आहे.

वर्ष २०२२-२०२३ दरम्यान महानिर्मितीने निरीक्षण केले की महावितरण विलंबित भरणा अधिभार योजनेत निर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करत नाही. म्हणून कार्यपद्धतीची विसंगती म्हणून महानिर्मितीच्या व्यवस्थापनाने विवेकी औद्योगिक पद्धत अवलंब करून विलंबित भरणा अधिभार लावणे सुरू करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार २०२२-२३ या वर्षासाठी तसेच २०२१-२२ च्या शिलकीसाठी ज्यामध्ये कार्यपद्धतीतील बदल आणि विलंबित भरणा अधिभार नियमांच्या अटींचा अवलंब न केल्यामुळे कमी झाली, अश्या विलंबित भरणा शुल्काचे बिल वाढवले. हीच पद्धत पुढे चालू ठेवून, आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्येसुद्धा विलंबित भरणा अधिभाराची बिले तयार करून महावितरणला जारी करण्यात आली आहेत..

ह्याच पद्धतीनुसार आर्थिक वर्ष २०२४ -२५ मध्येसुद्धा विलंबित भरणा अधिभाराची बिले तयार करून महावितरणला जारी करण्यात आली आहेत.

कंपनीने सातत्याने अवलंबलेल्या पद्धतीनुसार, वर्षभरात कंपनीने महावितरणला ₹ ३१४९.८३ कोटी (मागील वर्षी ₹ २६७४.१८ कोटी) बिल करण्यासाठी विलंब भरणा अधिभाराची गणना केली आहे आणि ती बिल विनादेयक महसूल अंतर्गत नोंदवली आहेत.

३१ मार्च २०२५ रोजीच्या मागील वर्षामध्ये बिल केलेल्या विलंब भरणा अधिभाराच्या आधारे महावितरणने केलेल्या विलंब भरणा अधिभार आणि महानिर्मितीने दावा केलेल्या विलंब भरणा अधिभारामधील फरक १६,९९६.१९ कोटी आहे (मागील वर्षी ₹ १५,५९३.६३ कोटी) होता.

वरील व्यतिरिक्त, महावितरणने स्वीकारलेल्या आणि महानिर्मितीने दावा केलेल्या ऊर्जा आणि पूरक बिलांमधील फरक आणि महानिर्मितीने स्वीकारलेल्या मागील कालावधीच्या समायोजनाची रक्कम अनुक्रमे ₹ ३३८.०८ कोटी रुपये (मागील वर्ष ₹ ४२९.२५ कोटी) आणि ₹ १३७.६१ कोटी रुपये (मागील वर्ष ₹ १३७.६१ कोटी)

कंपनीने सातत्याने अवलंबलेल्या पद्धतीनुसार, महावितरणने मान्य केलेल्या वाढीव देयक मुदतीशिवाय वसूल करण्यायोग्य रक्कम चालू आर्थिक मालमत्तेअंतर्गत उघड केली आहे.

**टिपा क्र. ४३ ब**

१) कंपनीने आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये क्रिप्टो चलन किंवा आभासी चलनात कोणतेही व्यवहार किंवा गुंतवणूक केलेली नाही.

२) कंपनीकडे कोणतीही बेनामी मालमत्ता नाही. तसेच बेनामी मालमत्ता धारण करण्याबाबत कंपनीविरूद्ध कोणतीही कार्यवाही सुरू केली गेली नाही किंवा प्रलंबित नाही.

३) कंपनीकडे अशा प्रकारचा कोणताही व्यवहार नाही जो लेखापुस्तकात नोंदविलेला नाही व जो आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत कर मूल्यांकनामध्ये (जसे की शोध, सर्वेक्षण किंवा आयकर अधिनियम, १९६१ मधील इतर संबंधित तरतुदी) वर्षाच्या दरम्यान उत्पन्न म्हणून आत्मसमर्पित किंवा जाहीर केलेला आहे.

४) कंपनीकडे चालू व मागील आर्थिक वर्षात रद्द करण्यात आलेल्या कंपन्यांसोबत कोणतेही महत्त्वपूर्ण व्यवहार नाहीत.

५) कंपनीला कोणत्याही बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणत्याही कर्जदात्याने जाणीवपूर्वक थकबाकीदार (विलफुल डिफॉल्टर) म्हणून घोषित केलेले नाही.

**टिपा क्र. ४३ क**

महानिर्मिती कंपनी वित्तीय वर्ष २०१३-२०१४ पासून राज्याच्या वीज जाळयात रिॲक्टीव्ह वीज पुरवठा करत आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीने यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडे वित्तीय वर्ष २०२०-२०२१ पर्यंत १४३.५२ कोटीची वीज देयके सादर केली आहेत. पंरतु महाराष्ट्र विज नियामक आयोगाने त्यांच्या वीज दराच्या आदेशात म्हटले आहे की, भूतकाळात रिॲक्टीव्ह ऊर्जाचा समन्वय करण्याची यंत्रणा पूर्णपने अंमलात आणली नसल्याने, तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ यासह मागील वर्षातील समायोजनाची प्रक्रिया झाली आहे.त्यामुळे आयोगाने त्या कालावधीतील रिॲक्टीव्ह ऊर्जा आकारांना मान्यता दिलेली नाही. (वर्ष २०१८-१९ पर्यंतची) .कंपनीने चालू वर्षी (वित्तीय वर्ष २०२०-२१ पर्यंतच्या रिॲक्टीव्ह वीज आकार याच्या समतूल्य रक्कम) ₹ १४३.५२ कोटी इतकी बुडीत कर्जासाठी तरतूद केली आहे.मात्र वरील आदेशाविरोधात वीज विषयक अपील न्यायाधिकरणाकडे अपील दाखल केले आहे..

**टिपा क्र. ४३ ड**

कंपनीने १२/०७/२०२४ च्या संचालक मंडळाच्या ठराव क्रमांक २०२४/३८९८ नुसार, छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादितमधून भागधारक म्हणून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे आणि या प्रकरणाचा कायमचा निपटारा करण्यासाठी ₹ ४.३४ कोटी रुपयांची जबाबदारी फेडण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये, कंपनीने ही परतफेड केली आहे.. छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादितच्या संचालक मंडळावर कंपनीचा कोणताही प्रतिनिधी नाही. तथापि, कंपनीने ही गुंतवणूक विक्रीसाठी राखून ठेवलेली म्हणून वर्गीकृत केल्यामुळे, कंपनीने छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे मर्यादितची आर्थिक विवरणपत्रे आपल्या एकत्रित आर्थिक विवरणपत्रांमध्ये समाविष्ट केलेली नाहीत.

**टिपा क्र. ४३ इ**

मे. महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ मर्यादित (एमएसएमसी) सोबत महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने कोळसा लाभ आणि वितरण करार केलेला आहे. या कराराच्या व्याप्तीत एमएसएमसीने महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादितच्या वतीने कोळशा कंपन्यांनी जारी केलेल्या रिलीझ ऑर्डरनुसार खाण प्रधिकरणाकडून कच्च्या कोळशाची डिलिव्हरी घेणे, कच्च्या कोळशाची वॉशरीपर्यन्त वाहतूक करणे, विशिष्ट मापदंड मिळविण्यासाठी कच्च्या कोळशावर प्रक्रिया करणे / शुद्धीकरण करणे, लाभदायक कोळशाचे रेल्वे साईडिंगपर्यंत वाहतूक, फायदेशीर कोळसा रेल्वे वॅगन्समध्ये लोड करणे, आणि असा लाभदायक कोळसा नियुक्त केलेल्या औष्णिक वीज केंद्राना वितरित करणे याचा समावेश होतो. कच्च्या कोळशाच्या गुणवत्तेतील कमतरता भरून काढण्यासाठी आणि एमओडी (मेरिट ऑर्डर डिस्पॅच) संकल्पनेत राज्याच्या निर्मितीची मागणी पूर्ण करण्यासाठी सुधारित गुणवत्तेसह (जीसीव्ही आणि ॲश सामग्री) शुद्ध केलेला कोळशाचा वापर केला जातो तसे न झाल्यास गुणवत्ता आणि प्राणाणातील अपयशयामुळे वीज निर्मितीवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे एमएसएमसी तांत्रिक तपशीलानुसार (ॲश कंटेंट, माउस्टयुअर इ.) लाभार्थी कोळसा वितरीत करेल, असे न केल्यास करारामध्ये निर्दिष्ट केलेला दंड एमएसएमसीकडून वसूल केला जाईल. उच्च राख सामग्रीसाठी दंडाच्या कलमानुसार, राखेचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा वाढल्यास, एमएसएमसीला उत्पन्नातील फरकाच्या समतुल्य (म्हणजे सुधारित कॉरोस्पॉन्डन्स उत्पन्न आणि वाढीमुळे सुधारित मानक उत्पन्न यांच्यातील फरक) परतफेड करावी लागेल.त्यानुसार कंपनीने तृतीय पक्षांकडे असलेल्या कोळशाच्या साठ्याखाली अशा कोळशाच्या वसुलीचा हिशेब ठेवला आहे (टिपा क्र. ५ पहा). अशा कोळशाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | २०२४-२५ | | २०२३-२४ (पुनर्लिखित) | |
|---|---|---|---|---|
| | मेट्रिक टन मध्ये प्रमाण | (₹ कोटीत) | मेट्रिक टन मध्ये प्रमाण | (₹ कोटीत) |
| कच्चा कोळसा | २१.३२ लाख | ५७१.०० | १६.६६ लाख | ४५०.१५ |
| धुतलेल्या कोळशाच्या बाबतीत | १६.८२ लाख | | १३.५४ लाख | |

**टिपा क्र. ४३ फ**

देशांतर्गत कोळशाच्या उपलब्धतेतील कमतरता भरून काढण्यासाठी, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, ऊर्जा मंत्रालय , भारत सरकार ने, भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाकडून अपेक्षित वीज निर्मिती आणि अंदाजित कोळसा उत्पादनाच्या आधारे संपूर्ण भारतातील वीज कंपन्यांकडून आयात कोळशाच्या गरजेचे सूचक मूल्यांकन केले. त्यानुसार, भारत सरकारच्या मंत्रालयाने कंपनीसह विविध वीज कंपन्यांना कोळशाच्या आयातीसाठी तात्पुरते वार्षिक लक्ष्य दिले. ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितला जून, २०२४ पर्यंत वजनाने ६% मिश्रण आणि जुलै २०२४ ते ऑक्टोबर, २०२४ या कालावधीसाठी ४% मिश्रण करण्याचे लक्ष्य दिले. कंपनीने हे लक्ष्य प्रकल्प स्तरावर न घेता कंपनी स्तरावर स्वीकारले आहे.

**टिपा क्र. ४३ ग**

